रस धातु प्रकाश — Part II —

By Vaidya ~~?~~ पं. द. मुळे — Skt. Text with Comm. in मराठी ~~with~~ and quotations in Sanskrit

Amaravati, 1957.

~~30~~ 25

worm eaten pinholes in few middle pages in the lower portion damaging few letters and neatly repaired.

Bill No. 3/07-08

163.

2008-0329

163

Indira Gandhi National Centre for the Arts

Alliance Invited for

# रसधातु प्रकाश

रसशास्त्र विषयावरील अभिनव ग्रंथ

भाग २ रा

व

पंचकर्मयुक्त अनुभवी चिकित्सा विभाग


: लेखक :

वैद्य पं. दा. मुळे

—: आचार्य :—

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती.



Indira Gandhi National Centre for the Arts

1463

# ❋ रसधातु प्रकाश ❋

## रसशास्त्र विषयावरील अभिनव ग्रंथ

## भाग २ रा

व

## पंचकर्मयुक्त अनुभवी चिकित्सा विभाग

Indira Gandhi National
Centre for the Arts

: लेखक :

वैद्य पं. दा. मुळे
प्राचार्य, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती.

[redacted]

1463

: मुद्रक :

अनंत रघुनाथ चौधरी

(मालक, अनंत मुद्रणालय, अंबापेठ, अमरावती.)

MAR
540
MUL-T

DATA ENTERED
Date 23/06/08

: प्रकाशक :

वैद्य पं. दा. मुळे

प्राचार्य, विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती.

Indira Gandhi National
Centre for the Arts

KALANIDHI
Rare Book Collection
ACC No.: R-329
IGNCA Date: 25.5.08

(सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधिन)

जून ] प्रथमावृत्ति [ १९५७

## ★ वैद्य-पं. दा. मुळे ★

: प्रिन्सिपॉल :

वि. आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती.



विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाचे

संस्थापक व चालक.

**'रसधातुप्रकाश' ह्या ग्रंथाचे**

निर्माते (लेखक)

# * रसधातु प्रकाश *

## पंचकर्मयुक्त अनुभवी ] भाग २ रा [ चिकित्सा विभाग

### —: अनुक्रमणिका :—


| | अ. | पान नं. |
|---|---|---|
| ५८ रत्नोपरत्न विज्ञानीय | ५७ | ५५० |
| ५९ हिरा | ,, | ५५४ |
| ६० प्रवाळ | ,, | ५६२ |
| ६१ मोती | ,, | ५६७ |
| ६२ वैडूर्य | ,, | ५७३ |
| ६३ तार्क्ष्य | ,, | ५७५ |
| ६४ गोमेद | ,, | ५७७ |
| ६५ पद्मराग (माणिक) | ,, | ५७८ |
| ६६ निलम | ,, | ५८१ |
| ६७ पुष्पराग | ,, | ५८३ |
| ६८ राजावर्त | ,, | ५८५ |
| ६९ फिरोजा | ,, | ५८७ |
| ७० चंद्रकांत | ,, | ५८७ |
| ७१ सूर्यकांत | ,, | ५८९ |
| ७२ स्फटिक मणी | ,, | ५९१ |
| ७३ लाल | ,, | ५९२ |
| ७४ ब्रुज | ,, | ५९३ |
| ७५ यशज | ,, | ५९३ |
| ७६ याकुत | ,, | ,, |
| ७७ करविंद | ,, | ५९४ |
| ७८ शंख | ,, | ५९५ |
| ७९ कांचमणी | ,, | ६०० |
| ८० शुक्ति | ,, | ६०१ |
| ८१ विषवर्ग विज्ञानीय | ५८ | ६०५ |
| ८२ बचनाग | ,, | ६०७ |
| ८३ अफू ( अहिफेन ) | ,, | ६१२ |
| ८४ जेपाळ | ,, | ६१८ |
| ८५ धोत्रा | ,, | ६२२ |
| ८६ भांग | ,, | ६२५ |
| ८७ गुंजा | ,, | ६२७ |
| ८८ कुचला | ,, | ६३० |
| ८९ अर्कक्षीर | ,, | ६३४ |
| ९० स्नुहीक्षीर | ,, | ६३५ |
| ९१ करवीर | ,, | ६३६ |
| ९२ लांगली | ,, | ६३७ |
| ९३ भल्लातक | ,, | ६३९ |
| ९४ कृष्णसर्पविष | ,, | ६४१ |
| ९५ रसकर्पूर | ,, | ६४७ |
| ९६ अुपयुक्त द्रव्य विज्ञानीय | ५९ | ६४९ |
| ९७ गोदंती | ,, | ,, |
| ९८ मृगश्रृंग | ,, | ६५१ |
| ९९ गुग्गुळ | ,, | ६५२ |
| १०० हिंग | ,, | ६५६ |
| १०१ नाडीहिंग (डिकेमाली) | ,, | ६५७ |
| १०२ समुद्रफेस | ,, | ६५८ |
| १०३ खडू | ,, | ६६१ |
| १०४ चूर्ण (चुना) | ,, | ६६३ |
| १०५ सेंदुर | ,, | ६६४ |
| १०६ बोळ | ,, | ६६६ |
| १०७ कापूर | ,, | ६६७ |
| १०८ सिकता | ,, | ६६९ |

१०९ गोपीचंदन ५९ ६७०
१०९ (अ) शंखजीरक ,, ,,
११० दुग्धपाषाण ,, ६७१
१११ काळी माती ,, ,,
११२ पंक (कर्दम) ,, ६७२
११३ युनानी औषधें ६० ६७३
११४ गिले आरमानी ,, ६७३
११५ जंजार ,, ६७३
११६ गिले मख्तुम ,, ६७४
११७ सुर्मह सफेद ,, ६७४
११८ सिकता प्रधान योग ,, ६७५
११९ कौशेयाश्मा ,, ,,
१२० नागपाषाण जहर मोहरा ,, ,,
१२१ हुजल यहूद ,, ,,
१२२ हज्रल यहूदकी पिष्टी ,, ६७६
१२३ संगे यशद ,, ६७६
१२४ अकीक ,, ६७७
१२५ कहसबा ,, ६७७
१२६ क्षार विज्ञानीय ६१ ६७९
१२७ यवक्षार ,, ६८१
१२८ सज्जिखार ,, ६८५
१२९ टाकणखार ,, ६८८
१३० सोराखार ,, ६९३
१३१ अपामार्ग ,, ६९४
१३२ अर्कक्षार ,, ६९५
१३३ तिलक्षार ,, ६९६
१३४ स्नुहिक्षार ,, ६९८
१३५ पलाशक्षार ६१ ७००
१३६ चिंचक्षार ,, ,,
१३७ पापडखार ,, ७०२
१३८ लवण विज्ञानीय ६२ ७०३
१३९ सैंधव ,, ७०३
१४० नारीकेल लवण ,, ७०३
१४१ अर्क लवण ,, ७०४
१४२ बिडलोण ,, ७०५
१४३ सौवर्चल लवण ,, ७०६
१४४ रोमक ,, ७०७
१४५ समुद्रलवण (लवणक्षार) ,, ७०९
१४६ तैलपातन विज्ञानीय ६३ ७११
१४७ भूनागस त्वपातन विज्ञानीय ६४ ७१५
१४८ चरकाचे काळांत पारा, धातु, रत्नें यांचा उपयोग ६५ ७२०


**पंचकर्मयुक्त अनुभविक चिकित्सा विभाग**


१ प्रस्तावना १ ७३६
२ दोष विज्ञानीय २ ७४३
३ पंचकर्म चिकित्सा विज्ञानीय ३ ७४६
४ अन्नजल विज्ञानीय ४ ७६०
५ दोष चिकित्सा विज्ञानीय ५ ७६७
६ संचय प्रकोपादि दोषोपक्रमणीय ६ ७७३
७ रोगपरीक्षा विज्ञानीय ७ ७८०
८ पंचकर्मयुक्त रोग चिकित्सा ८ ७८३
९ कास चिकित्सा विभाग ९ ७९३
१० श्वास चिकित्सा प्रकरण १० ८१२
११ अतिसार चिकित्सा प्रकरण ११ ८२७
१२ संग्रहणी चिकित्सा प्रकरण १२ ८४६
१३ शूळ चिकित्सा प्रकरण १३ ८७१
१४ गुल्म चिकित्सा प्रकरण १४ ८८८
१५ उदर चिकित्सा प्रकरण १५ ९०४
१६ पांडुरोग चिकित्सा प्रकरण १६ ९३१
१७ शोथरोग चिकित्सा प्रकरण १७ ९५६
१८ अर्श चिकित्सा प्रकरण १८ ९७१
१९ राजयक्ष्मा चिकित्सा प्रकरण १९ ९८३
२० यकृत प्लिहा चिकित्सा प्रकरण २० १०१८
२१ वातरोग चिकित्सा प्रकरण २१ १०३४
२२ मांसार्बुद-रक्तार्बुद (कॅन्सर) चिकित्सा प्रकरण २२ १०६१
२३ बहुमूत्र चिकित्सा प्रकरण २३ १०७४
रोग व त्यावरील औषधें १०७८


----

# रत्नोपरत्न विज्ञानीय

## अध्याय ५७

### १ रत्नशब्दाची निरुक्ति

**मणयोऽपि च विज्ञेय: सूतबंधस्य कारका: ।**
**देहस्य धारका नृणां जराव्याधि विनाशका: ।।** आ. प्र.

सर्व प्रकारचीं रत्नें पाऱ्याला बांधणारें आहेत. तसेच ते मनुष्याच्या शरीराचे धारण करणारे व त्यांच्या व्याधि व वृद्धावस्था यांचें निवारण करणारें आहेत.

### २ रत्न हें नांव कसें पडले

**रमणीय नरंयस्माद्रमंतेऽस्मिन्नतीव वा ।**
**तस्माद्रत्नमिदंख्यातं शब्दशास्त्र विशारदै: ।।** भा. प्र.
**धनार्थिनो जना:सर्वे रमंतेऽस्मिन्नतीवयत् ।**
**अतो रत्नमिति प्रोक्तं शब्दशास्त्रविशारदै: ।।** आ. प्र.
**जातो जातो यदुत्कृष्टं तद्रत्नमभिधीयते ।**

जें दिसण्यांत अत्यंत रमणीय असते व ज्यामध्यें मन अत्यंत रममाण ( आल्हाद-दायक) होते, त्याला रत्न ही संज्ञा दिली आहे. तसेच धनाची इच्छा करणारे लोक ज्यामध्यें रममाण होतात. त्याला शास्त्रज्ञांनी रत्न ही संज्ञा दिली आहे.

रत्न या शब्दाची व्याख्या रघुवंश ग्रंथांच्या सोळाव्या अध्यायाच्या शेवटी मल्लीनाथानें टिकेमध्यें खालीलप्रमाणें केली आहे.

ज्या ज्या जातींत जें उत्कृष्ट म्हणजे सुन्दर असतें त्याला रत्न असें म्हणतात. जें जन्मताच सुंदर असून तो सुन्दरपणा कायम टिकाऊ राहतों त्याला रत्न असें म्हणतात.

### ३ रत्नाचें महत्त्व

रत्नावर पाणी आणि वायु यांचा प्रभाव फारच कमी प्रमाणांत होतों. याच कारणामुळे तीं रत्नें अनेक वर्षेपपर्यंत जसेच्या तसेंच चमकतात. रत्नें अनेक वर्षें धारण केली असतांनासुद्धां त्याच्यावर मलिनता किंवा कोणताहि कमीपणा दिसून येत नाही. कठीणपणांत हिरा हा व्यवहारांतील सर्व पदार्थांत श्रेष्ठ आहे. 'कुलिशं केनापि नो लिख्यते' हिऱ्यावर कोणत्याहि पदार्थाने लिहितां येत नाही. हिऱ्यामुळे सर्वच वस्तु खुरचटल्या जातात. रत्नामध्यें कठोरतेच्या दृष्टीने हिऱ्यानंतर माणिक, नील, पन्ना, चंद्रकांत व राजावर्त हे क्रमश: काठिण्याने कमी आहेत.

४ महारत्नें नऊ

मुक्ताफलं च वैडुर्यं हीरकं पद्मरागकम् ।
पुष्परागं च गोमेदं नीलं गारुत्मतं तथा ।
प्रवालं च तथैतानि महारत्नानिवै नव ॥ आ. प्र.

मोती वैडुर्य, हिरा, पद्मराग. (माणिक्य) पुष्पराग, गोमेद, नीलमणी, गारुत्मक ( पांच–मरकतमणी–ताक्ष्र्याचा एक प्रकार ) प्रवाळ हीं नवमहारत्नें होत.

५ उपरत्नें

वैक्रांतः सूर्यकांतश्च चंद्रकान्तस्तथैवच ।
राजावर्तो लालसंज्ञः पेरोजाख्यस्तथाऽपरः
मुक्ताशुक्तिस्तथा शंखः कर्पुराश्माऽथकाचजाः ।
मणयोनीलपीताद्या स्त्वन्ये विषहराश्च ये ॥
वन्ह्यादिरतभका ये च ते सर्वे हि परिक्षकैः ।
गणिताद्युपरत्नेषु मणयो लोकविश्रुताः ॥ आ. प्र.

वैक्रांत, सूर्यकांत, चंद्रकांत, राजावर्त, लालमणी, पेरोझ, शिंप, शंख, कर्पुराश्म, कांच, स्फटिकमणी. हीं सर्व उपरत्नें होत.

त्या शिवाय याकुतचुनडीबुज, यशम, तरमरी, कुरूविंद, मोरवावगिरी व कॅबे, हींहि उपरत्नें मानतात.

६ पांच श्रेष्ठ रत्नें

पद्मरागेंद्रनीलाख्यौ तथाच मरकतोत्तमः ।
पुष्परागः सवज्राख्यः पंचरत्न वराःस्मृताः ॥ र. र. स.

पद्राग, इंद्रनीलमणी, मरकतमणी, पुष्पराग व हिरा हीं पांच श्रेष्ठ रत्नें होत.

७ क्षुद्र रत्नें

वैक्रांतः सूर्यकांतश्च चंद्रकांतो नृपोपलः ।
पेरोजं स्फटिकंचैव क्षुद्ररत्नं गणोह्ययम् ॥

वैक्रांत, सूर्यकांत, चंद्रकांत, राजावर्त पेरोजक व स्फटिक हीं क्षुद्र रत्नें होत.

८ नवग्रहाला प्रिय रत्नें

माणिक्यमुक्ताफलविद्रुमाणि ताक्ष्र्यं च पुष्पं भिदुरंच नीलम् ।
गोमेदकं चाथ विदूरकं च क्रमेण रत्नानि नवग्रहाणाम् ॥

नवरत्नांपैकी माणिक हें सूर्याला प्रिय आहेत. मोती–चंद्राला, पोवळें–मंगळाला, पांच—बुधाला, पुष्पराग–गुरूला, हिरा–शुक्राला आणि नीलमणी–शनीला तसेंच गोमेद–राहुला, वैडुर्य रत्न केतुला प्रिय आहेत. अशीं हीं नऊ रत्नें क्रमानें नव ग्रहांना प्रिय आहेत.

९ रत्नाच्या अभावी उपरत्नें

रत्नादिना अलाभेतु ग्राह्यं तस्योपरत्नकम् ।
मौक्तिक स्याप्य भावेतु मुक्ताशुक्ति प्रयोजयेत् ।।

ज्या ठिकाणीं हिरा आदि रत्नें मिळणार नाहींत, त्या त्या ठिकाणीं त्या रत्नाचे जें उपरत्न असेल तेंच उपरत्न प्रयोगांत आणावें. मोत्याचे अभावी मौक्तिक शिपाचा उपयोग करावा. कारण रत्नाप्रमाणेंच उपरत्नांतहि तेच गुण असतात. विशेष फरक असा की रत्नाचें गुणापेक्षा उपरत्नांत ते गुण किंचित कमी असतात.

१० सर्व रत्नांची सर्वसाधारण शुद्धि

शुद्धि चरंति रत्नानी निंबमंतु तुषांबुनि ।
विशुध्यंति त्रिदिवसं विधृतानि च सर्वशः ।। र. र. स.

सर्व रत्नें निंबाचा रस व कांजी यांत तीन दिवस भिजत ठेवल्याने शुद्ध होतात.

स्वेदयेद्दोलिकायंत्रे, जयंत्या स्वरसेनच ।
मणिमुक्ताप्रवालानां यामैकं शोधनं भवेत् ।। र. च.

मणि, मोती, प्रवाळ हें टाकळी (जयन्ति) च्या स्वरसांत दोलायंत्रानें प्रहरभर शिजविली असतां ते शुद्ध होतात.

Indira Gandhi National Centre for the Arts

११ रत्नांची वेगवेगळी शुद्धि स्वेदन संबंधीं स्पष्टीकरण

शुध्यंत्यम्लेन माणिक्यं जयंत्या मौक्तिकं तथा ।
विद्रुमंक्षारवर्गेण ताक्ष्यं गोदुग्धकैस्तथा ।।
पुष्परागं च संधानैः कुलत्थक्वाथसंयुतैः ।
तंडुलीय जलैर्वज्रं नीलं नील रसेन च ।।
रोचनाभिश्च गोमेदं वैडुर्यं त्रिफला जलैः । र. र. स.
मुक्तादिष्व विशुद्धेषु न दोषःस्याच्चशास्त्रतः ।
तथापिगुणवृद्धिस्यात् शोधनेन विशेषतः ।। र. का. धे.

रत्नांच्या शुद्धिकरितां स्वेदनसंस्कार उत्तम तऱ्हेनें केला पाहिजे. रत्नाचें उत्तम रीतीने चूर्ण करून कपडचामध्यें त्याची उत्तम पुरचुंडी बांधून नव्या मडक्यामध्यें उक्त द्रव्यांचा स्वरस अथवा कषाय अर्धे भांडें भरेल एवढा प्रमाणांत टाकून त्यांत त्या पोटलीला लटकाऊन मंद आंचेवर उकळू द्यावे. या प्रमाणें एक प्रहर स्वेदन करावें. त्यांतील द्रव्यांश नाहीसा होण्यापूर्वीं त्यांत द्रव टाकीत जावा.

माणिकाचें स्वेदन आम्लरसामध्यें करावें लागतें. हा आम्लरस कांजी लिंबाचा रस, किंवा आम्ल वर्गांतील कोणत्याहि एका द्रव्याचा रस असूं शकतो. प्रवाळाकरितां क्षार वर्ग सांगितला आहे. त्यापैकी सज्जिखार, जवखार, टांकणखार, यापैकी कोणताहि

शरिराचें जे लहान तुकडे पडतात त्यांचें वैद्यानें भस्म करावें. अथवा रत्नांच्या खाणीं-तून त्यांच्याच जातीचें चांगल्या लक्षणांनी युक्त असें रत्नांचे लहान लहान तुकडे निघ-तात, तें घेऊन त्यांचेंच मारण करावें.

हिऱ्याच्या फलकावर प्रकाश किरणें पडलीं असतां त्यांतील कांही किरणें परा-वर्तीत होवून पहाणाऱ्याच्या डोळ्यांत पोहोचतात व शेष किरणें त्यांतून वर्तीत होऊन पहाणाऱ्याच्या नेत्रांत पोहोचतात. ह्या दोन प्रकारच्या प्रकाशित किरणांचा प्रवेश डोळ्यांत झाल्यानें हिरा अति भासूर अर्थात तेजःपुंज दिसतो.

## हिरा

### १ हिऱ्याचे पर्याय

१) हिरको हीरकं हीरमभेद्यं भिदुरं तथा ।
कुलिशं वज्रकं वज्रं तथोक्तं भार्गवप्रियम् ॥　　र. त
हीरक, वज्रमशिरं षट्कोण दृढगर्भकम् ।　　शा. नि.

हिरक, हीरकं, हीरम, अभेद्य. भिदुर, कुलिशं, वज्रकं. वज्रम्, भार्गवप्रीय, हे हिऱ्याचे पर्याय होत. त्याशिवाय वज्र, अशीर, षटकोण, दृढगर्भक, दधिच्यास्थि, सूची-मुख, वरारक, रत्नमुख, अभेद्य, दृढांग, चंद्रमणीवर असेहि पर्याय आले आहेत.

### २ भाषावार नांवें —

(हि ) हिरा, (बं) हिरे, (म.) हिरा, (गु.) हिरो, (फा.) इल्माश, (क.) वज्र. (तै.) वज्रं. (इं.) डाकमण्ड Daimond, (लॅ.) पिओर कार्बन एडम्स Pure Carbon Adams.

### हिऱ्याची घटना

यूरोपमध्यें १७१७ पर्यंत हिरा ही स्फटिक जातीच्या गारगोटीची एक जात समजत. ह्या वर्षी हिऱ्यांत सिकता नाही असें ठरलें. सूर्याचे किरण हिऱ्यावरून परत फिरतांना Refraction ( रिफरॅक्शन ) हा देखावा तेलावर दिसतो म्हणून दोहोंत एकच सत्य असले पाहिजे असा तर्क निघाला. साधारण भट्टींत हिरा जळत नाही. दोही बाजूस बाह्य गोल असलेल्या भिंगाने सूर्याचें किरण एका बिंदूत आणून त्यांत हिरा धरला तर तो जळतो. हिरा व माणिक एके ठिकाणीं ठेवलीं तर अशा उष्णतेने हिरा जळतो. परंतु माणिक तसेच रहाते. हिरा जळतो तेव्हां त्याचें भोवती ज्वाला दिसते. कोळसा जळून जीं द्रव्यें उद्भवतात तीच द्रव्यें हिरा जळून उद्भवतात. हें नंतर सिद्ध झाले. पदार्थ मूळ एकच आहे असे मानतात. द्रव्य एकच परंतु त्याचा आकार, देखावा, रंग, रूप वगैरे वेगळी. अशा द्रव्यास Allotrophy ॲलॉट्रापी बहुरूपी म्हणतात.

४ हिऱ्याचा रंग, काठिण्य व कांति–

**हिऱ्याचा रंग**–नेहमी पारदर्शक, विरळा हिरवा, पिवळा, तपकिरी, क्वचित् निळा व काळा.

**काठिण्य**–पृथ्वीवरील सर्व द्रव्यांत हिरा फार कठिण म्हणून त्यास तीक्ष्ण म्हटले आहे. हा निळास खरवडतो. वि. गु. ३·५.

**कांति**–ओळखता येण्यासारखी असामान्य. ह्याचे अंगावरून उजेड स्पष्टपणे परत फिरतो. हिऱ्याचे गुणधर्म सर्वच असामान्य आहेत; म्हणून त्यास वज्राकार, वज्रकांती, वज्रकाठिण्य हें विशेष इयत्ता दाखविणारे विशेषण लावतात व हें तुलनात्मक शब्द वापरतात.

५. हिऱ्याचें वैशिष्टय

**हिऱ्याचें वैशिष्टय**—हिरा जितका वजनतांत हलका तितका तो मौल्यवान समजल्या जातो. काठिण्यांत सर्व श्रेष्ठ आहे. कोणतीहि दुसरी वस्तु हिऱ्याला खरचटण्यास समर्थ नाही. हिरा मात्र सर्वच वस्तुला कापूं शकतो.

६ हिऱ्यात कार्बन तत्व–

रासायनीक दृष्टया हिरा हा कोळशाच्या जातीचा पदार्थ आहे. त्याच्यामध्यें कार्बन तत्वाशिवाय दुसरें कोणतेहि तत्व सांपडू शकत नाही. ज्याप्रमाणे कार्बन अर्थात कोळशाला हवेंत जाळले असतां कार्बन डॉय ऑक्साईड गॅस तयार होतो त्याचप्रमाणे हिऱ्याला तीक्ष्ण उष्णता देऊन हवेंत अथवा ऑक्सीजन गॅसमध्यें फुकुंन दिले असता कार्बन डॉय ऑक्साईड गॅस तयार होतो.

७ हिरा व कार्बन यांत फरक–

हिरा व कार्बन यामध्यें जे अंतर आहे ते केवळ हिऱ्याच्या जास्त घनत्वामुळे व जास्त काठिण्यामुळे आहे. अर्थात हिऱ्यामध्यें कार्बन व त्याचें परमाणू अधिक घन असे असतात.

८ उत्तम हिऱ्याचें लक्षण–

२) **स्निग्धं विद्युद्विभं स्वच्छ मलेख्यंच विलेखनम् ।**
**तीक्ष्णं षट्कोणमष्टास्त्रं जात्यं हीरक मुच्यते ॥** र. त.

हिरा हा स्निग्ध विद्युल्लतेप्रमाणे कांति असलेला, निर्मल व त्यावर दुसऱ्या कशाने लिहिले जात नाही किंवा रेघा पडत नाहीत, व ज्याने सर्व द्रव्यावर लिहिल्या जाते. तसेच तो तीक्ष्ण सहा कोण असलेला व अष्टपैलु असलेला असा हिरा जात्य ह्मणजे उत्तम जाणावा.

९ पुरुष जातीच्या हिऱ्याचे लक्षण–

अष्टास्त्रं वाष्टफलकं षट्कोण प्रतिभासुरम् ।
अंबुदेंद्र धनुर्वारित पुंवज्र मुच्यते ॥　　र. र. स.

अष्टकोणी किंवा अष्टपैलु तसेच षट्कोणी किंवा अष्टपैलु, अतिशय ते जस्वी मेघ, इंद्रधनुष्य किंवा पाणी यांच्यासारख्या रंगाचा व पाण्यावर तरणारा असा जो हिरा तो पुरुष जातीचा असे ह्मणतात.

१० स्त्री जातीच्या व नपुंसक जातीच्या हिऱ्याचे लक्षण–

तदेव चिपिटाकारं स्त्री वज्रंवर्तुलायतम् ।
वर्तुलं कुंठ कोणाग्रं किंचित् गुरुनपुंसकम् ॥　　र. र. स.

जो हिरा चापटसा, वाटोळा व विस्तृत असा असतो तो स्त्री जातीचा समजावा. तसेच जो हिरा वाटोळा ज्याच्या कोपऱ्यांची टोके बसकी आहेत असा व किंचित जड असा हिरा नपुंसक समजावा.

११ हिऱ्याचे पांच गुण (लक्षण)–

अच्छत्वं लघुता तथाष्टफलता षट्कोणता तीक्ष्णताऽ ।
ष्येतान् पंचगुणान् गृणति गुणिनो देवोपभोग्ये पवौ ॥　　आ. प्र. ४०८

आरशाप्रमाणे, कांचाप्रमाणे स्वच्छ, तुपाप्रमाणे हलका, अष्टकोणी, षट्कोणी, तीक्ष्ण हे पांच गुण बुद्धीमानांनी उत्तम हिऱ्याचे म्हणून सांगितलेले आहेत.

१२ हिऱ्याचे प्रकार–

वज्रं च त्रिविधं प्रोक्तं नरो नारी नपुंसकम् ।
पूर्वं पूर्व मिहश्रेष्टं रसवीर्य विपाक तः ॥

हिरा हा पुरुष, स्त्री व नपुंसक असा तीन प्रकारचा आहे. त्यापैकी पूर्वी पूर्वीचा म्हणजे नपुंसक हिऱ्यापेक्षा स्त्री जातीचा व त्याहून पुरुष जातीचा हिरा रसवीर्य व विपाकादींनी श्रेष्ठ आहे.

बिंदुः काकपदं यवः किल मलो रेखेति नाम्नो दिता ।
दोषाः पंच पवेरथात्र कथितो बिंदुः समो बिंदुना ॥
कृष्णो रक्त इति क्रमेण स पुनर्द्वेधा मतो वर्तुला ।
वार्ताकार भिदा ग्रही तुरफलः शस्तो न सर्वोऽपिसः ॥　　आ. प्र. ४०६

बिंदू (ज्या हिऱ्यावर पाण्याचें बिंदू बिंदूप्रमाणे दिसतात), काकपद (कावळ्याच्या पंजाप्रमाणे हिऱ्यावर आकृति दिसणें), यव ( जवाप्रमाणे हिऱ्यावर आकृति दिसणे ), मल ( आंतून व बाहेरून मलीन दिसणें ) व रेखा ( हिऱ्यावर लाल व पिवळ्या रेघा दिसणें ) हे हिऱ्याचे पांच दोष जाणावेत.

बिंदू दोन प्रकारचे काळा व लाल, त्याचेहि गोल व चपटा असे दोन प्रकार. आहेत. ज्या हिऱ्यावर सर्वत्र बारिक बारिक ठिपके असतात तो हिरा बिलकूल प्रशस्त नाही.

१३ हिऱ्याला कोणते दोष लागत नाहीत–

क्षेत्र तोय भवा दोषा रत्नेषु न लगंति ते ॥ र. र. स.

क्षेत्रसंबंधी व जलसंबंधी दोष रत्नाला लागत नाहीत.

१४ हि-यैाची अष्टविध परिक्षा–

उत्पत्तिर्गुणदोष जाति खनयो हस्तांगुली चालनं ।
मूल्यं मंडलिकेति रत्न दृषदां ज्ञानं वरं चाष्टधा ॥
अत्रैक प्रसरेण नोक्त मपि तत्तत्परिक्षा स्थल ।
श्लोकश्लोकित मेकशः खलु विदां कुर्वंति वैज्ञानिकाः ॥ आ. प्र.

उत्पत्ती, गुण, दोष, जाती, खाण, हातांची बोटें त्यावर फिरवून, त्याची किमत व मंडलीका ( रत्न परिक्षा करणारांची सभा ) हे आठ मार्ग रत्न परिक्षेचे सांगितले आहेत.

१५ हिऱ्याच्या शुद्धीचे प्रयोजन–

अशुद्धं कुरुते वज्रं कुष्ठं पार्श्व व्यथां तथा ।
पांडुतापं गुरुत्वंच तस्मात्संशोध्य मारयेत् ॥ आ. प्र.

अशुद्ध हिरा हा कुष्ट, पार्श्व वेदना, पांडूरोग, संताप व जडता उत्पन्न करतो म्हणून शुद्धीं करूनच त्याचे भस्म करावे.

१६ हिऱ्याची शुद्धी–

(१) व्याघ्रीकंद गतं वज्रं मृदालिप्तं पुटे पचेत् ।
अहोरात्रात्समुधृत्य हयमूत्रेण सेचयेत् ॥
वज्रीक्षीरेणवा सिच्येत् कुलिशं विमलं भवेत् ॥ भा. भै. र.

रिंगणीचा कंद आंतून पोकळ करून त्यांत हिरा ठेवावा. नंतर त्यावर दोन तीन अंगूळ मातीचा लेप करावा. आणि वाळवून गजपुटांत पचन करावें. एक दिवस व एक रात्र पचन झाल्यानंतर त्याला घोडयाच्या मूत्रांत किंवा निवडुंगाच्या दुधांत भिजविणें. ह्या विधीने हिरा शुद्ध होतो.

(२) पोट्टली मध्यगं भार्गवस्य प्रियं कोद्रव क्वाथतो दोलिका यंत्रके ॥
सप्तभिर्वासरैः स्वेदितं सन्ततं याति शुद्धि परां निश्चितं सत्वरम् ॥ र. त.

हिरा एका पोटलींत बांधून हरिकाच्या काढयांत दोला यंत्रानें सतत सात दिवस स्वेदन केला असतां उत्तम प्रकारें शुद्ध होतो.

(३) हीरकं परि संतप्तं सुधाक्षीरे निषेचितम् ।
शतवारं प्रयत्नेन शुद्धि माप्नोत्यसंशयम् ॥ र. त.

हिरा तापवून निवडुंगाच्या दुधांत विझवावा. याप्रमाणें शंभरवेळां तापवून प्रत्येक वेळीं त्या दुधांत विझवीत गेल्याने हिऱ्याची शुद्धि होते.

(४) हीरकं परि संतप्तं प्रखरानल योगतः ।
शतधा वापितं सूते शुद्धे शुद्धिमवाप्नुयात् ॥ र. त.

हिरा प्रखर अग्नींत तापवून शुध्द पाऱ्यांत टाकावा. यांप्रमाणें शंभर वेळां केल्यानें हिरा शद्ध होतो.

१७ हिऱ्याचें मारण–

(१) त्रिवर्षा रुढ कार्पासी मूल मादाय पेषयेत् ।
त्रिवर्षा नागवल्या वा बीजद्रावैः प्रपेषयेत् ।
तद्गोलके क्षिपेद्वज्रं रुध्वा गजपुटे पचेत् ।
एवं सप्त पुटैर्नूनं कौलिशं भस्म जायते ॥

तीन वर्षे होऊन गेलेल्या कपाशीच्या झाडाचीं मूळें आणून तीं तीन वर्षांच्या नागवेलीच्या बियांच्या काढयांत वाटावीं आणि त्यांच्या लगदीमध्यें हिरा घालून शराव संपुटांत ठेवून वर मुखमुद्रा करून त्यास गजपुट द्यावें. अशीं सात पुटें दिलीं असतां हिऱ्याचें भस्म होतें.

(२) हिरकं विमलं सूतं मृतं तु समभागिकम् ।
मनःशीलां गंधकंच समंदत्वा विमर्दयेत् ॥
संपुटस्थं तु पुटयेत् वाराणास्थे पुटेभृषम् ।
तावत्पुटे प्रयत्नेन यावन्नायाति पंचताम् ॥
द्वितीयादि पुटेष्वत्र सूतं न विनियोजयेत् ।
एवं चतुर्दशपुटैर्हीरकं म्रियते ध्रुवम् र. त.

शुद्ध केलेला हिरा घेवून त्यात तितक्याच वजनाचें पारदभस्म घालावे. व मनशीळ आणि गंधक प्रत्येकी पाऱ्याच्या वजना इतकेच घेवून सर्व एकत्र करून घोटावे. नंतर संपुटांत बंद करून रानगोवऱ्याचे गजपूट द्यावे. याप्रमाणे भस्म होईपर्यंत पुटें द्यावीत. दुसरें पुटापासून पारा घालू नये. चवदा पुटें दिली असतां हिऱ्याचें भस्म होते.

(३) हिरकं विमलं तालं तथा रोग शिला मला ।
समं समं समादाय खरखल्वे विमर्दयेत् ।
त्रिवर्षा रुढ कार्पास शिफा स्वरस योगतः ।
संपेष्य कामं यामैकं निदाघे परिशोषयेत् ॥

विशुष्कं संपुटे न्यस्य पुटयेत्तु महापुटे ।
एवंचतुर्दशपुटैर्हीरकं याति पंचताम् ॥ र. त.

शुद्ध केलेला हिरा, हरताळ व शुद्ध मनशीळ हें सर्व सामान वजनाचे घेवून मजबूत अशा खलांत टाकून घोटावे. नंतर त्यात तीन वर्षांचे कपासीचे झाड पाहून त्याचे मुळीचा रस काढून त्या खलांत टाकून एक प्रहरभर चांगले घोटावे. व नंतर ते उन्हांत वाळवावे. वाळल्यानंतर परळाचे संपुटांत बंद करून मातकापड करून रानगोवऱ्याचे महापुट द्यावे. याप्रमाणे चवदा पुटें दिली असतां हिऱ्याचें भस्म होते.

(४) कुलत्थ क्वाथ संयुक्त लकुच द्रव पिष्टया ।
शिलया लिप्त मूषायां वज्रं क्षिप्त्वा निरुध्य च ॥
अष्टवारं पुटेत्सम्यग्विशुष्कैश्च वनोपलैः ।
शतवारं ततो ध्मात्वा निक्षिप्त शुद्ध पारदे ॥
निश्चितं म्रियते वज्रं भस्म वारितरं भवेत् ॥ र. र. स.

शुद्ध मनशीळाला लिंबूचा रस मिश्रीत अशा हूलग्याच्या काढयांत घोटून त्याचा दोन्ही शरावाला आतल्या बाजूंनी लेप करावा व उन्हांत वाळवावे. वाळल्यानंतर त्यांत हिऱ्याला ठेवून संधिलेप करावा. मग तें संपुट वाळल्यानंतर रानगोवऱ्याचे पुट द्यावे. या प्रकारांनी आठ पुटें द्यावीत. ( प्रयेक पुटाचे वेळीं त्या शरावाला नवीन वरील लेप करावा. ) किंवा त्या हिऱ्याला तापवून तापवून १०० वेळ शुद्ध पारदांत विझवावे. ह्या विधीने हिऱ्याचे अवश्य वारीतर भस्म होते.

(५) हिंगुसैंधव संयुक्ते क्षिपेत्क्वाथे कुलत्थजे ।
तप्तं तप्तं पुनर्वज्रं भवेत्भस्म त्रिसप्तधा ॥ र. चं.

हिंग व सेंधलोण घातलेल्या हुलग्याच्या काढयांत हिरा तापवून ल.ल करून २१ वेळ विझवावा म्हणजे हिऱ्याचें भस्म होतें.

## १८ हिऱ्याचे गुण

१) सुमृतं हीरकं हृद्यं परमं षड्रसान्वितम् ।
योगवाही मतं चैतत् सर्वोत्कृष्ट रसायनम् ॥
राजयक्ष्मप्रशमनं मेहमेदो विनाशनम् । र. त
पांडुशोथोदरहरं तथा क्लैब्यहरं परम् ॥
चक्षुष्यो वान्तिकृत् पापालक्ष्मी नाशकरो धृतः ॥ शा, नि.
रुपसिद्धि जननं मृतवज्रं नाकलोक गमनं प्रतिभाति ।
तापकोप शमनं बलदंस्यादायुषः प्रचुरतां च करोति ॥ र. चं.

हिऱ्याचें भस्म हें त्रिदोष नाशक, षडरसयुक्त, अग्नि प्रदिप्त करणारे, योगवाही, शीत असून वमनकारक आहे. हें दाहनाशक असून हृदयाला हितकर, नेत्ररोगनाशक,

उत्तम प्रकारचें रसायन आहे. याचें सेवनानें क्षय, मेह, मेद, पांडुरोग, सूज, शोष, भ्रम, भगंदर, उदररोग हे रोग नाश पावतात. तसेच ते नपुंसकत्व नाशक आहे.

हें कांतीदायक स्वर्गसुखदायक, सर्वरोगनाशक व पापाचें क्षालन करणारें आहे.

## शरीर अवयवावरील परिणाम व गुण

हिऱ्याचें भस्म हें प्रबळ रोगवाही असें शक्तिवर्धक औषध आहे. तें चैतन्यवर्धक आहे. शरीरांतील धातु व अवयव यांची पोषणक्रिया सुधारून शरीराची शक्ति व मजबुती वाढविते. त्यामुळे सर्व रोगाचें निवारण होतें. हिरा हा वीर्याची जास्त प्रमाणांत उत्पत्ति करितो. हा ओषधी कार्यांत फारच उपयोगी आहे.

पांढऱ्या रंगाच्या हिऱ्याचें भस्म औषधी कर्मांत वापरण्यास फार पसंत करतात. लाल रंगाच्या हिऱ्याचें भस्म हें निरनिराळ्या रोगांत फार उपयोगी आहे व अकाली येणाऱ्या मृत्युचें तें निवारण करतें. पिवळ्या रंगाच्या हिऱ्याचें भस्म हें फार शक्तिवर्धक आहे. काळ्या रंगाच्या हिऱ्याचें भस्म हें निरनिराळ्या आजारावर फार फायदेशीर आहे.

इंडियन मटेरिया मेडिका ( डॉ. नाडकर्णी )

Indira Gandhi National Centre for the Arts

## १९ रत्नांची दृति

२) रामठं पंच लवणं क्षाराणां त्रितयं तथा ।
मांसद्रवोऽम्लवेतश्च चूलिका लवणं तथा ।
स्थूलं कुंभी फलं पक्वं तथा ज्वाला मुखी शुभा ।
द्रवंतीच रुदंतीच पयस्या चित्रमूलकम् ।।
दुग्धं स्नुह्या स्तथाऽर्कस्य सर्वं संमर्द्यं यत्नतः ।।
गोलं विधाय तन्मध्ये प्रक्षिपेत्तदनंतरम् ।।
गुणवन्नवरत्नानी जातिमन्ति शुभानिच ।
भूर्जे तं गोलकं कृत्वा सूत्रेणा ऽऽ वेष्टय यत्नतः ।।
पुनर्वस्त्रेण संवेष्ठच दोलायंत्रे निधायच ।
सर्वाम्लियुक्त संधान परिपूर्ण घटोपरे ।।
अहोरात्रं त्रयो यावत्स्वेदये त्तीव्र वन्हिना ।
तस्मादाहृत्य संक्षाल्य रत्नजां दृति माहरेत् ।। र. र. स.

हिंग, पंचलवणें ( संचळ, सैंधव, बिडलोण, औद्भिद, सोरा अगर टांकणखार, आणि मीठ ), त्रिक्षार ( सज्जीखार, यवक्षार, टाकणखार ), मांसरस, आम्लवेतसाचा रस, नवसागर मोठ्या कुंभ्याचें फळ, ज्वालामुखी ( बीबा ) द्रवंती, मोगली एरंड,

उन्दोरकानी रुदंती (रानहरबरा–खानदेशांत प्रसिद्ध दुधी,) चित्रकमूळ, त्रिधारी निवडुंगाचा चीक, रुईचा चीक हे सर्व एकत्र खलून त्याचा गोळा करून उत्तम गुणवान, जातीवंत आणि शुभकारक अशीं रत्नें त्या गोळयांत घालून तो गोळा भूर्ज पत्रांत गुंडाळून वर दोऱ्यानें वेष्टन करून पुन्हा त्यावर वस्त्राचें वेष्टन करून सर्व आम्लयुक्त कांजीने भरलेल्या डेऱ्यांत घालून दोलायंत्राने तीव्राग्नि देऊन तीन दिवस स्वेदन करावें. नंतर त्यांतून काढून स्वच्छ धुवावें म्हणजे रत्नांची दृति होते.

वर दिलेल्या औषधाच्या गोळयांत जर कोणतेंहि एक रत्न ठेवल्या गेलें तर त्या विशिष्ट रत्नाची दृति तयार होतें. जर संपूर्ण नऊ रत्न त्यांत ठेवल्या गेलें तर त्या सर्वांची मिश्र दृति तयार होते. या दृतींना तयार करून त्याचें स्वरूप आणि संघटन याबाबतींत रासायनिक दृष्टीने संशोधन करणें आवश्यक आहे.

२० हिऱ्याची दृती–

१) **वज्रवल्यंतरस्थं च कृत्वा वज्रं निरोधयेत् ।**
**अम्लभांड गतं स्वेद्यं सप्तहाद्रवतां व्रजेत् ॥** र. र. स.

वज्रवल्लीच्या ( सूर्यफुलवल्ली, आदित्यभक्ता ) लुगदीत ठेवून बळकट बांधून कांजी अगर आम्ल वर्गाचा रस भरलेल्या भांडयांत सात दिवस स्वेदन केला असतां हिऱ्याची दृती होते.

Indira Gandhi National Centre for the Arts

२१ हिऱ्याच्या भस्माची मात्रा–

२) **रक्तिकाया नेत्रगुण भागतस्तु कलांशकम् ।**
**मृतं हीरं प्रयुंजीत बलकालाद्यपेक्षया ॥**

हिऱ्याच्या भस्माचे पोटांत घेण्याचे प्रमाण (मात्रा) एक बत्तीसांश गुंजेपासून एक शोडशांश गुंजेपर्यंत ऋतुमान व रोग्याची शक्ती पाहून उपयोगांत आणावे.

२२ हीरकस्य मात्रा निर्माण प्रकार–

३) **रक्तिकैकमितं हीरं रम्ये खल्वे विनिक्षिपेत् ।**
**मेलयेत्रससिंदूरं चतुर्माषक संमितम् ॥**
**संपेष्य त्वति यत्नेन रसतंत्र विचक्षणः ॥**
**गुंजैकतः समारभ्य द्विगुंजं विनियोजयेत ॥** र. त. पा. २९५

हिऱ्याचे भस्म एक गुंज मजबुत अशा खलांत घालून त्यांत चार मासे रससिंदूर मिळवून घोटावे व ते मिश्रण काढून भरून ठेवावे. त्याचे पोटांत घेण्याचे प्रमाण एक गुंजेपासून सुरु करून दोन गुंजेपर्यंत वाढवावे.

२३ मृत हीरकस्य आमयिक प्रयोग–

हिऱ्याचे भस्म रससिंदुर मिसळून लोण्यातून सेवन केले असतां जुनाट नपुंसकत्व देखील तात्काळ नाहीसे होते.

हिऱ्याचें भस्म हें सुवर्ण भस्म व रससिंदुर मिळवून घेतले असतां फार वाढलेला असा राजयक्ष्मा रोग तात्काळ नाहीसा होतो.

हिऱ्याचें भस्म हें मकरध्वजा बरोबर सेवन केले असतां नपुंसकत्व व अशक्तपणा ताबडतोब नाहीसा होतो.

२४ वज्ररसायन-

वज्रभस्म ३० भाग, स्वर्ण भस्म १६ भाग, रौप्य भस्म ८ भाग, शुद्ध नाग भस्म ११ भाग, अभ्रक भस्म ४ भाग, सुवर्ण माक्षिक भस्म ८ भाग, वैक्रांत भस्म ६ भाग ह्या सर्वांना मिळवून आणि पुष्कळ घोटून ठेवून द्यावे. यथोक्त अनुपानासह या सर्वांचे योग्य प्रमाणांत सेवन केले तर मनुष्य सर्व रोगांपासून निवृत्त होवून त्याला दिव्य देहसिद्धी प्राप्त होते.

रसतरंगिणी

## प्रवाळ

१ प्रवाळाचीं नांवें

प्रवालकं प्रवालश्च भौमरत्नं च विद्रुमम् ।
आब्धिजन्तु विशेषोत्थं तदेव परिकीर्तितम् ॥१॥ र. त.

प्रवालोंगारक माणीर्विद्रुमोंभोदिपल्लवः ।
भोमरत्नं च रत्नांगो रत्नांगश्चलतामणिः ॥१॥ शा. नि.

प्रवालक, प्रवाळ, भौमरत्न, विद्रुम, आब्धिजन्तु, अंगारकमणी, अंभोदिपल्लव, भौमरत्न, रत्नांग, रक्तांग, लतामणी, रक्तकंद, रक्तकंदल, रक्ताकार ही प्रवाळाचीं पर्याय वाचक नांवें आहेत.

२ प्रवाळाचीं भाषावार नांवें

(सं.) प्रवाळ, (हिं.) मुंगा, (बं.) पला, (म.) पोवळें, (गु.) परवाल, (क.) अवलेवहन, (तै.) प्रवाल, पागडालु, (इं.) रेड कोरल, (लॅ.) कोरोलियं एब्रं, (फा.) मिरजान, वेख मिरजां, (अ.) एहेमखुसखुद, बेसेद, बुसुद, (इ.) मिर्जान, (पं.) मर्जान गुल्ली (ता.) प्रवालाम्. (मली) पोआलम्. करंज.

३ प्रवाळामध्यें असणारीं तीन तत्वें

स्थूल रासायनिक दृष्टया प्रवाळामध्यें कॅल्सियम कार्बन आणि ऑक्सिजन हें तीन तत्त्व असतात. याचें रासायनिक सूत्र कॅल्सियम कॉर्बोनेट ( $CaCo^3$ ) असे होते. कारण हे प्राणिज पदार्थ असल्या कारणाने त्याच्या थोड्या मात्रेंत सुद्धा दुसरीं तत्त्वें असतात. कारण प्रवाळाचे गुण संगमर्मराचे गुणापेक्षा अवश्य भिन्न असतात.

## ४ प्रवाळाची उत्पत्ति समुद्रांतील जलजंतूंपासून

प्रवाळाची उत्पत्ति समुद्रामध्यें जलजंतूंच्या द्वारें होतें. समुद्राच्या पाण्यामध्यें कांही अंश चुन्याचा असतो. हे जलजंतु आपली उपजिविका करण्याकरितां जेव्हां समुद्रांतील पाणी शोषून घेतात, तेव्हां त्यांच्या पोटांत चुन्याचा कांही अंश शोषित होतो आणि दिवसेंदिवस वाढत जातो. त्यांच्या शरीरांत जेव्हां चुन्याची मात्रा जास्त प्रमाणांत वाढत जाते तेव्हा ते जलजंतु मरतात. त्यांच्या मृत शरीरालाच प्रवाळ असें म्हणतात.

## ५ प्रवाळाच्या उत्पत्तीची स्थानें

युरोप आणि आफ्रिका यांच्यामध्यें भूमध्य समुद्रांत ब्रम्हदेशाच्या दक्षिण समुद्रांत आणि आस्ट्रेलियाच्या उत्तर समुद्रांत शेकडो मैल लांब आणि रुंदीचे खडक समुद्रांत या जलजंतूंनी केलें आहे. आणि त्यांचें हें काम फार जोराने सुरू असतें. लाखो वर्षांपासून यांचें काम सुरू आहे. आणि याच प्रकाराने या जतूंनी समुद्र आणि महासागर यांच्यामध्यें विस्तृत पहाड आणि प्रवाळाचे मोठमोठे खडक बनविलें आहेत. तांबडा समुद्र, पर्शियन, अरेबियन गल्फ, मेडिटरेनिअन समुद्र, अटलांटिक महासागर या ठिकाणीं पोवळयांची उत्पत्ति होते.

Indira Gandhi National
Centre for the Arts

## ६ पांढरा, काळा व लाल रंगाचा प्रवाळ मिळण्याचीं स्थानें

प्रवाळ बहुतेक पांढरा, मळकट, काळा आणि लाल रंगाचा असतो पांढरा आणि मळकट रंगाच्या प्रवाळाला कोणीहि विचारीत नाही. विशेषेकरून याच रंगाचा प्रवाळ सर्वत्र सांपडतो. काळया रंगाचा प्रवाळ इराणाच्या आखातांत गुलाबी आणि लाल रंगाचा प्रवाळ भूमध्य समुद्रांत सांपडतो. गोलाकार, व्रणरहित, गलाबी अथवा लाल रंगाचे प्रवाळ यांची गणना रत्नामध्यें होते. आयुर्वेददृष्टया उत्तम आणि मध्यम प्रवाळाचें लक्षण वर दिलेलें आहे.

## ७ प्रवाळाची झुडपें

दिसण्यांत ती लहान झुडपाप्रमाणें अपून उलट बाजूनें लोंबकळत असलेलीं दिसतात. तें लांबट, गोल, कांडेदार तुकडें असें दिसत असून त्यांचा रंग विटकरीप्रमाणें लाल असतो. बारीक पण पुष्कळ तुकडे (कांडे) एकमेकाला एकापुढे एक असें लागलेले असतात. त्याचा उदाप्रमाणें धूप येतो. हीं कांडी तोडलीं असतां आवाज होतो. पोवळयाची वेल जेव्हां कोवळया स्थितींत असते, तेव्हां कांडें (जोड) आणि फांद्या यावर एक प्रकारच्या सालीचें आच्छादन असते. तें आच्छादन फारच नरम लहान लहान तंतूचें एक घरच होय.

८ घटकद्रव्यें व उपयुक्त भाग

सेंद्रिय पदार्थ ८ परसेंट कॅर्बानेट ऑफ लाइम (चुना) ४३ परसेंट मॅग्नेशियम कॅर्बोनेट ३·५ परसेंट ऑक्साइड ऑफ आयर्न ४·५ परसेंट व लोह.

प्रवाळांतील लाल रंग हा प्रवाळाच्या घटक द्रव्यांत असलेल्या लोहामुळे असतो.

उपयुक्त भाग–चुन्याच्या धर्माच्या असलेल्या लांब कांड्या ह्या औषधी कामांत उपयोगी आहेत.

९ प्रवाळाची वेल व तिचें लक्षण

१) बालार्क किरणरक्ता सागर सलिलोद्भवाच जलतापा ।
न त्यजति निजांरुचिं निकषे घृष्टापि सामृता जात्या ।।
पक्व बिंबफलच्छायं वृत्तायतमवक्रकम् ।
निग्धमव्रणकं स्थूलं प्रवालं सप्तधास्मृतम् ।।                    शा. नि.

समुद्रांत बालसूर्याच्या किरणांसारखी प्रवाळाची वेल उत्पन्न होते. ती वेल कसोटीवर घासली असतां स्वतःची कांती व रंग सोडत नाही. त्याचप्रमाणें अमृता-सारखी गुणकारी आहे. पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें लाल, गोल, लांब, सरळ, स्निग्ध, व्रणरहित अशी सात प्रकारची वेल उत्तम असते.

Indira Gandhi National
Centre for the Arts

१० ग्राह्य प्रवाळाचें लक्षण

२) आरक्त मंजुलच्छायं स्निग्धं वृत्तंच्च निर्व्रणम् ।
दीर्घं स्थूलं गुरु दृढं ग्राह्यं विद्रुममुच्चते ।।                    र. त.

जे प्रवाळ लाल असून ज्याची कांती अल्हादकारक आहे आणि जें स्निग्ध, वाटोळे, छिद्र नसलेले असून जाड असलेलें, जड व मजबूत अशा प्रवाळाला ग्राह्य असें समजावें.

११ अयोग्य प्रवाळाचे लक्षण

३) पांडुरं धूसरं सव्रणं कोटराचितम् ।
निर्भारं शुभ्र वर्णंच प्रवालं नेष्यतेष्टधा ।।                    र. र. स.

पांढरें, धुरकट रंगाचें, सूक्ष्म, छिद्रयुक्त, शिरायुक्त हलकें व शुभ्रवर्ण असें आठ प्रकारचे पोवळे अयोग्य समजावें.

१२ प्रवाळ शुद्धी

४) जयंत्या स्वरसे नेह दोलायंत्रे तु विद्रुमम् ।
यामैकं सुपरि स्विन्नं शुद्धि मायात्यप्रुत्तमाम् ।।                    त. र.

प्रवाळ हें जयंतीच्या स्वरसांत दोलायंत्राच्या पद्धतीनें एक प्रहरभर शिजविलें असतां उत्तम प्रकारें शुद्ध होतें.

सर्जिका क्षार संयुक्ते सलिले परि पाचितम् ।
यामैकेन प्रवालं तु शुद्धिमायात्यनुत्तमम् ॥ र. त.

पाण्यांत सर्जिका क्षार घालून दोलायंत्रांत एक प्रहरभर प्रवाळ शिजविलें असतां उत्तम प्रकारें शुद्ध होतो.

तंडुलीय द्रवेणेह दोलायंत्रं तु यामकम् ।
प्रवालकं परिस्विन्नं शुद्धिमायात्यनुत्तमाम् ॥ र. त.

प्रवाळ तांदुळजाच्या रसांत दोलायंत्रांत शिजविलें असतां शुद्ध होतो.

१३ प्रवाळ मारण

५) विशोधितं विद्रुमं तु श्लक्ष्ण चूर्णं तु कारयेत् ।
कन्यांभसाऽथ संपेष्य शोषयेत् कृतचक्रिकाम् ॥
संपुटस्थं तथा कृत्वा त्रिवारं पुटयेद्भिषक् ।
एवं पुटत्रयैर्भस्म जायते शशिसुंदरम् ॥ र. त.

शुद्ध प्रवाळाचें चूर्ण करून कोरफडीच्या रसांत घोटावें. नंतर त्याच्या वड्या करून सुकवाव्या. नंतर त्या परळांत घालून संपुट करून गजपुट द्यावें. याप्रमाणें तीन पुटें दिलीं असतां प्रवाळाचें भस्म होतें.

विद्रुमं गव्य दुग्धेन संपष्य कृत चक्रिकम् ।
म्रियते पुटितं भस्म जायतेऽति मनोहरम् ॥ र त.

शुद्ध प्रवाळ गाईच्या दुधांत घोटून त्याच्या चकत्या तयार कराव्या. सुकल्यावर परळांत घालून मातकापड करून गजपुट द्यावें. म्हणजे भस्म तयार होतें.

जयंत्याः स्वरसेनेह संपेष्य कृत चक्रिकम् ।
त्रिवारं पुटितं सम्यक् विद्रुमं म्रियते ध्रुवम् ॥ र. त.

शुद्ध प्रवाळ जयंतीच्या रसांत घोटून त्याच्या वड्या तयार कराव्या. सुकल्यावर तीन गजपुटें द्यावीं. म्हणजे प्रवाळाचें उत्तम भस्म होतें.

प्रवाळभस्म

१) पिष्ठं वरी रसेनेह संपेश्यकृत चक्रिकम् ।
त्रिवारं पुटितं सम्यक् विद्रुमं म्रियते धृवम् ॥

शुद्ध प्रवाळ शतावरीच्या रसांत घोटून वड्या करून गजपुट द्यावें. म्हणजे प्रवाळाचें भस्म होतें.

कुमारी तंडुलीयेन स्तन्येनच वपाचयेत् ।
प्रत्येकं सप्तवेलंतत्तप्तं तप्तंच कृत्स्नशः ॥
उक्त माक्षीकवन्मुक्ता प्रवालानिच मारयेत् ॥ र. चं.

मोती व पोवळे तापवून कोरफडीचा रस, तांदुळजाचा रस व स्त्री दुग्ध ह्यामध्ये क्रमाने सात सात वेळ बुडवावे म्हणजे त्याचे भस्म होते. सुवर्ण माक्षिकाच्या भस्माच्या विधीप्रमाणे केले असतांना सुद्धा मोती व पोवळी यांचे भस्म होते.

## १४ प्रवाळ भस्माचे गुण

२) विद्रुमं क्षुमृतं क्षारं मधुरं लघु शीतलम् ।
दीपनं पाचनं चैव दृष्टीरोग निषूदनम् ॥
त्रिदोष शमनं बल्यं विशेयात्कफ वातनुत् ।
क्षयकास हरं चैव रक्तपित्त प्रणाशनम् ॥
स्वेदाति निर्गमहरं रात्रि स्वेद हरं परम् ।
विषघ्नं भूतशमनं वीर्यवर्ण विवर्द्धनम् ॥　　र. त.
क्षय पांडु ज्वर, श्वास, कास मेदोगदांजयेत् ॥　　शा. नि.

प्रवाळ भस्म हें क्षारीय असून मधुर, हलके, थंड, अग्निदिपक, पाचक, दृष्टीरोग नाशक, त्रिदोष, शामक, बल्य विशेषे करून कफवात नाशक, क्षय, कास नाशक, रक्तपित्त शामक, पांडु, ज्वर, श्वास, मेदोरोग यांचा नाश करणारे, अती घाम जात असल्यास तो बंद करणारे, रात्री येणारा घाम बंद करणारे, विष व भूतबाधा नाशक,तसेच वीर्य, व कांति यांना वाढविणारे आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

गुण विशेष—प्रवाळमधील लालरंग हा लोहाच्या अंशामुळे आलेला असतो व त्यातील पांढरा भाग हा चुन्याचा अंश होय. त्यामुळे रक्तक्षय व अशक्तता यावर तो फार उपयोगी आहे. तसेच त्यांतील चुन्याच्या अंशामुळे अस्थिक्षयावर तसेंच यकृत वृद्धिवर उत्तम गुण देते.

कफ, क्षय, दमा, जीर्णज्वर, लघ्वीचे विकार, स्वप्नावस्था, गरमीचा रोग, गंडमाळा, डोके दुखणे, भोवळ चक्कर, अंधारी येणे यांवर प्रवाळ भस्माचा उत्तम उपयोग होतो. तसेच ज्ञानतंतूला ते उत्तम शक्ति देणारे आहे.

प्रवाळामधील चुन्याचा अंश प्राण्याच्या शरीरांत रक्तामध्यें लवकरच मिसळून जातो. आणि शरीरातील कॅल्सियम नांवाच्या तत्वाची जी निपुर असते ती लवकरच भरून येते.

## १५ प्रवाळ मंजरीचे गुण

३) प्रवाल मंजरी सार्द्रा काम पुष्टि करी नृणाम् ।
सेविता सततं देहे वीर्यस्तंभ करोतिच ॥　　शा. नि.

प्रवाळ मंजरी ही मनुष्याला काम आणि पुष्टी देणारी आहे. निरंतर सेवन केल्यास वीर्य स्तंभक आहे.

# मोती

## १ मोत्याचे पर्याय

मौक्तिकं, शुक्तिजं मुक्ता, शौक्तिकेयं शशीप्रभम् ।
अम्भः सारंभिदुरत्नं लक्ष्मीमुक्ता फलंहिमम् ॥ शा. नि.

मौक्तिक, शुक्तिज, मुक्ता. शौक्तिकेय, शशिप्रभ, अम्भसार, इंदुरत्न. मुक्ताफल, हिम तसेच शुक्तिमणी, हिमबल, सुधांशु रत्न, हैमवत, भूरुह, शशिरत्न ही मोत्याची नांवे आहे.

## २ मौक्तिकाचीं भाषावार नांवें

(सं) मुक्ता, (हि) मोती, (बं) मुक्ता, (म) मोती, (गु.) मोती, (क) मौक्तिक (तै) मोत्यालु, (इं) पर्ल, (लै) मार्गरीटा, (फा) मरवारीद (अ) लोलो.

## ३ मोत्याची घटना व त्यांतील तीन तत्वांची नांवें

मोत्याला इंग्रजींत पर्ल ( Pearl ) असें म्हणतात. रासायनिक दृष्टया यांत मुख्यत्वें करून कॅल्सियम, कार्बन, आणि ऑक्सीजन हीं तीन तत्वें सापडतात.

## ४ मोत्याचे रासायनिक सूत्र

याचें रासायनिक सूत्र Ca Co3असें आहे. यामध्यें थोडया प्रमाणांत कांही दुसऱ्या तत्वाचें अस्तित्व असल्या कारणानें त्या पासून उत्तम तऱ्हेचा गुण येतो. वास्तविक शंख, शिप, संगमरवर आणि मोती हे सर्व पदार्थ कॅल्सियम कार्बोनेटच्या जातीचीं आहेत. परंतु यात थोडी थोडी विशेषता असल्याकारणाने त्याच्या औषधीय गुणांत भिन्नपणा दिसून येतो.

## ५ मोत्याचीं उत्पत्तिस्थानें

चांगले मोती इराणच्या आखातात, लंका, काठेवाडांत, जामनगर, रामेश्वरच्या, जवळ मिनारच्या आखातांत सापडतात. ब्रम्हदेशांत मुंगई जिल्हा येथे मोती उत्पन्न होतात.

दोन्ही शिंपाच्या मध्यभागीं जो कीडा असतो त्याच्या वरच्या त्वचेपासून एक प्रकारचा स्राव निघतो. त्या स्रावापासून दोन्ही शिंपामधील चमकणारा भाग नेहमी होत राहतो. केव्हां केव्हां त्वचा आणि झांकण यांच्या मध्यें कोणत्या प्रकारचे सूक्ष्म कण कोणत्याहि प्रकाराने आल्यास त्या कणाच्या वर स्रावाचे पृथकपृथक पुष्कळ थर जमतात. हे थर दोन प्रकारच्या श्रावाचे बनतात, एक प्रकारचा द्रव वाळल्यावर संगमरवरी दगडाप्रमाणे तयार होते. अर्थात् हा रासायनिक दृष्टया कॅल्सियम कार्बोनेट होतो. दुसऱ्या प्रकारच्या द्रावकांची आलीन या नांवाचा होतो. याचें रासायनिक सूत्र C 30 H 48 N 20॥

### ६ मोती सुंदर कां दिसतात?

या थरावर प्रकाश किरणें पडल्यावर कांही किरणें पहिल्या थरावरूनच परावर्तित होऊन पाहणाऱ्याच्या डोळयांत प्रविष्ट होतात. राहिलेलीं शेष किरणें पहिल्या पडद्याला पार करून दुसऱ्याच्या पटलावर जातात. यांतूनहि कांही किरणें परावर्तित होतात. आणि राहिलेलीं किरणें तिसऱ्या पटलावर जावून पोहोचतात. याप्रमाणे अनेक किरणांवर जाऊन परावर्तित झालेलीं किरणें पाहणाऱ्याला फारच सुन्दर दिसतात. आणि म्हणूनच मोती सर्वांना फार सुंदर वाटतो.

### ७ मोती वाकडें, अपारदर्शक व दोषयुक्त कां दिसतात?

या प्रकाश किरणांच्या खेळामध्यें मोत्याचे जितके अधिक पटल भाग घेतात, तितके ते मोती अधिक सुंदर दिसतात. या पटलामध्यें चुकून एखादा अपारदर्शक पदार्थ आला असतांना मोती वाकडा तिकडा, अपारदर्शक, दोषयुक्त असा होतो.

### ८ कल्चर मोती कुठे बनतात? तयार करण्याची कृति.

आजकाल चीन आणि जपानमध्यें कल्चर मोती तयार होतात. या क्रियेमध्यें मोत्याच्या शिंपीला पहिले उघडून तींत बाहेरील मुक्ताशुक्तीचे सूक्ष्म रजःकण प्रविष्ट करवितात. आणि या प्रविष्ट कणावर मोत्याच्या शिपीमधील किट्ट आपल्या स्रावांच्या पटलांच्या स्तरांना बनवून मोती तयार करतो. याप्रमाणे कणांना प्रविष्ट केलेल्या प्रत्येक शिंपीमध्यें मोती तयार होतात. हे मोती चांगलेहि असतात. आणि थोडया वेळांत तयार होतात. आणि याच कारणामुळे मोत्यांची उत्पत्ति अधिक प्रमाणांत वाढली आहे. त्याचप्रमाणे फार परिश्रम न करतां मोती उत्पन्न होत असलेल्या कारणानें मोती आजकाल फार स्वस्त झाले आहेत.

### ९ प्राकृतिक व कल्चरमोती या दोघांत फरक

कल्चर मोती व प्राकृतिक मोती यांत फारसा फरक नाही. दोन्ही मोत्यांचे कण मुक्ताशुक्तींत तयार होतात. प्राकृतिक मोत्यामध्यें दैवयोगानें शिंपी मध्यें प्रविष्ट झालेल्या कणापासून मोती तयार होतो. आणि कल्चर मोती तयार करित असतांना मोत्याच्या शिंपला पहिले उघडून त्यांत सूक्ष्मकण बाहेरुन प्रविष्ट करवून शिंपला बंद करून कांही वर्षें समुद्रांत सोडून द्याव्या लागतात. त्यानंतर शिंपेला बाहेर काढून तिला खोलून मोत्यांच्या दाण्यांना खरडून पृथक् पृथक् करून शिंपीच्या किटाला भोजन सामग्रीच्या उपयोगांत आणतात. निव्वळ मोती पाहून हा कल्चर आहे कीं प्राकृतिक आहे याची पूर्णपणें परीक्षा करणें ही फार कठिण गोष्ट आहे. आणि याच कारणामुळें मोत्याची खरेदी व्यापाऱ्याच्या विश्वासावर विश्वासु दुकानावरुन करावी लागते.

· · · डी कुलकर्णी (हिंदी रसरत्नसमुच्चय)

## १० कृत्रिम मोती तयार कसे करितात

आजकाल युरोपखंडांतील कांही देशामध्यें माश्यांच्या चमकणाऱ्या बहिर्भागाच्या चूर्णाला कांचाच्या बनलेल्या पोकळ मण्यामध्यें टाकून आणि त्यांत मेण भरून कृत्रिम मोती बनवितात. हे फार स्वस्त असतात. आणि त्याला थोडासा आघात झाल्या बरोबर मोती लवकर तुटतात. थोडीशी उष्णता लागताच त्यांतील मेण वितळून लवकरच पातळ होते, आणि त्यामुळे ते मोती लवकरच बेढब दिसूं लागतात.

## ११ मौक्तिकोत्पत्ति

शुक्तिः शंखः गजः क्रोडः फणिमत्स्यश्च दर्दुरः ।
वेणुश्चाष्टौ समाख्याताः सुज्ञैर्मौक्तिक योनयः ॥ शा. नि.

शिंप, शंख, हत्ती, डुक्कर, साप, मासा, बेडूक, आणि वेळू यांच्या पासून मोत्यांची उत्पत्ति होते असे पंडितांनीं सांगितलें आहे. ही आठ मोत्यांची उत्पत्तिस्थानें होत.

## १२ उत्तम मोत्याचें लक्षण

१) नक्षत्राभं वृत्तमत्यंत मुक्तं स्निग्धं स्थूलं निर्मलं निर्व्रणंच ।
व्यस्तं धत्ते गौरवं यत्तुलायां तन्निर्मौल्यं मौक्तिकं सौख्यदायी ॥ आ. प्र.

शुक्राच्या ताऱ्याप्रमाणे तेजस्वी, अतिशय गोल, चिकणा, स्थूल, स्वच्छ, छिद्ररहित व तराजूवर ठेवल्याने भारी प्रतीत होतो, तो मोती अमूल्य व सुखदायी असतो.

ल्हादि श्वेतं लघु स्निग्धं रश्मिवन्निर्मलं महत् ।
ख्यातं तोयप्रभं वृत्तं मौक्तिकं नवधा शुभम् ॥

दिसण्यांत मनोहर, श्वेतवर्ण, हलके, स्निग्ध, तेजस्वी, निर्मळ, मोठे, पाण्याप्रमाणे कांति असलेले व वाटोळे असे नऊ गुणांनी युक्त मोती ते उत्तम म्हणून सांगितले आहे.

## १३ मोत्याची परीक्षा

लवणक्षारक्षोदिनि पात्रे गोमूत्र पूरिते क्षिप्तं ।
मर्दितमपि शालि तुषैर्यदविकृतं तत्तु मौक्तिकं जात्यम् ॥ ॥ आ. प्र.

सैंधव आणि सज्जीखार यांचें चूर्ण व गोमुत्र एका भांड्यांत भरून त्यांत मोती टाकावें व मर्दन करावे. या क्रियेने जे मोती विकृत होत नाहीत ते मोती उत्तम समजावे.

## १४ अशुभ मोत्याचें लक्षण

यद्विच्छायं मौक्तिकं व्यंगकायं शुक्तिस्पर्शं रक्तताचाति धत्ते ।
मत्स्याक्षीकं रुक्षमुत्तान निम्नं नैतद्धार्यं धीमताऽसौख्यदायी ॥ आ. प्र.

रुक्षांगं निर्जलं श्यावं ताम्राभ्रं लवणोपमम् ।
अर्ध शुभ्रं च विकटं ग्रथिलं मौक्तिकं त्यजेत्		र. र. स.

ज मोती, कांतिहीन आकृति विकृत, शिपेंत चिकटून असलेला,अतिशय लाल रंगाचा, माश्याच्या डोळ्यांच्या आकाराचा, रुक्ष, वर उंचवटा असलेले, असे मोती अशुभ जाणावेत. तसेच जे दिसण्यांत रुक्ष, निर्जल, (पाणीदारपणा नाही असे) काळसर, तांबूस दिसणारे, मिठाच्या खड्यासारखे दिसणारे, अर्ध्या भागांत पांढरा रंग असलेले, वाकडे तिकडे दिसणारे व गाठी असलेले असे मोती अग्राह्य समजावे.

## १५ मोत्यांची शुद्धी–

जयंती स्वरसेनेह दोलायंत्रे विधानतः ।
यामैकं सततं स्विन्नं मौक्तिकं शुद्धिमाप्नुयात् ॥		र. त.

जयंतीच्या स्वरसांत मोती हे दोलायंत्राच्या पद्धतीने शिजविलें असतां शुद्ध होतात.

अगस्त्यद्रवयोगेन यामं स्विन्न मनारतम् ।
दोलायंत्रे पोटलिस्थं शुद्धि मायाति मौक्तिकम ॥		र. त.

मोती हे अगस्तीचे रसांत ( हदग्याच्या रसांत ) दोलायंत्राच्या पद्धतीने एक प्रहर शिजविलें असतां ते शुद्ध होतात.

Indira Gandhi National Centre for the Arts

सुराप्रदीप वन्हिना शरावगं तु मौक्तिकम् ।
सुधोदकेन पाचितं विशुद्धि मेत्यनुत्तमाम् ॥		र. त.

मोती हे एका पात्रांत घालून चुन्याच्या निवळींत खाली स्पिरीट लँप ठेऊन शिजविलें असतां शुद्ध होतात.

## १६ मोत्याचें भस्म–

२) विमलं मोक्तिकं गव्य पयसा परिपेषितम् ।
त्रिधा लघुपुटे पक्वं मृतंस्याच्छशि सुंदरम् ॥		र. स.

शुद्ध मोती घेवून गाईचें दुधांत खलांत घालून घोटावें आणि तीन लघुपुटें द्यावीत म्हणजे मोत्याचें भस्म होतें.

मुक्ताफलं तु तरुणी परिस्रुत जलान्वितम् ।
पिष्टं त्रिवारं पुटितं मृति माप्नोत्यनुत्तमाम् ॥		र. त.

मोती हे स्त्रियांचें दुधांत घोटून तीन पुटें दिली असतां मोत्याचें भस्म होतें.

मुक्ता चूर्णं समादाय कर काम्बु विभावितम् ।
आतपे त्रिदिनं भाव्यं चूर्णितं मृतिमाप्नुयात् ॥		र. त.

मोत्याच्या चूर्णाला उन्हामध्यें गारांच्या पाण्याच्या भावना देवून तीन दिवस खल करावा म्हणजे मोत्यांचें भस्म होतें.

तत: क्षिप्त्वान्ध मूषायां पुटेल्लघु पुटेनच ।
एवं भस्मत्वमायाति मौक्तिकं पुटयोगत: ॥ र. का. धे.

शुद्ध मोती हे परळांत घालून मातकापड करुन हलके पुट द्यावें म्हणजे मोत्याचें भस्म होतें.

कुमारी तंडुलीयेन स्तन्येनच विपाचयेत् ।
प्रत्येकं सप्तवेलं तत्तप्तं तप्तं च कृत्स्नश: ॥
उक्त माक्षिक वन्मुक्ता प्रवालानिच मारयेत् । र. चं.

मोती व पोवळें तापवून कोरफडीचा रस, तांदुळजाचा रस व स्त्रीचें दुध, ह्या मध्ये क्रमाने सात सात वेळ बुडवावें म्हणजे त्याचें भस्म होतें. सुवर्ण माक्षिकाच्या मारणाच्या पद्धतीनेही मोती व पोवळें ह्यांचें भस्म होतें.

१७ मोत्यांचे गुण–

मौक्तिकं वृष्य मायुष्यं मधुरं शिशिरंपरम् ।
दीपनं दाह शमनं नेत्र्यं वर्ण्यं च कीर्तितम् ॥
जीर्णज्वरप्रशमनं त्वस्थिदंत विवर्धनम् । र. त.
हृद्यं मेहहरं मेद्यं दंतोद्भेदं ज्वरापहम् ॥ र. त.
मौक्तिकं सुशिशिरं क्षयापहं श्वास कास परिकोप नाशनम् ।
अस्ति शोष शमनं विषापहं देह वीर्यं बल बुद्धि वर्धनम् ॥

मौक्तिकभस्म हें वीर्यवर्धक, आयुष्यवर्धक, मधुर, थंड, अग्निदीपक, दाह शांत करणारा, डोळयाला फायदेशोर व कांतीदायक आहे तसेंच जीर्णज्वरनाशक दांत आणि अस्थी वाढण्याला मदत करणारे, हृदयाला हितकर, मेहनाशक, बुद्धिवर्धक, लहान मुलांचे दात निघते वेळीं येणारा ज्वर यांना नाहीसे करणारें आहे. तसेंच तें थंड, क्षयनाशक श्वास कास नाशक आहे. व अस्थीचा क्षय व विषनाशक असून देह वीर्य, बल व बुद्धि यांना वाढविणारें आहे.

मौक्तिक भस्म हे सर्व शरीर कार्याला चांगलें उत्तेजन देणारें असून तें शक्तिवर्धक व कामोत्तेजक आहे. मौक्तिक भस्मांत उष्णता कमी करणारा व पौष्टिक गुण असून शिवाय तें सारक आहे. मौक्तिक भस्म हे सर्व हृदयाच्या विकारावर उत्ताम गुण देणारे आहे.

मौक्तिक भस्म हें विशेषत: चुन्याचा ऑक्साईड व कार्बोनेट आहे.

हे भस्म मुख्यत्वें करून हृदयाची जळजळ व पित्त विकार यांवर फार उपयोगी आहे. तसेंच तें कफ, दमा, क्षय, या रोगांत दिवसांतून दोन वेळ मधांतून दिल्याने उत्तम गुण येतो. जीर्णज्वरांत जेव्हां डोळे तळहात व तळपाय, यांची आग किंवा जळजळ वाटते तेव्हां मौक्तिक भस्म दिल्यानें फार चांगला गुण येतो. तसाच लव्हीचा पिवळे-

पणाहि नाहीसा होतो. वातविकारांत डोकें दुखणें व आचके येणें या विकारांतही उत्तम गुण देणारें असून त्याचे सेवनानें मेंदुची शक्ति वाढते. तसेंच प्रदर, नपुंसकत्व, लघ्वींतून धातू किंवा खर जाणें या विकारांवरहि हें भस्म फायदेशीर आहे. नपुंसकपणा हृद्रोग, व क्षय यावर याचा विशेष उपयोग वैद्य लोक करतात. निरनिराळ्या रोगपरत्वें तें पुष्कळ रोगांवर उपयोगी आहे.

१८ मोत्याच्या भस्माची मात्रा–

रोग्याचे बळ व ऋतुमान पाहून $\frac{1}{4}$ गुंजेपासून एक गुंजेपर्यंत मौक्तिकभस्म पोटांत घ्यावे.

१९ मोत्याचें द्रावण–

आम्लवेतसाच्या रसाच्या मोत्याला सात दिवस भावना द्याव्या. नंतर तें इडनिंबामध्यें घालून धान्याच्या राशींत पुरुन ठेवावे. पुटें काढून इडनिंबासह पुटपाकाने तें उकडून काढावे म्हणजे तें पाण्यासारखे पातळ होते. हा श्रेष्ठ योग रत्नाचेहि द्रावण करीतो.

आम्लवेतसाच्या रसांत मोत्याचें चूर्ण घोटून त्याची प्रथम लुगदी तयार करावी. नंतर एक मोठेसे जम्बीरी निंबू घेऊन त्याला एका चाकूने छिद्र करावें. त्याच्या मध्यभागीं एक गढ्ढा तयार करून त्यांत ती औषधाची लुगदी ठेवावी. आणि त्या छिद्राचें तोंड बंद करावे. नंतर त्या निंबूवर उत्तम मातकापड करून त्याला सात दिवस धान्याच्या राशींत पुरून ठेवावे. आठव्या दिवशीं तें निंबू बाहेर काढावे. त्यांतील औषध शराव संपुटांत घालून कोणतेहि हलकें पुट दिले असतां मोत्याची द्रुति तयार होते.

२० मुक्ता पंचामृत रसायन–

(१) मौक्तिकं विद्रुमं वंगं शंखं मुक्तागृहं तथा ।
वसुवेदाक्षि चंन्द्रेन्दु भागिकः क्रमशः पृथक् ॥
वरी विदारी कन्येक्षु दुग्धं हंसपदी रसैः ।
पृथक् संप्येष्य यत्नेन पंचधा पुट पाचितम् ॥
ततः काच पिधानेन विदध्या त्कूपिका गतम् ॥
रसायनमिदं ख्यातं मुक्तापंचामृताव्हयम् ।
अनारतं द्विगुजंतु गव्य दुग्धेन शीलितम् ।
मासद्वय प्रयोगेण रसायन फल प्रदम् ॥ र. त.

मौक्तिकभस्म ८ भाग, प्रवाळभस्म ४ भाग, वंगभस्म २ भाग, शंखभस्म १ भाग, शौक्तिक भस्म एक भाग हे सर्व एकत्र करून शतावरी, कोरफड, भुईकोहळा, गाईचें दूध व हंसपादीचा रस या प्रत्येकांत वरील मिश्रण वेगवेगळे घोटावें. या प्रमाणे पांच

भावना द्याव्यांत. नंतर रानगोवऱ्यांत पांच पुटें द्यावीत. नंतर तें कांचकुपींत भरून बूच लावावे. हें मुक्ता पंचामृत नांवाचें रसायन होय. हें गाईच्या दुधांतून दोन गुंजा प्रमाणाने दोन महिने सेवन केलें असतां इच्छित फलप्राप्ति होते.

## वैडूर्य

१ वैडूर्याचीं नांवें व भाषावार नांवें–

> विदूर रत्नं वैडुर्यं केतु रत्नं विदूरजम ।
> बिडालाख्य बिडालाभं वायजंच प्रकीर्तितम् ॥ र. त. ३०४
> वैडूर्यं राष्टकं केतू रत्नं मघखराकुरम ॥ शा. नी.

विदुर रत्न, वैडूर्य, केतुरत्न, विदूरज, बिडालाख्य, बिडालाभ, वायज हीं वैडूर्याचीं नांवें होत. त्याचप्रमाणें वैदर्य, राष्ट्रक, केतुरत्न, मेवखरांकुश, बालवायज, बालसूर्य, बालसूर्यक, प्रावृष्य, अभ्रलोह, शराब्दांकर असेहि पर्यायवाचक नांवें आहेत.

२ भाषावार नांवें–

(सं.) वैदुर्य, (हिं) वैडूर्य वैदूर्य, लहसुनीया (बं.) वंदुर्य (गु.) मिजरानी आंख्य, जेवुलसणीयो (क) वैडूर्य (तै.) वैडूर्य (इं.) केटस् आय (Cats Eye).

३ वैडूर्याचे लक्षण–

वैडुर्याला हिंदीमध्ये लह सुनीया म्हणतात. इंग्रजीमध्ये याला कॅटस् आय म्हणतात ( Cats Eye ) कारण दिसण्यामध्यें हा मांजरीच्या डोळ्यांप्रमाणे दिसतो. मांजरीच्या डोळ्यांत ज्याप्रमाणे चमकदार रेखा दिसतात, त्याचप्रमाणे वैडुर्याच्या मध्यभागीं अभ्रशुभ्र, उत्तरीय म्हणजे अभ्रकाप्रमाणे चमकणारा पांढऱ्या रंगाच्या रेघेप्रमाणे असतो.

४ गोमेद व वैडूर्य यांत फरक–

रासायनिक दृष्टचा गोमेद आणि वैडूर्य यांत विशेष फरक नाही. निव्वळ रंगांत फरक आहे, आणि वैडुर्यांत विशेष प्रकारच्या रेषा असणे आवश्यक आहे.

५ वैडूर्याच्या प्राप्तिची स्थानें–

भडोच, खंबायत आणि जबलपूर हीं तीन शहरें यांच्या व्यापाराचीं मुख्य होत.

६ शुभ वैडूर्य लक्षण–

> वैडूर्यं शाम शुभ्रांगं समं स्वच्छं गुरु स्फुटम् ।
> अभ्र शुभ्रोत्तरीयेण गर्भीत शुभ मीरितम् ॥ र. र. स.

वैडूर्य काळसर, पांढरा, समान, स्वच्छ, जड, ज्याची प्रभा पडते असा व अभ्राप्रमाणें शुभ्र अशा पदराने गर्भित असा वैडूर्यमणी शुभकारक आहे.

IGNCA RAR
R-329
ACC No.

७ अप्रशस्त वैडूर्याचे लक्षण–

विच्छायं लघु रुक्षंच सत्रासं चिपिटं खरम् ।
कृष्णं तथा मृच्छिलाढ्यं वैदूर्यं हेय मीरितम् ॥ र. त.

कांति नसलेलें, हलकें, रुक्ष, सत्रास, चिपिट, खर, काळसर, मातीचे रंगाप्रमाणे दिसणारे, तांबुस, खडबडीत असे त्याज्य, जाणावे.

८ वैडूर्याचे शोधन–

त्रिफला क्वथितो पेयं वैडूर्यं याम मात्रकम् ।
दोलायंत्रे परिस्विन्नं शुद्धिमायात्यनुत्तमाम् । र. त.

त्रिफळ्याच्या काढ्यांत वैडूर्य रत्न एक प्रहरपर्यंत दोलायंत्राने शिजविला असतां ते शुद्ध होते.

९ वैडूर्याचे मारण–

माणिक्य मारणोद्दिष्ट विधिभ्यामतियत्नतः ।
विदूररत्नं पुटितं त्वष्टधामृति माप्नुयात ॥ र. त.

माणिक्य रत्नाच्या पद्धतीने आठ पुटे दिली असतां वैडुर्य रत्नाचे भस्म होते.

Indira Gandhi National
Centre for the Arts

१० मृत वैडूर्याचे गुण–

सुमृतं खलु वैडुर्यं मधुरं शिशिरं परम् ।
दीपनं मेध्य मायुष्यं बल्यंच मलभेदनम् ॥
रक्तपित्त प्रशमनं चक्षुष्यं बृहणं परम् ।
पित्तामय प्रशमनं समाख्यातं विशेषतः ॥ र. त.
वैडूर्यं मुष्ण मम्लंस्यात् . . .
शूलगुल्मोदर कफवातनाश करं मतम् ॥ शा. नि.

वैडूर्य भस्म हे मधुर, थंड, अग्निदीपक, बुद्धिवर्धक, आयुष्य वाढविणारे, बलदायक, सारक, रक्तपित्त नाशक, डोळ्याला हितकर, शक्तिदायक व पित्ताचे विकाराला शमन करणारे तसेच ते आंबट, उष्ण असून शूळ, गुल्म, उदररोग यांचा नाश करणारे आहे.

११ वैडूर्य भस्माचे मात्रा प्रमाण–

वस्वंशतो रक्तिकाया वैडूर्यं गुंज संमितम् ।
प्राणाचार्या प्रयुंजीत बलकालाद्य पेक्षया ॥ र. त.

वैडूर्य भस्माची मात्रा $\frac{1}{8}$ गुंजेपासून एक गुंजेपर्यंत ऋतुमान व रोग्याचे बलाबल पाहून द्यावी,

## ताक्ष्र्य-पन्ना-मरकत मणी

१ मरकत मण्यांचीं नांवें-

गारुत्मकं, मरकतं, ताक्ष्र्यं गारुडसंज्ञकम् ।
बुधरत्नं रोहणेयं हारिद्रत्नं च तन्मतम् ॥ र. त.

गारुत्मक, मरकत, ताक्ष्र्य, गरुडसंज्ञक, बुधरत्न, रोहणेय व हरितरत्न ही मरकत मण्यांचीं नांवें होत. ह्या शिवाय गरुडाश्म, मरक्त, राजनील, गरूडांकीत, रौहिरण्येव, सौपर्ण्य गरुडोग्दिर्ण, बुधरत्न, अश्मगर्भज, गरलारी, वापवाल, गारूड, गारुडोत्तिर्ण अशींहि नांवें आहेत.

२ भाषावांर नांवे-

(सं.) मरकत (हिं.) पन्ना (बं.) पन्ना (म.) पांच (गु.) लीलुं पातुं (क.) पचिपच्चे (तै.) नीलम् (इं.) इमराक (लै.) स्मेरेगुस, (फा.) जुमुरंईप (अ) जमईद.

३ ताक्ष्र्याची घटना-Silicate of Aluminium and Beryllium
( 3BeO $Al_2$ O 3 6 Si $O_2$ )

(सिलीकेट ऑफ अँल्युमिनीयम अँड बेरिलियम = ३ ता स. प्रा. वा. १ हीर २ प्रा. वा. ३, ६ सी. प्रा. वा. २ ) हीन रजत व ताक्ष्र्यत्वाचे सिकता सारिक लवण ह्याचे षट्कोन खडे असतात.

४ रंग-

बहुधा सर्व खडे रंगीत असतात. विरळा बहुधा हिरवा पारदर्शक व हिरव्या खड्यास पांच म्हणतात. सभुद्राच्या रंगाच्या खड्यास Aqua mareine अँक्वा मरिन म्हणतात. पिवळा निळा, करडा व गुलाबी रंगाचे खडे मिळतात.

५ उत्पत्ती स्थाने-

हिंदुस्थानांत फार थोड्या ठिकाणीं ताक्ष्र्य सापडतो. काश्मीर, बिहार, कोइमतुर, आणि पंजाब या ठिकाणीं फारच थोड्या प्रमाणांत सापडतो. हा प्रायः एक्वा मरीन जातीचा असतो. सुंदर हिरव्या रंगाचा ताक्ष्र्य, यारकंद, मध्य एशिया, रुस, चीन, इत्यादि देशांतून येतो. कोईमतूर, म्हैसुर आणि अजमेरच्या आसपास थोड्या हिरव्या रंगाचा ताक्ष्र्य सापडतो. ओरिसा, ब्रह्मदेश व राजपुताना येथेही थोड्या प्रमाणांत सापडतो.

६ उत्तम मरकताचे लक्षण-

हरिद्वर्णं गुरुस्निग्धं स्फुर द्रश्मिचयं शुभम् ।
मसृणं भासुरं ताक्ष्र्यं गात्रं सप्तगुणं मतम् ॥ र. र. स.

हिरव्या रंगाचा जड, स्निग्ध, तेजाने चमकणारा, गुळगुळीत, तेजस्वी व मोठा असा सात प्रकारचा पाचमणी शुभ समजावा.

७ त्याज्य मरकताचें लक्षण–

रुक्षंतु विगतच्छायं विकृतांगं खरं लघु ।
सत्रासं चाति मलिनं हेयं मरकतं मतम् ॥　　　र. र. स.

जो मरकत मणी, रुक्ष, निस्तेज, बेडौल, खरखरीत, हलका, अतिशय मळकट रंगाचा असा आहे, तो मरकत मणी त्याज्य समजावा.

८ मरकताचें शोधन–

सुरभी पयसा यामं दोलायंत्रे विधानतः ।
विपाचितं मरकतं विशुध्यति सुनिश्चितम् ॥　　　र. त.

मरकतमणी हा गाईच्या दुधांत दोलायंत्राच्या पद्धतीने एक प्रहर शिजविला असता शुद्धि होते.

९ मरकताचे मारण–

माणिक्य मारणोद्दिष्टं विधिभ्यामति यत्नतः ।
अष्टधां पुटितं तार्क्ष्यं म्रियतेनाऽत्रसंशयः ॥　　　र. त.

मनशीळ, हरताळ, गंधक, प्रत्येकी मरकत मण्याचें वजना इतके घेऊन एकत्र सात दिवस लिंबाचे रसांत घोटावे. नंतर उन्हांत ठेऊन वड्या कराव्या. सुकल्यानंतर गजपुटी अग्नि द्यावा. आठ पुटें दिली असतां उत्तम भस्म होतें.

१० मरकताचे गुण–

मृतं मरकतं बल्यं विषघ्नं वन्हिदीपनम् ।
ओजो विवर्धनं वृष्यं पांडु शोफ निषूदनम् ॥
श्वासच्छर्दि प्रशमनं गुदजामय नाशनम् ।
समाख्यातं विशेषण सन्निपात निबर्हणम् ॥　　　र. त.

मरकत मण्याचें भस्म हें बलकर, विषनाशक, अग्निदीपक, ओज वाढविणारे, वीर्यवर्धक, पांडुरोग नाशक, शोथनाशक, श्वास, कास, वांती, यांचे शमन करणारे, अर्शनाशक व सन्निपाताचा नाश करणारे आहे.

११ मरकत भस्माची मात्रा–

मरकत मण्याचें भस्म $\frac{1}{4}$ गुंजेपासून एक गुंजेपर्यंत ऋतुमान व रोग्याचे बलाबल पाहून द्यावे.

# गोमेद

१ गोमेदाचें पर्याय–

गोमेदकस्य गोमेद: पिंग स्फटिक इत्यपि ।
गोमेदं राहु रत्नं च कीर्तितश्च तमो मणि ॥ र. त.

गोमेदक, गोमेद, पिंग, स्फटिक, राहुरत्न, तमोमणी हें गोमेदाचे पर्याय होत.

गोमेदाची दुसरीं नांवें –

गोमेदकाला अकीक आणि संगई सुलेमान असेहि म्हणतात. इंग्रजीमध्यें याला अगेट (Agate) असेही म्हणतात.

२ भाषावार नांवें–

(सं.) गोमेदक, (हिं.) गोमेदमणी, (बं.) गोमेद (म.) गोमेदमणी, (गु.) गोमूत्र, जेवुं पिला रंगनु, (क.) गोमेद, (ते.) गोमेदकं, (इं.) ओनिकस (Onayse) (लॅ.) ओनिकस.

३ गोमेदांत कोणकोणती तत्वें कमी जास्त प्रमाणांत असतात–

यांत वाळूमध्ये सापडणारे तत्व जास्त प्रमाणांत सापडतात. थोड्या प्रमाणांत आल्युमिनम ऑक्साईडही असतो. यांचा रंग लोखंड आणि मॅंगनीज यांच्या अल्प अंशामुळे होतो.

४ उत्तम गोमेदाचे लक्षण–

गोमेद: सम राग तत्वात् गोमेदं रत्न मुच्यते ।
सुस्वच्छ गोजलच्छायं स्वच्छं स्निग्धं समं गुरु ।
निर्दलं मसृणं दीप्त गोमेदं शुभमष्टधा ॥ र. र. स.

गोमेदाप्रमाणे कांती असते म्हणून ह्या रत्नाला गोमेद असे म्हणतात. अती स्वच्छ, गोमूत्र वर्ण स्वच्छ, स्निग्ध, सम, जड, दलदलीत, मृदु व दीपक अशा आठ प्रकारचा गोमेद मणी शुभकारक असतो.

५ त्याज्य गोमेद लक्षण–

विच्छायं लघु रुक्षांगंचिपिटं पटलान्वितम् ।
निष्प्रभं पीत काचाभं गोमेदं न शुभावहम् ॥ र. र, स.

कांतिरहित, हलके,रुक्ष, चपटा ज्याला पटल आहे असा निष्प्रभ, पिवळा व कांचेसारखा गोमेद हितावह नाही.

६ गोमेद मण्याची परीक्षा–

परिक्षा वन्हित: कार्या शाणेवा बहु कोविदै: । शा. नि.

गोमेदाची परीक्षा अग्नि आणि कसोटीचा दगड यांनी करावी.

७ गोमेदाचे शोधन —

निंबुक स्वरसे नेह दोलायंत्रे विधानतः ।
परिस्विन्नं तु यामैकं शुद्धिमायात्यनुत्तमाम् ॥ र. त. पा. ३०५

गोमेदरत्न निंबूच्या रसांत दोलायंत्राच्या पद्धतीनें शिजवला असता तो शुद्ध होतो.

८ गोमेदाचे मारण—

माणिक्य मारणोद्दिष्ट विधिभ्यामतियत्नतः ।
त्वष्टवारं सुपुटितं गोमेदं मृतिमाप्नुयात् ॥ र. न.

माणिक्याच्या भस्म करण्याच्या पद्धतीनें आठ पुटें दिली असता गोमेद रत्नाचें भस्म होते.

९ गोमेदाचे गुण —

गोमेदकं रुचिकरं दीपनं पाचनं परम् ।
त्वग्दोष शमनं बल्यं कफपित्त प्रणाशनम् ॥
उष्णं पांडवामय हरं क्षयक्षय करं परम् ।
समाख्यातं विशेषण बुद्धि संवर्धनं तथा ॥ र. त.
चक्षुष्योऽग्निदीपनः ।
लघुर्वातस्य कासस्य नाशकारी ॥ शा. नि.

गोमेद रत्न हे रुचिकर, अग्निदीपक पाचक, त्वचेचे विकार कमि करणारे, शक्तिवर्धक, कफपित्तनाशक, उष्ण, पांडुरोग नाशक क्षयरोगनाशक, व बुद्धिवर्धक आहे. तसेच तें डोळयांला हितकर असून वातनाशक व खोकला नाशक आहे.

१० गोमेद भस्म मात्रा प्रमाण—

आरभ्य गुंजा पादांशात् गुंजैक प्रमितं मृतम् ।
गोमेदंतु प्रयुंजीत बलकालाद्य पेक्षया ॥ र. त.

गोमेद रत्नाचे भस्म हे $\frac{1}{4}$ गुंजेपासून एक गुंजेपर्यंत ऋतुमान व रोग्याचे बलाबलाबल पाहून द्यावें.

## पद्मराग (माणिक्य)

१ माणिक्याचे पर्याय—

माणिकयं रंग माणिक्यं पद्मराग समाव्हयम् ।
रविरत्नं शोणरत्नं कुरु विदं चं लोहितम् ॥ र. त.

माणिक्य, रंग माणिक्य, पद्मराग, रविरत्न, शोणरत्न, कुरुविंद व लोहित हे माणिक्याचे पर्याय होत. रत्न राट, कविरत्न, शोणरक्त, तरणीरत्न, श्रृंगरी, रंग

माणिक्य, तरुण रत्ननायक, रागयुक, शोणोपल, सौगंधिक, कुरुविंद, कुरुबिलव, लोहित, लक्ष्मीपुष्प, अरुणोपल, अशीं ही पर्यायवाचक नांवें सांगितलीं आहे.

२ भाषावार नांवें–

(सं.) पद्मराग माणिक्य (हिं.) माणिकलाल (बं.) माणिक (म.) माणिक (गु.) माणक्य, चुनीं (क.) मानक (तै.) माणिक्यं (इं.) रुबी (Ruby) (लैं.) रुबीनस (Rubinus) (फा) लाल बदपशानी (अ.) लाल.

३ उत्पत्ति स्थान–

दक्षिण हिंदुस्थान व मध्य हिंदुस्थान, अफगाणिस्थान व सिलोन, म्हैसूर व बर्मा.

४ घनत्व व काठिण्य—

उत्तम माणिकाचे घनत्व ४ असते. काठिण्य ९. सर्वांत हिऱ्याचें जास्त काठिण्य म्हणजे १० असते.

५ उत्तम माणिक्य लक्षण–

माणिक्यं पद्मरागाख्यं द्वितीयं नील गंधि च ।
कुशेशय दलच्छायं स्वच्छं स्निग्धं महत स्फुटम् ॥
वृत्तायत्तं समं गात्रं माणिक्यं श्रेष्ट मुच्यते ॥
नीलं गंगाषु संभूतं नीलगर्भारुणच्छवि ।
पूर्वं माणिक्यवत् श्रेष्ठं माणिक्यं नील गंधि च ॥ र. र. स.

माणिक हें एक पद्मराग नांवाचें व दुसरे नीलगंधी असे दोन प्रकारचें आहे. जें माणिक कमलपत्राप्रमाणे आरक्तवर्ण, स्वच्छ, स्निग्ध, जड, पारदर्शक, वाटोळे, विस्तृत व चोहोबाजूंनी सारख्या आकाराचें असते तें श्रेष्ठ म्हणून समजावें. आणि निळया रंगाचे गंगेच्या पाण्यांत उत्पन्न झालेलें, आंतून निलवर्ण व आरक्त झांक असलेले असे जें माणिक तें नीलगंधी हें पहिल्या पद्रागाप्रमाणेच श्रेष्ठ आहे.

६ त्याज्य माणिक्य लक्षण–

रंध्र कार्कश्य मालिन्य रौक्ष्यावैशद्य संयुतम् ।
चिपिटं लघु वक्रं च माणिकयं दुष्टमष्टधा ॥ र. र. स.

छिद्र असलेलें, कर्कश दिसणारें, चपटें, मलीन, रुक्ष, स्वच्छ, न दिसणारें लहान तोंडाचें असें आठ प्रकारचें माणिक अशुभ समजावे.

७ माणिक्य शोधन–

निंबुक स्वरसेनेह दोलायंत्रे विधानतः ।
यामैकं स्वेदितं कामं माणिक्यं शुद्धिमाप्नु यात् ॥
आम्लवर्गोक्त भेषज्यै र्दोलिका यंत्रयोगतः ।
विपाचितं तु माणिक्यं शुद्धिमायात्यनुत्तमाम् ॥

निंबुकाम्ल युतं वारि माणिक्यं चषकास्थितम् ।
सूरा प्रदीपे संपक्वं शुद्धिमायात्यनुत्तमम् ॥ र. त.

माणिक हें लिंबाच्या रसांत दोला यंत्राने एक प्रहर शिजविले असतां शुद्ध होते. तसेच आम्ल वर्गातील द्रव्याच्या रसांत किंवा काढयांत शिजविले असता माणिक शुद्ध होते.

एका कांचेच्या पेल्यात निंबुकाम्ल व थोडे पाणी घालून त्यांत माणिक्य टाकून स्पिरीट लॅंपवर तापवावे म्हणजे माणिक्याची शुद्धि होते.

८ माणिक्य मारण–

विमली कृतमत्यर्थं माणिक्यं सुविचुर्णितम् ।
शिलाल गंधैर्विमलैः पृथक् तु सम भागिकैः ।:
निंबुक स्वरसे नेह पेषयेद्दिन सप्तकम् ।
वित्यसेत्संपुटेधर्मे विशुष्कं कृतचक्रिम् ॥
ततस्तु पुटयेत धीमान् पुटेवारण संज्ञके ।
रीत्यानया सुपुटितमष्टवारं प्रयत्नतः ॥
माणिक्यं म्रियते भस्म जायते पांडुरप्रभम् ।
पिष्टं तुलकुचद्रावैः पुटे देवमथापिवी ॥ र. त.

माणिक्य शुद्ध करुन त्याचे चांगले चूर्ण करावे. नंतर मनशीळ . हरताळ व गंधक प्रत्येकी माणिक्याच्या वजनाबरोबर व शुद्ध घेऊन निंबाचे रसांत व सर्व एकत्र सात, दिवसपर्यंत घोटावे. नंतर उन्हांत ठेऊन त्याच्या वड्या कराव्या. त्या सुकल्यावर संपुटांत बंद करुन रानगोवऱ्यांचे गजपुट अग्नि द्यावा. याप्रमाणें आठ पुटें दिलीं असता माणिक्याचें पांढऱ्या रंगाचें भस्म होतें. कांही जण अंबाडचुक्याच्या रसांत घोटुन पुटें देतात.

९ माणिक्य गुण–

(१) माणिक्यं सुमृतं मेध्यं मधुरं तु रसायनम् ।
दीपनं वृष्य मायुष्यं वातपित्तहारं परम् ॥
कफप्रशमनं स्निग्धं क्षयरोग विषुदनम् ।
वाजीकरण मत्यतं ध्वजभंगहरंपरम् :: र. त. पा. २९८

माणिक्य भस्म हें मेध्य, मधुर व रसायन आहे. तसेच तें दिपक, वीर्यवर्धक, आयुष्य वाढविणारें असून वातपित्ताचा नाश करणारें आहे. तें कफनाशक, स्निग्ध, क्षयरोगनाशक, अत्यंत कामोत्तेजक व नपुंसकत्वाचा नाश करणारें आहे.

१० माणिक्य मात्रा–

(२) आरभ्य गुंजा पादांशात् गुंजार्थ प्रमितं मृतम् ।
माणिक्यं योजयेत् धीमान बलकालाद्यपेक्षया ॥ शा. नि.

ऋतुकाल व रोग्याचें बलाबल पाहून माणिक्य भस्म हें चवथाई गुंजेपासून अर्ध्या गुंजेपर्यंत द्यावे.

## नीलम

१ नील मण्याची नांवें–

नीलो नीलोपलो नीलं नीलरत्नं सु नीलकम् ।
महानीलश्च नीलाश्मा शनिरत्नं च कीर्तितम् ॥ र. त.

नील, नीलोपल, नीलं, नीलरत्न, सुनोलक, नीलाश्मा, शनिरत्न हीं नील मण्याचीं नांवें होत तसेच शैलीरत्न, नीलोपल, तृणग्राही, महानील, मस:र अशीहि नांवें आहेत.

२ भाषांवार नांवें–

(हि.) नीलमणी, (वं.) नीलमणी, (म.) नीलमणी, (गु.) नीलम, कालुंनग, (क.) नील, (इं.) सेफायर (Sattire) (लै.) सेफायर्स )Saffirus) (तै.) नील.

३ नील मण्याची घटना–

इंग्रजीमध्यें नीलमण्याला Sapphere (सफायर) म्हणतात. रासायनिकदृष्टया त्यांत अॅल्युमिनिय आणि ऑक्सिजन हें दोन तत्व असतात.

वास्तविक हा पारदर्शक खनिज अॅल्युमिनियम ऑक्साईड असतो. याचा रंग प्रायः कोबाल्टच्या अल्प मात्रेमुळे होतो.

४ प्राप्ति स्थानें–

हिंदुस्थानांत काश्मिर, विजयनगरच्या आसपास, बर्मा आणि सिलोन इतक्या ठिकाणीं चांगले नीलमणी मिळतात. बर्मामध्यें माणकाबरोबर याचेहि तुकडे मिळतात.

रंगाशिवाय माणिक आणि निलम यांच्यांत कांहीच फरक नाही. हिरा सोडून बाकीचे सर्व रत्नामध्यें निलम कठीण असतो.

याचें अंदाजे घनत्व चार, आणि काठिण्य नऊ आहे.

५ रंग–

फिक्कट निळा, ते निळीसारखा गाढ असतो. माणकापेक्षा नीळ मोठमोठे मिळतात. परंतु माणकापेक्षा कमी असतात.

६ नील मण्याचे प्रकार व त्यापैकी श्रेष्ठ–

जलनीलेंद्र नीलं च शक्रनीलं तयोर्वरम् ।
श्वैत्यं गर्भित नीलाभं लघुतज्जल नीलकम् ।
कार्ष्ण्यंगर्भित नीलाभं सभारं शक्रनीलकम् ॥ र. र. स.

जलनील आणि इंद्रनील असे नील मण्याचे दोन भेद आहेत. त्यांत इंद्रनील हा श्रेष्ट आहे. गर्भामध्यें श्वेतवर्ण असून वरून नीलवर्ण कांतीचा हलका तो जलनील व सर्वांत कृष्णवर्ण असून नीलवर्ण कांतीचा आणि जड असतो तो इंद्रनीलमणी होय.

७ उत्तम नील मण्याचें लक्षण–

एकच्छायं गुरु स्निग्धं स्वच्छं पिंडित विग्रहम् ।
मृदुमध्ये लसज्योतिः सप्तधा नीलमुत्तमम् ॥ र. त.

एकवर्ण कांतीचा, जड, स्वच्छ, स्निग्ध, गोलाकार, (ज्याला पदर नाही असा) मृदु, ज्याचें तेज पडत असते अशा सात गुणांनी युक्त जो नीलमणी ता उत्तम असतो.

८ त्याज्य नील मण्याचें लक्षण–

रक्तार्थं विगतच्छायं रुक्षं लघुच कोमलम् ।
परिहेयं शौरिरत्नं मतं रत्न परिक्षकैः ॥ र. त.

अर्ध भाग लाल असलेलें, कांतिहीन, रुक्ष, हलकें, नाजुक अशा गुणांनी युक्त जें नीलरत्न तें रत्न परिक्षकांनीं त्याज्य ठरविलें आहे.

९ इंद्रनील व जलनील मण्यांत फरक–

श्वैत्य गर्भित नीलाभं लघु तज्जल नीलकम् ।
कार्ष्ण्य गर्भित नीलभं सभारं शक्र नीलकम् ॥

जो गर्भांत श्वेतवर्ण असून वरुन नीलवर्ण कांतीचा व हलका असतो. तो जलनीलमणी होय. जो गर्भांत कृष्णवर्ण असून नीलवर्ण कांतीचा आणि जड असतो तो इंद्रनीलमणी होय.

१० नीलाचें शोधन–

नीली स्वरस संयुक्तं दोलायंत्रे विधानत् ।
यामैकं परिपक्वंतु नीलं शुध्यति निश्चितम् ॥ र. त.

नीळ वनस्पतिच्या रसांत दोलायंत्रानें नीलमणि एक प्रहरभर शिजविला असता तो शुद्ध होतो.

११ नीलाचें मारण–

माणिक्य मारिणोद्दिष्टा विधिभ्यामतियत्नतः ।
मारयेत् शनिरत्नतु रसागम विशारदः ॥ र. त.

रसशास्त्रज्ञ नीलमण्याचें भस्म माणिक्याच्या भस्माच्या विधीने करतात.

१२ नील मण्याचें गुण–

नीलं तु सुमृतं वृष्यं बल्यं दीपनमुत्तमम् ।
त्रिदोष शमनं वर्ण्यं गुदजामय नाशनम् ॥
त्वच्यं कुष्टादि दोषघ्नं श्वासकास निषूदनम् ।
कफपित्तानिलहरं विषमज्वर नाशनम् ॥ र. त.

नीलमण्याचें भस्म हें वीर्यवर्धक, बलकारक, उत्तम प्रकारचें अग्निप्रदीपक, त्रिदोषशामक, कांतीवर्धक, अर्शनाशक, त्वचेची कांती वाढविणारें, कुष्टादि रोगांचा नाशक, श्वासकास नाशक, कफ, पित्त व वायु यांचा नाशक व विषमज्वराचे शमन करणारे आहे.

## पुष्पराग

१ पुष्परागाचीं नांवें--

पुष्पराज, पुष्पराग, पीतरक्ताव्हय, गुरुरत्न, पीतमणि, गुरुवल्लभ हीं पुष्परागाचीं नांवें होत. त्याचप्रमाणे मंजुमणी, वाचस्पति वल्लभ, पीताश्मा, गुरुरत्न, जीवरत्न असेही पर्याय आले आहेत.

२ भाषावार नांवें–

(सं.) पुष्कराग, (हिं.) पुखराज, (वं.) पुष्पराग, (म.) पुष्कराज; (गु.) पुखराज, पिलुरत्न, (क.) पुष्पराग, (इं.) Topaz, (लै.) टोपाजीयो Topagio.

३ घटना–

ह्यांत सिकता सारीक हीनरजत, फ्ल्युओरीन असते. हे एक भाग पाण्यानें बांधलेलें आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

४ वर्णन–

चतुष्कोण खडे ( Rhombic Prisms ) पारदर्शक, बहुधा रंगरहित, क्वचित पिवळ्या रंगाचे असतात. हें उपरत्न आहे.

५ उत्पत्ति स्थानें–

दक्षिण ब्रम्हदेशांत, तव्हाय व उत्तर ब्रम्हदेशांत कठ–सकंगाई येथे मिळतो.

६ रासायनिक सूत्र–

याचें रासायनिक सूत्र ( $Al_2 O_3 Sio H_2$ ) असें आहे.

७ घनत्व व काठिण्य–

याचें घनत्व जवळ जवळ अंदाजे ३॥ इतकें आणि काठिण्य ८ च्या बरोबर इतके आहे

८ उत्तम पुष्पराग लक्षण–

**पुष्परागं गुरुस्वच्छं स्निग्धं स्थूलं समं मृदु ।**
**कर्णिकार प्रसूनाभं मसृणं शुभमष्टधा ॥** र. र. स.

पुष्परागमणी जड, स्वच्छ, स्निग्ध, मोठा, सर्व बाजूंनी सारखा, मृदु भासणारा, बाहव्याच्या फुलाच्या रंगासारखा दिसणारा व गुळगुळीत असा आठ प्रकारचा पुष्परागमणी शुभ समजावा.

९ त्याज्य पुष्परागाचें लक्षण-

कृष्णं बिन्द्वङ्गितं द्व्यक्षं धबलं मलिनं लघु ।
विच्छायं शर्कराङ्गभं पुष्परागं सदोषकम् ॥ आ. प्र.

काळचा रंगाचा, बिंदु बिंदु असणारा, दोन छिद्रें असणारा, पांढऱ्या रंगाचा; मलीन, हलका, बेरंगी, दोन वाळूच्या कणांप्रमाणे असणारा पुखराज वाईट समजावा.

१० पुष्परागाचें शोधन —

कुलत्थक्वथितो पेतैः कांजिकैः स्वेदितं समम् ।
दोलायंत्रे पुष्पराजं यामैकेन विशुध्यति ॥ र. त.

कुळथीचा काढा व कांजी यांत दोलायंत्राच्या पद्धतीने प्रहरभर शिजविला असता पुष्पराज शुद्ध होतो.

११ पुष्परागाचें मारण-

माणिक्य मारणोद्दिष्ट विधिभ्यामतियत्नतः ।
मारयेत् पुष्परांगंतु रसतंत्र विचक्षणः ॥

पुष्परागाचें भस्म माणिक्याच्या भस्मविधीप्रमाणे करावें. म्हणजे भस्म होतें.

Indira Gandhi National Centre for the Arts

१२ पुष्परागाचें गुण-

पुष्पराग विषच्छर्दी कफवाताग्निमांद्यनुत् ।
दाहकुष्टाय शमनं दीपनं पाचनं लघु ॥ र. र. स.
वृष्यो वयः स्थापकश्च प्रजाबुद्धि विवर्धनः । शा. नि.
. . . . . कुष्टच्छर्दि निबर्हणः ।
विषघ्नं दाहशमनं गुदजामय नाशनम् ।
मेध्यं बृहणमायुष्यं रसज्ञैः परिकीर्तितम् ॥ र. त. पा. ३०१

पुष्पराग हा विषबाधा, ओकारी, कफवात व अग्निमांद्य यांचा नाशक दाह, कोष्ट व रक्तदोष ह्यांचें शमन करणारा, अग्निदीपक, पाचक व हलका असा आहे.

त्याचप्रमाणे अवस्थास्थापक, प्रजाजनक, बुद्धिवर्धक, कुष्टनाशक, दाहनाशक, अर्शशामक, बृहण करणारा व आयुष्य वाढविणारा आहे.

१३ पुष्परागाचें मात्रा प्रमाण-

आरभ्य गुंजा पादांशात् गुंजैक प्रमितं परम् ।
समृतं पुष्पराजंतु प्रयुंजीत भिषक्वरः ॥ र. त.

पुष्परागाचें भस्माचें पोटांत घेण्याचें प्रमाण गुंजेपासून सुरूं करून एक गुंजेपर्यंत जाणावे.

## राजावर्त

### १ राजावर्ताची नांवें-

राजाबर्तो नृपावर्तो राजन्यावर्तकस्तथा ।
आवर्त मणिरावर्तःस्यादित्येव शराव्हयः ॥ अ. प्र.

राजावर्त, नृपावर्त, राजन्यावर्तक, अवर्त मणी व आवर्त हीं राजा वर्ताचीं नांवें आहेत.

### २ रंग-

राजावर्ताला लाजवर्द, रेवटी आणि लॅपिस लेझुली ( Lapis Lazuli ) असें म्हणतात. दिसण्यामध्यें याचा रंग गर्द निळा असा असतो. आणि याचे तुकडे नियमित आकाराचें असतात.

### ३ राजावर्ताचें रासायनिक सूत्र-

रासायनिक दृष्टचा याचें सूत्र Na4 ( Nas3 Al ) Al2 (Sio4)3 असें आहे.

### ४ राजावर्ताचें विशिष्ट गुरुत्व व काठिण्य-

याचें विशिष्ट गुरुत्व २·३८ ते २·४५ आणि काठिण्य ५·५ आहे. उष्णतेमुळे याच्या रंगांत बदल होतो.

### ५ मिळण्याची स्थानें-

बर्मा, राजपुताना, त्याचप्रमाणे अजमेर प्रांतांत हा थोडचा प्रमाणांत सांपडतो. इंग्रजीमध्यें याला अल्ट्रामरीन ( (Alramarine ) असें म्हणतात. अफगाणिस्थान आणि रशियामध्यें हा जास्त प्रमाणांत आढळतो. जर्मनीमध्यें हा आजकाल कृत्रिमहि बनविल्या जातो.

### ६ घटना-

ह्यांत सिकता, हीनरजत, चुना, सर्जिका सत्व, व गंधक इतकीं द्रव्यें असतात.

### ७ राजावर्ताचें प्रकार-

रत्नजातौ स्मृतः कैश्चिल्लक्षणं तस्य कथ्यते ।
राजावर्तो द्विधा प्रोक्तः सरक्तोनील माश्रितः ॥
कथितः सगुरूः श्रेष्टस्तदन्यो हीन उच्यते । आ. प्र. पा. २७४

राजावर्ताला कांही लोक उपरसांत गणतात व कांहीजण रत्नांत मानतांत. राजावर्ताच्या दोन जातीं आहेत. पैकी एक लाल व दुसरा निळा आहे. काळचा रंगाचा राजावर्त गुरु व श्रेष्ठ व दुसरा हीन गुणी आहे.

८ उत्तम राजावर्ताचें लक्षण—

निर्गारमसित मसृणं नीलं गुरु निर्मलं बहुच्छायम् ।
शिखिकंठं समं सौम्यं राजावर्तं वदंति जात्यमणिम् ।। आ. प्र.

कृत्रिम, विषरहित, काळचारंगाचा, गुळगुळीत, निळा, वजनदार, स्वच्छ, अनेक आभायुक्त, मोराच्या कंठाप्रमाणे निळा व सौम्य हीं लक्षणें राजावर्तांत असतात.

९ राजावर्तात्रें शोधन—

सगव्य मूत्रः सक्षरो निंबुकद्रव योगतः।
खिन्नो नृपोपलो यामं शुद्धिमायात्यनुत्तमाम् ।। र. त.

राजावर्तमणी हा गोमुत्र, जवखार व लिंबाचा रस हीं सर्व द्रव्यें एकत्र करून त्यांत घोटला असतां शुद्ध होतो.

१० राजावर्ताचें मारण—

विचुर्णितं नृपोपलं विशुद्धं गंधकान्वितम् ।
नवेन निंबूकाम्बुनासुपेशयेद् दिनत्रयम् ।।
विशोषितंच विन्यसेच्छराव संपुटस्थितम् ।
विधाय संधि लेपनं पुटेत्पुटे गजाव्हये ।। र. त.

राजावर्ताचें चांगलें चूर्ण करून त्यांत शुद्ध गंधक मिसळून त्यांत लिंबाचा रस घालून तीन दिवस घोटावें. नंतर सुकवून परळांत ठेवून मातकापड करून गजपुट द्यावें. याप्रमाणे आठ पुटें दिलीं असतां राजावर्ताचें उत्तम भस्म होतें.

११ राजावर्ताचे गुण—

नृपोपलः कटुस्तिक्तो दीपनः पाचनः तथा ।
शिशिरः पित्तशमनो बृंहणोऽति रसायनः ।।
पांडुप्रमेह हरणः क्षयशोष निबर्हणः ।
मादात्ययात्ययकरश्छर्दिहिक्का निवारणः ।।

राजावर्त हा तिखट, कडु, अग्निदीपक, पाचक, थंड, पित्तशामक, बृंहण व रसायन आहे. तसेच तो पांडुरोग, प्रमेह, यांचा नाशक आहे. क्षय शोष यांना नाहीसे करणारे, मदात्य यांचा नाश करणारा, वांती व उचकी यांचे निवारण करणारा आहे.

१२ राजावर्ताचें सत्व पातन—

मनःशिलाज्य संमिश्रः प्राच्यः पात्रे हि लोहजे ।
पश्चाच्च महिषि क्षीरैः मित्र पंचक संयुतम् ।।
मर्दयित्वाऽथ पिंडंतु कृत्वा मूषानिवेशितम् ।।
ध्मातस्तु खदिरांगारैः सत्वं मुंचति तद्गतम् ।। आ. प्र.

मनशीळ व तूप एकत्र करून तें लोखंडाच्या भांड्यांत पचन करावे. त्यानंतर म्हशीचें दुधानें मित्रपंचकासहित राजावर्ताला मर्दन करून त्याचा गोळा करावा. तो गोळा मूषेंत ठेवून ती मूषा या विस्तवावर ठेवून फुंकावें म्हणजे राजावर्ताचें सत्व निघेल.

## पेरोजा

१ पेरोजाची नांवें–

**पेरोजं हरिताश्माच भस्मांग हरितं द्विधा ।**
**पेरोजकंच पेरोजं रसज्ञैः परिकीर्तितम् ।।** र. त.

पेरोज, हरिताश्म, भस्मांग, आणि हरित हे पेरोजचे पर्याय होत. तसेच पेरोज व पेरोजक असेहि पर्याय आहेत.

२ भाषावार नांवें–

(सं.) पेरोज, (हिं.) फिरोजा, (बं) उपरत्न विशेष, (म.) पेरोज, (गु) पिरोजो, (क.) पेरोज, (इं.) टरकोइझ, (लॅ.) टरचोसियस, टरचीना Terchesius Turchina, (फा.) फिरोजा, (अ.) फिरोजज.

३ पेरोजांचा रंग–

याचा रंग फिक्कट निळा किंवा निळसर हिरवा असा असतो. हा इराणमधून येतो. ऊन आणि गरमीमुळे याचा रंग बिघडल्या जातो. हा विशेष चमकदार नसतो.

४ पेरोजक प्रकार–

**भस्मांगं हरितं चेति द्विविधं परिकिर्तीतम् ।** र. त.

भस्मांग व हरित असे पेरोजकाचे दोन प्रकार आहेत.

५ पेरोजकाचें शोधन मारण–

Indira Gandhi National Centre for the Arts

**शोधनं मारणं चैव पेरोजस्य विशेषतः ।**
**नृपोपल समं ख्यातं रसतंत्र विशारदैः ।।** र. त.

पेरोज मण्याची शुद्धि व मारण राजावर्ताप्रमाणेच करावे असे रसशास्त्रज्ञांनी सांगितले आहे.

६ पेरोजकाचें गुण–

**पेरोजकं सु तुवरं मधुरंच सु दीपन ।**
**शूल दूषी विषघ्नंच चराचर विषापहम् ।।** र. त.

पेरोजक मणी हा तुरट, मधुर, अग्निदीपक, शूळ व दुषी विष यांचा नाशक, तसेच विषाचाहि नाश करणारे आहे.

हिंदी रसरत्न समुच्च ( डॉ. कुळकर्णी )
शालिग्राम निघंट.

## चंद्रकांत

१ चंद्रकांत मण्याची नांवें–

**इंदुकांतः चंद्रकांत श्चंद्राश्मा चंद्रजोपलः ।**
**शीतात्मा चंद्रिका द्रावः शशिकांतश्च सप्तधा ।।** आ. प्र.

यन्निर्मलं सु मसृणं शिशिरंच पीतं ।
स्निग्धं परं सु विशदं परमं पवित्रम् ।।
स्त्रावं स्त्रवत्यथ परं तुहिनांशु संगा ।
चंद्रोपलं खलुतदेव मतं तु जात्यम् ।। र. त.

इंदुकांत, चंद्रकांत, चंद्राश्मा, चंद्रजोपल, शीताश्मा, चंद्रिकाद्राव व शशिकांत हीं सात नांवें चंद्रकांताला आहेत. त्या शिवाय चांद्र, चंद्रमणी, संप्लवोपल, सोममणी, प्रस्तरोपल, असेहि पर्याय सांगितले आहेत.

२ भाषावार नांवें–

(सं.) चंद्रकांत (इं.) Moon stone मूनस्टोन, (हिं) चंद्रकांत (बं.) चंद्रकांत (म.) चंद्रकांतमणी (क.) चंद्रकांत = (तै.) चंद्रकांत.

३ चंद्रकांताचें रासायनिक सूत्र, रंग व प्रभाव–

चंद्रकांताचें रासायनिक सूत्र KAL Si3 O6 असें आहे,

४ चंद्रकांताचा रंग–

दिसण्यामध्यें हा निळसर छटेचा, शुभ्र, दुधिया रंगाचा दिसतो सिलोनच्या डुंबरा जिल्ह्यामध्ये याची प्राप्ति होते. याचें अंदाजे घनत्व २।। आणि काठिण्य जवळजवळ ६ असते.

५ चंद्रकांताचा प्रभाव–.

चंद्रकांत हा निर्मळ, गुळगुळीत, थंड, पिवळचा रंगाचा, स्वच्छ, चंद्रप्रकाशांत पाझरणारा असा असतो. चंद्राच्या प्रकाशामध्यें हा विशेष प्रकाराने चमकतो कीं, ज्याच्या योगाने पाण्याचा आभास उत्पन्न होतो. याच्या घटनेच्या योगाने जुन्या साहित्यकारांनी चंद्रकांतमणी चंद्राच्या प्रकाशांत पाझरतो असें वर्णन केलें आहे. पाझरणें ही गोष्ट संभवनीय नाही. असें होऊं शकेल कीं चंद्राच्या प्रकाशांत हा मणी विशेष सुंदर, शितल आणि आल्हादकारक वाटतो.

याची प्राप्ति सिलोन आणि बर्मा यामध्यें होते.

६ चंद्रकांतांचें मारण–

कुनटी हिंगुलो पेतः कन्यानीरेण पेशितः ।
चंद्रकांतः सुपुटितो म्रियते नात्र संशयः ।। र. त.

मनशीळ व हिंगुळ दोन्ही एकत्र कोरफडीच्या रसांत घोटून त्याचा चंद्रकांताला लेप करावा. नंतर पुट द्यावें म्हणजे चंद्रकांताचें भस्म होते.

७ चंद्रकांताचें गुण–

शिशिरः चंद्रकांतस्तु स्निग्धः पित्तास्त्रतापनुत् ।
शिवःप्रीतिकरः स्वच्छो ग्रहालक्ष्मी विनाशनः ।। आ. प्र.

चंद्रकांतमणी हा शीतल, चिकणा, रक्तपित्त व संताप यांना शांत करणारा, शिवाचें ठिकाणीं प्रीति उत्पन्न करणारा, निर्मल, ग्रह व दारिद्र्य यांना नष्ट करणारा आहे.

८ चंद्रकांतोद्‍भवजल गुण–

**चंद्रकांतोद्‍भवं रूक्षं शीतं दाह विनाशनम् ॥** शा. नि.

चंद्रकांत मण्याचें पाणी रुक्ष, शीतल आणि दाहशामक आहे.

## सूर्यकांत

१ सूर्यकांतांत रासायनिक दृष्टीने असणारी तत्वें

सूर्यकांत मण्यामध्यें रासायनिक दृष्टचा सोडियम, ॲल्युमिनम, सिलीकान, ऑक्सिजन त्याचप्रमाणे कॅल्सियम या तत्वांचा समावेश होतो.

हिंदी–डॉ. कुळकर्णी

२ रासायनिक सूत्र

याचें रासायनिक सूत्र $Na_2O, Al_2O_3 6SiO_2 + CaO Al_2O_3 2SiO_2$ असे आहे. याचें घनत्व सरासरी २॥ बरोबर आहे. याचें काठिण्य ५॥ आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

३ सूर्यकांत मण्याचा प्रभाव

हा मणी गोल लेन्सच्या आकाराचा बनविलेला असतो. हा सूर्य किरणाला कोणत्यातरी एका बिंदूवर केंद्रीभूत करून उष्णतेच्या योगाने रुई, कागद इत्यादि पदार्थाला जाळूं शकतो. हा सूर्य प्रकाशांत चमकतो.

याची प्राप्ति बर्माच्या मोगोक जिल्ह्यामध्ये खाणींत होते. रुस देशाच्या बाईकेल नांवाच्या सरोवराच्या आसपास आणि नार्वे देशामध्यें याची प्राप्ति विशेष करून होते.

४ रंग

याचा रंग कांहीसा लाल असा असतो. सूर्याच्या प्रकाशामध्यें अग्नीचा आभास उत्पन्न होतो. हा लाल रंग साधारण: लोखंडाच्या ऑक्साईडच्या अत्यल्प प्रमाणामुळे उत्पन्न होतो. सूर्यकांताला इंग्रजीमध्यें सनस्टोन ( Sunstone ) असे म्हणतात. खनीजाच्या रूपामध्यें याचें नांव 'अलिग्लोकेज' असें आहे.

५ सूर्यकांताचें पर्याय व भाषावार नांवें

**सूर्यकांतः सूर्यमणि स्तथा सूर्यो पलाव्हयः ।**
**दीप्तोपलो वन्हिगर्भो तथैव ज्वलनोपलः ॥** र. त.
**अथ भवति सूर्यकांतःस्तपनमणि स्तपनश्च रविकांतः ।**
**दीप्तोपलोऽग्नि गर्भोज्वलनाश्माऽर्कपलश्च वसुनामा** आ. प्र.

सूर्यकांत, सूर्यमणी, सूर्योपलाव्हय. दीप्तोपल, वन्हिगर्भ, ज्वलनोपल, हे सूर्यकांताचे पर्याय होत. तपनमणी, तपन, रविकांत, दीप्तोपल, अग्निगर्भ, ज्वलनाश्मा, अर्कोपल व वसु अशींही नांवें आहेत.

५ भाषावार नांवें

(सं.) सूर्यकांत (हिं.) अतिशीशिशा, सूर्यकांत (बं.) आतसपाथर (म.) सूर्यकांतमणी (गु.) गगनच शमांनो कांच [इं] मॅग्निफाइंग ग्लास (Magnifying glas Sunstone).

६ सूर्यकांताचें लक्षण

विमल: निस्तुष: स्निग्धो घृष्टो व्योमसु निर्मल: ।
मसृणो निर्व्रणश्चैव जात्य: सूर्योपल: स्मृत: ॥
शुद्धस्निग्धो निर्व्रणो निस्तुषस्तु योनिधृष्टो व्योम नैर्मल्यमेति ।
य: सूर्यांशु स्पर्शनिर्व्यूत वन्हिर्जात्यासोयं चक्षते सूर्यकांत: ॥

सुन्दर, निर्मळ, स्निग्ध, घासलें असतां आशाप्रमाणे निर्मळ दिसणारें, गुळगुळीत छिद्ररहित असा सूर्यकांतमणी उत्तम समजावा.

जो गुळगुळीत; व्रणरहीत, तुषररहीत, जो घासला असतां आकाशाप्रमाणे निर्मळ होणारा आणि उन्हांत ठेवला असतां, ज्यांत अग्निबदल उत्पन्न होतो असा सूर्यकांतमणी उत्तम समजावा.

Indira Gandhi National Centre for the Arts

७ सूर्यकांताची परीक्षा

यस्तु: सूर्यांशु संपृष्ट: प्रसूते दहन प्रभाम् ।
स एवं जात्य: कथित: सूर्यकांत पुराविदै ॥ र. त.

ज्यावर सूर्याची किरणें पडलीं असतां विस्तव उत्पन्न होतो. तो खरा सूर्यकांतमणी जाणावा.

८ सूर्यकांताचें मारण

सूर्यकांत: सुसंविष्ट: शिलाबलि समन्वित: ।
सप्तधा पुटितो यत्नात् म्रियते नात्र संशय: । र. त.

सूर्यकांतमणी हा खलांत बारीक करून त्यांत मनशीळ व गंधक मिसळून रानगोवऱ्याचें पुट द्यावें. याप्रमाणे सात पुटें दिलीं असतां सूर्यकांताचें भस्म होते.

९ सूर्यकांताचें गुण

सूर्यकांतो भवेदुष्णो निर्मलश्च रसायन: ।
वातश्लेष्म हरो मेध्य: पूजनाद्रवि तुष्टिद: ॥ शा. नि.

सूर्यकांतमणी उष्ण, निर्मल, रसायन, वातकफनाशक, मेद उत्पन्न करणारा असा आहे. याचें पुजन केलें असतां सूर्य संतुष्ट होतो.

## स्फटिक

१ स्फटिक मण्याचें सूत्र–

स्फटिक मण्याचें रासायनिक सूत्र $SiO_2$ असें आहे.

(हिंदी रसरत्नसमुच्चय)

२ स्फटिक मण्यांत असलेली तत्वें–

ह्यांत सिलिकान आणि ऑक्सिजन हीं दोनच तत्वें असतात.

३ स्फटिक मण्याचें इंग्रजी नांव

इंग्रजीमध्यें याला रॉक क्रिस्टल (Rock crystal) असें म्हणतात. कारण याचें तुकडे नियमित आकाराचे असतात.

४ स्फटिक मणि रंगरहित कां दिसतो ?

कांही धातूचे अल्प अंश यांत असल्यामुळे हा रंगरहित दिसतो. या रंगीन तुकड्याला व्यवस्थेशीर कापल्यानें सुंदर रत्न तयार होतें. स्फटिकाचें तयार केलेलें 'शिवलिंग' शैवलोक फार पसत करतात.

५ स्फटिक आणि वाळू यांत फरक

रासायनिक दृष्टया वाळू आणि स्फटिक यांत विशेष अंतर नसते. स्फटिकांचे तुकडे नियमीत आकाराचे असतात. तसें वाळूच्या बाबतीत नसते. स्वच्छ स्फटिकाला गार किंवा दगड असेंहि म्हणतात. गारीच्या बनविलेल्या चष्म्याला लोक फार पसंत करतात.

६ प्राप्ति स्थानें

जबलपूर, बांदा आणि खंबायत हीं स्फटिकांचीं विशेष स्थानें आहेत. याची शुद्धि आणि मारणक्रिया राजावर्तासारखी आहे.

७ स्फटिकाचें पर्याय

शैवः शूकः श्वेतरत्नं स्फटिको निस्तुषोपलम् । शा. नि.
स्फटिकं सितोपलं स्यादमलमणि निर्मलो पलं स्वच्छम् ।
स्वच्छ मणिरमलरत्नं निस्तुषरत्नं शिखिप्रियं नवधा ॥ आ. प्र.

शैव, शुक, श्वेतरत्न, स्फटिक, निस्तुषोपल, शीतोपल, अमलमणी, निर्मलोपल, स्वच्छ, स्वच्छमणी, अमलरत्न, निस्तुषरत्न व शिखप्रिय हीं नऊ स्फटिकाची नांवें आहेत.

८ उत्तम स्फटिक मण्याचें लक्षण

शीतं स्निग्धं निस्तुषं नेत्रहृद्यं धृष्टं धत्ते स्वच्छतां पूर्वतुल्याम् ॥
स्वच्छच्छायं यच्चशुद्धान्तरालं तन्निर्दिष्टं शैवरत्नं तु जात्यम् ॥ र. त. ३१५

थंड, स्निग्ध, रेषा वगैरे नसलेले, डोळ्याला आल्हाददायक, घासून पाहिलें असतां अत्यंत निर्मळ व फोडून पाहिला असतां वरच्या स्वच्छतेप्रमाणेच निर्मळ दिसतो. अशा लक्षणांचा स्फटिकमणी उत्तम समजावा.

९ स्फटिकाचें शोधन व मारण

**शोधनं मारणं चैव शिवरत्नस्य सर्वदा ।**
**राजावर्त मणेस्तुल्यं जानीयात् रसकोविदः ॥** र. त.

स्फटिकमण्याचें शोधन व मारण रसशास्त्रज्ञांनी राजवर्ताप्रमाणेच करावें.

१० स्फटिक गुण

**स्फटिको मधुरो वल्य स्तुषार समशीतलः ।**
**रक्तपित्त प्रशमनो ज्वरदाहाविनाशनः ॥** र. त.

स्फटिकमण्याचें भस्म हें मधुर, बलकारक, तुषाप्रमाणे थंड, रक्तपित्तनाशक, ज्वर व दाह यांचें शमन करणारें आहे.

## लाल ( कुरुविंदाची जात )

१ लालचें वर्णन

इंग्रजीमध्यें याला स्पिनेल ( Spinel ) अथवा बलास रुबी असें म्हणतात. हा माणकाचेप्रमाणे दिसतो. परंतु हा माणिकापेक्षां फार मृदु असतो.

भारतीय रसायनशास्त्र (डॉ. देसाई)

२ लालची घटना

रासायनिकदृष्टया यांत Mgo आणि $Al_2O_3$ हे असतात. अल्प प्रमाणांत क्रोमियम आणि लोखंड हेहि असतात.

३ रंग

रंगामध्यें हा लाल, गुलाबी आणि कधी कधी निळसर असाहि असतो.

४ प्राप्ति

सिलोन, सयाम, उत्तर बर्मामध्यें माणिक्याच्या खाणींत हा विशेष प्रमाणांत सांपडतो. याचे विशिष्ट गुरुत्व ३·६ ते ५·२ आणि काठिण्य ७·५–८ एवढे असते.

५ लाल व माणिक यांत घटना, विशिष्ट गुरुत्व वा स्वरुप य दृष्टीने फरक

| लाल | माणिक |
|---|---|
| (१) घटना हीन, रजत, सारिक, लघुमृत्तीका. | (१) घटना मशीभूत हीन रजत. |
| (२) अष्टकोण खडे. | (२) षट्कोण व अनियमित आकृतीचे खडे. |
| (३) वि. गु. ३–६ च्या वर कधी नसते. | (३) वि. गु. ४. |

(४) तापविल्यास अपारदर्शक होते व थंड होतांना पूर्वरंग येतो.

(४) तापविल्यास अपारदर्शक होते, थंड होतांना प्रारंभी हिरवा रंग व शेवटी पूर्वरंग येतो.

(५) अंग घट्ट.

## ब्रुज

### १ ब्रुजचें इंग्रजी नांव व वर्णन

ब्रुजला इंग्रजीमध्यें कैनाइट ( Kainite ) असें म्हणतात. हा निळ्या रंगाचा खनिज पदार्थ आहे. याच्या पारदर्शक तुकड्याला उत्तम तऱ्हेने कापलें असतांना सुंदर रत्न तयार होते.

### २ रासायनिक सूत्र

रासायनिक दृष्टीने यांत Al2 O3 आणि Si O2 हे असतात.

### ३ उत्पत्ति स्थानें

हाहि हिंदुस्थानांत बऱ्याच ठिकाणीं सांपडतो. बिहार, ओरिसा, पंजाब, मद्रास आणि दक्षिण हैद्राबाद या प्रांतांत विशेष करून यांची उत्पत्ति होते.

## यशम–यशब

Indira Gandhi National Centre for the Arts

### १ इंग्रजी नांव

इंग्रजीमध्यें याला ( Jade ) अथवा जेडाईट ( Jadeite ) असेंहि म्हणतात.

### २ रंग

याचा रंग पांढरा, किंचित् हिरवा किंवा गर्द हिरवा असा असतो.

### ३ प्राप्ति

हा बहुतेक चीन, उत्तर बर्मा व तिबेट इत्यादि देशांत मिळतो. चिनी लोक सर्व रत्नांत याला श्रेष्ठ समजतात. तें लोक औषधीमध्यें सुद्धां याचा उपयोग करतात.

### ४ रासायनिक सूत्र

याचें रासायनिक सूत्र Na al Si2 O6 असें आहे.

### ५ काठिण्य व विशिष्ट गुरुत्व

याचें काठिण्य ७ आणि विशिष्ट गुरुत्व ३·३ आहे.

## याकूत Garnet कुरुविंद जाती उपरत्न

### १ नांवें

याकुत, चुन्री, मेहताब. (पं.) संगई, मेहेताब, तांब्रा.

### २ घटना व रासायनिक सूत्र

Silica'e of a' umina iron lime magnesia [ Mg fe3] Al2 Si O3 Oi2. हें हीन रजत अयस व सुधा यांचें सिकता सारिक लवण आहे. याचें

बरोबर अयस व लघुमृत्तिका ह्यांचें मिश्रण असते, इतर धातूच्या संयोगाप्रमाणे ६ ज़ाती करता येतात.

३ दुसरा भेद

पाईरोप नांवाचा याचा दुसरा भेद आहे. तो अत्यंत लाल रंगाचा असतो. हा सिलोनमध्यें सांपडतो.

४ वर्णन

ह्याचे खडे नियमित आकाराचें, बहुधा द्वादशफलक. अंग पारदर्शक, रंगयुक्त, रंग लोखंडामुळे येतो. फिक्कट पिवळा ते लालभडक, लोखंडाच्या अंशाप्रमाणे असतो.

५ उत्पत्ति स्थानें

हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं बरेच प्रमाणांत मिळते. अरवली दल पाषाणावर (Sehist) व त्यांतून वाहणाऱ्या नद्यांच्या पात्रांत हे खडे मिळतात. तसेच ब्रम्हदेश, बिहार, ओरिसा, मद्रास, राजपुताना, हैद्राबाद येथेहि त्याची उत्पत्ति होते.

६ याकूत व माणिक यांत फरक

याचा रंग माणकाशी जुळेल असा असतो. परंतु यांत माणिक्याप्रमाणे कठिणता, पारदर्शकपणा आणि सुंदरता नसते.

Indira Gandhi National Centre for the Arts

भारतीय रसायनशास्त्र (डॉ. देसाई)

## कुरुविंद

१ नांवें

(इं) Courumdum = कॉरन्डम् (सं.) कुरुविंद, (गु) करंजनो पथरो Emery stone (म.) कुरुंद, समद.

२ उत्पत्ति

कुरुविंद रवाळ पाषाणांत, दलपाषाणांत व चुनाळ जमिनींत आढळतो. पाषाण-घटनेंत याचें महत्त्व अल्प आहे. केव्हां केव्हां याची मोठी ठेव आढळते.

३ रंग

ह्याची हिंदुस्थानांत खरी पैदास होते. कांही खडे हलक्या रंगाचे. अपारदर्शक, कांही सुंदर पारदर्शक लाल रंगाचे ( माणिक ) कांही निळे पारदर्शक ( नीळ ) असतात.

४ घटना

कुरुविंदांत स्वच्छ ॲल्युमिना ( $Al_2O_3$ हीनरजत २ प्रा. वा. ३ ) ९७·५ टक्के असतो. बाकीचा भाग लघुमृत्तिका व सिकतेचा असतो.

५ वि. गु.

वि. गु. ३·९५ ते ४·१० माणिक व नीळ ४· रंगाप्रमाणे वि. गु. कमी जास्त असते. उत्तम रंग व पारदर्शक असल्यास वि. गु. जास्त. गढूळ अंग असल्यास वि. गु. कमी.

६ काठिण्य

फार कठीण म्हणून Adamantine Spar = ॲडॅमॅन्डाईन स्पार वज्राची उपमा दिली आहे. काठिण्य ९· हिऱ्याचे खालोखाल कुरुविंद लागतें. नीळ माणिकाला कापतो. व माणिक इतर कुरुविंद जातीस कापतो.

७ उत्पत्ति स्थानें

आसाम, मध्यहिंदुस्थान, मद्राम आणि म्हैसूर.

भारतीय रसायनशास्त्र (डॉ. देसाई)

## शंख

१ उत्पत्ति

शंखाची उत्पत्ति हिंदी महासागरांत होतें.

२ लक्षण

शंखाचा आकार लांबोळा असून तो निमुळता, गोपुच्छाकार असतो. तो लांबोळा भाग मध्यभागीं फुगीर झालेला असून दोन्ही टोकाला निमुळता झालेला असतो. खडबडींत स्फटिकासारखा त्याचा रंग दिसतो. त्याची निमुळती झालेली तऱ्हा चमत्कारीक आहे. त्याचें वरील टोक बुच काढण्याच्या स्क्रूप्रमाणे पिळवटलेले व निमुळतें झालेले असतें. त्याचा खालील भाग रुंद असतो. व आंतील भाग पोकळ असतो वरील पृष्ठभाग कठीण असून त्याचा रंग फिक्कट पांढरा असतो. वरचा भाग फारच खडबडीत असून आंतील भाग चकाकीदार, ठिसूळ व पारदर्शक असतो.

३ शंखाची नांवें

शंखः समुद्रजः कंबुः क्षुद्रः शंखनकः स्मृतः ॥ शा. नि.

शंख, समुद्रज, कम्बु, सुनाद, पावनध्वनि, हे शंखाचे पर्याय होत. ह्याशिवाय अब्ज, त्रिरेख, जलज, अर्णीभव, अन्तः, कुटील, महानाद, श्वेतपुत्र, दीर्घनाद, बहुनाद, हरिप्रिय, दीर्घनिस्वन, सुरचर, सम्यकशब्द, जलोद्भव, विष्णुप्रिय, दुष्टद्रावी, धवल, स्त्रीविभूषण, पांचजन्य, अर्णवभव, अर्णवभवोदर.

४ भाषावार नांवें

(सं) शंख, (हिं.) शंख, (बं.) शाँक, शंख (म.) खंख, (गु.) खंख, (तै.) खंरवमु, (इं.) Conch.

५ श्रेष्ठ शंखाचे लक्षण

**शंखस्तु विमलः श्रेष्ठः चंद्रकांति समप्रभः ।**
**अशुद्धो गुणदो नैव शुद्धस्तु सुगुण प्रदः ।।** शा. नि.

निर्मल आणि चंद्राप्रमाणे कांती असणारा असा शंख उत्तम समजावा. अशुद्ध शंख गुणदायक नाही. शुद्ध शंखच गुणदायक समजावा.

६ शंखाचे भेद

**द्विधा स दक्षिणावर्तो वामावर्तः शुभेतरः** - आ. प्र.

दक्षिणावर्त व वामावर्त असे शंखाचे दोन भेद आहेत.

७ दक्षिणावर्ताचें लक्षण

**दक्षिणावर्त शंखस्तु पुण्ययोगादवाप्यते ।**
**तिष्टतियदगृहेऽसौवै स लक्ष्म्याः भाजनं भवेत् ।।** आ. प्र

दक्षिणावर्त शंख हे पुण्याच्या योगानेच प्राप्त होते. ज्याचे घरीं दक्षिणावर्त शंख असतात तो लक्ष्मीपुत्र समजावा.

८ दक्षिणावर्त शंखाचें गुण

**दक्षिणावर्त शंखस्तु त्रिदोष कामलापहः ।**
**विषदोषक्षयनेत्र ग्रहपीडा विनाशकः ।।** शा. नि

दक्षिणावर्त शंख त्रिदोष, कामला रोग, विष, दोष, क्षय, नेत्ररोग आणि ग्रहपीडानाशक आहे. दक्षिणावर्त शंख हा देवपूजेच्या उपयोगी प्रशस्त आहे. व दारिद्र्यनाशक आहे.

९ वामावर्त शंखाचें लक्षण

**वामावर्ता भिधः शंखः सर्वत्र सुलभो मतः ।**
**अतः स एव वैद्यस्तु मारणार्थं प्रयुज्यते ।।** र. त.

वामावर्त नांवाचा शंख सर्वत्र सुलभ आहे. म्हणूनच वैद्य लोक द्रव्यमारणार्थ त्याचा उपयोग करतात.

१० शंख शुद्धि

**शंखंतु खंडशः कृत्वा पोटल्यां स्थापयेद्भिषक् ।**
**दोलायंत्रे चतुर्यामं पचेज्जंबीर वारिणा ।।**
**प्रक्षालयेच्छंखखंडान् प्रतप्तेनाम्भसाततः ।**
**इत्थं नाति चिरादेव शंखशुद्धिमवाप्नुयात् ।।** र. त.

शंखाचे तुकडे करून त्याची पुरचुंडी बांधून दोलायंत्रांत निंबूचा रस घालून त्यांत ती पोटली घालून खाली जाळ लावून चार प्रहर पचन करावें. नंतर तें तुकडे गरम पाण्यानें स्वच्छ धुवून टाकावें म्हणजे शुद्ध होतात, त्याचप्रमाणें तांदुळजाच्या रसांत शिजविलें म्हणजे शुद्ध होते.

## ११ शंखाचें भस्म

शुद्ध शंखस्य खंडानि शरावेस्थापयेत्सुधी: ।
शरावेण विधायाथ यत्नात्संधिं प्रलेपयेत् ॥
आतपेत्वथ संशोष्यं पुटेग्दज पुटे भिषक् ।
स्वत:शीतं समुधृत्य खल्वे संचूर्णयेद्भिषक् ।
चुर्णितं चाथ विज्ञाय संपुटस्थं तत: पुटेत् ॥
एवं पुटद्वये नैव शंखको मृति माप्नुयात् ॥ र. त.

शुद्ध शंखाचे तुकडे तुकडे करून परळांत घालून दुसरा परळ वर ठेवून मात-कापड करावे, आणि उन्हांत सुकल्यावर त्याला गजपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून धेवून त्याचे खलांत चूर्ण करावे. नंतर त्या चूर्णाला पुन्हा दुसरें पुट द्यावे. ह्या दोन पुटांनी शंखाचें उत्तम भस्म होतें.

Indira Gandhi National Centre for the Arts

## २ शंखाचे गुण

शंख: सुशीतल: क्षारस्त्वाम्ल पित्त विनाशन : ।
अग्निमांद्य हरोबल्यो ग्राही ग्रहणिका हर: ।
पारिणामोत्थ शूलघ्नस्तारुण्य पिटिका पह: ।
विषदोष हरो वर्ण्यो मात्रागुंजद्वयोन्मिता ॥

शंखभस्म हें शीतल, क्षारीय, आम्लपित्ताचा नाश करणारें, अग्निमांद्यनाशक, बलकर, ग्राही, संग्रहणी नाशक, परिणाम शूळाचा नाश करणारें, तारुण्यपिटीकेचा नाश करणारे, विषदोष नाशक, कांतीवर्धक आहे. तसेंच तें नेत्राला हितकर असून हलके व पित्त, कफ आणि रक्त यांचे पासून होणाऱ्या विकारांना नाहीसें करणारें आहे. त्याचप्रमाणें शूळ आणि श्वास नाशक आहे.

## १३ शंखनाभी गुण

रसेन जंबीरफलस्य शंख नाभीरज: पीतमवश्यमेव ।
कर्ण प्रमाणं शमयेदशेषं प्लीहामयं कूर्मसमानमाशु ॥ भा. भै. र.

शंखनाभीचें १। तो. भस्म जंबीरी निंबुचे रसांतून सेवन केलें असतां अत्यंत वाढलेली प्लीहाहि नाश पावते.

## १४ शंखद्राव निर्माण विधी

१) शंखचूर्णंच सौभाग्यं स्फुटिका याव शूकजम् ।
सज्जिक्षारं नृसारंच तथा लवण पंचकम् ॥
समं समं समादाय यत्नतः चूर्णयेद्भिषक् ।
मृल्प्ति जठरायांतु काचकुप्यांन्यसेत्ततः ॥
कूपीं चुल्यां निधायाथ तिर्यङ्नालं निवेशयेत् ।
अन्यस्यां काचकुप्यांतु तोयस्थायां विधानतः ।
पचेत् मंदानलेनैव विधानज्ञो भिषक् वरः ॥
द्रावितं तोयरुपं तु द्रावकं जायते तदा ॥
शंखशुक्ति वराटादीन् यामार्द्धेनैव निश्चितम् ।
द्रावयत्येष तु यतः शंखद्रावस्ततः स्मृतः ॥

शंख, टांकणखार, तुरटी, यवक्षार, सज्जीखार, नवसागर, पंचलवणें या सर्वांचें चूर्ण करून तें मातकापड केलेल्या शिशींत भरून चुलींवर ठेवावे. त्या शिशीला एक तिरपी नळी लावावी. व त्या नळीचे शेवटचें तोंड पाण्याने भरलेल्या भांडयांत ठेवलेल्या शिशीमध्यें घालून तें तोंड मजबूत बंद करावें. चुलीचेखाली मंदाग्नि लावावा. त्यामुळे पाण्यांत लावलेल्या शिशीमध्यें पातळ द्राव दिसून येईल, हाच शंखद्राव होय. शंखद्राव, शंख, कौडी आदि वस्तूचें अर्घ्या प्रहरांत द्रावण करील.

अर्कः स्नुही तथा चिंचा तिलारग्वध चित्रकम् ।
अपामार्ग भस्म समं वस्त्रपूतं जलं हरेत् ।
मृग्दग्निना पचेत्तत् यावल्लवणतां गतम् ।
लवणेन समौ ग्राह्यौ द्वौक्षारौ टंकणं तथा ।
समुद्रफेनं गोदंतं काशीसं सोरकं तथा ॥
द्विगुणं पंचलवणं मातुलुंगं रसेनच ।
काचकुप्यां तु सप्ताह वासयेदम्ल योगतः ।
शंखचूर्णं पलंदत्वा वारुणी यंत्रमुद्धरेत् ॥
सर्वधातून् हरेच्छीघ्रं वराटी शंखकादिकान् ।　　भा भै. र.

रुई, सेहुंड, चिंच, तीळ, बाहवा, चित्रक आणि आघाडा यांचें भस्म समभाग घेवून सर्वांना एकत्र मिसळावे. व ते २१ पट पाण्यांत टाकावें. नंतर क्षारविधीप्रमाणे वरील स्वच्छ पाणी गाळून घ्यावे. त्यानंतर त्यांला मंदाग्निवर पचन करून क्षार तयार करावा.

हा क्षार एक भाग, त्याचप्रमाणे सज्जीखार, जवखार, टांकणखार, समुद्रफेस, गाईचा दांत, हिराकस, आणि सोरा १–१ भाग व पांच प्रकारचे लवण २ भाग, घेवून सर्वांना महाळुंगाच्या रसांत टाकून खल करावा. ते कांचेच्या शिशींत भरावें व त्या शिशींत माहाळुंगाचा रस टाकून ठेवून द्यावें. पुन्हां सात दिवसानंतर एक भाग शंख चूर्ण मिसळून सर्वाला कांचेच्या शिशींत भरून वारुणी यंत्रद्वारा त्यांतील अर्क काढून घ्यावा.

### १५ शंखद्रावाचे गुण

अग्निमांद्यं हरत्येष विषूचीञ्चाति दारुणाम् ।
ग्रहणीं मूत्र कृच्छ्ं च गुल्म प्लोहोदराणिच ॥
शूलमष्टविधं हंति तथार्शांसि विनाशयेत् ।
भोजनांते बिंदुमात्रं पिबेत्प्रचुर वारिणा ॥
भुक्त्वा कंठ पुनर्भोक्तुं इच्छंत्यस्य प्रयोगतः ।
कृमीनुन्मूलयत्याशु छर्दिचापि सु दारुणाम् ॥ र. त.

शंख द्रावानें अग्निमांद्य व तीव्र विषूचिकेचा नाश होतो. तसेच ग्रहणीरोग, मुत्रकृच्छ्र, गुल्म, प्लीहा, उदररोग, आठ प्रकारचे शूळ व मुळव्याध यांचा नाश करिते. जेवणानंतर शंख द्रावाचा एक थेंब पुष्कळसें पाणी घालून घेतले असतां आकंठ जेवण झालेल्या माणसांना देखील पुन्हां जेवण्याची इच्छा होतें. त्याशिवाय कृमि व तीव्र अशा वांतीचा देखील नाश होतो.

## क्षुद्रशंख

### १ नांवें

क्षुद्रशंखः शंखनकः शंबूकः स्वल्प शंखकः ।
क्षुल्लको नव शंखश्च नामान्येतानि शंखके ॥ र. त.

क्षुद्रशंख, शंखनक, शंबूक, स्वल्प शंखक, क्षुल्लक, नवशंख, हे क्षुद्र शंखाचे पर्याय होत त्या शिवाय कोशस्थ, लघुशंख, क्षुद्रक, नदीभव असे ही पर्याय आहेत.

### २ शोधन

आम्लेन केनचिद्वापि कामं स्थाली गतं पचेत् ।
यामार्द्धेनैव शंबूकः शुद्धिमायात्यनुत्तमाम् ॥ र. त.

शंखाचे तुकडे हे कोणत्या तरी आम्लरसांत दोलायंत्राच्या पद्धतीनें अर्धा प्रहर पचन करावें म्हणजे शंखाची शुद्धी होते.

३ मारण

शंखवन्मारणं त्वस्य करणीयं भिषग्वरैः ।
कुमारी स्वरसेनैव संपुटस्थं पुटेत्तु वा ॥ र. त.

क्षुद्र शंखाचें मारण शंखाप्रमाणेच करावे, अथवा कुमारीच्या स्वरसांत घालून मातकापड करून पुट द्यावें म्हणजे क्षुद्र शंखाचें भस्म होतें.

४ गुण

शंबूकः शीतलो नेत्र्य रुजास्फोट विनाशनः ।
शीतज्वरहरस्तीक्ष्णो ग्राही दीपन पाचनः ॥
ग्रहणी रोग हंताच रक्तातीसारनाशनः ॥ आ. प्र.

क्षुद्र शंखाचें भस्म हें शीतल, डोळ्याचे रोग, स्फोट, ग्रहणीरोग, रक्तातिसार, शीतज्वर यांचा नाशक, तीक्ष्ण ग्राही, दीपन व पाचक आहे.

५ कृमिशंखाचीं नांवें व गुण

कृमिशंखः कृमिजलजः कृमिवारिश्च जंतुकंबुश्च ।
कथितो रसवीर्य्याद्यैः कृतनिधिभिः शंखसदृशोऽयम् ॥ शा. नि.

कृमिशंख, कृमि, जलज, कृमिवारी, जंतुकंम्बु, कृमिशंख, याचे रस, वीर्य, विपाक व गुण शंखा प्रमाणेच जाणावें.

Indira Gandhi National Centre for the Arts

## कांच

१ कांचमण्याचीं नांवें

काचः कृत्रिम रत्नंच पिंगाणो मुकरो पिच । शा. नि.

कांच, कृत्रिमरत्न, पिंगाणा, मुकुर हीं कांच मण्यांचीं नांवें आहेत.

२ भाषावार नांवें

(सं.) कांच, (हि.) काँच, कंच (बं.) कांच, (म.) कांच (इं.) ग्लास Glass (लै.) ग्लेसम Glesum (फा.) आबगीना (अ.) जुजाज.

शालिग्राम निघंटू

३ कांचेचे गुण

काचातु सारका लघ्वी व्रण नेत्र हितावहा ।
लेखनीशूलत्प्रोक्ता वैद्यशास्त्र विशारदैः ॥ शा. नि.
काचस्तु लोचनभवामयहृद्विलेखी ।
वर्ण्यो लघुर्निगदितोऽत्र विदारणश्च ॥ र. का. धे.

कांच हा डोळ्यांतील विकारांचा नाश करणारा असून तो लेखन करणारा आहे. तसेच तो व्रण उत्पन्न करणारा, हलका व विदारण करणारा आहे असें सांगितलें आहे.

## दुग्धपाषाण

१ नांवें

दुग्ध पाषाणिका क्षीरीमाधवी मेदसन्निभा । शा. नि.

दुग्ध पाषाणिका, क्षीरी, माधवी, मेदसन्निभा (दुग्ध पाषाणीक, दुग्धपाषाणक दुग्धाश्मा, गोमेदसन्निभ व्रज्राभ्र, दिप्तिक, दुग्धी, क्षीरक्षव, सौध ही दूसरी नांवें आहेत.)

२ भाषावार नांवें

(सं.) दुग्ध पाषाण. (हि.) शिरगोला (वं.) शिरगोला (म.) शिरगोळा (गु.) दुधियोपाणो (क.) रंगवलिय हरेल्ली

३ दुग्धपाषाणाचे गुण

दुग्ध पाषाणको रुच्यः इषदुष्णो ज्वरापहः ।
पित्तहृद्रोग शूलघ्नः कासाध्मान विनाशनः ॥

दुग्ध पाषाण रुचि कारक, किंचित् उष्ण, ज्वरनाशक, त्याचप्रमाणे हृदयरोग, शूळ, कास, आणि पोट फुगणें हें विकार नाहीसें करणारा आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

## शुक्ति

१ नांवें

शुक्तिश्च शुक्तिका चापि मुक्तामाता तथैवच ।
मुक्तागृहं महाशुक्ति मौक्तिक प्रसवाच सा ॥
मुक्ताशुक्तिस्तथा मुक्तागेहं मोक्तिक मंदिरम् ॥ र. त.

शुक्ति, शुक्तिका, मुक्तामाता, मुक्तागृह, महाशुक्ति, मौक्तिकप्रसवा, मुक्ताशुक्ति, मुक्तागेह, मौक्तिक, मंदीर हे शुक्तीचे पर्याय होत. ह्याशिवाय महाशुक्ति, मुक्तास्फोट, अब्धिमंडुकी, मौक्तिकप्रसवा, दुर्नामा, दीर्घकोशिका, पंकशुक्ता, मुक्तागार, महाशुक्ति, तौतिक, मौक्तिकशुक्ति असेहि पर्याय आहेत.

२ भाषावार नांवें

(हि.) मोतीकी सीप (जलसीप,) (वं.) झिनुक, शामुक (म.) मोत्याची शिंप, नदींतील शिंप (गु.) मोतीनी छिप. नदीना छिपना (क.) मुक्तिनी सिपू, तोरेयसिपू, (इं.) ओइस्टरशेल, oyster shell.

शालिग्राम निघंटू

३ शिंपेचे प्रकार

शुक्तिका द्विविधा ह्युक्ता मौक्तिकी जलजा तथा ॥ र. चं.

शिंप दोन प्रकारची. एक मोत्याची शिंप व दुसरी पाणशिंप.

४ शुक्तिची शुद्धि

**जयंत्या स्वरसेनैव शुक्ति दोलागतां पचेत् ।**
**यामैकेनैव नियतं शुक्तिः शुद्धिमवाप्नुयात् ॥** र. त.
**अम्लेन केनचिद्वापि दोलायंत्रेण यत्नतः ।**
**शुक्तिकां पाचयेद्धीमान् शुद्धिमायात्यनुत्तमाम् ॥** र. त.

मोत्याची शिप ही जयंतीच्या स्वरसांत दोलायंत्रद्वारा एक प्रहरभर पचन केलें असतां शिपीची शुद्धि होते.

मोत्याची शिंप कोणत्याहि आम्लरसांत दोलायंत्रांत घालून शिजविली असतां शिंपीची शुद्धि होते.

५ शुक्तिचें मारण

**शुक्तिकां खंडशः कृत्वा संपुटस्थां ततः पुटेत ।**
**हिमकुंदेन्दु संकाशां शुक्तेर्मूति समाहरेत् ॥** र. त.

मोत्याच्या शिंपीचे तुकडे करून संपुटांत घालून पुटें दिली असतां पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें पांढरे असे शिंपेचें भस्म होतें.

६ मुक्ताशुक्तिचे गुण

**मुक्ताशुतिस्तु मधुरा स्निधा रुच्याच दीपनी ।**
**कटवीच कास शूलघ्नी हृद्रोगस्य च नाशिनी ॥**
**स्नायूरोग हरी चैव ज्वरघ्नी व्रण भेदिनी ।** शा. नि.

मोत्याची शिप मधुर, स्निग्ध, रुचिकारक, दीपन, तिखट त्याचप्रमाणें कास, शूळ, हृदयरोग, स्नायूयोग, आणि ज्वर यांचा नाश करणारी आहे. आणि व्रणनाशक आहे. त्याचप्रमाणे श्वासनाशक असून अग्निदीपक आहे. विटकरीच्या चूर्णा प्रमाणे लघ्वीतून जाणारी शर्करा, पानथरी व जठरांतील रोग हे विकार शौक्तिक भस्मानें नाहीसें होतात.

जलशुक्तिचीं नांवें

**जलशुक्तिर्वारिशुक्तिः कृमिभूः क्षुद्र शुक्तिका ।**
**शंभूका जर्लडिबश्च पुटिका तोय शुक्तिका ॥** आ. प्र.

जलशुक्ति, वारिशुक्ति, कृमिभूः शुद्रशुक्तिका, शंबुका, जलडिंब, पुटिका, तोय-शुक्तिका ही जलशुक्तीचीं नांवें होत.

७ जलशुक्तिचें शोधन मारण

**शुक्तिवच्छोधनंतस्या मारणं चापि कीर्तितम् ।**
**अंगाराग्नौ तु वान्यस्य मारयेद्वारि शुक्तिकाम् ॥** र. त.

जलशुक्तीचें शोधन, मारण मुक्ताशुक्ति प्रमाणेंच आहे. अग्नींत टाकून त्याचें भस्म करून घ्यावें.

८ जलशुक्तिचे गुण

**जलशुक्तिः कटुः स्निग्धा दीपनी गुल्मशूलनुत् ।**
**विषदोषहरारुच्या पाचनी बलदायिनी ।।**
**शुक्तिस्तु शिशिरा पित्त रक्तज्वर विनाशनी ।।** आ. प्र. २९३

पाणशिंप, तिखट, स्निग्ध, अग्निदिपक, गुल्मनाशक, शूळनाशक, त्रिदोषनाशक, रुचिकारक, पाचक व बलदायक आहे. त्याचप्रमाणें ती रक्तपित्तनाशक व ज्वरनाशक आहे.

९ शौक्तिकभस्माचे मात्रा प्रमाण

**रक्तिद्वयमिता मात्रा मुक्ता गेहस्य कीर्तितः ।** र. त.

शौक्तिक भस्माचो पोटांत घेण्याची मात्रा दोन गुंजाप्रमाणें आहे.

१० शौक्तिक भस्म असलेली रोगवारी औषधांचीं नांवें.

गुल्म

प्रवाळ पंचामृत

ज्वर

भूतभैरव

Indira Gandhi National Centre for the Arts

११ शौक्तिक भस्माचा अनुपान परत्वें रोगावर उपयोग

शूळ

त्रिफला, ज्येष्टमधाचें चूर्ण, आणि त्रिकटू चूर्ण, हीं सर्व समभाग घेवून याचे बरोबर शौक्तिक भस्म सेवन केले असता ताबडतोब शूळाचा खात्रीनें नाश होतो.

रसतरंगिणी

हृद्रोग

शौक्तिक भस्म हें आवळकांठीचे चुर्णाबरोबर कावळीच्या रसांतून सेवन केले असतां हृदयाचे विकार तात्काळ नाहीसे होतात.

श्वास

शौक्तिक भस्म हें त्रिकटूचें चूर्ण, मधांत मिसळून अडुळशाच्या रसांतून सात दिवस पोटांत घेतलें असता श्वास रोग तात्काळ नाहीसा होतो.

अग्निमांद्य

शौक्तिक भस्म हें त्रिकटूचें चूर्ण, चित्रकाचें चूर्ण, व यवक्षार यांच्या बरोबर मधांतून मिसळून चाटून घेतलें असतां अग्नि प्रदीप्त होतो.

## मूत्र शर्करा

शौक्तिक भस्म हें तृणपंचमूळांच्या कषायांतून सेवन केलें असता जुनाट अशा मूत्र शर्करेचा नाश होतो.

## प्लीहा

शौक्तिक भस्म हें त्रिकटू, त्रिक्षार, आणि लवणद्वय. हें सर्व एकत्र मिळवून मधांतून चाटून घेतले असतां दारुण अशा पानथरीचा नाश होतो.

## श्वेतप्रदर

शौक्तिक भस्म हें शिलाजित, वंगभस्म, व राळ हें सर्व एकत्र करून कोरफडीच्या रसाबरोबर सेवन केलें असता श्वेत प्रदराचा नाश होतो.

------

Indira Gandhi National
Centre for the Arts

# विषवर्ग विज्ञानीय

## अध्याय ५८

१ विषपदस्य निर्वचनम–

दृष्टवैवतद्यद्विषीदन्ती जनास्तस्माद्विषं मतम् ।
नरवा विषिणोत्यतन्मृत्यु पाशैस्ततो विषन् ॥ र. त.

ज्याला पाहिल्या बरोबर सर्व मनुष्यांना विषाद ऊत्पन्न होतो म्हणून त्याला विष असे म्हणतात. तें पोटांत गेल्यास मृत्यु येतो.

२ विषांची १८ नांवे–

मयूर कालकूटंच सक्तुकं बिंदूकं तथा ।
वत्सनाभं सुनाभंच शंखनाभं सुमंगलम् ॥
शृंग कर्कोटकं मुस्तं पुष्करं शुक्ल कंदकम् ।
रक्त शृंगं हरिद्रंच विषं हालाहलं तथा ॥
विषाणि भ्रमरांतानि प्रोक्तान्यष्टा देशवहि ॥ र. का. धे.

मयूर, कालकूट, सक्तुक, बिंदुक, वत्साभ, सुनाभ, शंखनाभ सुमंगल शृंग, ककोटक मुस्त, पुष्कर, शुक्लकंदक, रक्तशृंदक, हारद्रं, विष, हालाहल, जागल ही १८ नांवे. वषांची आहेत.

१८ विषापैकी उप विषें–

सक्तुको मुस्तकः कौर्मो दा विकः सार्षपस्तथा ।
सेकतोव त्सनाभश्च श्वेतशृंगी तथैवच ॥
भैषज्यर्थं तु चैतानि विषाण्यष्टौ समाहरेत् ।
जरा व्याधि हराण्युस्यु विधिनाशीलतानिहि ॥ आ.प्र.

सोक्तुक, मुस्तक, कौर्म, दाविक, सार्षप, सैकत, वत्सनाभ, श्वेत शृंगी ही, आठ उपयुक्त विषें जाणावी.

४ स्थावर विषांचे प्रकार–

विषं चोपविषंचेति द्विविधं स्थावरं विषम् ।
प्रथमं वत्सनाभादि द्वितीयं तिंदुकादिकम् ॥

स्थावर विषाचे विष व उपविष असे दोन प्रकार आहेत. वत्सनाभादी विषें ही विषें होते. व कुचला वगैरे ही उपविषें होत.

५. श्रेष्ट विष वर्ग–

श्रृंगिकं कालकूटंच वत्सनाभं सकृत्रिमम् ।
पित्तंच विषवर्गोयं सवर:प रिकीर्तित:।। र. र. स.

श्रृंगीक , कालकुट, बचनाग व कृत्रिम विष हा विषवर्ग श्रेष्ट होय.

६. उपविष वर्ग–

लांगली विषमुष्टिश्च करवीर जयास्तथा ।
नीलक: कनकोर्कश्च वर्गोद्युत्प विषात्मका ।। र. र. स.
स्नुग्र्क लांगली गुंजा ह्यारी विष मूटिष्का ।
जैपालीन्मत्त ही फेन नवापऽविष जातय: ।।
धतूर बिज विजया गुंजा भल्लात काब्यहृच।। र. चं.

कललावी, कुचला, कण्हेर, भांग, मोरचूत, धोत्रा, रुई, उपविष वर्ग होय. या शिवाय त्रिधारी निवडुंग, गुंज, जेपाळ, आणि अफु याचीही गणना उप विषांत केली आहे. कांही रसशास्त्रज्ञ बिबा हाही उपविषांत समाविष्ट करितात.

७. जंगम विषवर्ग–

शिखि पारावत ध्वांक्ष खंजरीट कृशो ररा: ।
सागरे विहगायेच दीर्घवक्राश्चिरायुष ।।
अपरे द्विपदैश्चैव चतुष्पादादि संकुलै: ।।
जलजैः स्थलजै: सर्वै: सजीवोबधमामुपात ।। र. का. धे.

मोर, पारवा, बगळा, ताजपक्षी, बैल, जलचर प्राणी, आकाशगामीपक्षी, दोन पायांचे व चार पायांचे सर्व प्राणी हे जंगम विषवर्गांत येतात. या प्राण्यांचे रक्त व पित्त दोन्ही औषधीच्या उपयोगी अ हेत.

८. जंगम विषाचे भक्षण दोष–

निद्रांतन्द्राकलमं दाहं सपाकं लोम हर्षणम् ।
शोफंचैवाति सारंच जनयेज्जंगमं विषम् ।।

जंगम विष हे निद्रा, तंद्रा आळस, दाह, पाक, अंगावर शहारे, खेद आणि अतिसार हे विकार उत्पन्न करिते.

९. पित्त वर्ग–

क्रौंचयोग कृतंकर्म सकलंच शुभं भवेत् ।
सागरे विहगारम्या दीर्घवक्राश्चिरायुष: ।।
कुकुटाग्रण्ड पानीयं श्वेतं पीतं द्विधाभवेत ।
श्वेतंच श्वेत कार्येषु पीत कार्येषुपीतक्रम् ।।
आपदै द्विपदै श्चैव चतुष्पादैश्च संकुलै: ।
जलजै: स्थलजै: सर्वेरंजनीयो रसेश्वर: ::
एषामसृग्भि: पित्तैश्च कर्माणिस्यु: पृथक्पृथक् ।। र. का. धे.

करकोचा प क्षाचें पित्त, चलचर व आकाशगामी पक्षी, लांब चोचवाले प्राणी, या सर्वांचे पित्त हा पित्त वर्ग होय.

१०. पित्ताची शुद्धि -

निंबुद्रवपित्तं वारत्रयं विभाव्य प्रक्षालय गृण्हीयादिति ॥ र. च.

कडु निंबाच्या पाल्याच्या रसांत पित्ताला तीन दिवस भावना द्याव्या, नंतर ते पाण्यानें स्वच्छ धुऊन घ्यावे.

## २ बचनाग

१. बचनागाची नांवें-

वत्सनाभो वत्सनाग:क्ष्वेडोऽस्त्री च विषंमतम् ।
अमृतंच तदेवोक्तंरसतंत्र विशारदैः ॥ र. त.

वत्सनाभ, वत्सनाग, क्ष्वेड, स्त्री, विष व अमृत ही बचनागांची नांवें होत.

२. काळचा विषाची (बचनाग) भाषावार नांवें-

(हिं) सिंगिया विष, (बं) श्रंगिक विष, (नेपाळी) कालोविष (सं) हालाहल विष (इं) एको नाइटम् फेरोक्स.

Indira Gandhi National Centre for the Arts

३. बचनागाचें रंगपरत्वे भेद-

कृष्णाभः कपिशः पांडुवर्णंत स्त्रिविधोमतः ।
वत्सनाभो विशेषेण क्रमेण गुणवत्तमः ॥ र. त.

वत्सनाभ हा काळचारंगाचा, पिवळ्यारंगाचा व पांढऱ्यारंगाचा, असा तीन प्रकारचा आहे. तो क्रमाने पहिल्यापेक्षा दुसरा, व दुसऱ्यापेक्षां तिसरा गुणानें श्रेष्ट आहे. म्हणजे पांढऱ्या रंगाचा बचनाग हा सर्वात जास्त गुणदायक आहे.

४. ग्राह्यबचनागाचे स्वरूप-

स्थूलं स्निग्धं गुरुनवं फल पाकोत्तरोद्धृतम् ।
कीटाद्य भक्षितं चैव विषं ग्राह्य मिहोच्यते ॥ र. त.

जो बचनाग स्थूल, स्निग्ध, जड, नवीन, पूर्ण परिपक्क झालेला आहे, व ज्याला कीड लागलेलो नाही असा बचनाग ग्राह्य समजावा

५. शुद्ध बचनाग कमी विषारी कां ?-

बचनागाची शुद्धी करतांना गोमुत्रांत किंवा दुधांत उकळावे लागते. त्याला उकळल्या मुळे बचनागाचे पुष्कळसे विष बाष्पीभूत होऊन उडून जाते. व कांही विष गोमुत्रांत किंवा दुधांत मिसळून जाते म्हणून बचनाग हा शुद्ध केल्याने, त्यातील विष फारच कमी होते.

६. विषाच्या शुद्धीचे प्रयोजन–

**अविद्धं विषं दाहं मोहं हृग्दति रोधनम् ।**
**मृत्युंच विदधात्याशुतस्मात्तं परिशोधयेत् ॥** र. त.

शुद्ध न केलेले विष हे दाह, मोह उत्पन्न करणारे असून हृदयाचा अवरोध करणारे आहे. तसेच त्यामुळे ताबडतोब मृत्युहि येतो. म्हणून विषाचे शोधन करावें.

७. विषशोधन–

**अथवात्रैफले क्वाथे विषं शुद्धति पाचितम् ।**
**दोलायां त्रिफलाक्काथे छागीक्षीरेच पाचितम् ॥** भा. भै. र. ७८४

बचनागाला दोलायंत्र विधीने त्रिफळयांच्या काढयांत आणि बकरीच्या दुधांत-पचन केल्याने तो शुद्ध होतो.

प्रकार २ रा

**कणशो वत्सनागं च कृत्वा बद्धा च कर्पटे ।**
**दोलायंत्रे जलक्षीरे प्रहराच्छुद्धिमृच्छति ॥** यो. र.

बचनागाचें बारिक बारिक कणकरून तें फडक्यांत बांधून दुध व पाणी समान एकत्र करून त्यांत दोलायंत्रानें एक प्रहरभर पचन करावें, म्हणजे बचनागाची शुद्धि होतें

प्रकार ३ रा

**विषभागांश्चणकवत्स्थूलान्कृत्वा तु भाजने ।**
**तत्र गोमुत्रकं क्षिप्त्वा प्रत्यहं नित्यनूतनम् ॥**
**शोषये त्त्रिदिनादुर्ध्वं कृत्वा तीव्राऽतपे ततः ।**
**प्रयोगेषु प्रयुञ्जीत भागमानेन तद्विषम् ॥** र.

विषाचें (बचनागाचें) हरभऱ्याएवढे तुकडे करून एका मातीच्या भांड्यांत टाकून ते तुकडे बुडे तो पर्यंत त्यांत गोमूत्र घालून तीन दिवस ते उन्हात ठेवावें. रोज नवें गोमूत्र घालावें. ह्या प्रमाणें तीन दिवस करून मग पाण्यानें स्वच्छ धुवून वाळवून घेऊन मग सर्व कार्यांत योजावें.

८. अनुक्त विषोपविषांचें शोधन–

**न प्रोक्तं शोधनंयस्य विषस्यो पविषस्यवा ।**
**गोदुग्धे स्वेदनं तस्य कर्तव्यं शुद्धिकारकम् ॥** आ. प्र. पा. ४५६

ज्या विषांचे किंवा उपविषांचे शोधन सांगितले नसेल, तर त्यांचे गाईच्या दुधांत स्वेदन केल्याने त्या त्या विषाप विषांची शुद्धी होते.

९ विषमारण–

**तुल्येन टंकणे नैव द्विगुणे नोषणे न च ।**
**विषं संयोजितं शुद्धं मृतं भवति सर्वथा ॥** भा. भै. र. ७८३

शुद्ध बचनागा बरोबर टाकणखार घेऊन आणि दुप्पट काळचा मिऱ्याचे चुर्ण मिसळून एकत्र खल केल्यानें बचनाग शुद्ध व मृत होतो.

२) सम टंककणं पिष्टं तद्विषं मृत मुच्यते ।
योजयेत्सर्व रोगेषु न विकारं करोति हि ॥ र. चं.

समभाग टाकणखाराशी विषाचा खल करावा म्हणजे विषाचे मारण होते. तें विष सर्व रोगावर योजावे म्हणजे तें अपाय करित नाही.

१० बचनागाचे विशिष्ट गुण —

विषं विशेषतो वात वेदना हर मुत्तमम् ।
मूत्रलं स्वेद जननं शूल निर्मूलनं परम् ॥
मस्तिष्क देशे संवृद्धां रक्त संचरण क्रियाम् ।
नाशयत्याशु मस्तिष्के जातं वा रक्त संचयम् ॥
फुफ्फुसच्छदशोथघ्न स्तथा फुफ्फुस शोथनुत् ।
तथा शोथ समुद्भूत विविध ज्वर वेगजित् ॥
शोथं विनाशत्याशु हृदयावरणो त्थितभ् ।
तथान्त्रावरणोभ्दुतं ज्वरंच विनिहत्यलम ॥
गलशोथं तुंडिकेरीं तथैव गल शुंडिकाम् ।
अन्यांश्च तरुणान् कंठरोगा नाशु निहंत्यलम् ॥
तत्तस्थान समुभ्दूतं त्वभिघातादि हेंतुजम् ।
बाह्य माभ्यंतर रक्तत्रावं ऱ्हासयति द्रुतम् ॥
सदाहं सक्षवं तीव्रशिरो वेदनयान्वितम् ।
सदाहश्च युगं हन्ति प्रतिश्यायं नवोत्थितम् ॥
शीत पूर्वं तु दाहान्तं ज्वरं विविधहेतुकम् ।
विषं विधि प्रयुक्तं तु नाशयत्याशु निश्चित् ॥

बचनाग हे वातापासून होणाऱ्या वेदना नाहीसें करणारे उतम औषध आहे. तें मूत्रल, स्वेद जनक व शूळ नाहींसे करणारे आहे. मेंदुत रक्त संचय झाला असता बचनागानें तो नाहीसा होतो. बचनाग हा 'फुफ्फुसच्छद शोथ' (Pleurisy प्लुरसी) व निमोनिया ह्या दोन्ही विकारांना नाहींसा करणारा आहे. तेथील सुजंमुळे आलेले वेगवेगळ्या प्रकारचे ज्वरहि नाहीसे होतात. हृदयावरणावर आलेली सूज (Pericarditis) व अंत्रावरणावरील सुजेमुळें आलेला ज्वर (Peritonitis) ही नाहीसे होतात. त्याच प्रमाणें गळ्याची सुज तुंडिकेरी (गलरोग) गलशुंडिका व तसेच गळयाचे नुतन रोगांचाहि नाश होतो,

नं. २.

विषं रसायनंबल्यं वातश्लेष्म विकारनुत् ।
कटुतिक्तकषायंच मदकारि सुखप्रदम् ॥

व्यवायि शीततुद्दाही कुष्ट वातस्त्र नाशननम् ॥
अग्निमांद्य श्वास कास प्लीहोदर भगंदरान् ॥
गुल्म पांडू व्रणार्शांसि नाशयेत्क्रमशोनृणाम् ॥ यो. र.
र. चं.

विष हे रसायन बलकारक, वातकफ विकार नाशक, तिखट, कडू, तुरट, मदकारक सुखदायक, व्यवायी शैत्य नाशक, दाह कारक, कुष्टव, वातरक्त नाशक, तसेच अग्निमांद्य, श्वास, खोकला, पान्थरी उदर, भगंदर गुल्म, पांडुरोग, व्रण मुळव्याध ह्या सर्वांचा अनुक्रमे नाश करितें.

११ विषाची अधिक मात्रा पोटांत गेल्यास योग

१) अतिमात्रं यदाभुक्तं तदाज्यं टंकणं पिबेत ।
विषं सवेगतो नाशमाशु प्राप्नोति निश्चितम् ॥

एखादे वेळी जर एखाद्या मनुष्याने प्रमाणापेक्षा ज्यास्त विष भक्षण केले तर त्याच वेळी त्या मनुष्याला टाकणखार आणि तुप एकत्र मिसळून पाजावें म्हणजे खाल्येल्य विषाचा वेग लवकर नाहीसा होतो.

२) अतिमात्रं यदाभुक्तं वमनंतस्यकारयेत् ।
अजा दुग्धं यदा कोष्टे स्थिरी भवति देहिनः ॥
अजा दुग्धं ददेत्तावत् यावत् वांतिर्न जायते ॥
विषवेगं तदोत्तीर्णं जानीयात् कुशलो भिषक् ॥ अ. प्र. पा.४६१

विष ज्यास्त प्रमाणांत पोटांत गेल्यास त्याला वमन करवावें. बकरीचे दूध उलटी होइपर्यंत पाजावे. बकरीचे दूध विषभक्षण केलेल्या मनुष्याचे पोटांत जावून, स्थिर झाले म्हणजे त्या दुधाचे पचन झाले म्हणजे, तें विष उतरले असे बुद्धिमान वैद्य म्हणतात.

३) विषं हन्यात रसः पीतो रजनी मेघनादयोः ।
सर्पाक्षी टंकणं वाऽपि घतेन विषहृत परम् ॥ अ. प्र.पा. ४६१

हळद व चवळीचा रस प्याल्यानें विषांचा नाश होतो. अथवा सर्पाक्षी व टाकण खार तुपाबरोबर पिल्यानें विषांचा नाश होतो.

२१ विषनाशक योग–(वाग्भट)

आदौ वांत विरक्तस्य हरिद्रे कटभीं गुडम् ।
सिंधुवारक निष्पाव बाष्पिका शतपर्विका ॥
तंदुलीयक मूलानि कुक्कुटांडमवल्गुजम् ।
नावनांजन पानेषु योजयेत् विषशांतये ॥
विषभुक्ताय दयाद्याच्च शुद्धायोर्ध्वमधस्तथा ।
सूक्ष्मं ताम्ररजः काले सक्षौद्रं हृत् विशोधनम् ॥
शुद्धे हृदि ततःशाणं हेमचूर्णं च दापयेत् ।
न सज्जते हेमपांगे पद्मपत्रेऽम्बुवत् विषम् ॥

जायते विपुलं चायुर्गरेऽप्येष विधिःस्मृतः ।
साधकानां हितार्थाय सदाशिवमुखात् गतम् ॥
क्षिप्रं सर्वविषघ्नं च मंत्रं वै प्रवदाम्यहम् । अ. प्र. पा. ४६२

वाग्भटाचे मतानें विषनाशक योग—पहिले वमन (आमाशयगत विष बाहेर काढण्या करितां) विरेचन (पक्काशयांत गेलेले विष गुदद्वारावाटे बाहेर काढण्या करितां) ह्या वमन विरेचनांनी शुद्ध झालेल्या मनुष्याला हळद, दारूहळद, मालकांगोणी गुळ, निर्गुडी, पावटे, हिंगुपत्री, वेखंड, चवळाईचीमुळी, कोंबडीचे, अंडे, वावंच्या ही द्रव्य नस्य, अंजान, व पोटांत घेणें ह्या कामीं विष शांतीकरितां उपयोगांत आणाव्या. विष-भक्षण केलेल्या मनुष्याला वमन, विरेचन देऊन शुद्ध केल्यावर औषध देतांना पहिले ताम्रभस्म मधाबरोबर हृदय शुद्धिकरितां द्यावे, नंतर सुवर्णभस्म एक शाण द्यावे. कारण जसे कमळ पत्रावर पाणी ठरत नाहीं त्याचप्रमाणें सुवर्ण खाल्लेल्या मनुष्याच्या शरीरांत विष ठरत नाहीं. व त्यामुळे आयुष्याची वृद्धि होते हा योग गर (कृत्रिमविष) विषां करिताही फार उत्तम आहे.

१३ अशुद्ध बचनाग पोटांत गेल्यास उपाय–

अविशुद्ध वत्सनाभे जठरसगतें सति वेगानालोच्य शुद्धयादि यथावदुपक्रमं
कृत्वा पश्चात्छमनार्थ मिमान्योगान्‌पयोजयेत् । यथा–
गोदुग्धं । नवनीतं । अजेयं घृतम् । मृद्विक कल्कः । उदुम्बरत्वक्कल्कः तंडुल शाकियो रसाः पृश्निपर्णीरसः । खण्डशर्करा जंम्बूत्वग्रसः हिंगु इत्येतान्प्रयोगान् यथदान कल्पयेत्

मात्रा—४ गुं. ८ गुंज,

काल–– विशतिनिमिशादारभ्य एक दिन पर्यन्तम्

धृतं क्षीरं सितां क्षौद्रं गोधूमांस्तंडुलान्यवान् ।
ब्रम्हचर्य हिमं देशं हिमं कालं हिमं जलम् ॥
विषस्य सेवको मर्त्यो भवेदति विचक्षणः । र. चं.

तूप, दूध, साखर मध, गहू, तांदूळ व सातू ह्या पदार्थांचे सेवन तसेंच ब्रम्हचर्य, थंड प्रदेशांत राहणे, थंड हवा व पाणी ह्याचें सेवन करणे ही पथ्य विष सेवन करणारानें पाळावी.

१४ विषनाशक चार योग–

पुत्रजीवक मज्जा वा पीता निंबुक वारिणा ।
विषवेगं निहंत्येव वृष्टिर्दावा नलं यथा ॥
गोघृतपीता हरति विषं गरलं च वंध्यकर्कोटी ।
सकल विशोप शमनी त्रिमूली सुरभि जिव्हा च ॥
अतिमात्रं यदा भुक्तं तदाऽऽज्यं टंकणंपिबेत् ।
विषं सवेगं तेनाशु माप्नोति निश्चितम् ॥ आ. प्र. पा. ४७२

(१) पुत्रजीवक वृक्षाच्या फळांची मज्जा निंबुच्या रसांत उगाळून पोटांत घेतली असतां विषवेगाची तात्काळ शांती होते. जसा वर्षाऋतुतील पावसामुळे वनांतील अग्नीं जसा तात्काळ नाहींसा होतो.

(२) वांझकटोली गाईच्या तुपाबरोबर प्याले असतां विष व सापाची गरळ यांची शांती होते.

(३) त्रिमूळी व सुरभिजिव्हा ह्या दोन्ही वनस्पती संपूर्ण विषांचा नाश करणाऱ्य आहेत. ह्या वनस्पती गाईच्या तुपाबरोबर पोटांत घ्याव्या

(४) विष हे जास्त प्रमाणांत पोटांत गेल्यास टाकणखार गाईच्या तुपांतुन प्यावा म्हणजे विषांची तात्काळ शांति होते.

५ विषतैल–

गृण्हियात् काचयंत्रेण विषस्यागरूसत्ववत् ।
तैलं तेन रसो मर्द्यः क्षुत्कारी स महान्भवेत् ॥
एवं धत्तूर बीजादेस्तैलं ग्राह्यं विधानतः ।
योगे सर्वत्र युंजीत प्रोक्तमानेन नान्यथा ॥　　आ. प्र. पा. ४६८

अगरूचे सत्वपातन ज्या विधीनें केलें जाते. त्याच विधीनें काचाच्या मंत्राने विषाचे तेलाचे पातन करावें. ह्या तेलाने पारा मर्दन केल्यास तो फारच बुभुक्षित होतो. याच विधीनें धोत्रा आदि विषांचे विषाचे तेल काढावे. ह्या तेलाचा प्रयोग सर्वयोगांत विधियुक्त व योग्य प्रमाणांतच करावा अन्यथा करू नये.

## अहिफेन

१ अहिफेनस्य नमानि–

अहिफेनमफेनं च निफेनमहिफेनकम् ।
अफूकं फणिफेनं च नागफेनं च तन्मतम् ॥　　र. त.

अहिफेन, अफेन, निफेन, अहिफेनकम्, अफुक, फणिफेन, नागफेन हीं अफुचीं नांवें आहेत.

२ भाषावार नांवें–

सं.–अहिफेन　　तै.–नाल्लामंदु
हिं.–अफीम　　इ.–ओपियम् (Opium)
बं.–अफिग　　लै.–ओप्पम् (Opium)
म.—अफू, अपू, कडवी　　फा.—अफयून, तिर्याक
गु.—अफीण　　आ.—लवनूल, खसखास.
क.–फेन　　शा. नि. ३४२

३ अफूचा परिचय काल–

चरक–शुश्रुत काली अफू तर सर्वत्रच अज्ञात होती. वाग्भटकालीं अफूचा शोध लागला होता. परंतु तो शोध भारतापर्यंत येऊन पोचला नव्हता. ११ व्या शतकांत अफूचा प्रचार भारतांत झाला असूनहि त्यावेळीं वैद्यवर्गानें त्याची दखल घेतली नव्हती. असें दिसतें. त्यामुळे चक्रदत्त ग्रंथांत अफूचा समावेश झालेला दिसत नाही. १२ व्या शतकांत र. र. स. कार वाग्भट झाला. त्यानंतर सोळाव्या शतकांत गदनिग्रहकार शोदल झाला, त्यानंतर शारंगधर झाला. त्या दोघांनी मात्र औषधी कल्पांत व प्रक्रियेंत अफूचा उपयोग केलेला आढळतो. पण तिचे गुणधर्म अगर शोधन स्वतंत्रतेनें दिलेले आढळत नाही. भावमिश्रानें अफूचे गुण संक्षेपानें दिले तर यो. र. ने आफूचे गुणदोष व्यवस्थित देवून शुद्धिप्रकारहि सांगितला आहे. यो. र. काल १६५० धरतात. कारण त्यांत तमाखुचे गुणधर्म सांपडतात. पोर्तुगीज लोकांनी नवव्या शतकांत अफू भारतांत आणली असे म्हणतात.

४ अफूची उत्पत्ति–

खस्तिलस्य फलानां तु क्षीरणात्खलु दुग्धवत् ।
निर्यासो योऽभिनिर्याति सैवाफेनाख्ययामता ॥ विषतंत्र १६

खसखसीच्या फळांना चिरा पाडल्यानंतर त्या चिरांतून दुधासारखा जो स्राव निघतो त्याला अहिफेन असे म्हणतात.

५ भेसळ–

चीक गोळा करण्यापासून तो ती अफू शिक्कामोर्तब होईपर्यंत अफूंत निरनिराळ्या वेळीं निरनिराळी भेसळ होत राहते. (१) बोंडावरील अफू खरडतांना जरा अधिक जोर दिला कीं बोंडावरील मेंचट पदार्थ व बोंडाचा मऊ भाग अफूंत येतो. (२) नंतर ती एकजीव व्हावी व सावकाश सुकावी म्हणून तींत तेल मिसळतात. त्यांतला कांही भाग तींत राहतो. (३) नफा अधिक मिळावा म्हणून तींत काळी माती मिसळतात. कांही देशांत काळ्या मातीऐवजी जेष्टमधशिरा मिसळतात. त्याने रंग व चिक्कणता कायम टिकते. वास उत्तम येऊं लागतो पण आकार वाढतो त्यामुळे प्रमाणित वजन जमत नाही.

६ अहिफेन निर्मलीकरण–

स्वस्तिलस्य तु निर्यासं सलिले तु सुनिर्मले ।
संद्राव्य खलु यत्नेन वस्त्रपूतं तु कारयेत् ॥
निर्मलीकृतमेतत्तु स्वस्तिलद्रवतोयकम् ।
गव्यदुग्धसमायुक्तं पचेन्मंदाग्नियोगतः ॥

पाककालं सुविज्ञाय पाकविद्भिषजां वरः ।
समाहरेत्प्रयत्नेन त्वफेनं निर्मलीकृतम् ॥ र. त.

खसखसीच्या फळांपासून निघालेला रस पाण्यांत टाकून स्वच्छ धुवून त्याला पातळ करावा आणि तो फडक्यांतून गाळून घ्यावा. याप्रमाणे निर्मळ करून घेतलेल्या त्या जलयुक्त अहिफेन द्रवांत गाईचें दुध मिसळून मंद अग्नीवर तें पचन करावें. पाणी व दूध जळून गेल्यावर खाली काढून ठेवावे. हाच निर्मलीकृत अहिफेन होय.

७ अहिफेन शुद्धिः । प्रकार १ ला–

अहिफेनं शृंगवेर रसैर्भाव्यं त्रिसप्तधा ।
शुद्धं युक्तेषु योगेषु योजयेत्तद्विधानतः ॥ र. चं.

अफू आल्याच्या रसांत एकवीस दिवस खलावीं म्हणजे ती शुद्ध होते. नंतर ती औषधामध्यें योजावी.

८ अहिफेन गुणाः

अफुकं शोषणं ग्राहि श्लेष्मघ्नं वातपित्तलम् ।
मदतृड्दाहकृच्छुक्रस्तम्भनायासमोहकृत् ॥
अतिसारे ग्रहण्यां च हितं दीपनपाचनम् । यो. र.
सेवितं दिवसैः कैश्चिद्भ्रमयत्यन्यथार्तिकृत् ॥ यो. र.

अफू, शोषक, ग्राही, कफनाशक, वातपित्तकारक, मद, तहान व दाह ह्यांना करणारी, वीर्यस्तंभक, आयास व मोहकारक, अतिसार व संग्रहणी ह्यांना हितकारक, अग्निदीपक व पाचक आहे. अफू कांही दिवस सारखी सेवन केली असतां घेरी उत्पन्न करिते व आणखीहि कांही पीडा करिते.

मोहकृन्मारणं दीप्तं सेवितं त्यक्तुमक्षमम् ।
श्लेष्महृद्वात पित्तास्तेऽनिष्टं युक्त्याऽमृतं विषम् । र. का. धे.

अफू ही मोह उत्पन्न करणारी असून ती मारक आहे. तिची खाण्याची संवय झाल्यास ती सोडणें अशक्य होऊन जातें. ती कफनाशक असून वातरोग व रक्तपित्त या रोगावर अनिष्ट आहे. परंतु युक्तीने ( बुद्धीने ) योग्य अनुपानांतून सेवन केल्यास ती अमृताप्रमाणें आहे.

अहिफेनं सुतिक्तं तु निद्राजनकमुत्तमम् ।
ग्राहि चैव विशेषेण वेदनाविनिवारणम् ॥
संनिपातप्रशमनं तथा वमिनिषूदनम् ।
पुरातनं नवं चापि विनिहंत्यतिसारकम् ॥

निहंत्यामाशयोद्भूतक्षतमांसार्बुदव्यथाम् ।
मद्यपानोत्थशोयस्य व्यथाग्चामाशयाश्रयाम् ।
अपानवायोर्भुक्तान्नबहिर्निःसारणात्मिकाम् ।
क्रियां विवृद्धां चपलां ऱ्हासयत्यविकल्पितः ।।
विनिहंति विशेषेण विषूचिमतिदारुणाम् ।।
सातिसारं सप्रलापं पर्याप्तकुलमनिद्रया ।
निपातयेत्सन्निपात मांत्रिकज्वरसंज्ञकम् ।।
प्रवाहिकाप्रशमनं त्वंत्रशूलविनाशनम् ।
मदात्ययहरं चैव तथोन्मादनिबर्हणम् ।।
रजःशूलप्रशमन मस्थिभग्नव्यथापहम् ।
नवामवातशमनं हितमस्थिच्युतौ तथा ।।
शुष्ककासप्रशमनं गर्भस्राव निषूदनम् ।
राजयक्ष्मसमुद्भुत निशास्वेदनिवारणम् ।। र. त. ३३८

अफू ही कडु असून तो निद्रा आणणारी, मलमुत्रांचा अवरोध करणारी, वेदना कमी करणारी, सन्निपात व वांति यांचा नाशक, नवा किंवा जुनाट अतिसार यांचा नाशक, आमाशयांतील क्षत, मांसार्बूद, मद्यपानामुळे आमाशयांत आलेली सूज या सर्वांचा नाश करणारी आहे. मोठ्या आंतडींतील मल बाहेर ढकलण्याची अपानवायुची क्रिया दूतगतीने वाढून नंतर ती क्रिया तात्काळ बंद होते. तसेच दारुण अशी विशुचिका, प्रलापयुक्त अतिसार, ज्यांत झोप येत नसून फार व्याकूळ आहे असा आंत्रिक ज्वर नांवाचा सन्निपात यांचा नाश करिते. शिवाय प्रवाहिका, अंत्रशूळ यांचीं नाशक, मदात्यय, उन्माद, विटाळशूळ, अस्थिभंगाची व्यथा, नवीन आमवात, अस्थिभंग. कोरडा खोकला, गर्भस्राव, राजयक्ष्मांत रात्री येणारा घाम, या सर्वांचा नाश करणारी आहे.

## ९ अफूची उपयुक्तता—

त्वचेवर लेप लावणें, अगर चोळणें व पोटांत देणें असा दोन प्रकारचा अफूचा उपयोग करण्यांत येतो.

भारतांत अफूचा औषधी उपयोग युनानी वैद्यांनी केला व त्यांचेकडूनच आयुर्वेदियांनी ह्या औषधांची माहिती घेतली. शस्त्रक्रिया करण्यापूर्वी हकीमलोक रुग्णास अफू देत असत. शुक्रस्तंभन व वाजीकरण म्हणूनहि ते अफूचा उपयोग करीत. लहान मुलांना दांत येतांना अफू दिल्यास अतिसाराचा उपद्रव होत नाही. व दांतहि सुखाने बाहेर येतात. दाहशामक म्हणूनहि ते अफू देत. डोळे आले म्हणजें अफू, तुरटी, लिंबाचा रस, असा लेप ऊन करून डोळ्यांवर देतात. ह्याने सूज ओसरते. शूलहि

राहतो. अफू तेलांत ऊन करून कानांत घातली तर कान दुखणें थांबतें. उसण, लचक, संधिवात इत्यादि रोगांवर वेदना व शोथ शामक म्हणून अफूचा लेप देत असत.

रस-कडु, गुण-रुक्ष, रंग-तांबूस, गंध-अप्रिय, वीर्य-उष्ण, स्पर्श-शीत, रूप-स्निग्ध, युनानी वैद्यांप्रमाणेच अफूचा उपयोग आर्य वैद्यहि करितात. त्याशिवाय ते दमा, खोकला, डांग्या खोकला ह्यावर, उबळ थांबविण्याकरितां व क्लेश कमी व्हावेत. तसेच लघ्वींतील साखर कमी व्हावी म्हणून मधुमेहांतहि देतात,

अफूने शिश्यांचें मारण करितात. थोड्या वेळांत नागाचें पांढरें भस्म तयार होतें. हें भस्म मैथुनजन्य स्नायुशैथिल्यावर फारच उत्तम काम करिते.

## १० अफूची प्रत्यक्ष शरिरावरहोणारी क्रिया–

अफूची प्रत्यक्ष क्रिया तोंडापासून गुदापर्यंतचे अंत:स्त्वचेवर होते. अफू दिल्या-नंतर प्रथम थुंकी कमी होते. आमरस कमी होतो. भूक मंदावतें. मळबद्ध होतो. नाडी सुधारते. मनास आल्हाद होतो. विचारशीलता व कामशक्ति वाढते. मन शांत होतें. झोप सुंदर येतें. हें कार्य अल्प मात्रेने अधिक चांगले साधते.

अफू हें दिव्य औषध आहे. अफू उत्तेजक, आल्हादकारक, वाजीकर, सर्व शरीरास शांतता आणणारे, निद्राजनन, शूलघ्न, पीडाशामक, मादक, ग्राहक, कफनाशक, शोणि-तास्थापन, ज्वरघ्न, स्वेदजनन, नियतकालिक ज्वरप्रतिबंधक, शोथघ्न, कासहर आणि सकोच विकास प्रतिबंधक असें अमौलिक औषध आहे. ह्या गुणांचे प्राप्तिकरितां मात्रा मात्र वाढवावी लागते.

अफू शरिरांतील सर्व रस कमी करिते. मात्र घाम, लघ्वी व दूध ही कमी होत नाहीत. मात्र क्षयरोग्यास रात्रीं घाम येतो तो मात्र अफूने कमी होतो.

मुलावर शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांना अफू दिल्यास ती लवकर सुधारतात. अफूने जीवन विनिमय क्रिया सुधारते. म्हणूनच तिला रसायन म्हणतात. मधुमेहांत अफू दिल्यास लघ्वींतील साखर कमी होते.

अफू मूत्रपिंडाद्वारे शरिरांतून बाहेर पडते. मूत्रपिंड बिघडलेलें असल्यास वेळचे-वेळीं बाहेर निघून जात नाही. म्हणून शक्यतोवर मुत्रपिंड विकृत झालें असतां अफू न देणें बरें.

वैद्य पु. वि. धामणकर (आयुर्मिमांसामधील लेख)

## ११ अहिफेनस्य निषेधः ।

न बालेषु न वृद्धेषु मधुमेहप्रपीडिते ।
शीतपादकरायां च विषूच्यां खलु नैव च ॥
न श्लैष्मिके तथा कासे प्रचुरश्लेष्मनिर्गमे ।
अहिफेनं वृक्कशोथे प्रयुञ्जीत न कर्हिचित् ॥ र. त.

आठ वर्षांच्या खालील मुलांना व वृद्धांना, मधुमेहानें पीडित असलेल्यांना विषुची रोगांत हातापायांत थंडपणा आला असल्यास, अफू देऊ नयें. कफ रोगांत, कास रोगांत, कफ जास्त प्रमाणांत पडत असल्यास, वृक्क शोथांत अफू कदापीहि देऊं नये.

## १२ बाह्यप्रयोगे अहिफेनस्य गुणाः

**अहिफेनं विशेषेण खलु बाह्यप्रयोगतः ।**
**फुप्फुसच्छदशोथघ्नं त्वंत्रावरणशोथनुत् ॥**
**विविधोस्थानसंभूतां यिविधस्थानसंश्रयाम् ।**
**तथा विविधसंस्थानां वेदनां विनिहंत्यलम् ।**
**अभिष्यंदप्रशमनं कर्णशूलनिबर्हणम् ।**
**कृमिदंतोत्थशुलघ्नं त्वामवातापहं तथा ।:**
**गुदामयहरं चैव पायुस्थविदरापहम् ।**
**व्रणपीडाप्रशमनं नाडीनामवसादनम् ॥** र. त.

अफू ही बाह्य कामाकरितांच उपयोगांत आणतात. अफू ही फुप्फुसावरणाची सूज व अंत्रावरणावरीस सूज नाहीशी करिते. त्याजप्रमाणे शरीराच्या इतर भागावर उत्पन्न झालेली सूज, निरनिराळ्या प्रकारची सूज व निरनिराळ्या स्थानांतील वेदना नाहीशा होतात. डोळ्याचे विकार व कानांत होणारा शूळ नाहीसा होतो. कृमि व दांत निघतांना होणारा शूळ, आमवात, मुळव्याध, गुदस्थानांतील चिरा व्रण नाहींसे होतात व नाडीची गती मंद होते.

## १३ अहिफेनस्य मात्रा–

**आरभ्य गुजापादांशाद् गुंजैकप्रमितं शुभम् ।**
**अहिफेनं प्रयुंजीत वलकालाद्यपेक्षया ॥** र. त.

अफू ही ऋतु व बळ पाहून चवथाई गुंजेपासून एक गुंजेपर्यंत द्यावी.

## १४ अफू असलेल्या औषधांची नांवें–

(१) वेदनांतक रस –२ गुं. पाण्याबरोबर–अंगांत होणाऱ्या वेदना ताबडतोब नाहीशा होतात.

(२) निद्रोदय रस– २ गुं. घेतल्याने झोप येते.

(३) सिंदुरभूषण—२ गुं. घेतल्याने अतिसार नाहीसा होतो.

(४) हर्षोदयावटी–२ गुं. शक्तिवर्धक. वीर्यवर्धक. कामोद्दीपक आहे.

(५) अहिफेनासव--अतिसार, विषूचिका, कर्णशूळ, दंतशूळ.

(६) मंगलोयवटी–१ गुं. बडबड नाहीशी होतें.
(७) वेदनांतकमलहर–मुळव्याध, वेदना, ठणका नाहीशे होतात.

१५ प्रमाणापेक्षा जास्त अफू पोटांत गेल्यास होणारे विकार व त्यावर उपाय–

प्रमाणाधिकमहिफेतं जठरगनं सधिमानन्दोषांजनयति–आदावुत्साहः, तन्द्राधिक्यं, अग्नेः सादः, स्पर्शज्ञानं, सुखदुःखव्यामोहः, ज्ञानतंतूनां बाधिर्यं, शरीरेरौक्ष्यम्, स्वेद-मुत्रदुग्धादीनां क्रमशो ऱ्हासः, नेत्रकनीनिका संकोचः, निद्राधिक्यं शरीरशीतता, मुखोष्टौनीलौ भवतः मंदश्वासः मन्दतमानाडी मरणं च ।

शमनोपायः–शोधनानंतरं सौराष्ट्री चूर्णम । कार्पासत्वक्चूर्णम् । हिंगुजलम् । पिप्पलत्वक्कषायः । आर्द्रक स्वरसः ।

मात्रा ४ गुंजा.

काल–षट्होरासमयादारभ्य द्वादशहोरसमय पर्यंतम् ।	विषतंत्र १७

१६ अहिफेन विष जास्त पोटांत गेल्यास होणारे अपाय—

विषमेतदात्मनाशायैव प्रायः समुपयुज्यते । अस्मिन्हिद्रव्यें" मॉंफिआ " इतिसंज्ञकं विषं । सद्या प्राणहरण करंच विद्यते । अस्यच अशुद्धस्य प्रमाणातिरिक्तस्यच, सेवना-दष्टहोरा परिमिते एवकाले समयाति मृत्युः । तस्यच जठर गतस्य परिहरणं काथंकारं विधेयमिति सप्रपंच व्याख्यातमेव ।	विषतंत्र ७८

विष हें प्राण हरण करणारे आहे त्यांतच अफुचाहि समावेश होतो. (मॉंफिया) हाहि तात्काळ प्राण हरण करणारी आहे, अफू ही अशुद्ध व प्रमाणापेक्षां जास्त पोटांत गेल्यास तात्काळ मृत्यु येतो. पाटांत गेलेली अफू बाहेर कशी काढावी याची वेगळी माहिती सांगितली आहे.

## जेपाळ

१ भाषावार नांवें

| | |
|---|---|
| सं.–जयपाल, | क.–जेपाल, |
| हिं.–जमालगोटा, | इ.–पार्जिग ब्रोटन (Parging Broton) |
| वं–जैपाल, | लै.–ओलियम, कोटोनिस, |
| म.–जेपाळ | अ.–हबुससलातिन, |
| गु.–नेपाली, | फा.–तुखमेबेदं जीरखताई. |

२ जैपाल नामानि

जैपालश्च जयपाल, सारकस्तिन्तिडी फलम् ॥

जैपाल, जयपाल, सारक तितिडीफल हीं जैपालचीं नांवें आहेत.

दुसरीं नांवें–दंतीबीज, मलद्रावी, निकुंभाख्य बीज, रेचक. बीज रेचक, कुंभी बीज, कुंभीनी बीज घंटिनी बीज, शोधनीबीज, चक्रदंती बीज.

३ जयपाल शोधन.

जयपालस्य बीजानि नवानि तु समाहरेत् ।
बाह्यत्वचमपाकृत्य द्विधा खलु विभेदयेत् ॥
हरिद्वर्णां नातिदीर्घां रसनां तु परित्यजेत् ।
पोट्टल्यामथ विन्यस्य दोलायंत्रे विधानतः ॥
गव्यदुग्धे प्रयत्नेन यामैकं स्वेदयेत्ततः ।
एवं त्रिवारं सुस्विन्नो जयपालो विशुध्यति ॥ र. त.

जयपाळाच्या बिया नवीन पाहून आणाव्या. त्या बियाच्या वरील टरफले काढून टाकावी. व नंतर त्या बियाचे दोन भाग चाकूनें करावेत. पिवळट रंगाची फार लांब नसलेली त्या बियामधील जीभ काढून टाकावी. नंतर त्या बिया एका फडक्यांत बांधून त्याची पुरचंडी करावी. व ती गाईचें दुधांत दोलायंत्राच्या पद्धतीने एक प्रहरभर शिजवावी. या प्रमाणे तीन वेळ शिजविलें असतां जेपाळ शुद्ध होतो.

जयपालं त्वग्रसज्ञारहितं पोट्टलीगतम् ।
दोलायंत्रे तु यामैकं स्वेदयेद् गव्यदुग्धतः ॥
संपेष्य खल्वे नूत्ने तु खर्परेषु प्रलेपयेत् ।
विज्ञाय विगतस्नेहं जयपालं समाहरेत् ॥
न्यसेद्वा यत्नतो मध्ये मषीशोषकपत्रयोः ।
एवं तु विगतस्नेहो रेचकः शुद्धिमाप्नुयात् ॥ र. त.

जयपाळ बीजें आणून त्याच्या वरील टरफलें व आंतील जीभ काढून नंतर त्या बियांची एक पुरचुंडी करून एक प्रहर दोलायंत्रांत गाईचें दुधांत शिजवावी. नंतर दगडावर बारीक वाटून एका कोऱ्या मडक्याला त्याचा लेप करावा. त्यामुळे बियांत असलेले तेल त्या कोऱ्या मडक्याला शोषल्या जाईल. नंतर तें चूर्ण मडक्यांतून काढून घ्यावे. नंतर दोन शाईशोकपेपरमध्यें तें चूर्ण पुन्हां ठेवून वर दडपण ठेवावें. या कृतीने सर्व तेल निवून गेल्यावर तो जेपाळ शुद्ध होतो.

स्विन्नं गोमय तोयेवा दुग्धेवा जयपालकम् ।
खर्परे मृदू भृष्टंतन्निःस्नेहंशुद्धि मृच्छति ॥ शा. नि. पा. ३९०

जेपाळाचें वरील टरफल व आंतील जीभ काढून त्या बिया शेणाच्या पाण्यांत किंवा गाईचें दुधांत एक प्रहर दोलायंत्रांत शिजवाव्या. नंतर खलांत किंवा पाट्यावर वाटून तो लुगदा कोऱ्या मडक्याच्या बुडावर बाहेरून लावावा किंवा कोऱ्या खापरांत घालून मंद अशा आचेंवर त्यांतील स्नेह नाहीसा होईपर्यंत भाजून घ्यावा म्हणजे शुद्ध होतो

४ जेपाळाचें गुण

क्रुमिहारी कुष्ट हरो वातश्लेष्म निषूदनः ।
वांतिकृत्पित्त जननो वृश्चिकादि विषप्रणूत् ॥ र. त.

जेपाळ हें कडू, विरेचन करणारे, जलोदर व नवज्वर नाशक, कृमीनाशक, कुष्ठनाशक, वातकफाचा नाशक, वांती करणारा, पित्त वाढविणारा, विंचवाच्या विषावर फार उपयोगी असा आहे.

जैपालोऽस्ति गुरुस्तिक्तो वांतिकृज्ज्वरकुष्ठनुत् ।
उष्णः सरो व्रणश्लेष्मकण्डूकृमिविषापहः ॥ यो. र.

जैपाल जड, कडू, वांति, ज्वर, व कुष्ठ ह्यांचा नाश करणारा, उष्ण, सारक, व्रण, कफ, कंडू, कृमि व विष ह्यांचा नाशक आहे.

५ जेपाळाचें तेलाचें गुण

तैलं निकुंभ बीजोत्थ मत्युग्रं रेचनं परम् ।
आनाह मुदरं हन्ति संन्यासं च शिरोगदम् ॥
धनुस्तम्भं ज्वरोन्मादं गदमेकांग संज्ञकम् ।
आमवातंच शोथंच मर्द्दनात्कास नाशनम् ॥

जेपाळाचें तेल अत्यंत उग्र, रेचक, त्याचप्रमाणे पोट फुगणें, उदररोग, संन्यास, शिरोरोग, धनुस्तंभ, ज्वर, उन्माद, एकांगरोग आणि आमवात नाशक आहे. सुजेवर या तेलाचें मर्दन केलें असतां सूज नाहीशी होते. त्याचप्रमाणें हें तेल कास नाशक आहे.

६ जयपाल कोणास देऊं नये ?

बाले वृद्धे कृशे क्षीणे गर्भिण्यांच गुदामये ।
प्रवाहिकायां. शोथे च त्वामपक्वाश्रयाश्रिते ॥
गुदभ्रंशे चांत्रशोथयुते बद्ध गुदोदरे ।
तयांत्रच्छदशोथे च जयपालं न योजयेत् ॥ र. त.

बाल, वृद्ध, कृश, क्षीण, गर्भिणी, मुळव्याध; भगंदर वगैरे, प्रवाहिका, आम किंवा पक्व अशी सूज, गुदभ्रंश, आंत्रशोथ, बद्धगुदोदर, हे विकार ज्यांना असतील अशा सर्वांना जेपाळ देऊं नये.

बालवृद्ध कृशक्षीण पीनसार्त भयार्दिताः ।
रूक्ष शोष तृषायुक्ता गर्भिणीच नवज्वरी ॥
अधोगच्छति यस्यासृक् सूतिकातंक पीडिता ।
नैति विरेक योग्याः स्युरन्येषांच बलाबलम् ॥ रसेंद्र.

लहान मूल, जो कृष असेल; जो क्षीण असेल, पीनस व क्षय यांनी पीडित, ज्याचें शरीर रुक्ष आहे, शोष व तहान यांनी पीडित, गर्भिणी, नवज्वरात, सूतिका रोगाने पीडित असून, अधोमार्गाने रक्त जास्त असेल, जे विरेचन देण्याला योग्य नाही अशांना जेपाळ देऊं नये. इतरांना बलाबल पाहून द्यावे.

### ७ प्रमाणापेक्षा जास्त जयपाल पोटांत गेल्यास होणारे विकार व त्यावर उपाय

**तीव्ररेचनकरः आंत्रशोथ समुत्पादकरः, शूलकरः, आटोपकरः, अस्यभक्षणातन्मुख मोजो रहितं भवति । नाडीसूक्ष्मा, सस्वेदमंगं भवति ।**

**शमनोपायः गोघृतम्, एलाचूर्णं दधियुक्तम्, धान्यचूर्णं शर्करासहितम् ।**

**विषतंत्र १७**

जेपाळ प्रमाणापेक्षां जास्त पोटांत गेल्यास तीव्र जुलाब होतात. आंतडीला सूज येते शूळ होतो. पोटांत आवाज होतो. तोंड कोरडे पडतेः नाडी सूक्ष्म होते. आंगाला घाम येतो.

**त्यावर उपाय**—गाईचें तूप पाजावें, विलायचीचे चूर्ण दह्याबरोबर घ्यावे. धणे चूर्ण करून साखरेबरोबर घ्यावें.

### ८ जयपालस्य वृश्चिक विषहरः प्रलेपः

**जलपिष्टस्तु जैपालो यत्नतः परिलेपितः ।**
**विषं वृश्चिक दंशोत्थं विनिहंति विशेषतः ॥** र. त. ३४६

जेपाळ चूर्ण करून किंवा पाण्यांत उगाळून विंचू चावला असेल अशा जागीं लावावें. त्यामुळें वृश्चिक विष नाहीसे होते.

### ९ जयपाल मात्रा

**अष्टमांशाद्रक्तिकाया रक्तिका चरणांशिकम् ।**
**जयपालं प्रयुञ्जीत भेषजैः सह योजितम् ॥** र. त.

जेपाळाचें पोटांत घेण्याचें प्रमाण एक अष्टमांश गुंज ते एकचतुर्थांश गुंजेपर्यंत दुसरें औषधांत मिसळून घ्यावें.

### १० जयपाल असलेल्या औषधींची नांवें

(१) इच्छाभेदी–गरम पाण्याबरोबर घेतली असतां जुलाब होतात. जुलाब पुरेसे झाले असे वाटल्यास अर्धा ग्लास थंड पाणी प्यावें. प्र. २ गुंजा.

(२) जलोदरारि–जुलाब होऊन जलोदर नाहीसे होते. प्रमाण– १ गुं. निशोत्तराच्या काढयांतून घ्यावें. दिवसांतून १ वेळ.

ज्वरारि–तीव्र ज्वरावर (नवज्वर) १ गुंज, आल्याच्या रसांतून घ्यावें.

(४) अंजनभैरव–संन्निपात, याचें डोळयांत अंजन केल्यास संनिपात नाहीसा होतो.
(५) वृश्चिकविषहरलेप–पाण्यांत उगाळून दंशस्थानावर लेप केला असतां विंचवाचें विष उतरतें.

## धोत्रा

### १ भाषावार नांवें

हिं–धतूरा
वं.—धतूरा
म.–धोत्रा, धोतरा
गुं.—धंतुरो
क.–मदकुणिके
तै.—नाल्लाउम्मीते, उम्मेत्त चेट्टु
ता.–उमतताई, कारुउमते
पा.–सतुल्या, तातरईसफेदा
इं.–थोर्न आपल ट्रामोनियम् ( Thorn apple Stramonium )
लैटी.–डाटुरा ट्रामोनियमं, डाटुरा आल्वा डाटुरा फेस्टुनोसा, ( Datura Stramonium D allo, D. Fast nosa ).

### २ धंत्तूरनामानि

**धत्तुरो मदनोन्मत्तः कितवः कनकाव्हयः ।**
**शिवप्रियो महामोही देविका स्वरदूषणः ॥** शा. नि. ३०१

धुस्तूर, मदन, उन्मत्त, कित्तव, कनकाव्हय, शीवप्रिय, महामोही. देविका, खर दूषण, धूर्त, मातुल, पुरीमोह, धूर्तक्त, धत्तूर, घंटिक, शठ, मातुलक, श्याम, शिवशेखर, खर्ज्जूघ्न, काहलापुष्प, खल, कण्टफल, मोहन, कलमत्त शैव, तूरी उन्मत्तक, मदनक, हरवल्लभ, कनक, सविष, मदकर, घंटापुष्प, महाशठ. याशिवाय सोन्याचीं सर्व नांवें धोत्र्याला आहेत.

### ३ धत्तूर प्रकार

**सितनील कृष्ण लोहित पीत प्रसवाश्च संति धत्तूराः ।**
**सामान्य गुणो पेता स्तेषु गुणाढयस्तु कृष्ण कुसुमःस्यात् ॥** शा. नि.

धोत्रा पांच प्रकारचा आहे. पांढरा, निळा, काळा, लाल आणि पिवळा हें पांचहि प्रकार त्यांच्या फुलांच्या रंगावरून सांगितलेलें आहेत. या सर्वांचे गुण सारखेच आहेत. परंतु काळ्या रंगाचे फुल येणारा धोत्रा अधिक गुणकारक आहे.

## ४ धत्तूर शुद्धि

धत्तूरबीजान्यादाय पोट्टल्यां रोधयेत्ततः ।
स्वेदयेद्दोलिकायंत्रे गव्यदुग्धेन यामकम् ॥
संस्वेद्य क्षालयेदुष्णतोयेन तु ततो भिषक् ।
इत्थं शुद्धानि बीजानि वीतशंकः प्रयोजयेत् ॥ र. त.

धोत्र्याच्या बिया आणून त्या एका पोटलींत बांधून गाईचें दुधांत दोलायंत्र पद्धतीने एक प्रहरभर शिजवावें. नंतर गरम पाण्यानें त्या बिया धुवून घ्याव्या म्हणजे धोत्रा बीज शुद्ध होते.

धूर्तबीजं तु गोमुत्रे चतुर्यामोषितं पुनः ।
कंडितं निस्तुषं कृत्वा शुद्धं योगेषु योजयत् ॥ आ. प्र. पा. ४६७

धोत्र्याचें बीज हें गोमुत्रांत चार प्रहर भिजत ठेवावे. नंतर सुकवून कुटावे म्हणजे त्याचे वरील कोंडा निघेल तो काढून टाकावा. याप्रमाणें शुद्ध झालेलें बीज औषधी प्रयोगांत वापरावे.

## ५ धोत्र्याचे गुण

धत्तूरः कान्तिकृच्चोष्णः कटुकश्चाग्निदीपकः ।
तुवरो मधुरस्तिक्तो मदकृद्वान्तिकृद्गुरुः ॥
वर्ण्यः कुष्टव्रण श्लेष्म ज्वर कंडू कृमींजयेत् ।
यूका लिक्षा श्रम विष पामा त्वग्दोनाशनः ॥
एषु कृष्णो गुणैः श्रेष्टो मुनिभिः परिकीर्तितः ॥ शा. नि. ३०३

धोत्रा कांतीकारक, उष्ण, तिखट, अग्निदीपक, तुरट, मधुर, कडु, मदकारक, वांतीकारक, भारी वर्णाला हितकर, त्याचप्रमाणे, कुष्ट, व्रण, कफज्वर, कंडूकृमि, युकालिखा, आम, विष, पामा नांवाचा रोग आणि त्वगरोगनाशक आहे. या सर्व प्रकारच्या धोत्र्यामध्यें काळा धोत्रा गुणाने श्रेष्ट आहे.

धुस्तुर मूर्च्छा जनको वन्हि पित्तं च नाशयेत् । शा. नि.

धोत्रा मूर्च्छाकारक, अग्नि आणि पित्तनाशक आहे.

## ६ धोत्र्याचा उपयोग

श्वास रोगामध्यें वाढलेल्या श्वासाचा अवरोध करण्याकरितां, धोत्र्याच्या वाळलेल्या फळाचें आणि पानाचें धुम्रपान करावें. जखम असलेल्या जागेवर धोत्र्याचा रस, गाईचें तुप आणि सैंधव मिठ एकत्र मिळवून दुखणाऱ्या जागेवर लावावे. धोत्र्याच्या बीजाने ८० प्रकारचे वातरोग नाहीसे होतात.

७ धोत्र्याचे विशिष्ट गुण

धत्तूर: श्वास शमन: कफसंशोषण: परम् ।
आक्षेपोन्माद हरण: स्तंभनो हर्ष वर्धन: ॥
अभिष्यंद प्रशमन: कर्णशूल निबर्हण: ॥ र. त. ३४८

धोत्रा हा श्वासनाशक, कफाचे संशोषण करणारा, आक्षेप, उन्माद यांचा नाशक, स्त्रिसंगाचें वेळीं वीर्याचें स्तंभन करून हर्ष उत्पन्न करणारा, अभिष्यंदनाशक व कर्णशूळाचा नाश करणारा आहे.

धत्तूर मात्रा

आरभ्य गुंजापादांशाद्गुंजार्धं तु विशोधितम् ।
धत्तूरबीजचूर्णं तु प्रयुञ्जीत विधानवित् ।
गुंजार्धतः समारम्य सार्द्ध गुंजैकसंमितम् ।
चूर्ण धत्तूरपत्राणां प्राणाचार्य: प्रयोजयेत् ॥ र. त.

शुद्ध धोत्र्याच्या बियाचे चूर्ण एक चतुर्थांश गुंजेपासून अर्धी गुंजपर्यंत पोटांत घेण्याची मात्रा जाणावी. धोत्र्याच्या पानाचें चूर्ण अर्ध्या गुंजेपासून दीड गुंजापर्यंत पोटांत घेण्याची मात्रा जाणावी.

Indira Gandhi National Centre for the Arts

९ धोत्रा असलेल्या औषधांची नांवें

(१) प्रलापांतक रस–बडबड बंद होते व पाचक आहे. प्रमाण १ गुं. २ वेळ.

(२) उन्मादगुंजाकुश–उन्माद व ज्वर नाहीसा होतो. प्र. १ गुं. कोरफडीच्या रसांतून २–३ वेळ.

(३) ग्रंथीशोश निवारकवर्तिका.

१० धोत्रा प्रमाणापेक्षा जास्त पोटांत गेल्यास होणारे विकार व त्यावर उपाय–

मुखशोषकर: लालानाशक:, गलशोथकर:, दृष्टिमांद्यकृत्, स्वरभेदकृत्, कनीनिका विस्तारकृत् । अंगरौक्ष्यकर: । मृत्युदश्च ।

शमनोपाय:—समुद्रफलस्य गोमुत्रे कल्क: । वचाचूर्णं दधियुक्तम् । एरंडमूलकल्क: कर्पासबीज कषाय: गोदुग्धं शर्करायुतम् ।

मात्रा—विंशति संख्याकानि बीजानि । विषतंत्र १९

धोत्रा प्रमाणापेक्षा जास्त भक्षण केल्यास तोंड कोरडे होते. लाळ येणें बंद होते. गळ्याचे ठिकाणीं सूज येते. डोळ्याचें तेज कमी होते. आवाज बदलतो. नेत्र कनीनिकेचा विस्तार बदलतो. शरीराचें ठिकाणीं रुक्षपणा येतो. प्रसंगीं मरणहि ओढवते.

उपाय–समुद्रफल गोमुत्रांत वाटून तो कल्क घ्यावा. वेखंडाचें चूर्ण दह्यांतून घ्यावें. एरंडाच्या मुळचाचा काढा घ्यावा. कपाशीच्या बियांचा काढा करून घ्यावा. गाईचें दूध साखर घालून घ्यावे.

११ धोतऱ्याचे तेल काढण्याचा विधि

MAR
540
MUL

धत्तूरबीजचूर्णानि वस्त्रपूतानि कारयेत् ।
समूलोत्तरवारुण्या कषायेण विलोडयेत् ॥
आलिप्य कांस्यपात्रं तु धारयेदातपे खरे ।
स्वतप्तं वस्त्रपूतं च पातयेत्तैलमाहरेत् ॥
यथा धत्तूरजं तैलं क्वाथान्धर्मे समुद्धरेत् ।
तथा सर्वत्र तैलानि संग्राह्यान्यौषधान्तरात् ॥ र. चं.

धोत्र्याच्या बियांचें वस्त्रगाळ चूर्ण करावे. नंतर मूळासकट इंद्रायणीचीं झाड आणून त्यांचा काढा करून त्या काढ्याची त्या चूर्णाला भावना द्यावी. नंतर तो कल्क कांशाच्या भांड्याला लिंपून तें भांडें कडक उन्हांत ठेवावें. मग तें भांडें तापल्यावर त्याच्या तळाशीं सांचणारें तेल काढून घ्यावे. इतर सर्व औषधांचीं तेलेंहि ह्याच रीतीनें ( म्हणजे काढ्याच्या भावना देऊन, उन्हामध्यें ठेवून) काढून घ्यावीं.

Indira Gandhi National Centre for the Arts

## भांग

१ भाषावार नांवें

सं.–भृङ्ग, विजया, गंजाचरस,
हिं.-भाँग, भंग, गंजा चरस,
बं.–सिद्धि, भांग, गांजा,
म.–भांग, गांजा
ब्र.–बीन,
गु.–भांग्य, गांजो, चरस,
तै.–जन, परि, तुलु. गांजाई,
इं.–इंडियन हेंप (Indian Hemp)
लै.--इंडियन हेंप (Indian Hemp)
फा.–किन्नाविष, वरकुलख्याल, शवनवंग,
अ.–किन्नवकेन, वुर्वारू, रुहूलवंज,

२ भांगेची नांवें

भंगा भंगी मातुलानी मादिनी मादिका तथा ।
मातुली विजया तंद्राकारिणी बहुवादिनी ॥ र. त.

भांगेचीं नांवें---भंगा, भंगी, मातुलानी, मादिनी, मादिका, मातुली, विजया, तंद्राकारिणी, बहुवादिनी.

३ भांगशोधन

मातुलानीं शुष्कपत्रां सलिले तु निमज्जयेत् ।
निष्पीडच शुष्कां गव्याज्ये तु भजयेन्मंद वन्हिना ।
सुभृष्टामथ विज्ञाय सत्वरं तु समाहरेत् ।
इत्थं विशोधितं भंगां सर्वत्र विनियोजयेत् ।। र. त.

भांगेची पानें सुकलेलीं आणून पाण्यांत बुडवावीं व नंतर त्याचें पाणी पिळून काढावें व तिला सुकवून घ्यावें. नंतर मंदाग्नीवर गाईचें तुपांत भाजावी. चांगली भाजून झाल्यावर खाली काढून घ्यावी. याप्रमाणे भांगेची शुद्धि होते. नंतर ती सर्वत्र उपयोगांत आणावी.

बब्बूलत्वक्कषायेण भंगा संस्वेद्य शोषयेत् ।
गोदुग्धभावनां दत्वा शुष्कां सर्वत्र योजयेत् ।। र. चं. यो. र.

भांग बाभळीच्या सालीच्या काढयांत दोलायंत्रानें एक प्रहरभर शिजवावी. नंतर गाईच्या दुधाची एक भावना देऊन ती वाळवावी. मग सर्व औषधांत योजावी.

Indira Gandhi National
Centre for the Arts

४ भांगेचे गुण

भंगा तिक्ता लघुस्तीक्ष्णा ग्राहिणी कफहारिणी ।
दीपनी पाचनी चैव पित्तला मदकारिणी ।। र. त.

भांग ही कडू, हलकी, तीक्ष्ण, ग्राही, कफनाशक, दीपक, पाचक, पित्तकारक व मदकारी अशी आहे.

५ भांगेचे विशिष्ट गुण

निद्राप्रदायिनी कामं कामोद्दीपनकारिणी ।
प्रलापनाशिका चैव धनुःस्तंभहरा तथा ।।
अंत्रशूलहरा चैव वृक्कशूलप्रणाशिनी ।
पित्ताशोषज शुलघ्नी त्वामाशयबलप्रदा ।।
अजीर्णजातिसारघ्नी तथाजीर्णनिवारिणी ।
उन्मादनाशिनी चैव वृक्कशोथव्यथा हरा ।।
मूत्रलारक्तसंयुक्त मूत्रस्रावनिवारिका ।
विचित्रानन्दजनन स्वप्नसंतानकारिका ।।
अर्शोव्यथाहरा चैव किंचिज्ज्वर निवारिका ।
व्रणमेहसमुद्भूत शिश्नोत्थानव्यथाहरा ।।

रजःशूलं निहंत्याशु भास्करस्तिमिरं तथा ॥
आमाशयोत्थशूलघ्नी यक्ष्मकासहरा परम् । र. त.

भांग ही निद्राकर, कामोद्दिपक, बडबड नाहीशी करणारी, धनुर्वात नाहीसा करणारी, अंत्रशुळ नाशक,. वृक्कशूलनाशक, पित्तनलिकेंत पित्ताच्या खड्यामुळे होणारा शूळ नाहीसा करणाणारी, आमांशाची शक्ति वाढविणारी, अजीर्णापासून होणाऱ्या अतिसाराला नाहीशी करणारी, अजीर्णनाशक, उन्मादनाशक; वृषणाच्या सूजेमुळे होणारी पिडा नाहीशी करणारी, मूत्रल, लघ्वीच्या मार्गानें रक्त येत असल्यास तें बंद करणारी, अशी आहे. भांगेच्या सेवनानें विचित्र आनंद उत्पन्न होतो. व लागोपाठ स्वप्न दिसू लागतात. तसेच ती अर्शव्यथा नाशक, ज्वरनाशक आहे. इंद्रियांत व्रण असल्यास किंवा प्रमेहांत इंद्रिय ताठतेवेळेस होणारी वेदना नाहीशी करणारी आहे. तसेंच स्त्रियांचा विटाळशूळ, आमाशयांतील शूळ, क्षयजकास या सर्वांचा नाश करणारी आहे.

## ६ भांगेमुळे होणारीं लक्षणें

कनीनिका विस्तार कारिणी, मनसः आनंदकर्त्री, तन्द्रांजनयत्री, बृहणीच ।

शमनोपायः--तक्रपानम्, शुष्ठीकल्कयुतंदधि, तंडूल धावन जलं चिंचाकल्कः । बहुबीज फलं च

कर्नानिका (डोळ्यांतील बाहुली) मोठी होते, मनाला आनंद वाटतो व झांपड येते.

उपाय--ताक, सुंठ घालून दही घेणें, तांदुळाचें धुवण, चिंचाकल्क व सिताफळ हे पदार्थ खावें.

## ७ भांग मात्रा

द्विगुंजतः समारभ्य चतुर्गुंजमितां परम् ।
भंगां खलु प्रयुज्जीत बलकालाद्यपेक्षया ॥ र. त.

भांगेची मात्रा—दोन गुंजेपासून चार गुंजेपर्यंत बळ व काळ पाहून भांग पोटांत घ्यावी.

# गुंजा

## १ गुंजेचीं नांवें

गुंजा रक्ता रक्तिका च ताम्रिका कृष्णचूडिका ।
उच्चटा शीतपाकी च भिल्लभूषणिकारुणा ॥
चूडामणिस्ताम्रिका च शिखंडी कृष्णला तथा ।
काकणन्ती च कांभोजी सैवेह परिकीर्तिता ॥ र. त.

**गुंजेची नांवें**--गुंजा, रक्ता, रक्तिका, ताम्रिका, कृष्णचूडिका, उच्चटा, शीतपाकी, भिल्लभूषणिका, अरुणा, चुडामणि, ताम्रिका, शिखंडी, कृष्णला, काकणंति, कांभोजी हीं गुंजेचीं नांवें होय.

२ गुंजाबीज शोधन

**गुंजा कांजिक संस्विन्ना प्रहराच्छुध्यति ध्रुवम् ॥** र. चं.

गुंजा कांजामध्यें दोलायंत्रानें एक प्रहरभर शिजवाव्या. म्हणजे त्या शुद्ध होतात.

**नवानि गुंजाबीजानि चूर्णीकृत्य प्रयत्नतः ।**
**द्विगुणीकृत वस्त्रातः पोट्टल्यां रोधयेत्ततः ।।**
**स्वेदयेद्दोलिका यंत्रे द्वियामं गव्यदुग्धतः ।**
**इत्थं तु गुंजाबीजानि शुद्धिमायांत्यनुत्तमाम्** र. त.

नवीन गुंजा आणून त्यांचें चांगलें चूर्ण करावें. व तें चूर्ण दुहेरी फडक्यांत बांधून त्याची पोटली तयार करावी. नंतर ती पुरचंडी गाईचे दुधांत दोलायंत्राच्या पद्धतीनें दोन प्रहर शिजवाव्या म्हणजे गुंजेची शुद्धि झाली.

३ गुंजाबीजांचे शोधनप्रयोजन

**गुंजाबीजं वांतिकरं तीव्ररेचनकृत्तथा ।**
**शीलितं त्वतिमात्रं तु गुंजाबीजमशोधितम् ।।**
**विषूचीलक्षणाकारं करोति हि विषक्रियाम् ।**
**अतो दोषनिवृत्यर्थं गुंजाबीजानि शोधयेत् ।।** र. त.

गुंजा ह्या शुद्धि न करितांच सेवन केल्या किंवा प्रमाणापेक्षां जास्त सेवन केल्यास त्यामुळे वांती होते. तीव्र रेच होतात. विषूचिकेचीं लक्षणें होतात व विषसेवन केल्यानें जीं लक्षणें होतात तीं सर्व लक्षणें गुंजेमुळे होतात. हे सर्व दोष नाहीसे करण्याकरितां गुंजेची शुद्धि करावी.

४ गुंजेचे गुण

**गुंजाबीजं सुविमलं कामोद्दींपन मुत्तमम् ।**
**ऊरुस्तंभहरं चैव बलसंवर्धनं परम् ।।**
**गुंजापत्रं शोथहरं त्वामवात प्रणाशनम् ।**
**तथैव च समाख्यातं वेदनाहरमुत्तमम् ।।**
**गुंजापलाशनिर्यासो मधुरः कटुकस्तथा ।**
**स्वरभेदप्रशमनः शोथघ्नो वेदनाहरः ।।**
**गुंजामूलं सुमधुरं कफनिःसारकं परम् ।**
**वातपित्तहरं चैव तृष्णाशोथ निवारणम् ।**

स्वरभेदप्रशमनं तथा वांतिविनाशनम् ।
मूत्रकृच्छप्रशमनं बलवर्णकरं परम् ।
कासघ्नं शुक्रजननं रुच्यं विषविनाशनम् ।
वृष्यं व्रणापहं चैव विशेषात्परिकीर्तितम् ।
गुंजामूलं विशेषेण मधुयष्टिगुणोपमम् ।
अत एवाघुना तत्तु तदभावे प्रयुज्यते ॥ र. त.

शुद्ध गुंजाबीज हें कामोद्दिपक असून उरूस्तंभ नाशक आहे. ते उत्तम बलकारक आहे. गुंजेची पानें हीं सूजनाशक व आमवात नाशक आहे. तसेंच तें सर्व प्रकारच्या वेदनानाशक आहे. गुंजेच्या पानांचा रस हा कडु, तिखट असून स्वरभेद, शोथ, वेदना यांचा नाशक आहे. गुंजेचें मूळ हें मधुर, कफाचा स्राव करणारे, वातपित्त नाशक, तसेंच तहान सूज ह्यांना निवारण करणारे आहे. तसेंच स्वरभेद, वांती, मूत्रकृच्छ्र यांचे नाशक असून बल, कांती यांना वाढविणारे आहे. शिवाय तें काशनाशक, शुक्रोत्पादक, रुचकर, विषनाशक. वृष्य व व्रणनाशक आहे. गुंजेचें मूळ विशेषतः जेष्ठमधाच्या गुणाप्रमाणे गुण देणारे आहे. अलिकडे एकाच्याऐवजी दुसरें वापरतात.

गुंजा लघुर्हिमा रुक्षा भेदनी श्वांसकासजित् ।
कोष्णा वृष्या कुष्ठ कण्डू श्लेष्मपित्त व्रणापहा ॥ यो. र.

गुंजा थंड, हलक्या, रूक्ष, मलभेदक, श्वास व खोकला ह्यांचा नाश करणाऱ्या, कचित् उष्ण, वृष्य, कुष्ठ, कंडू, पित्त व व्रण ह्यांचा नाश करणाऱ्या आहेत.

५ शुद्ध गुंजाबीज मात्रा

गुंजार्द्धतः समारभ्य सार्द्धगुंजैकसंमिताम् ।
गुंजाबीजं सुविमलं प्रयुञ्जीत विधानवित् ॥ र. त.

शुद्ध गुंजेचें पोटांत घेण्याचें प्रमाण अर्घ्या गूंजेपासून दीड गूंजेपर्यंत आहे.

६ रोगनिवारक योग

संधिशोम--

गुंजाबीजं शिलापिष्टं वारिणा परिलेपितम् ।
निहंत्युत्पिष्टसंधिस्थां दारुणां शोथवेदनाम् ॥

गुंजाबीज फरसावर चांगल्या वाटून त्याचा लेप केला असतां सांध्याच्या हाडाचें घर्षणामुळें उत्पन्न झालेली दारुण सूज व वेदना यांचा नाश होतो

पक्षवध श्वित्रकुष्ठ--

इंद्रलुप्तं पक्षवधं तत्तदंगसमाश्रितम् ।
गृध्रसीं दारुणां चैव सुघोर मवबाहुकम् ॥
गुंजाबीजं शिलापिष्टं वारिआ चित्रकान्वितम् ।
प्रलिप्तं शमयेत्थेव श्वित्रंकुष्ठं विशेषतः ॥

गुंजाबीज व चित्रक दोन्ही एकत्र करून पाण्यांत उगाळून त्याचा लेप केला असतां इंद्रलुप्त ( चाई-केस गळणें ) अर्धांगवात व त्यासारखेंच वाताचे इतर रोग, दारुण, गृध्रसी व अवबाहुकरोग व विशेषेकरून पांढरा कोड या सर्वांचा नाश होतो.

(१) गुंजाजीवनरस--कामोत्तेजक, २ गुंज भांगेबरोबर.

(२) गुंजाभद्ररस--उरुस्तंभावर २ गुं. निंबाचें रसांतून.

(३) गुंजातैल – कंडु, कुष्ठ, वातवेदना यांवर उत्तम.

## कुचला

### १ भाषावार नांवें

सं. – कारस्कर.

हिं. – कुचला.

बं. – कुंचिले.

म. – काजरा, कारस्कार, कुचला.

गु. – झेरकोचलां.

क. – कांजिबार.

तै. – मुष्टिगिंजा.

इं. – पाइझननट, ( Poison nut )

लै. – स्ट्रिकनास नक्स्व्हामिका,
(Strychnos Nuxvomica).

फा. – इफराकी.

अ. – कातिलुल्‌ कल्क फलूज माही.

### २ कारस्कर नामानि

**कारस्करस्तु किंपाको विषतिन्दु विषद्रुमः ।**
**अरद्द्रुमोरम्यफलः कुपाकः कालकूटकः ॥** शा. नि. पा. ५८०

कारस्कर, किम्पाक, विषतिन्दु, विषद्रुम, गरद्रुम, रम्यफल, कुपाक, कालकूटक हीं कुचल्याचीं नांवें आहेत.

### ३ कुचला शोधन

**त्रिदिनं कांजिकैः स्विन्नः शुद्धः स्याद्विषतिन्दुकः ।** भा. भै. र. ७७७

कुचला ३ दिवस कांजींत स्वेदन केल्यानें शुद्ध होतो.

### ४ विषतिंदुक शोधन प्रकार

**कारस्करस्य बीजानि त्वतिमंदाग्नियोगतः ।**
**निधायपिष्टपचने तावदाज्येन भर्जयेत् ॥**

यावद् बहिस्त्वचा किंचिज्जायते कपिशप्रभा ।
कुचेलमेवं त्वरितं शुद्धिमायात्यनुत्तमाम् ॥ र. त.

कुचल्याच्या बिया ह्या तव्यावर तूप टाकून त्यांतच भाजाव्या. खाली मंद आंच लावावी. बियाची वरची त्वचा कपीश (नसीच्या रंगाची) रंगाची येईपर्यंत भाजाव्या. या विधीनें कुचल्याच्या बिया शुद्ध होतात.

विषतिंदुकबीजानि पोट्टल्यां विन्यसेद्भिषक् ।
स्वेदयेद्गव्यपयसा दोलिकायंत्रमार्गतः ॥
एवं यामैक मात्रेण शुद्धिमायांत्यनुत्तमाम् ।
शोधितं तिंदुकं त्वेवं वीतशंकः प्रयोजयेत् ॥ र. त.

कुचल्याच्या बिया ह्या एका फडक्यांत बांधून त्याची पोटली तयार करावी. व ती पोटली गाईचें दुधांत दोलायंत्राच्या पद्धतीनें मंद आंच लावून एक प्रहरभर शिजवावी म्हणजे शुद्ध होतात.

किंचिदाज्येन संभृष्टो विषमुष्टिर्विशुध्यति । र. चं.

कुचल्याच्या बिया तुपांत थोडचाशा तळून घ्याव्या, म्हणजे त्या शुद्ध होतात.

५ विषतिंदुक गुणा

Indira Gandhi National Centre for the Arts

विषमुष्टिस्तिक्तकटुस्तीक्ष्णोष्णः श्लेष्मवातहा ।
सारमेयविषोन्मादहरो मदकरः स्मृतः यो. र.

कुचला कडु, तिखट, तीक्ष्ण, उष्ण, कफवातनाशक, तसाच कुत्र्याचें विष व उन्माद ह्यांचा नाशक व मदकारक आहे.

कारस्करो मदकरस्तुवरो ग्राहकः स्मृतः ।
कटुस्तिक्तो लघुश्चोष्णः कुष्टरक्त विकारहा ॥
कंडूं कफं वातरोगं व्रणं चार्शो ज्वरं जयेत् ।
अस्यचाम फलं ग्राही तुबरं वातकृल्लघु ॥
शीतलंच समुद्दीष्टं तत्पक्वं विषदं गुरु ।
पाकेच मधूरं प्रोक्तं कफं वातं प्रमेहकम् ॥
पित्तं रक्त विकारंच नाशये-दितिकीर्तितम् ॥ शा. नि. ५८२

कुचला मदकारक, तुरट, मलाचा अवरोध करणारा, तिखट, कडु, हलका, गरम, असून, रक्तविकार, खाज, कफ, वातरोग, घाव, मुळव्याध आणि ज्वर नाशक आहे.

त्याचें कच्चें फळ – मलरोधक, तुरट, वातकारक, हलका आणि थंड आहे.

कुचल्याचें पक्वफळ--विषद, भारी, पाककाळी मधुर असून कफ, वात, प्रमेह आणि पित्त त्याचप्रमाणे रक्तविकार नाशक आहे.

तिन्दुकोव्रण वातघ्नः तत्सारः पित्तरोगजित् ।
आममस्थ फलं ग्राहि वातलं शीतलं लघु ॥
पक्वं पित्त प्रमेहास्थ श्लेष्मघ्नं यिशदं गुरु ।
विषतिन्दुकमप्येवं विशेषात्ग्राहिशीतलम् ॥　　　　विषतंत्र १६

कुचला हा व्रणनाशक व पित्तरोगनाशक आहे. कच्च्या बिया ह्या मलमूत्रांच्या अवरोध करणाऱ्या, वातुळ, थंड व कफ याचें नाशक असून स्वच्छ आणि जड असते. कुचल्याच्या बिया विशेषेकरून मलमूत्रांचा अवरोध करणाऱ्या व थंड आहे.

६ विषतिंदुक मात्रा

आरभ्य गुंज पादांशाद् गुंजक प्रमितं परम् ।
मात्राविद्विनियुंजीत विमलं विषतिंदुकम् ॥　　　　र. त.

चवथाई गुंजेपासून एक गुंजेपर्यंत शुद्ध कुचल्याची मात्रा जाणावी.

७ कुचल्याचा अनुपान परत्वे उपयोग

मेदोहरं रुचिकरं सारमेयविषापहम् ।
ग्रहणीहरमत्यंतं तथोन्मादविनाशनम् ।
श्वासप्रशमनं चैव तथा फुफ्फुसशोथनुत् ।
अर्धांगार्दितवातघ्नं नाडीबलविवर्धनम् ॥
मांसपेशीशोषयुते नवे कठिनपेशिके ।
पक्षाघाते न युंजीत स्पर्शानुभववर्जिते ॥
मदात्ययात्ययकरं नाडीशूलनिबर्हणम् ।
अनिद्रापहमत्यंतं गुदजामयनाशनम् ॥
अत्यम्लवदनास्वादं नवं वा चिरकालजम् ।
आध्मानं नाशयत्याशु भोजनोत्तर कालिकम् ॥
चित्तावसाद संयुक्तं दारुणाध्मानसंगतम्
अम्लपित्तासमुद्भू-तमंत्रशूलंव्यपोहति ॥
मलत्यागसमीहाढ्यां मुहुर्वेदनयान्विताम् ।
कष्टप्रवृत्तात्पमलां नाशयेन्मलबद्धताम् ॥
अत्यल्पमूत्रस्त्रवणं सदाहं वेदनान्वितम् ।
मूत्रणेच्छापरिगतं मूत्ररोधं निवारयेत् ॥
रक्तातिस्त्रावसंयुक्तं दीर्घकालानुबंधिकम् ।
रजःस्त्रावं निहंत्याशु समयात् पौर्वकालिकम् ।
सवेदनां तथा पीनदुर्गन्धास्त्रावसंयुताम् ।
विनिहन्ति विशेषेण श्वेतप्रदरजां रुजम् ॥　　　　र. तं.

**रात्रौ निद्रायमाणस्य विवृद्धां पृष्ठदेशजाम् ।**
**वेदनां शमयत्याशु तथैव कटिवेदनाम् ॥** र. त,

कुचला हा मदनाशक, रुचिकर, कुत्र्याचें विष हरण करणारें, दुष्ट ग्रहणीनाशक, तसेंच उन्माद, श्वास, फुफ्फुसाची सूज, अर्धांगवायु, अर्दित हे रोग नाहीसे करणारा आहे व नाडीची शक्ति वाढविणारा आहे. ज्या पक्षाघातांत मांसपेशीचा शोष झाला आहे व मांसपेशी कठीण झाल्या आहेत व हाताचा स्पर्श कळत नाही, अशा वेळीं कुचल्याचा उपयोग करू नये मदात्यय, नाडीशूळ, झोप न येणें, मुळव्याध तोंड आंबुस वाटणें, जेवल्यानंतर पोट फुगणें, आध्मान असून गळल्यासारखें वाटणें व आम्लपित्त असून त्यांत पोटशूळ असणें हे सर्व विकार कुचल्याने नाहीसें होतात. शौचेला खडा होणे व त्यावेळीं वेदना होणें, मोठ्या कष्टानें थोडा थोडा मळ होणें अशा तऱ्हेची मलबद्धता कुचल्यानें नाहीशी होतें.

लघ्वीची इच्छा झाली असतां लघ्वी थोडी थोडी होणें, दाहा होणें, लघ्वी होतांना वेदना होणें अशा रीतीचा मूत्रावरोध नाहीसा होतो. पुष्कळ दिवसाचा रक्तातिसार, महिन्याची पाळी येण्याचे अगोदर स्त्रियांना विटाळ जाणें व पीवळा दुर्गंधीयुक्त वेदना होत होत विटाळ जाणें व पीडायुक्त श्वेतप्रदर या सर्वांचा कुचल्याच्या सेवनानें नाश होतो. रात्रीं निजतांना पाठींत फार वेदना होणें व त्याचप्रमाणे कमरेतील वेदना होणे हे सर्व विकार कुचल्याचें सेवनानें नाहीसे होतात.

## ८ कुचला प्रमाणापेक्षा जास्त भक्षण केल्यास होणारी लक्षणें व त्यावर उपाय

**प्रमाणाधिक तथा जठरे गते सतिमानि लक्षणानि संभवन्ति ।**

**यथा--धनुर्वातमन्नमयत्यंगम्, आक्षेपकाः संभवन्ति, अंगमर्दः, कंपः दंतहर्षः नेत्रयोर्मध्यगतकनिनिका विस्तारः, मन्दतमा नाडीच ।**

**शमनोपायाः--नागवल्लीदलरसः । गोवृतम्**

**मात्रा–१ गुंजा**

**कालः–निमेष पंचकादारभ्य द्विहोरापर्यंतम् ।** वि. त. १६

कुत्र्याचे विषनाशक योग–कुत्र्याच्या विषावर १ महिना दररोज वाढत्या प्रमाणांत-कुचला घेतल्याने तें विष नाहीसे होतें.

**विष तिन्दुक तेल**--(बाह्य उपयोग) हें तेल आंगास मालीश केल्यानें पक्षाघात वगैरे सर्व वातविकार नाहीसें होतात.

## ९ विषतिंदुक तैल्यम्

**विषतिंदुक बीजं तु तौलकैकमितं शुभम् ।**
**तिल तैले तु विमले तोलकाष्टक संमिते ॥**

मंदाग्निना पचेत्तावद्यावदायाति रक्तताम् ।
एतत् संजायते रम्यं विषतिंदुकतैलकम् ॥
विषतिंदुकतैलन्तु भृशमभ्यंग योजितम् ।
पक्षाघातादिकान् रोगान् विनिहंत्य विकल्पतः ॥ र. त. पा. ३३६

कूचल्याच्या बिया एक तोळा घेऊन आठ तोळे तिळाच्या तेलांत खाली मंदाग्नि लावून पचन करावें. तेलाचा रंग लाल झाला म्हणजे तेल तयार झालें असें समजावें. हें विष तिंदुक तेल होय, हें तेल अंगास चोळलें असतां पक्षाघातादि सर्व वातांचे रोग नाहीसे होतात.

## अर्कक्षीर

### १ अर्कक्षीर नांवें

अर्कक्षीरं रविक्षीरं सूर्यक्षीरं तथैव च ।
अर्कदुग्धं सूर्यदुग्धं रविदुग्धं च तन्मतम् ॥ र. त.

अर्कक्षीर नांवें — अर्कक्षीरं, रविक्षीरं, सूर्यक्षीरं, अर्कदुग्धं, सूर्यदुग्धं, रविदुग्धं.

### २ अर्कशुद्धि

अर्क सेहुंडयोर्दुग्धं तत्स्वयं शुद्ध मुच्यते । यो. र.

रुई व निवडुंग यांचें दूध स्वतःच शुद्ध असतात.

### ३ अर्कक्षीर गुण

अर्कक्षीरं मतं स्निग्धं तिक्तोष्णं कुष्ठगुल्मनुत् ।
उदरापहमत्यन्तं रेचनं वांतिकारकम् ॥
गुदांकुरप्रशमनं कृमिदंतव्यथापहम् ।
क्षारकर्मकरं चैव त्वचि लिप्तं विशेषतः ॥ र. त.

गुण--अर्कक्षीर हें स्निग्ध, कडू, उष्ण, गुल्म, यांचा नाशक आहे. तें वांती व रेचन करणारें असून अति वाढलेल्या उदर रोगाचाहि तें नाश करिते. मुळव्याधीचें कोंबाचा तें नाश करिते, किडलेल्या दांतांची व्यथा नाहीशी करिते, क्षाराप्रमाणें कार्य करणारे आहे. विशेषतः त्वचेवर त्याचा लेप करितात.

### ४ अर्कक्षीर बाह्य प्रयोग

कृमिदंतव्यथा —

सक्षौद्रे रविदुग्धे तु तूलमल्पं निषेचितम् ।
कृमिदंतस्थरंध्रस्थं कृमिदंतव्यथापहम् ॥

रुईचें दूध, त्यांत मध पिसळून रुईच्या फोव्यानें किडलेल्या दांताच्या फटींत ठेविलें असतां कृमीमुळे होणारी दांताची व्यथा नाहीशी होते.

५ रुईचें दूध पोटांत गेल्यास होणारे विकार व त्यावर उपाय

१) जठरेगतं सत्तीव्र विरेचनं भवति तदर्थं गोघृतम् ।

२) त्वगुपरि यदि स्फोटाः स्युस्तदुपरि चिंचापत्र कल्क लेपः । विषतंत्र

रुईचें दूध पोटांत गेल्यास फार जुलाब होतात. त्यावेळीं गाईचें तूप प्यालें असतां ते जुलाब थांबतात व तें विष नाहीसें होतें.

रुईचे दूधानें त्वचेवर स्फोट (फपोले) आले असतां त्यावर चिंच किंवा पानाचा वाटलेला कल्क लावावा.

## स्नुहीक्षीर

१ नामानि

स्नुहीक्षीरं सुधाक्षीरं सेहुंडक्षीरकं तथा । यो. र.
स्नुहीदुग्धं सुधादुग्धं स्नुग्दुग्धं च मतं तु तत् ॥ र. त.

स्नुहीक्षीरं, सुधाक्षीरं, सेहुंडक्षीरकं, स्नुहीदुग्धं, सुधादुग्धं, स्नुदुग्धं ही निवडुंगाच्या दुधाचीं नांवें आहेत.

२ स्नुहीक्षीर शोधन

पलद्वयं सुधादुग्धं तोलकद्वयसंमिते ।
चिंचादलद्रवे वस्त्रपूते धर्मे विशोषयेत् ॥
द्रवं विशुष्कं विज्ञाय सुधादुग्धं समाहरेत् ।
ततः सर्वत्र योगेषु प्रयुञ्जीत भिषग्वरः ॥ र. त.

निवडुंगाचें दुध दोन पळ ( ८ तोळे ), चिंचेच्या पानाचा रस दोन तोळे गाळून घ्यावा व तो उन्हांत सुकवून घ्यावा. तो द्रव सुकल्यावर त्याचा सर्वत्र उपयोग करावा.

अर्कसेहुंडयोर्दुग्ध तत्स्वयं शुद्धमुच्यते ॥ यो. र.

रुई व निवडुंग ह्यांचें चीक स्वतः शुद्धच असतात.

३ स्नुहीक्षीर गुण

सुधादुग्धं वातहरं गुल्मोदरविनाशनम् ।
विषाध्मानहरं चैव गुदांकुरहरं परम् ॥
परं विरेचनकरं पुष्पकृत्त्वक्षि मध्यगम् ।
समाख्यातं विशेषेण क्षारकर्मकरं परम् ॥

निवडुंगाचें दुध हें वातनाशक, गुल्म, उदर, विषबाधा, आध्मान, मुळव्याधींचे कोंब या सर्वांचा नाश करणारे आहे. तसेंच तें तीव्र रेच करणारे असून डोळयांत पडलेल्या फुलाचाहि तें नाश करिते. शिवाय तें क्षार कर्म करणारेहि आहे.

४ त्रिधारी निवडुंग गुण

सेहुण्डो रेचकस्तीक्ष्णो दीपनः कटुको गुरुः ।
शूलमष्ठीलिकाध्मान गुल्मशोफोदरानिलान् ॥
हन्ति दोषान्यकृत्प्लीहकुष्ठोन्मादाश्मपाण्डुताः । यो. र.

त्रिधारी निवडुंग--रेचक, तीक्ष्ण, अग्निदीपक, गुरु, तिखट, शूळ, अष्ठिलिका, पोट फुगणें, गुल्म, शोफ, उदर, वात, त्रिदोष, यकृत, पांथरी, कुष्ठ, उन्माद, मूतखडा व पांडुरोग ह्यांचा नाशक आहे.

५ स्नुहीक्षीराचा बाह्य उपयोग

गुदांकुरावर

सुधादुग्धं निशाकोषातकीसैंधवसंयुतम् ।
गोमूत्रेण प्रलिप्तं तु पातयेद्गुदजांकुरान् ॥ र. त.

निवडुंगाचें दूध हें हळद, दोडक्याच्या बिया, सैंधव या सर्वांचें चूर्ण करून त्यांत मिसळून मुळव्याधीचें कोंबाला लावलें असतां तें कोंब गळून पडतात.

६ स्नुहीक्षीर असलेली रोगवारी औषधें

(१) क्षारवर्तिका--भगंदर, नाडीव्रण, हे विकार नाहीसे होतात.

(२) क्षारसूत्र--गुदांकूर, भगंदर हे विकार नाहीसे होतात.

७ त्रिधारी निवडुंगाचें दूध प्रमाणापेक्षा ज्यास्त पोटांत गेल्यास होणारें विकार व त्यावर उपाय

जठरे गतं सत्तीव्ररेचनकृद्भवति तदर्थं गोघृतम्
त्वगुपरि चिंचापत्र कल्क लेपः ॥ विषतंत्र २३

निवडुंगाचें दूध पोटांत गेल्यास तें तीव्र विरेचन करणारे आहे. त्यावर गाईचें तूप प्यावें म्हणजे रेच थांबतात व पोटावर चिंचेच्या पानाचा वाटून कल्क करून त्याचा लेप करावा.

## करवीर

१ नामानि

करवीरो हयारिश्च हयमारोऽश्वमारकः ।
अश्वान्तकोऽश्वहाश्वघ्नो मतश्चण्डातकस्तथा ॥

करवीरः श्वेतपीतरक्तपुष्पविभेदतः ।
त्रिविधस्तु समाख्यातो वैद्यविद्याविशारदैः ॥ र. त.

करवीर, हयारी, हयमार, अश्वमार, अश्वांतक, अश्वहा, अश्वघ्न, चंडातक, करवीर पांढरे, पिवळे व लाल अशीं तीन रंगाचीं फुलें येणाऱ्या अशा कण्हेराच्या तीन जाती आहेत.

२ करवीर शुद्धि

हयारिर्विषवच्छेद्यो गौदुग्धे दोलकेन तु ।। यो. र. र. चं.

कण्हेरीच्या मुळचा बचनागाप्रमाणे गाईच्या दुधांत दोलायंत्रानें प्रहरभर शिजवाव्या.

३ करवीर गुण

करवीरद्वयं नेत्ररोगकुष्ठव्रणापहम् ।
लघूष्णं कृमिकडूघ्नं भक्षितं विषवन्मतम् ।। र. त.

दोन्हीहि कण्हेर ( पांढरी व तांबडी ) नेत्ररोगनाशक, कुष्ठ व व्रणनाशक, लघु, उष्ण, कृमि, कंडू ह्यांची नाशक आणि भक्षण केली असतां विषाप्रमाणें मारक आहेत.

४ करवीरस्य बाह्य प्रयोग

करवीरकमूलं तु वारिणा परिपेशितम् ।
समाख्यातं प्रलेपेन ह्युपदंशव्रणापहम् ।।
करवीरदलद्रावो नेत्रयोर्विनियोजितः ।
अभिष्यंदं जलस्त्रावं व्यपोहति विशेषतः ।। र. त.

कण्हेरीचें मूळ पाण्यांत उगाळून उपदंशाच्या व्रणावर, त्याचा लेप केला असतां तें व्रण नाहीसे होतात. कण्हेरीच्या पानांच्या रसाचा डोळ्यावर लेप केला असतां डोळे येणें, लाली, पाणी गळणें हे विकार नाहीसे होतात.

५ कण्हेरीचे विषावर

अंगस्त्यैमित्यं नाडीमंदा आक्षेपकाः श्वासावरोधः मृत्युश्च ।
शमनोपायाः नवनीतं गोदुग्धं खंडशर्करायुतं ।।

कण्हेरीचें चूर्ण जास्त प्रमाणांत पोटांत गेल्यास, अंग आंलसर होणें, नाडी बंद होणें, आचके येणें, श्वास रुकणें किंवा एखादे वेळेस मृत्युहि येतो.

उपाय--वरीलपैकी कोणतीहि एकदोन लक्षणें दिसू लागतांच लोणी किंवा गोदुग्ध खडीसाखर घालून घ्यावें.

## लांगली

१ नामानि

लांगली हलिनी सीरी विशल्या कलिकारिका ।
अग्निजिव्हा स्वर्णपुष्पा दीप्ता नक्तेंदु पुष्पिका ।।
विद्युज्ज्वाला वन्हिशिखा लांगल्या गर्भपातिनी ।
हली लांगलिनी चैव समाख्याता भिषग्वरैः ।। र. त.

कळलावी (कुहिली) चीं नांवें – लांगली, हलिनी, सीरी, विशल्या, कलिकारिका, अग्निजिव्हा, स्वर्णपुष्पा, दिप्ता, नक्तेंदु पुष्पिका, विद्युज्ज्वाला, वन्हिशिखा, लांगल्या, गर्भपातिनी, हली, लांगलिनी हीं लांगलीचीं नांवें होय.

२ लांगली शुद्धि

**लांगली शुद्धिमायाति दिनं गोमूत्रसंस्थिता ।** र. चं

कळलावीचे गड्डे एक दिवसभर गोमुत्रांत भिजत ठेवावे, म्हणजे ते शुद्ध होतात.

३ लांगलीचे आभ्यंतर प्रयोगामुळे होणारे विकार

**शुष्का वार्द्रा लांगलिनी स्वल्पापि परिशीलिता ।**
**करोति दारुणं दाहं मोहातीसार विभ्रमम् ।** र. त.

कळलावी ही ओली किंवा वाळली असली व ती थोडी जरी पोटांत गेली तरी फार दाहा, मोह, अतिसार व भ्रम हे विकार उत्पन्न होतात.

४ लांगलीचे गुण

**लांगली कटुका चोष्णा कफवातापहा सरा**
**अपरापातिनी चैव सद्यः प्रसवकारिका ॥**
**शोथापहा विशेषेण मता व्रणनिवारिणी ।**
**कुष्ठकृमिप्रशमनी विशेषात्परिकीर्तिता ।**
**आभ्यंतरप्रयोगार्थं लांगलीं न प्रयोजयेत् ।**
**बाह्यप्रयोगे युञ्जीत तत्तद्रोगापनुत्तये ॥** र. त.

कळलावी ही तिखट, उष्ण, कफवातनाशक, सारक, बाळंतपणानंतर वार बाहेर पडली नसल्यास बाहेर काढणारी, लवकर प्रसूत होण्यास मदत करणारी, तसेंच शोथ व व्रणनाशक, कुष्ठ व कृमीनाशक हे विशेष गुण त्यांत आहेत. पोटांत घेण्याच्या उपयोगी त्याचा प्रयोग करण्यांत येत नाही. जरूर त्या रोगावर त्याचा बाह्य प्रयोग करितात.

**कलिकारी सरा कुष्ठशोफार्शो व्रणशूलजित् ।**
**तीक्ष्णोष्णा कृमिनुल्लघ्वी पित्तलाः गर्भपातिनी ॥** यो. र.

कळलावी गुणानें सारक, कुष्ठ, सूज, मूळव्याध, व्रण व शूळ ह्यांची नाशक, तीक्ष्ण, उष्ण, हलकी, पित्तकारक, कृमिनाशक व गर्भपात करणारी आहे.

५ लांगली बाह्यप्रयोग

**सद्यःप्रसव–**

**सुधौतं लांगलीमूलं वारिणा परिपेषितम् ।**
**नाभौ योनौ द्रलिप्तं वा सद्यःप्रसवकृन्मतम् ॥**

कळवीचें मूळ हें चांगलें धुवून पाण्यांत वाटून त्याचा नाभी व योनी यांचे जागीं लेप केला असतां शीघ्र प्रसूति होते.

६ लांगलीयुक्त औषधी प्रयोग

लांगलीमूलतोयं तु पूरितं कृमिकर्णके ।
निहंत्यतः प्रविष्ठांस्तु शतपद्यादिकान् कृमीन् ॥
सूर्यभक्ताद्रवोपेतः सव्योषो लांगलीद्रवः ।
विधाय वस्त्रपूतं तु योजयेत् कृमिकर्णके ॥

(१) कळलावीच्या मुळांचा रस हा कर्णशुळांत (कानांत) टाकला असतां सर्व प्रकारचे शतपदी कृमीदेखील तो रस कानांत जातांच नाश पावतात.

(२) सूर्यफूलाचा रस, त्रिकटचूर्ण व कळलावीचा रस सर्व एकत्र घोटून, कपड्यांतून गाळून कानांत घालावे म्हणजे कानांतील कृमीचा नाश होतो.

## भल्लातक

१ नामानि

भल्लातकस्तु भलातस्तपनोऽरुष्करोऽग्निकः ।
कृमिघ्नश्चैव वातारिः स एव परिकीर्तितः । र. त.

भल्लातकांचीं नांवें–भल्लातः, तपनः, अरुष्करः, अग्निकः, कृमिघ्नः, वातारिः ही बिब्याचीं संकृत नांवें आहेत.

Indira Gandhi National Centre for the Arts

भल्लातको नभोवल्ली वीरवृक्षोऽग्निवक्रकः ।
आरुष्करस्तथा रुक्षो तपनोऽग्निमुखीधनुः ॥ विषतंत्र १९

भल्लातकः, नभोवल्ली, वीरवृक्षः, अग्निवक्रकः, आरुष्करः, रुक्षः, तपनः, अग्निमुखी, धनुः हीं भल्लातकाचीं नांवें होय.

२ ग्राह्यभल्लातकस्वरुपम्

भल्लातकानि पक्वानि नीरक्षिप्तानि यानि तु ।
निमज्जन्ति हि तान्येव ग्राहयाणीह विशुद्धये ॥ र. त.

भल्लातकाचीं पिककेलीं फळें आणून तीं पाण्यांत टाकावीं. त्यापैकी पाण्यांत बुडतील तेवढीं काढून घेऊन त्याची शुद्धि करावी.

३ भल्लातकस्य शोधनप्रयोजनम्

भल्लातकस्य तु रसः स्वल्पोऽपि पतितस्त्वचि ।
करोति दारुणं दाहं व्रणं चैवातिदारुणम् ॥
शोथं सञ्जनयत्याशु तीव्रदाहसमन्वितम् ।
मुखे निपतितो घोरं विसर्पं प्रकरोति वै ॥
उक्तोपद्रवशांत्यर्थं फलं भल्लातकोद्भवम् ।
शोधयेद्भिषजां वर्यः सावधानतया सदा ॥

बिब्यांतील रस थोडा ( एखादा थेंब ) जरी त्वचेवर पडला तरी, त्या ठिकाणीं दारुण दाह, व्रण व दाह उत्पन्न करणारी दारुण सूज उत्पन्न होते. तो रस तोंडाला लागला असता, घोर विसर्प होतो. ते उपद्रव शांत होण्याकरितां वैद्यांनी योग्य उपाय योजावे. बिब्याचे सावधतेने शोधन करावें.

४ भल्लातकस्य प्रथम: शोधनप्रकार: ।

इष्टकाचूर्णसंयुक्तं फलं भल्लातकोद्भवम् ।
पोट्टलीमध्यनिहितं घर्षयेन्नाति वेगत: ।।
तत: प्रतप्ततोयेन क्षालयेदतियत्नत: ।
इत्थं तैलत्वचाहीनं भल्लातं शुद्धिमाप्नुयात् । र. त.

विटकरीचें चूर्ण व बिब्याचीं फळें हीं दोन्ही एकत्र एका पोटलींत बांधावी. व हातास खोबऱ्याचें तेल लावून ती पुरचुंडी हलके हलके मर्दन करावी. नंतर गरम पाण्यानें ते बिबे धुवून काढावे. म्हणजे बिब्याचे वरची तैलयुक्त त्वचा निघून जाईल याप्रमाणे बिब्याची शुद्धि होते.

भल्लातकफलानीह नारिकेलाम्बुयोगत: ।
स्विन्नानि दोलिकायंत्रे शुद्धिमायांत्यनुत्तमाम् ।। र त.

बिब्याचीं फळें हीं नारळाच्या पाण्यांत दोलायंत्राच्या पद्धतीने शिजविलीं असतां शुद्ध होतात.

५ भल्लातक गुणा:

भल्लातक: कटुस्तिक्त: अत्युष्ण: कृमिनाशन: ।
रसायनो बलकरो गुल्मार्शो ग्रहणीहर: ।।
कुष्ठामयप्रशमन: कफवातोदरापह: ।
विबंधाध्मानशूलघ्न: श्वासादिगदनाशन: ।। र. त.

बिबे हे तिखट, कडु, अति उष्ण, कृमिनाशक असून ते रसायन आहे. तसेच ते बलकरन्द, गुल्म, अर्शग्रहणी यांचा नाशक, कुष्ठरोग नाशक, कफ, वात, उदर ह्यांचा नाशक, मलमूत्राचा अवरोध, आध्मान व शूल यांचा नाशक व श्वास रोगांना नाश करणारे असे आहेत.

भल्लातक: कषायोष्ण: शुक्लो मधुरो लघु: ।
वातश्लेष्मोदरानाह कुष्टार्शो ग्रहणी गदान् ।।
हन्तिगुल्म ज्वरश्वित्र वन्हिमांद्यकृमिज्वरान् ।। वि. त. २०

बिबे हे तुरट, उष्ण व शुक्रवर्धक, मधुर, हलके, वातश्लेष्माउदर व आनाह यांना नाशक, कुष्ठ, अर्श, ग्रहणी, गुल्म, ज्वर, पांढरे कोड, अग्निमांद्य, कृमि ह्या रोगांना नाहीसे करणारे आहेत.

६ भल्लातक मात्रा

**गुंजैकतः समारभ्य गुंजात्रितयसंमितम् ।**
**भल्लातकं प्रयुञ्जीत बलकालाद्यपेक्षया ॥** र. त.

रोग्याचे बल व ऋतुमान पाहून बिब्याची मात्रा एक गुंजेपासून तीन गुंजेपर्यंत जाणावी.

७ भल्लातकाचा रोगावर उपयोग

**हरीतकीतिलगुडयुतं भल्लातकं समम् ।**
**निषेवितं प्लीहपांडुज्वरघ्नं श्वासकासनुत् ॥** र. त.

हिरडे, तीळ व गुळ यांचें बरोबर बिब्याचें सेवन केलें असतां पानथरी, पांडुरोग, ज्वर व श्वासकास ह्या रोगांचा नाश होतो.

८ भल्लातक असलेली औषधें

(१) भल्लातक रसायन–बलवर्धक, रक्तवर्धक आहे.
(२) नित्योदित रस–मुळव्याधीवर उत्तम आहे. प्रमाण ४ गुंज तूपसाखरेंतून.
(३) संजीवनी–विषूचिका, अजीर्ण व शूळ. प्रमाण १–२ गुंजा. गरम पाण्यांतून.

९ भल्लातक विष उबजल्यास वर लावण्यास उपाय

**१ नवनीतयुतस्तिलकल्कः**
**२ धनिकाकल्कलेपः**
**३ अर्जुनपत्रकल्कलेपः**
**४ बिभितमज्जालेपः**
**५ कासमर्दपत्रकल्क लेपः**
**६ नारिकेलफलकल्क लेपः**
**७ रजनीकल्क लेपश्च**

तीळ वाटून त्यांत लोणी मिसळावे. तो कल्क त्या जागेवर लावावा. धण्याचा कल्क करून त्याचा लेप लावावा. अर्जून वृक्षाचीं पानें पाण्यांत वाटून त्याचा कल्क लावावा. बाहव्याच्या आंतील गराचा कल्क करून त्याचा लेप लावावा. कांसविंध्याच्या पानाचा कल्क करून लावावा. खोबऱ्याचा कल्क लावावा. हळदीचा कल्क लावावा.

## कृष्णसर्प विष

१ जंगम विषांत श्रेष्ठ विष कोणते ?

**विषेषु जंगमाख्येषु विषं नागभवम् हितम् :**
**इदमेव महच्छ्रेष्टम् . . . . . ॥** र. त.

जंगम विषामध्यें नागाचें विष हितकारक आहे. हें विष श्रेष्ठ आहे.

कृष्णसर्प विषस्य नामानि

कृष्णसर्पविषं चैव गरलं दारदं तथा ।
तदेव जंगमविषं समाख्यातं भिषग्वरैः ॥ र. त

कृष्णसर्प विषाची नांवें–कृष्णसर्प, गरलं, दारदं. हें जंगम विष होय असें लोक म्हणतात.

३ कृष्णसर्प विषस्य आहरणविधि:

शुक्तिकां तालपत्रेण खर्जूरस्य दलेन वा ।
आच्छाद्य सर्वतो दीर्घयष्टिकायां तु बंधयेत् ॥
कृष्णसर्पो यथा रोषात् तालपत्रे दशेत्तथा ।
निदध्यात्कृष्णसर्पस्य संमुख यष्टिकामिमाम् ॥
निदध्यात्तावदेवं तु बहुवारं दशेद्यथा ।
शुक्तिकासंचितं सर्पविषं त्वथ समाहरेत् ॥
पुनः पुनः कृष्णसर्पं रोषयन् भिषजां वरः ।
समाहरेद्विषं त्वेवं सावधानतया सदा ॥ र. त.

शुक्तिका, तालपत्र व खर्जुराचीं पानें हीं एका काठीच्या भोंवती गुंडाळल्या जातील अशा रीतीने लपेटून वरून दोरीनें बांधून टाकावी. अशा रीतीनें तयार केलेली ती काठी कृष्णसर्पाच्या पुढे करावी म्हणजे तो सर्प क्रोधायमान होऊन त्या काठीला गुंडाळलेल्या तालपत्राला दंश करील. याप्रमाणें वारंवार ती काठी त्या सापाच्या समोर समोर धरीत जावी म्हणजे क्रोधांत येऊन तो साप वारंवार दंश करीत जाईल. अशा रीतीनें शिंपामध्यें संचित झालेलें विष काढून घ्यावे. याचप्रमाणें सापाला क्रोधायमान करून विष संचीत करीत जावें.

४ कृष्णसर्प विषस्य शोधनम्

तैलाक्तशुक्तिकामध्यसंचिते जंगमे विषे ।
पादांशं सार्षपं तैलं न्यस्य घर्मे विशोषयेत् ॥
जायते पीतवर्णं तन्निदाघे परिशोषितम् ।
कृष्णसर्पविषं त्वेवं शुद्धिमायात्यनुत्तमाम् ॥ र. त.

शिंपांना तेल लावून त्यांत सापाचें वीष ठेवावें. त्या विषाच्या चवथाई सरसोचें तेल त्यांत टाकावें व त्या शिंपा उन्हांत ठेवाव्या व तें विष सुकवावें. उन्हांत सुकल्यानंतर त्या विषाचा रंग पिवळा होईल. याप्रमाणें सापाच्या विषाची शुद्धि होते.

नागोद्भवं यथाप्राप्तं विषं गोमूत्र संयुतम् ।
आतपे त्रिदिनं शुष्कं निहितं वीर्यघृग्भवेत् ॥ र. चं.

नागाचें विष जसें मिळेल तसें आणून तें गोमूत्रांत घालून तीन दिवस उन्हांत ठेवून मग सुकल्यावर काढून ठेवावें, म्हणजे तें गुणकारक होते.

५ कृष्णसर्प विषस्य गुणा:

विषेषु जंगमाख्येषु विषं नागभवं हितम् ।
इदमेव महच्छ्रेष्ठं त्रिदोषक्षपणं क्षणात् ॥
दीपनं कुरुते सद्यो वडवाग्निशतोपमम् ।
संनिपात प्रतीकारे प्रभावोऽपि सः ॥ र. चं.

जंगम विषामध्यें नागाचें विष हितकारक आहे. हें विष श्रेष्ठ असून त्रिदोषाचा क्षणांत नाश करिते. जठराग्नीला शेकडो वडवाग्नीप्रमाणें तात्काळ प्रदीप्त करतें. संनिपाताचा नाश करण्याविषयी हें विष प्रभाव दाखवितें.

६ कृष्णसर्प विष कोणाला देऊं नये

न बालेषु न वृद्धेषु न तथा राजयक्ष्मिषु ।
न संन्यासे न मूर्च्छाये न जीर्णज्वरजर्जरे ॥
जीर्णामय प्रजीर्णेषु रक्तपित्तिषु नैव च ।
न क्षीणेषु प्रयुञ्जीत कृष्णसर्पविषं भिषक् ॥ र. त

लहान मुलें, वृद्ध, राजयक्ष्माचा रोगी, संन्यासरोग, मूर्च्छारोग, जीर्णज्वराने जर्जर झालेला, जुनाट रोग, अजीर्ण रक्तपित्त, क्षीण मनुष्य अशा सर्वांना कृष्णसर्प विष देऊं नये.

Indira Gandhi National Centre for the Arts

७ कृष्णसर्पविषाचा उपयोग

(१) सुचिकाभरण–विषुचिका, संनिपात, श्वास. आल्याच्या रसांतून हें औषध सुरू असतांना थंड पाण्याची घडी डोक्यावर ठेवावी. दहीभात खाणें.

(२) विषूचि विध्वंसन रस--विषूचिका ताबडतोब नाहीशी होते.

(३) मृतसंजीवनी--आसन्नमरण असलेला रोगी दुरुस्त होतो. श्वास, प्रलाप, मुकता, अवयव थंड होणें हे विकार नाहीसे होतात.

दक्षता

हें औषध अत्यंत विषारी व प्राण घेणारें असलें तरी त्याची योग्य शुद्धि करून योग्य प्रमाणांत सर्व उपाय थकल्यावर अत्यंत दक्षतेने चोवीस तास रोग्याजवळ बसून, तें विष नाहीसे करणारीं सर्व औषधें जवळ ठेवून इतर सर्व औषधें देऊनहि रोगी वाचत नाही अशी खात्री पटल्यावर हें कृष्णसर्प विष वर सांगितल्याप्रमाणे द्यावें.

८ वृश्चिक विषस्य चिकित्सा

सर्वत्र चीप्रालिविषे पाययेद्घिसर्पिषी ।
विध्येत्सिरां विदध्याच्च वमनांजननावनम् ।

उष्णस्निग्धाम्ल मधुरं भोजनंचा निला पहम् ॥
अग्ते वृश्चिक दष्टानां समुदीर्णं भृशं विषे ।
विषेणालेपयेद्दंश मुच्चिटिंगेप्ययं विधिः ॥
नागपुरीषच्छत्रं रोहिष मूलंच शेलुतोयेन ।
कुर्याद्गुटिकां लेपादयमलिविषविनाशिनी श्रेष्टा ।
अर्कस्य दुग्धेन शिरीष बीजं त्रिर्भावितं पिप्पलिचूर्ण मिश्रम् ।
एषोऽगदो हन्ति विषाणि कीट भुजंगलूतोंऽदुरुवृश्चिकानाम् ।
शिरीष पुष्पं सकरंजबीजं काश्मीरजं कुष्टमनःशिलाच ॥
एषोऽगदो रात्रिक वृश्चिकानां संक्रांतिकारी कथितोऽजिनेन ।
सद्यो वृश्चिकजं दंशं चक्रतैलेन सेचयेत् ।
विदारिगन्धासिद्धेन कवोष्णे नेतरेणवा ॥
लवणोत्तम युक्तेन सर्पिषा वा पुनः पुनः ॥
सिंचेत्कोष्णार नालेन सक्षीर लवणेनवा ।
उपनाहे घृते भृष्टः कल्कोऽजाज्याः ससैन्धवः ॥ विषतंत्र ६०

उग्र विंचवाच्या विषावर सर्वत्र दही, तुप पाजावें. शीर तोडावी, वमन द्यावें. अंजन व नस्य करावें. आणि उष्ण, स्निग्ध, आंबट व गोड असे वातनाशक भोजन द्यावें.

विंचवाच्या व इंगळीच्या विषावर शेवटी ते अतिशय भडकल्यास बचनाग वगैरे विषारी औषधांचा लेप करावा.

हत्तीची लीद, अळंबी व रोहिस गवताची मुळें यांची भोकरीच्या रसांत वाटून गोळी करून तिचा दंशावर लेप करावा. म्हणजे विंचवाचे विष उतरतें. शिरसाच्या बियांना रुईच्या चिकाच्या तीन भावना देऊन त्यांत पिंपळाचे चूर्ण मिळवावे. हा आगद कीट, सर्प, लूता. उंदीर व विंचू यांचीं विषें नाहिशी करितो. शिरसाची फुलें, करंज्याच्या बिया, केशर, कोष्ट व मनशीळ याचा अगद इंगळया व विंचू यांच्या विषाचें संक्रमण करतो असे जिनाने सांगितले आहे.

विंचू चावल्याबरोबर त्यावर घाण्यांतील ताज्या तिळाचे तेल, सालवणीने सिद्ध केलेले तेल किंवा दुसरें कोणतेहि ताजे कोमट केलेले तेल लावावे.

तूपांत सैंधव घालून त्याने किंवा कांजीं कोमट करून त्यांत दूध व सैंधव घालून त्याने वरचेवर सेचन करीत असावे.

जिऱ्यांत थोडे सैंधव घालून ते वाटावे व तो कल्क तूपांत परतून त्याचे दंशावर पोटीस बांधावे.

प्रतिसारणम्--

आदंशं स्वेदितं चूर्णैः प्रच्छाय प्रतिसारयेत् ।
रजनी सैंधव व्योष शिरीष फल पुष्पजैः ॥

हळद, सैंधव, त्रिकटु सरसोच्या बिया व फुलें ह्या सर्वांना एकत्र कुटून त्याचे चूर्णाचा गोळा करून त्याने विंचवानें दंश केलेल्या जागीं स्वेदन करावें. तसेच दंशाचें जागेवर लावून द्यावें.

लेप:

मातुलुंगाम्ल गोमुत्र पिष्टं च सुरसाग्रजम् ।
लेपः सुखोष्णश्च हितः पिण्याको गोमयोऽपिवा ॥
पाने सर्पिर्मधुयुतं क्षीरं वा भूरिशर्करम् ॥ विषतंत्र ६०

माहाळुंगाचा रस, गोमुत्र व तुळशीचे शेंडे एकत्र वाटून, गरम करून त्याचा दंशाचे जागीं लेप करावा. तसेच तिळाची ढेप चूर्ण करून गरम करून तें दंशाचे जागीं बांधावें किंवा शेण गरम करून बांधावे. व खाण्यापिण्याकरितां तूप, मध व साखर घातलेले दूध पिण्यास द्यावें. म्हणजे वृश्चिक दंशाची व्यथा कमी होते.

पारावतगुटी

पारावतशकृत्पथ्या तगरं विश्व भेषजम् ।
बीजपूर रसोन्मिश्रः परमो वृश्चिकागदः ॥
सशैव लोष्ट्र दंष्ट्राच हन्ति वृश्चिकजं विषम् ।
गोशकृद्रस्स पिष्टेयं गुलिका वृश्चिकार्दिते ।
लशुने मारिचं हिंगु सुरसं विश्वभेषजम् ।
अर्कक्षीरेण गुटिका वृश्चिकार्दित शंकरी । विषतंत्र पा. ६०

पारव्याची विष्ठा, हिरडे, तगर व सुंठ ह्याचें चूर्ण महाळुंगाच्या रसांत मिळवून घ्यावें. हा विंचवाच्या विषावर उत्तम अगद आहे. उंटाची दाढ व शेवाळ यांच्या योगानेंहि विंचवाचे विष उतरतें. गाईचें शेणांत, ही गुटिका उगाळून लावली असतां विंचवाचें विष उतरतें. लसूण, मिरे, हिंग, शिरस, सुंठ यांची रुईच्या दुधांत गुटिका तयार करावी. ही विंचवाचें विष उतरविते.

अंजनम्

हिंगुना हरितालेन मातुलुंग रसेनच ।
लेपांजनाभ्यां गुटिका परमं वृश्चिका पहा ॥ विषतंत्र ६०

हिंग व हरताळ यांची महाळुंगाच्या रसांत गोळी करून तिचा दंशावर लेप करावा व डोळ्यांत अंजन घालावें. ही गोळी विंचवाचें विष उतरविण्याविषयीं उत्कृष्ट आहे.

लेपनम्

करंजार्जुन शेलूनां कटभ्याः कुटजस्यच ।
शिरोषस्यच पुष्पाणि मस्तुना दंश लेपनम् ॥　　　　विषतंत्र ६१

करंज, अर्जूनसादडा, भोकर, किन्ही, कुडा व शिरस यांचीं फुलें दह्याच्या निवळींत वाटून दंशावर लेप करावा.

इतर योग:

कर्पासपत्रैः संपिष्टैराज्यलेपो विषापहः ।
वृश्चिकस्याथ वावत्स्यनाभलेपः प्रशस्यते ॥

कापसाचीं पानें व तूप यांचा लेप विंचवाचें दंशावर करावा. अथवा बचनागाचा लेप विंचू दंशावर प्रशस्त आहे.

यो मुह्यति प्रश्वसिति प्रलपत्युग्रवेदनः ।
तस्य पथ्या निशा कृष्णा मंजिष्टाति विषोषणम् ।
सालाबुवृंतं वार्ताकरसपिष्टं प्रलेपनम् ॥　　　　विषतंत्र ६२

जो विषदंश झालेला मनुष्य मूर्च्छित होतो, बडबडतो, जास्त दम लागतो व उग्र वेदना होतात, त्याच्या दंशावर हिरडेदळ, हळद, पिंपळी, मंजिष्ट अतिविष मिरी, दुध्याभोपळचाचे डेख हीं औषधें डोरली वांग्यांच्या रसांत वाटून त्यांचा लेप करावा.

अर्कक्षीर योग:

अर्कक्षीरं धृवं पुंसा प्रच्छन्नागत शोणिते ।
न्यस्तं दंशे क्षणादेव वृश्चिकस्य विषं हरेत् ॥
कर्पासस्य फलैः सम्यग्लेपयेच्छ्लक्ष्ण पेशितैः ।
दंशं वृश्चिक दष्टस्य शमार्थं घृतमिमिश्रितैः ॥
पारावतशकृच्छुंठी मातुलुंग रसैः समैः ।
पथ्यान्वितैः कृतो लेपो वृश्चिकस्य विषं हरेत् ।
अर्कक्षीरेण संपिष्टा शिरीष फल मिश्रिता ।
उपयुक्ता विषं हन्याद् वृश्चिकस्य प्रलेपनात् ॥
नागरं वारिणा धृष्टं नराणां नस्य कर्मणी ।
विषं वृश्चिक दण्टानां हरेदेकं प्रभावतः ॥
मातुलुंग रसोपेतं तालं हिंगु समन्वितम् ॥
छायाशुष्कः प्रलेपः स्याद्वश्चिकाणां विषापहः ॥
जीरकस्य कृतः कल्को घृतसैंधव संयुतः ।
सुखोष्णो वृश्चिकार्तानां प्रलेपो वेदना पहः ॥

मन:शिलाकुष्ट करंज बीज शिरीष काश्मीर भवैः समांशकैः ।
विनिर्मिता वृश्चिक संभवानां संहारिणी स्याद्‌गुटिका विषाणाम् ॥
विषतंत्र ६१

रुईचा चिक विंचूदंशावर रक्त निघाले असतां लावला तर क्षणांत विषनाशन करिते. कापसाचीं फळें चांगली गुळगुळित वाटून, तूप मिश्र करून लेप करावा. पारव्याची विष्ठा, सूंठ, महाळुंगाचा रस, हिरडा, समभाग घेऊन, लेप केला तर विंचवाचें विष नाहीसे होते. शिरसाचीं फळें रुईच्या दुधांत वाटून लेप केला तर विंचूविष नाहीसे होते, सुंठ पाण्यांत वाटून त्याचें नस्य केल्यास प्रभावानें विंचवाचें विष नाहीसें होतें. हरिताळ हिंग महाळुंगाच्या रसांत वाटून, सावलींत सुकवून त्याचा लेप विंचूदंशावर केला तर विंचवाचें विष नाहीसे होते. जिऱ्याचा कल्क, तूप व सैंधव यांनी युक्त कोमट लेप विंचवाच्या वेदना नाहीशा करतो.

मनशीळ, कोष्ट करंजबीज, सरस, समभाग घेऊन निर्माण केलेली गुटिका वृश्चिक विष नाहीशी करते.

## रसकर्पूर

### रसकर्पूर प्रमाणापेक्षा ज्यास्त पोटांत गेल्यास होणारे विकार व त्यावर उपाय

रसकर्पुरकः ख्यातो बहुभूत विषापहः :
प्रवाहिका हरः कासं मात्राधिक्ये विषक्रिया ॥

विशेषतोयं फिरंगेषुपयुज्यते तदा अतिमात्रयो पयुक्तोऽयं मुखपाकादीनि लक्षणानि जनयति ।

शमनोपायाः–

१) संघर्षं तुत्यकत्थेला लालां मुंचेत्सुखाप्तये ।
२) यदिहंत मनागति वा वदन विपाकः कदापि बाधेत
तर्हि सितोपलयासह सुखाय पिब तडुलीयमूलांभः ।
३) समनंतर मेवाषु विदधीत विदधीत विधीनिमान् ॥
पंचप्रस्थंरपांकृत्वा गंडूषान्किकिरात जान् ॥
संचर्व्य दंत पवनं पुनर्गंडूषकाश्चरेत् ॥
४) एवंकृतेऽपिचेज्जातु मुखपाको भवेत्तदा ।
सलिलैस्तुस्थ मालोढय गंडूषान्सम्यगाचरेत् ॥

रसकर्पुराख्य विषमेत्ततीव्रदाहकं जठरे गतं सद चिरादेव सरक्तां वमी करोति । मुखं ओष्टौच रुक्षौ भवतः श्वासमांर्गश्च रुद्धो भवतिकंटेन सहितः । मूत्रकृच्छ्रन् जठरे शूलश्च रसकर्पुर भैषज्यानां अल्पमात्रया सेवनं चिरकाल पर्यंत कृतं चेत् सततं लाला-

स्त्राव: । अरति: दंतवेष्ट: शोथ: तस्मातं रक्त निस्यंद: । दंत वेष्टेषुनीलारुण सिरानां दर्शनम् मुखेपूतिगंध: संधिषु स्फोटनम् सर्वांगे स्फोटा:।।

मारक प्रमाणम्--यदि अस्यविषस्य २।। गुंजा परिमितं परिमाणं जठरे गतं चेदेक दिनादारभ्य पचदिनादर्वाक मृत्यु: संभवति ।

चिकित्सा–शीतलेन सैंधव जलेन आमाशय धावनम् द्वित्रिवारम् तत. कुक्कुटांड कल्क: शीतल जलेन साकं प्रदेय: उत्तेजन कराणां द्रव्याणां उपयोगाश्च । विषतंत्र ७७

रसकर्पूर हा पुष्कळ रोगविनाशक आहे. तसेच प्रवाहिका नाहीसा करणारा आहे. पण प्रमाणापेक्षा जास्त झाल्यास विषक्रिया होते.

विशेषत: हा फिरंगरोगावर उपयोगांत आणतात. जास्त प्रमाण झाल्यास तोंड येणें आदि लक्षणें होतात.

**शमनोपाय:**

(१) मोरचूद, काथ, विलायची घासून लाळ गळू द्यावी.

(२) जर मन अस्वस्थ झालें व तोंड आलें तर तांदुळाची मुळी पाण्याशीं उगाळून त्यांत खडीसाखर घालून प्यावें.

(३) नंतर थोडचा वेळांत हा विधी करावा.

पांचप्रस्थ पाणी घेऊन प्रथम काडेचिराइतासारखे पदार्थ चावून गंडुष करावेत.

(४) यानेही मुखपाक थांबला नाही तर पाण्यांत मोरचूद घालून गंडूष करावा.

रसकापुराचें विष तीव्र दाहक असते. तें जठरांत गेलें तर चिरकालाने रक्तयुक्त वमन होते. मुख व ओष्ठ रुक्ष होतात. श्वासमार्ग व घसा अवरूद्ध होतो मोठ्या कष्टाने लघ्वी होते. जठरांत शूळ होतो. रसकापूर औषध म्हणून अल्पमात्रेंत चिरकाल पावेतो घेतल्याने एकसारखी लाळ गळते. बेचैनपणा, हिरडचांची सूज, त्यांतून रक्तस्राव, हिरडचावरील शिरा निळचा, लाल दिसतात. तोंडाला दुर्गंधि, संधि, फुटल्यासारखे वाटणे व सर्वांगावर फोड येतात.

**मारक प्रमाण**–या विषाचें २।। गुंज प्रमाण पोटांत गेलें तर एक दिवसापासून पांच दिवसाचें आंत मृत्यु येतो.

**चिकित्साआमाशय धावन**–धावन थंड अशा सैंधव मिठाचें द्रावणानें २।३ वेळ करावे. नंतर कोंबडीच्या अंडचांतील बलक थंड पाण्याशी घ्यावा अथवा सपीट (मैदा) तबकीरपाण्यांत कालवून थंड पाण्याशी द्यावें. उत्तेजनकारक द्रव्यांत सेवन करावें.

---

# उपयुक्त द्रव्य विज्ञानीय

## अध्याय ५९

## गोदंति

### १ गोदंतीची घटना

Gypsum-- $CaSO_4 2H_2O$ कॅल्सियम सल्फेट (गोदंती हरताळ हा हरताळाचा भेद नसून गंधकाचा आहे. त्यांत सोमल नाही. )

आयुर्वेदीय खनिज विज्ञान.

### २ उत्पत्ति

समुद्र आटल्यावर त्या ठिकाणीं थरावर थर असें पापुद्रे असलेले मोठमोठया ढेपी गोदंती हरताळाच्या सापडतात. तसेच साधारण मातींतहि हरताळ सापडतो. काठिण्य व वि. गु. गोदंतीचें काठिण्य १॥ ते २ व वि. गु. २·२ ते २ ४ आहे.

### ३ गोदंतीचे तीन प्रकार

आकृति, वर्ण व कांतीच्या वरून गोदंतीचें तीन प्रकार मानण्यांत येतात. गोदंती खालील तीन स्वरुपांत मिळतो.

(१) सेले नाईट–(Selenite) कणरूप व पत्राकार, पारदर्शक स्फटिकमय.

(२) एलाबास्टर– (Alabaster) अपारदर्शक बुकणीच्या रूपाने सांपडतो यांत निरनिराळे रंग असतात.

(३) सेटिन स्पार– ( Satins spar ) साधारण पारदर्शक असते. त्याला ( Gipsum ) असें म्हणतात.

### ४ गोदंती हे कोणतें द्रव्य आहे

गोदंती हा गंधकाचा भेद असून तो श्वेतगंधक म्हणून ओळखला जातो. असें प्राचीन ग्रंथकाराचे मत आहे. परंतु अर्वाचीन ग्रंथकार त्याला हरताळाचा एक प्रकार समजतात. परंतु गोदंती हा हरताळाप्रमाणे सोमलाचा उपरस नव्हे.

### ५ गोदंतीचा वैद्यकीय उपयोग

गोदंतीचा उपयोग युनानी हकिमापासून आपणांस माहीत झाला. बगदाद व पंजाब ह्या प्रांतांतून भ्रमण करणारे साधू, संन्याशी, फकीर यांचे मार्फत इकडील प्रांतांतहि गोदंतीचा उपयोग होऊं लागला.

६ उत्पत्ति स्थान

गोदंती हरताळ हिंदुस्थानांत कांही ठिकाणीं विपुल आहे. पंजाबमध्यें कांग्रा स्पिटी, खोऱ्यांत विपुल आहे. गरम पाण्याच्या झऱ्याजवळ असतो. तेथें Iron Pyrites + Carbonate of lime गंधायस व सुधाश्मा आहे. त्याचें पृथःकरण व परत संयोग होऊन हें द्रव्य पाषाण (गोदंती) बनलें. येथें सैंधवासारखा शुभ्र पाषाण सापडतो. तसेंच रावळपिंडी, सिमला, शाहापूर, डेरागाझीखान, सिंध, बलुचिस्थान, मद्रास इलाखा, मुंबई इलाखा, राजपुताना, सरहद्दप्रांत, कोहट या ठिकाणीं गोदंती हरताळ सांपडतो.

७ गोदंतीची प्रांतवार नांवें

(इं.) Gypsum-जिप्सम. लाहोरांत-संग-ई-हजारत, गोदंती-संगई-मर्कल रावळपिंडी व झेलम येथें-सुर्म सफेद, मिठाच्या प्रांतांत-संगई जेहारत, स्पिटी-कर्सि, काश्मीर-सक्-हि. कुलनरर्, सिलसित-मुंबई घापाण, स. शंखकर्पूराश्मा दक्षिणदेश--कर्पूर शीला.

## गोदंती हरताळ

Indira Gandhi National
Centre for the Arts

१ नांवें

**गोदन्तिका च गोदन्ता गोदन्तं कथ्यते बुधैः ।**
**तत्तु पाषाण जातीयं सौम्यं तालसमं न तत् ॥** र. त. १३५

गोदंती हरताळाचीं नांवें--गोदंतिका, गोदंता, गोंदत, अशीं हीं होत. हें पाषाण जातीचें आहे. तें हरताळाच्या जातीचें नव्हे.

२ गोदंती हरताळाचें स्वरुप

**पत्राचितं सुमसृणं शरदिन्दुसुनिर्मलम् ।**
**दीप्तप्रभं तु गोदंतं ग्राह्यमत्र प्रकीर्तितम् ॥** र. त. १३५

गोदंती हरताळ हे एकावर असें अनेक थर असलेले, फार गुळगुळीत, शरदऋतुतील चंद्राप्रमाणें अत्यंत निर्मळ, कांतीयुक्त, अशा लक्षणांनी युक्त असें हरताळ प्रशस्त जाणावें.

३ गोदंती हरताळाचें शोधन

**गोदन्तं निबुनीरेण द्रोणपुष्पीरसेन वा ।**
**यामार्द्धेनैव सुस्विन्नं विशुध्यति न संशयः ॥** र. त १३५

गोदंती हरताळ हा निंबाच्या रसांत अथवा द्रोण पुष्पीचें रसांत अर्धा प्रहर शिजविले असतां तो शुद्ध होतो.

४ गोदंती हरताळाचें मारण

शरावसंपुटान्तस्थं गोदन्तं सुविशोधितम् ।
म्रियते पुटितं भस्म जायते शशिसुन्दरम् ॥ र. त. १३५

शुद्ध गोदंती हरताळ घेऊन, शरावांत घालून, मातकापड करावें, व गजपुट द्यावें. म्हणजे गोदंती हरताळाचें भस्म होतें.

५ गोदंती हरताळाचें गुण

गोदन्तं सुमृतं शीतं पित्तज्वर निषूदनम् ।
जीर्णज्वरहरं बल्यं दीपनं श्वासकासनुत् ॥ र. त. १३५

गोदंती हरताळाचें भस्म हें पित्तज्वराचा नाश करणारें, जीर्णज्वरनाशक, बलकर, अग्निदीपक असून श्वासकासाचा नाश करणारे आहे.

६ गोदंती हरताळाची मात्रा

गूंजैकतः समारभ्य गुंजात्रयमितं परम् ।
गोदन्तं विनियुञ्जीत बलकालाद्यपेक्षया । र. त. १३६

गोदंती हरताळाचें भस्म हें एक गुंजेपासून तें तीन गुंजापर्यंत ऋतुमान व रोग्याचे बल पाहून पोटांत घ्यावें.

## मृगशृंग

१ नांवें

मृगश्रृंग त्वेणश्रृंग तथा मृगविषाणकम् ।
हरिणश्रृंगकं चैव समाख्यातं भिषग्वरैः । र. त. पा. १४५

मृगश्रृंग, एणश्रृंग, मृगविषाण, हरिणश्रृंग ही वैद्यांनी मृगश्रृंगाचीं नांवें सांगितलीं आहेत.

२ मृगश्रृंगाचें स्वरूप

कीटानुपहतं दीर्घं भाराढ्यं सुदृढं तथा ।
अनेकश्रृंगसंयुक्तं मृगश्रृंग वरं मतम् ॥ र. त. पा. १४५

कीड न लागलेले, लांब आकाराचे, वजनदार, मजबूत, एकांत एक असें अनेक फांटे असलेलें मृगश्रृंग उत्तम जाणावें.

३ मृगश्रृंगाचें मारण

मृगश्रृंगं समादाय करपत्रेण कर्तयेत् ।
खंडशः कारयित्वा च त्वंगाराग्नौ दहेत्ततः ॥
सुदुग्धं चाथ विज्ञाय खल्वे संचूर्णयेद्भिषक् ।
रविदुग्धेन संपेष्य चक्रिकाः कारयेत्ततः ॥

शरावसंपुटांतःस्थं पुटेत्तीव्राग्निना भिषक् ।
त्रिवारं पुटनादेण विषाणं मृतिमाप्नुयात् ॥ र. त. पा. १४५

मृगश्रृंगाचें करवतीनें कापून त्याचे लहान लहान तुकडे करावे व प्रखर अशा अग्निनिखाऱ्यांत तें भाजावें. चांगलें भाजून त्याची राख झाल्यावर खलांत त्याचें बारीक चूर्ण करावें. व रुईच्या दुधांत घोटून त्याच्या वड्या कराव्या. त्या वड्या शरावसंपुटांत घालून त्याला तीव्राग्नीने पुट द्यावें. अशी तीन पुटें दिली असतां मृगश्रृंगाचें भस्म होतें.

४ मृगश्रृंगाचे गुण

मृगश्रृंगसमद्भूता विभूतिर्गव्यसर्पिषा ।
विनाशयेत् क्षणादेव हृच्छूलमतिदारुणम् । र. त. पा. १४५

मृगश्रृंगाचें भस्म हें गाईचें तुपांतून घेतलें असतां दारुण अशा हृदयशूळाचा नाश होतो.

पार्श्वशूळ

हरिणविषाणसमुत्था भूति: क्षौद्रेण रक्तिमिता ।
अपहरतीह निकामं हृच्छूलं पार्श्वशूलं च ॥ र. त. पा. १४५

मृगश्रृंगाचें भस्म मधांतून घेतलें असतां हृदयाचा शूळ व पार्श्वशूळ यांचा नाश होतो.

## गुग्गुळ

१ भाषावार नांवें

हिं.—गुगल (र.) भैंसा गूगुल.
बं.—गुग्गुल.
गु.—गुगुल, भैंसो गुगुल.
म.—म्हशा गुगुळ, गुगुळ.
क.—इडबोल.
तैं.—गुग्गिल मुचेट्ट महिसाछी.
इं.—इंडियन डेलियम (Indian Dellium).
लॅ.—वालसमोडीन्ड्रन एक्स वुछिआई, वालस मोडेड्रन मुकुल ( Walsams Raxburghii B. Makkul.)
फा.—वोपएज हुदान.
अ.—मुष्किले अर्जक.

२ गुग्गुलु नामानि

गुग्गुलु: काल निर्यासो महिषाक्ष: पलंकष: ।
जटायु: कौशिको धूर्तो देवधूप: शिव: पुर: ।। शा. नि. ३१

गुग्गुल, कालनिर्यास, महिषाक्ष, पलंकष, जटायु, कौशिक, धूर्त, देवधुप, शीव, पूर.

३ गुग्गुळ उत्पत्ति

मरुद्‌भूमौ प्रजायंते प्रायश: सुरपादपा: ।
भानोर्मयूखै: संतप्ता ग्रीष्मे मुंचन्ति गुग्गुलम् ।। र. चं. पा. ७३

मारवाड देशांत एकप्रकारचीं देवदाराची झाडें होतात. त्यांतून ग्रीष्म ऋतूंमध्यें सूर्याच्या तापानें त्या झाडांचा डिक बाहेर पडतो. त्यास गुग्गुळ असें म्हणतात.

४ गुग्गुळाचें प्रकार

महिषाक्षो महानील कुमुद: पद्म इत्यपि ।
हिरण्य: पंचमो ज्ञेये गुग्गुलो पंचजातय: ।। भा. प्र. पा. ११७

महीषाक्ष, महानील, कुमुद, पद्‌म व हिरण्य असे गुग्गुळाचे पांच प्रकार आहेत.

हेमाभं महिषाक्षतुल्यमपरं तत्पद्मरागोपमं ।
भृंगाभं कुमुद्युति च ।। र. र. पा. १०९

त्यापैकीं एक सोन्यासारखा पिवळा, दुसरा रेडयाच्या डोळयाप्रमाणें काळसर तांबूस, तिसरा माणिक रत्नाप्रमाणे लाल, चौथा भ्रमराप्रमाणें काळा आणि पांचवा कमळपुष्पाप्रमाणें तांबूस पांढरा असतो.

५ महिषाक्ष गुग्गुळाचें लक्षण

भृंगांजनसवर्णस्तु महिषाक्ष इति स्मृत: ।। भा. प्र. पा. १७७

जो गुग्गुळ भुंगा व अंजन यांच्या वर्णाचा असतो, त्याला महिषाक्ष म्हणतात.

६ महानील गुग्गुळ लक्षण

महानीलस्तु विज्ञेय: स्वनामसमलक्षण: । भा. प्र. ११७

जो अतिशय निळा असतो, त्याला महानीळ म्हणतात.

७ कुमुद गुग्गुळ लक्षण

कुमुद: कुमुदाव्हः स्यात । भा. प्र. पा. ११७

ज्याचा वर्ण कुमुदाप्रमाणे असतो, त्याला कुमुद म्हणतात.

८ पद्म गुग्गुळ

पद्‌मोमाणिक्यसंनिभ: । भा. प्र. पा. ११७

जो गुग्गुळ माणिकाप्रमाणें चमकतो, त्याला पद्‌म म्हणतात.

९ हिरण्याक्ष गुग्गुळ

हिरण्यःक्षस्तु हेमाभः ।                    भा. प्र. पा. ११७

जो गुग्गुळ सोन्यासारखा असतो, त्याला हिरण्य किंवा हिरण्याक्ष म्हणतात.

१० कोणत्या गुग्गुळाचा उपयोग कोठे करतात ?

महिषाक्षो महानीलो गजेंद्राणां हितावुभौ ।
हयानां कुमुदः पद्मः स्वस्त्यारोग्यकरौ परौ ॥                    भा. प्र. पा. ११७

महिषाक्ष व महानील हें हत्तींना हितकारक आहेत. कुमुद व पद्म हें घोड्यांना हितकर आहेत.

११ मनुष्याला उपयोगी गुग्गुळ

विशेषेण मनुष्याणां कनकः परिकीर्तितः ।
कदाचिन्महिषाक्षश्च यतः कैश्चिन्नृणामपि ॥                    भा. प्र. पा. ११७

हिरण्याक्ष विशेषेकरून मनुष्यांना हितकर आहे. केव्हां केव्हा महिषाक्ष हा सुद्धा मनुष्याचें उपयोगाकरितां वापरतात.

१२ नव्या गुग्गुळाचें लक्षण

स्निग्धः कांचन संकाराः पक्वजंबु फलोपमः ।
नूतनो गुग्गुलुः प्रोक्तः सुगंधियस्तु पिच्छिलः ।                    भा. प्र. पा. ११७

गुग्गुळ स्निग्ध, सुवर्ण सदृश, पिकलेल्या जांभळासारखा, सुगंधित व पिच्छिल असेल, तर तो नवीन समजावा.

१३ जुन्या गुग्गुळाचें लक्षण

शुष्को दुर्गंधक श्चैव त्यक्त प्रकृति वर्णकः ।
पुराणः सतु विज्ञेयो गुग्गुलुर्वीर्यवर्जितः ।

जो गुग्गुळ वाळलेला, दुर्गन्धित, स्वाभाविक गुण व वर्णरहित असेल तो जुना समजावा. जुना गुग्गुळ शक्तिहीन समजावा.

१४ ग्राह्य गुग्गुळाची परीक्षा

वन्हौ ज्वलन्ति तपने विलयं प्रयांति ।
क्लिघंति कोष्ण सलिले पयसा समानाः ॥                    भा. प्र. पा. ११०

जो गुग्गुळ अग्निवर ठेवलां असतां पेटतो, उन्हांत ठेवला तर पातळ होतो, कोमट पाण्यांत विरघळतो. व दुधासारखा पांढरा दिसतो, तो गुग्गुळ चांगला समजून घ्यावा.

१५ त्याज्य गुग्गुळ

परिहरे चिरकाल जाता
गास्फुटं खर्परगंधिकतुल्यवर्णान् ॥                    भा. प्र. पा. ११०

जो फार दिवसाचा जुना किंवा फोडला असतां त्याला खापरीप्रमाणें वास येतो रंगानेहि तसाच दिसतो. तो त्याज्य समजून घेऊं नये.

## १६ गुग्गुळाची शुद्धि

चतुर्गुणे गव्य दुग्धे गुग्गुलं स्वेदयेत भृषम् ।
वस्त्रपूतं विधायाथ मलं वस्त्रस्थमुत्सृजेत् ॥
दुग्धं शीतं तु विज्ञाय दुग्ध पात्र तला स्थितम् ।
समाहरेत गुग्गुलुंतु सर्व दोष समुज्झितम् ॥ र. त. पा. ३६९

गुग्गुळाच्या चौपट गाईचें दूध घेऊन त्यांत गुग्गुळाचें खूप स्वेदन करावें. नंतर एका फडक्यांतून तो गाळून घ्यावा. त्यांत असलेली माती त्या फडक्यावर राहील. दूध थंड झाल्यावर भांड्याच्या तळाशीं असलेले गुग्गुळ काढून घ्यावा. हा गुग्गुळ शुद्ध असून तो सर्व दोष नाशक आहे.

गुडुची त्रिफलाक्वाथे क्षीरे चैव विशेषत: ।
पक्त्वाच खण्डश: शुद्धं गृण्हीयान्मृदुगुग्गुलम् ॥ शा. नि. ३४

गुग्गुळ गुळवेल व त्रिफळयाच्या काढ्यांत आणि विशेषत: दुधांत तुकडे करून शिजवावा म्हणजे तो मृदु आणि शुद्ध होतो. तो उपयोगांत आणावा.

भैषजै: सह नि:क्वाथ्य यथा व्याधिहरै: पृथक् ।
मात्रावारिष्ट तंज्ञात्वा गालयेच्छुक्ल वाससा ॥ र. चं. पा. ७३

त्या त्या रोगनाशक औषधींच्या काढ्यांत गुग्गुळ घालून शिजवावा आणि पांढऱ्या फडक्यांतून गाळून घ्यावा व आटवून घट्ट करावा म्हणजे तो शुद्ध होतो.

## १७ गुग्गुळाचें गुण

गुग्गुलुर्विशदस्तिक्तो वीर्योष्ण: पित्तल: सर: ।
कषाय: कटुक: पाके कटु रूक्षो लघु: पर: ॥
भग्नसंधानकृद् वृष्य: सूक्ष्म: स्वर्यो रसायन: ।
दीपन: पिच्छिलो बल्य: कफवातव्रणापची: ॥
मेदोमेहाश्मवातांश्च क्लेदकुष्ठाममारुतान् ।
श्पिडिकाग्रंथिशोफार्शो गंडमाला कृमीञ्जयेत् ॥
माधुर्याच्छमयेद्वातं कषायत्वाच्च पित्तहा ।
तिक्तत्वात्कफपित्तेंन गुग्गुलु: सर्वदोषहा भा. प्र. पा. ११७

गुग्गुळ स्वच्छ, कडु, उष्णवीर्य, पित्तकारक, सारक, तुरट, तिखट, विपाककाली तिखट, रुक्ष, अत्यंत हलका, तुटलेली हाडें जुळविणारा, वीर्यकर, सूक्ष्म, स्वर, हितकर, अग्निदीप्त करणारा, रसायन, चिकट, बलवर्धक असून कफ, वात, व्रण, अपचो, मेद,

प्रमेह अश्मरी, वात, क्केद, कुष्ठ, व आमवात पिडका वगैरे रोगांना नष्ट करणारा आहे. गुग्गुळ मधुर असल्यामुळे वातनाशक, तुरट असल्यामुळे पित्तनाशक व कडु असल्यामुळे कफनाशक अशा प्रकारे गुग्गुळ हा त्रिदोषघ्न आहे.

### नवा व जुना गुग्गुळ यांत फरक

**स नवो बृंहणो वृष्यः पुराणस्त्वति लेखनः ।।** भा. प्र. पा. ११७

गुग्गुळ हा नवीन असला तर पुष्टि प्राप्त होते. मैथुन व शक्ति वाढवितो. जुना असेल तर लेखन असतो.

### १८ गंधराज गुग्गुलु गुण::

**कणगुग्गुलुः कटूष्णः सुरभिर्वात नाशनः ।**
**शुल गुल्मोदराध्मान कफघ्नश्च रसायनः ।।**

गंधराज गुग्गुळ, तिखट, उष्ण, सुगंधी, वातनाशक, त्याचप्रमाणे गुल्म, उदररोग आध्मान, कफनाशक असून तो रसायन आहे.

### १९ गुग्गुळ सेवन करतांना वर्ज्य पदार्थ

**आम्लं तीक्ष्णमजीर्णं च व्यवायं श्रममातपम् ।**
**मद्य रोषं त्यजेत्सम्यग्गुणार्थी पुरसेवकः ।।** भा. प्र. पा. ११७

गुग्गुळ सेवन करणाऱ्यां पुरुषाला त्याचें पूर्ण गुण पाहिजे असल्यास, खारट, आंबट, तीक्ष्ण व कच्चे पदार्थ, मैथुन, परिश्रम, ऊन, दारु व क्रोध हे वर्ज्य करावे.

## हिंग

### नांवें

**हिंगुं शूल द्विड् मठं वाल्हीकं जंतुकं जतु ।**
**सहस्त्र वेधि जंतुघ्नं सूपांगं सूप धुपनम् ।** शा. नि. १४१

हिंगू, शूलद्विट, रमठ, बाल्हीक, जतुक, अतु, सहस्त्रवेधी, जंतुघ्न, सूपांग, सूपधूपन.

### २ भाषावार नांवें

सं.—हिंगु.
हिं.—हींग.
वं.—हिंगु.
म.—हिंग.
गु.—वघारणी.
क.—लेसु.
तै.—इंगुरा.

लै.–फेरुलानर्थिक्स, नार्येक्स, आस्सा, फिटिडा ( Ficrula Narth Assafoctida )
फा.–अंगुझ, दर्खते अगझुखालिस.
इं.–आस्सा फेटिड्डा.
अ.–हिलसीत.

३ हिंगाचें शोधन

पद्मपत्ररसे याममातपे भावितं विदुः ।
रामठं शुद्धिमाप्नोति रसयोगेषु योजयेत् ॥ यो. र. २६४

हिंगाला कमळाच्या पानाच्या रसांत एक प्रहरभर खलले असतां तो शुद्ध होतो. तो रसायनांत योजावा.

अंगारस्थे लोहपात्रे सघृते रामठं क्षिपेत् ।
चालयेत्किंचिदारक्तवर्णं योगेषु योजयेत् ॥ शा. नि. १४३

अग्नीवर लोहपात्र ठेऊन त्यांत हिंग टाकावा, व तूप टाकावें. जेव्हां हिंग लाल होईल तेव्हां तें भांडें खाली उतरावें आणि नंतर तो हिंग औषधामध्यें उपयोगांत आणावा.

४ हिंगाचे गुण

वाल्हिकं पित्तलं चोष्णं हृद्यं तिक्तं परं कटु ।
लघु तीक्ष्णं रुचिकरं पाचकं चाग्नि दीपिकम् ।
स्निग्धं मलस्तंभकरं श्वासकास कफापहम् ।
आनाहाध्मान गुल्मघ्नं शूल हृद्रोग नाशनम् ॥
वातंचा जीर्णकंजतूनुदरं चैव नाशयेत् । शा. नि.

हिंग पित्तकारक, उष्ण, हृदयाला हितकर, कडू सारक, तिखट, हलका, तीक्ष्ण रुचकर, पाचक, अग्निदीपक, स्निग्ध, मलस्तंभक असून श्वास, खोकला, कफ, आनाह, आध्मान, गुल्म, शूळ, हृद्रोग, वात, अजीर्ण, कृमि आणि उदररोग नाशक आहे.

## नाडि हिंगु [ डिकमाली ]

१ नाडि हिंगु नामानि

नाडिहिंगु पलाशाख्या जन्तुका रामठीच सा ।
वंशपत्री च पिंडाव्हा सुवीर्या हिंगु नाडिका ॥ शा. नि.

नाडिहिंगु, पलाशाख्य, जंतुका रामठी, वंशपत्री, पिंडाव्हा, सुवीर्या, हिंगुनाडिका. दुसरीं नांवें–वेणुपत्री पिंडा, हिंगु शिवादिका.

२ भाषावार नांवें

सं.—नाडिहिंगु.

हि.–कलःपर्तिहिंग, डिकामाली.

वं.–हिंगुविशेष.

म.–डिकेमाळी.

गु.–डिकामाली.

क.–कलहंती.

तै.–चिभहिंगवा.

इं.–डिकेमालिगम् गम्मिगार्डिनिया ( Dikamallegum Gmmy-Gadinia ).

लै.—गार्डित्या ल्युसिडा, गार्धिन्यागम्मीफेरा ( Gardiniu Geeda Gardinua Gurrimefera ).

आ.–कनखाभ.

३ हिंगुपत्री नामानि

त्वग्पत्री हिंगु पत्री च कर्बरी पृथुला पृथुः ।
बाष्पीका बाष्पिका बाष्पी दीर्घिका दारु पत्रिका ॥

त्वग्पत्री, हिंगुपत्री, कर्बरी पृथुला पृथु, बाष्पीका, बाष्पिका, बाष्पी, दीर्घिका, दारुपत्रिका.

दुसरीं नांवें–कारवी, करवी, पृथ्वी, पृथ्विका, बाष्पका, बाष्पा, पत्रीतन्वी, दारुपत्री, बिल्वा, पृथुका.

४ नाडि हिंगु गुणाः

नाडीहिंगु कटुष्णाच कफवातार्ति शांतिकृत् ।
विष्टा विबंध दोषघ्नीचानाहामापहारिणी ॥ शा. नि. १४४

नाडीहिंगु तिखट; उष्ण, कफ आणि वात यापासून होणाऱ्या वेदना शांत करणारा. त्याचप्रमाणे विष्टाविबंध आणि आनाह हे रोगनाशक आहे.

## समुद्रफेस

१ उत्पत्ति

समुद्रे वर्तुलः क्षुद्रो दशहस्त समन्वितः ।
मीन जाति समुत्पन्नो जन्तुरेको विलक्षणः ॥
भीषणाक्षः कूर्मपृष्टः स यदा विजहात्यसुन ॥
तत्पृष्टास्थि विशुष्कं तु फेनाभं दृश्यते तदा ।

अब्धि मध्ये तरत्येत त्तरंगैराहतं मुहुः ।
यतोऽब्धौ फेनवत्तारि त्वब्धिफेनं ततः स्मृतम् ॥ र. त. १४७

समुद्रांत एक लहान. दहा हात लांबीचा वाटोळा, मीन जातीचा असा एक विलक्षण जंतु उत्पन्न होतो. त्याचे डोळे भयानक असून त्याची पाठ कासवाप्रमाणे असते. जेव्हा तो मरतो . तेव्हा त्याचें पाठीचें हाड शुष्क होते व तें फेसाप्रपाणें दिसते. समुद्रामध्यें तें तरंगते. ते पाण्यांत तरंगत राहत असल्यामुळे ते मृदु असते. समुद्रांत फेसाप्रमाणें तें तरंगतें म्हणून त्याला अब्धिफेन असे म्हणतात.

## २ भाषावार नांवें

सं.–समुद्रफेन.
हि.–समुद्रफेन.
वं._समुद्रफेना.
म.–समुद्रफेण.
गु.–समदरफीण.
क.–कडल नागले.
तै.–सामुद्र नालिके.
इं.–कटल फीश बोन (Cattle Fishbone).
लै.–सेपिया आपिसिनेलिस. ( Sepia offcinalis ).
फा.–कफेदरिया.
आ.—जुबदुल्लेहेर.

## ३ समुद्रफेसाची नांवें

समुद्रफेने डि (हि) ण्डीरं शुष्काशुष्कं पयोधिनम् ।
अब्धेर्मलकफौ प्रोक्तौ सिन्धूजं लाधवाञ्जनम् ॥ र. का. धे. ३००

डिडीर, शुष्काशुष्क, पयोधिनम् , अब्धेर्मलकफ, सिंधुज, लाघवांजन.

## ४ समुद्रफेनाची शुद्धि

समुद्रफेनः संपिष्टो निंबुतोयेन शुध्यति ॥यो. र, २६३ र. चं. ७२ आ. प्र

समुद्रफेनाचें चूर्ण करून निंबाच्या रसांत भिजत घातलें असतां तो शुद्ध होतो.

## ५ अशुद्ध समुद्रफेनाचे दोष

अशुद्धः स करोत्यंगभंग तस्माद्विशोधयेत् ॥ आ. प्रकाश पा. २९१

अशुद्ध समुद्रफेनाचा उपयोग केला तर अंग जखडते, म्हणून ते शुद्ध करून वापरावें.

६ समुद्रफेन गुणा:

समुद्रफेनश्चक्षुष्यो लेखन: शीतलस्तथा
कषायो विष पित्तघ्न: कर्णरुक्कफहृल्लघु: ॥ शा, नि. १५८

समुद्रफेन नेत्राला हितकर, लेखन, शीत, तुरट, त्याचप्रमाणे विषरोग, कर्णरोग, आणि कफ यांचा नाश करणारा असून तो हलका आहे.

समुद्रफेनं शिशिरं कषायं नेत्ररोगनुत् ।
कफकंठामयघ्नं च रुचिकृत्कर्ण रोगहृत् ॥ शा. नि.

समुद्रफेन, शीत, तुरट, नेत्ररोग, कफ, कंठरोग, कर्णरोग, नाशक असून रुचि उत्पादक आहे.

७ क्लिन्नवर्त्म निवारक योग

रालसैंधवरसाञ्जनान्वित: ।
फेनकस्तु वटकीकृतोऽञ्जनात् ॥
क्लिन्नवर्त्मविनिवारण: परं ।
पक्ष्मरोहणकरश्च कीर्तित: ॥ र. त. १४६

राळ सैंधव, रसांजन व समुद्रफेन या सर्वांचे एकत्र चूर्ण करून, पाण्यांत घोटून याच्या वटिका करून त्याचे डोळयांत अंजन केलें असतां डोळयांतून पाणी गळत असल्यास तें पाणी जाणें बंद होते. व पापण्याचे केस गळले असल्यास ते केस पुन्हां येतात.

८ श्रुतिस्रावावर योग

चूर्णितं त्वाब्धिफेनं तु प्रध्मातं श्रुतिसंपुटे ।
विनाशयेच्छ्रुतिस्रावं चिरजातमपि द्रुतम् ॥ र. त. १४६

समद्रफेनाचे चूर्ण करून तें गरम करून कानांत टाकले असतां पुष्कळ दिवसांपासून कान वाहत असल्यास तो लवकर दुरुस्त होतो.

९ व्रणरोपण योग

मुद्दारश्रृंगसंयुक्तं त्वब्धिफेनं सुचूर्णितम् ।
मधुना व्रणसंलेपादुत्तमं व्रणरोपणम ॥ र. त. १४७

समुद्रफेनांत मुरदाडसिंग मिसळून, मधांत मिसळून व्रणावर लावलें असतां व्रण भरून येतो.

१० समुद्रफेनाचा अनुपान परत्वें रोगावर उपयोग

समुद्रफेनचूर्णं तु सितया श्लक्ष्ण पिष्टया ।
नेत्रशुक्रं निहंत्याशु चिरजातमपि ध्रुवम् ॥
शंखसैंधव संयुक्त: सुफेनोऽर्ककलाशया ।
नेत्रयोरञ्जनादाशु शुक्रादीन् शस्त्रवल्लिखेत् ॥ र. त. १४६

समुद्रफेनचूर्ण व खडीसाखर दोन्हींना एकत्र घोटून गुळगुळीत चूर्ण करावे. तें चूर्ण डोळ्यांतील फूल बरेच दिवसांचे असले तरी त्याचा नाश करिते. शंखभस्म, सैंधव व समुद्रफेस यांचें चूर्ण करून त्या चूर्णाचें किंवा अंजनाचें तांब्याच्या सळईनें अंजन केलें म्हणजे डोळ्यांतील फूल वडस हें विकार शस्त्रक्रियेप्रमाणें तात्काळ नाहीसे होतात.

**पिप्पलीसैन्धवोपेतः फेनको मधुनाञ्जनात् ।**
**विनाशयेच्छुक्रदोषं दृशोश्चिरसमुत्थितम् ॥** र. त. १४६

पिंपळी, सैंधव व अब्धीफेन या सर्वांचें खलांत घोटून गुळगुळीत चूर्ण केलें तर पुष्कळ दिवसांचा डोळ्यांतील शुक्रदोषाचा नाश होतो.

## ११ पोथक्यादिकांवर

**तुत्थषड्गुणितः फेनः पथ्यया तुत्थतुल्यया ।**
**वर्तिः कृताञ्जनद्वारा पोथक्यादिविनाशिनी** र. त. १४६

मोरचूत १ भाग, समुद्रफेन ६ भाग व हिरडा १ भाग ह्या सर्वांचें चूर्णकरून पाण्यांत घोटून त्याची वात तयार करावी तिचें डोळ्यांत अंजन केल्यानें पोथक्यादिरोग नाहीसे होतात.

# खडू-खटी

## १ खटिकेची नांवें

**खटिका कठिनी चापि लेखनीच निगद्यते ॥** आ. प्र. ९९ भा. प्र. १८५

खटिका, कटिनी, लेखनी, खटी, खटिनी, धवालव मृत्तिका हीं नांवें आहेत.

**शुक्लधातुः खटी श्वेता खटिनी स्मृता ॥** र. का. धे. ३०२

शुक्लधातु, खटी, खटिनी, कठिनी हीं खडूचीं नावें होत.

## २ प्रांतीय वैदेशिक नांवें

सं.–खटी.
हिं.–खरियामाटी, खडीया, गौरखडी.
बं.–खडिमाटी, चाखाडी.
म.–खडु.
गु.–खडी.
क.–वेणेवहु.
इं.—पाईपक्ले. (Pipeclay)
लै. – कार्बोनेट ऑफ कलशम
फा. – गिलेसुफेद, गिलेखरिया,
अ. – हिने अवीयद,

Indira Gandhi National Centre for the Arts

३ खटिकेचे प्रकार

खडी गौरखटी द्वेच गुणैस्तुल्ये प्रकीर्तिते । भा. प्र. १८५

खडूमध्यें पांढरा व साधा असे दोन भेद आहेत.

४ खटिकेचे स्वरूप

मृदुपाषाणसदृशा खटी शुभ्राऽधिका गुरुः ॥ आ. प्र. ९९

खडू हा मऊ दगडाप्रमाणे, अधिक पांढरा आणि जड असतो.

५ खटिकेची शुद्धि

खटीचूर्णं शुद्धपात्रे निधाय विमलैर्जलैः ।
प्रक्षालयेद्विधानज्ञो विशूध्यति न संशयः ॥ र. त. १३३

खटीचूर्ण हें स्वच्छ भांडयांत ठेवून तें स्वच्छ पाण्यानें धुवून घ्यावे, म्हणजे खटीचूर्णाची शुद्धि होते.

खटी दाहास्त्रनुच्छीता मधुरा विषशोथचित् ।
कफघ्नी नेत्रयोः पथ्या लेखने बालकोचिता ॥
पाषाणखटिका तद्वद्व्रण पित्तास्त्रजिद्धिमा ॥
लेपादेते गुणाः प्रोक्ता भक्षिता मृत्तिकासमा ।
खटी गौरवटी द्वे च गुणैस्तुल्ये प्रकीर्तिते ॥ आ. प्र. ९९; २७८

खडू हा दाहनाशक रक्त बंद करणारा, थंड, मधुर, विष आणि शोथणनाशक, नेत्राला हितकर, कफनाशक असून बालकाच्या लेखनकर्माला योग्य आहे. पाषाणखटी याचेहि हेच गुण असून तो रक्तपित्तनाशक आणि थंड आहे. हेच गुण खडुचा लेप केला असतां होतात. आणि खडू खाल्ला असतां मातीप्रमाणे लागतो. खटी आणि गौरखटी या दोहोंचेहि गुण सारखेंच असतात.

६ खटिकेचा अनुपान परत्वें रोगावर उपयोग

माषोन्मितं खटीचूर्णं भक्षितं शीतवारिणा ।
प्रवाहिकां च पित्तास्रं ग्रहणींच विनाशयेत् ।: र. त. १३३

एक मासा खटिकेचे चूर्ण थंड पाण्याबरोबर घेतलें, असतां तें प्रवाहिका, रक्तपित्त व ग्रहणी या रोगांचा नाश करिते.

७ खटिकेचा अतिसारनाशक योग

खटी शुद्धा मधुरिकातोयेन सितयान्विता ।
शीलिता विनिहन्त्याशु त्वतीसारं सुदारुणम् ॥ र. त. १३३

शुद्ध खटी ( खडू ) बाळंतशेपेच्या काढ्याबरोबर खडीसाखर घालून घेतली असतां दारुण अशा अतिसाराचा नाश होतो.

## चूर्ण–चुना

### १ चूर्णाची नांवें

चूर्णं चूर्णश्चूर्णकं तु सुधा सौधविलेपनम् ।
तदेव च समाख्यातं शिलाक्षारं भिषग्वरैः ॥ र. त. १३३

चूर्णं, चूर्णः, चूर्णकं, सुधा, सौधविलेपन, शिलाक्षार हीं चुन्याचीं नांवें आहेत.

### २ चूर्णोदक निर्माण प्रकार

रक्तिद्वयोन्मितं चूर्णं पंचतोलक संमिते ।
जले विनिक्षिपेत्प्राज्ञस्त्रियामं स्थापयेद्बुधः ॥
ततः सारकपत्रेण सारयेत्काचपात्रके ।
चूर्णोदकमिति ख्यातं तथैव च सुधोदकम् ॥
चूर्णोदकं दृढहरित्काचकुप्यां निधापयेत् ।
तथाति संयतेनेह पिधानेन निरोधयेत् ॥ र. त. १३३

कळीचा चुना दोन गुंजा घेऊन, त्यांत पांच तोळे पाणी घालावे, आणि तें तीन प्रहरपर्यंत त्या कळचा मुरू द्याव्या. नंतर तें मिश्रण सारक प त्रें (ब्लाटिंगपेपर) एका कांचपात्रांत गाळून घ्यावें. त्याला चूर्णोदक किंवा सुधोदक असे म्हणतात. तें चूर्णोदक गाढ हिरव्या रंगाच्या बाटलींत भरून ठेवावे. त्या बाटलीचें तोंड मजबूत बुचानें बंद करावें.

### ३ चुन्याचें गुण

चूर्णं समीरण श्लेष्म मेदोहर मुदाहृतम् । शा. नि. ११६४

चुना वात, कफ आणि मेदनाशक आहे.

### ४ चूर्णोदकाचें गुण

चूर्णोदकं क्रिमिहरमतीसारहरं परम् ।
अम्लपित्तप्रशमनं विशेषाद्दुग्धपाचनम् ॥
शूलं ग्रहणिकां हन्ति खटीवद्गुणकारकम् ।
द्रावकाशनसंभूतां निहंति च विषक्रियाम् ॥ र. त. १३३–१३४

चूर्णोदक हें कृमिनाशक, अतिसार नाशक व आम्लपित्तनाशक असून तें दुधाचें पचन करणारें आहे. ते शूळ व ग्रहणी यांचा नाशक असून खडूप्रमाणेंच त्याचें गुण जाणावें,गंधक द्राव वगैरे घेतल्यानें जर विकृति झाली तर ती चूर्णोदकाने नाहीशी होते.

### ५ चूर्णोदकाची मात्रा

आरभ्य त्रिंशद् बिंदुभ्यः षष्टिबिंदुमितं परम् ।
चूर्णोदकं प्रयुञ्जीत वार्षिकैकस्तनन्वये ॥

चूर्णोदकस्य सुखदा तोलकद्वयसंमिता ।
पूर्णमात्रा समाख्याता रसतंत्र विशारदैः ॥ र. त. १३४

चूर्णोदकाची मात्रा तीस थेंबापासून सुरू करून साठ थेंबापर्यंत एक वर्षाच्या मुलाकरितां जाणावी. चूर्णोदकाची पूर्ण मात्रा सहज पचेल अशी दोन तोळे जाणावी.

६ अग्निदग्धावर योग

चूर्णोदकं कर्षमितं काचपात्रे निधापयेत् ।
तन्मितञ्चातसीतैलं दत्वा काचशलाकया ॥
क्षणं प्रचल्य मतिमान् काचकुप्यां तु विन्यसेत् ।
अग्निदग्धोत्थदाहघ्नं परमेतद्विलेपनात् ॥ र. त. १३४

एक तोळा चूर्णोदक घेऊन कांचपात्रांत टाकावे. त्यांत तितकेच जवसाचे तेल टाकावे व कांचेच्या शळाकानें तें थोडावेळ घोटावें. नंतर तें मिश्रण कांचेच्या बाटलींत भरून ठेवावे. अग्निदग्ध व्रणावर किंवा त्यामुळे आलेल्या सूजेवर, दाहावर त्याचा लेप केल्यास फारच गुणकारी आहे.

## शेंदुर

१ भाषावार नांवें

(इं.) Lead oxide लेड ऑक्साईड = नागगर्भ = Red lead रेड लेड = नाग सेंदुर Minimum = मिनिमम = लेड ऑक्साईड = नागसिंदुर. (हिं.) सिंदुर. (पंजाब) संधूर, इंगूर. (ता.) सेमप. (ते.) येई सिंदुरम, तेममेर, (ब्रम्ह) हसंग, (आरब) इस्रेंजू (दक्षि.) सेंदुर, (सं.) सिंदुर, (ब.) सिंदुर, (म.) शेंदूर, (लॅ.) ब्लं बं ऑक्सिडम् .

२ नागसिंदुर व रससिंदूर यांत फरक

नुसत्या सिंदुर शब्दाने नक्की बोध होत नाही म्हणून शिश्याच्या, प्राणवायु मिश्र लाल रंगाच्या उपरसास नागसिंदुर व पाऱ्याच्या लाल उपरसास रससिंदुर अशी नांवें द्यावीत व ती रास्त आहेत. रसरत्न समुच्चयांत गिरीसिंदुर वर्णिला आहे.

३ शेंदुर हा शिश्याचा उपधातु

शीसोपधातुः सिन्दूरं गुणैस्तत्सीसवन्मतम् ॥ आ. प्र. १५६
संयोगजप्रभावेण तस्थाप्यन्ये गुणाः स्मृताः ॥ र. चं. ६९

शेंदुर ही शिशाची उपधातू आहे. म्हणून शेंदुर हा गुणानें शिशासारखाच आहे. तथापि संयोगी द्रव्यविशेषानें दुसरेहि गुण त्याच्यामध्यें आहेत.

४ शेंदुराची नांवें

सिन्दुरं रक्तरेणुञ्च नागगर्भञ्च सीसजम् । भा. प्र. १८० आ. प्र. १५६

सिन्दुर, रक्तरेणु, नागगर्भ, सीसज, सीसोपधातु व सिन्दुर हीं याचीं संस्कृत नांवें आहेत.

५ शेंदुराचें शोधन

दुग्धाम्लयोगतस्तस्य विशुद्धिर्गदिता बुधैः ॥ आ. प्र. १५६ र. चं. ६९

शेंदुर दुधांत सात दिवस खलून पुन्हां लिंबाच्या रसांत सात दिवस खलावा म्हणजे शुद्ध होतो.

६ शेंदुराचें गुण

सिंदुरमुक्तं वीसर्पकुष्ठं कण्डूविषापहम् । शा. नि.
भग्नसंघानजननं व्रणशोधनरोपणम् ॥

भा. प्र. १८० आ. प्र. १५६ र. चं. ६९ यो. र. २६३

शेंदुर हा उष्ण विसर्प (इसब) कुष्ठ, कंडू व विष ह्यांचा नाश करितो. मोडलेल्या हाडाला सांधतो आणि व्रणाचें शोधन व रोपण (भरून आणणें) करितो.

७ सिंदुराच्या मारणाचा निषेध

सिन्दुरमारणं तद्वत्सत्वपातस्तथैव च ।
भक्षणस्य प्रयोगोऽपि न दृष्टः कुत्रचित्मया ॥
तस्मादुक्तस्थले योज्यः उपदेशो गुरोर्यथा र. चं. ६९

शेंदुराचें मारण व सत्त्वपातन,: त्याचप्रमाणें त्याचा खाण्यामध्यें उपयोग हे तीन प्रकार माझ्या कोठें पाहण्यांत नाहींत, म्हणून गुरूच्या आज्ञेप्रमाणें तो योग्य स्थलींच योजावा.

८ शेंदुराचा कंडुनाशक योग

आभ्यन्तरः प्रयोगोऽस्य सिन्दूरस्य न दृश्यते ।
अतो बाह्यप्रयोगार्थं यत्किंचिदुपदिश्यते ॥
सिन्दूरं धृतसंयुक्तं लेपाल्लोचनवर्त्मनि ।
नाशयत्यचिरादेव कण्डूमञ्जननामिकाम् ॥ र. त. २६६

सेंदुराचा पोटांत घेण्याचा प्रयोग आढळून येत नाही. बाह्य प्रयोगांकरितां त्याचें थोडे प्रयोग दिसून येतात. सेंदुर तुपांत मिसळून त्याचा डोळयाचे वरील भागावर लेप केला असतां डोळयावरील खाज नाहींशी होते.

९ शेंदुराचा शोधन रोपण मलम

विमलं सिक्यतैलं तु कर्षत्रितयसंमितम् ।
तोलकार्द्धमितं टङ्कं सिन्दूरञ्चापि तन्मितम् ॥
सम्मेल्य मसृणे खल्वे काचकुप्यां निधापयेत् ।
सिन्दुराद्यो मलहरो नाम्नायं परिकीर्तितः ॥ र. त. २६७

चांगले सिक्थ तेल तीन तोळे घेऊन त्यांत अर्धा तोळा टाकणखार आणि सेंदुरहि तितक्याच प्रमाणांत घालून एका गुळगुळीत खलांत ते मिश्रण घालून घोटावें. नंतर तो मलम एका कांचाच्या बाटलींत भरुन ठेवावा. हा सिंदुराद्य मलहर या नांवानें प्रसिद्ध आहे.

१० शेंदूराचा पादस्फुटितावर मलम

मध्वाज्य गुग्गुलुगुडयुतसिन्दूरलेपितौ ।
कामं तु स्फुटितौ पादौ भवतस्तूत्पलप्रभौ ॥ र. त. २६६-६७

मध, तूप, गुग्गुळ गुळ व सेंदुर हे सर्व एकत्र घोटून पाय फुटलें असतां, म्हणजे भेगा पडल्या असल्यास, त्या दुरुस्त होऊन त्याचे पाय कमळाप्रमाणें होतात.

११ शेंदूराचा तैलविधि

तैलं सर्षपसंभूतं शुभं दशपलोन्मितम् ।
निशार्कपत्रकल्कन्तु दद्याद्विशतितोलकम् ॥
चलोन्मितं च सिन्दुरं तुत्थं रक्तिचतुष्टायम् ।
तैलपाकविधानेन पाचयेत्तैल पाकवित ॥
सिन्दूराद्यमिदं तैलं भिषग्भिः परिकीर्तितम् ।
पामाविर्चचिकास्फोट क्षतकण्डूतिकापहम् ॥ र त. २६७

मोहरीचें तेल दहा पळे घ्यावें. हळद व रुईचीं पानें यांचा कल्क विस तोळे, एक पळ सिंदुर व मोरचूद चार गुंजा, ही सर्व द्रव्यें तेलांत मिसळून तेल तयार करण्याच्या पद्धतीप्रमाणे द्रव्यासहीत त्या तेलाचें पचन करावें तें तेल तयार झाल्यावर त्याला सिंदुराद्य तेल म्हणतात. त्यामुळे खाज, खरूज, विचचिका. स्फोट व क्षताला सुटत असलेली खाज हे सर्व रोग नाहीसें होतात.

## बोळ

१ भाषावार नांवें

(सं ) बोल, (हिं.) बोल, हिराबोल, बिजाबोल, (वं.) गन्धरस, बोल, हीरा-बोब, कुनखारापि. (म.) बोळ, (गु ) हीराबोल, (क.) बोल, (तै.) वालिम, त्रोपोलम् (ता.) वेल्लई, पपोलम्, (वम्.) रक्त्याबोल, (इं.) मीर्हा. Myrrha

२ बोळाची नांवें

बोलगंधरस प्राण पिण्डगोपरसः समाः ॥ भा. प्र. १६८

बोळ, गंधरस, प्राणपिंड व गोपरस हीं बोळाचीं संस्कृत नांवें आहेत.

३ बोळाचें प्रकार

बोलंतु त्रिविधं प्रोक्तं रक्तं श्यामं मनुष्यजम् । र. चं. ७२ आ. प्र. १०३

बोळाचे तीन प्रकार आहेत. रक्त बोळ, काळा बोळ व मनुष्यजन्य बोळ.

४ बोळाचें गुण

रक्तबोलः कटुस्तिक्त स्तुवरोष्णश्च पाचनः ।
मेध्योग्नि दीपको गर्भाशयस्यच विशोधनः ॥
सुगन्धि रक्तदोषघ्नः कफपित्त त्रिदोषनुत् ।
प्रदराश्मरि मेहघ्नो योनिशूल ज्वर प्रणुत् ॥
कुष्टापस्मार रक्तातिसारस्वेद निवारणः ।
ग्रहबाधां पोरुषत्वे नाशयेदिति कीर्तितम् ॥ शा. नि. ७७५

रक्तबोळ तिखट, कडु, उष्ण, पाचक, मेधाकारक, अग्निप्रदीपक, गर्भाशय शोधक, सुगंधी त्याचप्रमाणें रक्तदोष. कफ, पित्त, त्रिदोष, प्रदर, पांथरी, प्रमेह, योनिशूल, ज्वर, कुष्ठ, अपस्मार, रक्तातिसार, घाम, ग्रहबाधा, पौरुष यांचा नाशक आहे.

५ काळया बोळाचें गुण

श्यामबोलं तीक्ष्णगंधं दद्रुकण्डूविषापहम् ।
ब्रध्नापस्मार कुष्ठार्शोरक्तग्रंथि च नाशयेत् ॥ आ. प्र. १०४–२२८

काळा बोळ हा तीक्ष्णगंधी असून तो कुष्ट, खरूज, विष, बद, अपस्मार, कोड मुळव्याध आणि रक्तग्रंथी नाशक आहे.

Indira Gandhi National
Centre for the Arts

६ मानुष बोळाचे गुण

अपरं मानुषं बोलं सद्यो व्रणविषापहम् ।
भग्नस्यास्न्थस्तु सन्धानं त्रिदोशशमनं हिमम् ॥
धातुकांतिवयः स्थैर्यबलौजो वृद्धिकारकम् ।
प्रमेहपिटिकाकुष्ठसर्वव्रणविषापहम् ॥ आ. प्र. १०४

मानुषबोळ हा सद्योव्रणनाशक, विषनाशक; तुटलेले हाड जोडणारा, त्रिदोषशामक, धातू, शरीरसौंदर्य वयस्थैर्यंक आणि ओज यांची वृद्धि करणारा आणि प्रमेह-पिटिका, कुष्ट सर्व प्रकारचे व्रण व विषनाशक आहे.

## कर्पूर

१ कर्पूर नामानि

औषधीशश्च कर्पूरं सोमसंज्ञं सिताभ्रकम् ।
शिला हिमांशुः शीतांशुश्चंद्रभस्मनिशापतिः ॥ शा. नि.

औषधिश, कर्पूर, सोम, सिताभ्रक, शिला, हिमांशु, शीतांशु, चंद्रभस्म निशापती ही कर्पूराची नांवें आहेत.

२ भाषावार नांवें

(हिं.) कपूर, (बं.) कर्पूर, (म.) कापूर, (गु.) कपुर, कपूर, (क.) कपूंर, (तै.) कर्पूरासु, (इं) केम्फर (Camphar), (लै.) केम्फोरा (Comphora), (फा.) कापूर, (आ.) काफूर.

३ कर्पूर भेद

पोतास, भिमसेन सितकर, शंकरावासंज्ञ, पांशु पिंज, अब्दसार, हिमवालुक, जूतिका, तुषार, हिम, शीतल, पत्रिकाख्य असे कापुराचें १३ भेद आहेत.

४ कापुराचें शोधन

गोदुग्धे त्रिफलाक्वाथे भृङ्गद्रावे समांशके ।
मर्दयद्याममात्रं तु कर्पूरं शुद्धिमाप्नुयात् ॥ यो. र. २६४

गाईच्या दुधांत, त्रिफळयाच्या काढयांत व माक्याच्या रसांत कापूर एक प्रहर भर खलावा, म्हणजे शुद्ध होतो.

५ कापुराचें गुण

कर्पुरो मधुरस्तिक्तः शीतलः सुरभिर्लघुः ।
नेत्र्योलेखनकृद्वृष्यः कटुः प्रीतीकरोमुदुः ॥
मदकारीच संप्रोक्तः कफदाहतृषापहः ।
रक्तपित्तं कंठरोगं नेत्ररोगं विषं तथा ॥
पित्तं च मुख वैरस्यं दोर्गन्ध्यमुदरं तथा ॥
मूत्रकृच्छं प्रमेहं च मलगंधंच नाशयेत् ।
स एव नूतनः स्निग्घ स्तिक्तश्चोष्णश्चदाहकृत् ॥
सोपि जीर्णो दाह शोष नाशनः परिकीर्तितः ।
सोपि धौतो गुणैः श्रेष्ठः प्रोक्तो वैद्यैः पुरातनैः ।

कापूर मधुर, कडु, थंड, सुगंधी, हलका, नेत्राला हितकर, लेखन, शुक्रोत्पादक, तिखट, प्रीतीकारक, मृदु आणि मदकारक असून कफ, दाह, तहान, रक्तपित्त, कंठरोग. नेत्ररोग, विष, पित्त, मुखविरसता, दुर्गंध, उदररोग, मुत्रकृच्छ्र, प्रमेह आणि मलाचा दुर्गंध नाहीसा करणारा आहे.

नवीन कापूर–स्निग्ध, कडु, उष्ण आणि दाहजनक आहे.

जुना कापूर–दाह आणि शोष नाशक आहे. धुतलेला कापूर गुणाने श्रेष्ठ आहे.

६ कापुर प्रमाणापेक्षा जास्त पोटांत गेल्यास होणारे विकार व त्यावर उपाय–

अयंच्च प्रमाणाधिक तयाजठरे गतः सत् इमानि लक्षणानि संपादयति । क्लमः दृष्टिचांचल्यम् कर्णक्ष्वेडः, अरतिः आक्षेपकः भूयीभूयः मूत्र प्रस्त्रवणं दाहश्च । नाडी–चपला सूक्ष्माच । विशेषतो मस्तिष्क कार्यमांद्यं विदधति ।

चिकित्सा–लघुवमनं रेचनंच समुत्तेजनकराणां औषधानां उपयोग स्वेदश्च: ।
विषतंत्र ७८

कापूर हा प्रमाणापेक्षा जास्त पोटांत गेल्यास खालील लक्षणें होतात. ग्लानी, दृष्टीचांचल्य, कानांत आवाज होणें, बेचैन आक्षेपक (आचके), लघ्वीला पुष्कळ वेळां होणें आणि दाह वाटणें, नाडी चपल (द्रुतगती) व सुताप्रमाणें बारीक अशी हाताला लागणें. विशेषेकरून मेंदुचे कार्यांत मंदपणा येणें.

चिकित्सा–कापराचें प्रमाण थोडें जास्त पोटांत गेल्यावर वरील लक्षणें होऊं लागल्यास हलकें वमन व हलकेच रेचक औषध द्यावें. घाम काढावा. उत्तेजन येणारीं औषधें द्यावीं.

## सिकता

### १ भाषावार नांवें

(सं.) वालुका, (हिं) बालु, रेत (तो, ता) (बं.) बाली, (म.) वाळू, रेती (गु.) रेती बेलु, (क.) हालुलु, (तै.) विशिका, (इं.) सॅन्ड, (Sand), (लै.) Silica (फा.) रेग, (अ.) रमल.

### २ नांवें

सिकता वालुका सिक्ता शीतला सूक्ष्म शर्करा ।
प्रवाहोत्था महाश्लक्ष्णा सूक्ष्मा पानीय चूर्णका ।। शा. नि. ७४२

सिकता, वालुका, सिक्ता, शीतला, सूक्ष्म शर्करा, प्रवाहोत्था, महाश्लक्ष्णा, सूक्ष्मा, पानीय चूर्णका.

दुसरीं नांवें– वालिका प्रवाही, महासूक्ष्मा, पानीय वर्णिका, रेतजा.

वालुका सिकता प्रोक्ता शर्करा रेतिकाऽपिच । (रेतजाऽपिच ।
र. का. धे. ३०२ भा. प्र. १८५ आ. प्र. १०३

वालुका, सिकता, शर्करा, रेतिका रेतजा हीं नांवें आहेत.

### ३ वाळूचें गुण

वालुका मधुराशीला संतापश्रमनाशिनी ।
स्वेदप्रयोगतश्चैव शाखाशैत्यानिलापहा ॥
तद्वच्च लेखनी प्रोक्ता व्रणोरः क्षत नाशिनी ।
शर्कराभ्यस्तु गृण्हन्ति चुंबकेन ह्ययोरजः ॥
सुकरं त्विदमाख्यातं तच्च संशोध्य मारयेत्
मूत्रामया नलभुरः क्षत आप्र २८९

वाळू ही रसांत गोड, थंड असून संताप व श्रम यांना नाहीशी करिते. स्वेदन कर्मानें शाखांत (हातपायांत) आलेली शीतलता व वायु यांचा नाश करते. त्याचप्रमाणें लेखन करणारी, व्रण व उरक्षत ह्यांना नष्ट करणारी आहे. लोहचुंबकद्वारा वाळूतून लोहाच्या सूक्ष्म कणांचा संग्रह करून तें शुद्ध करावें व त्याचे भस्म करावें.

**वर्ण्या विलेखनकरा सिकता सुरक्षिता ।**
**मूत्रश्रमयानलमुर:क्षतमाशु हन्ति ।** र. का. धे. ३०३

रेती ही कांतिदायक, लेखन करणारी आणि थंड अशी आहे. तसेच ती लघ्वीचे रोग नाहीसे करणारी, अग्निदीपक, बलकर असून ती उरक्षताचा नाश करणारी आहे.

**सिकता मधुरा शीता लेखनी तापनाशिनी ।**
**अग्नि दग्ध व्रणं चैव व्रणोर:क्षत नाशिनी ॥**
**श्रमकुष्ट हरी चास्या: स्वेदनं वातनाशनम् ॥**

वाळू, मधुर, शीत, लेखन. तापदायक असून अग्निदग्ध व्रण, उर:क्षत, श्रम आणि कुष्ठनाशक आहे. वाळूने शेकलें असतां वातांचा नाश होतो.

## गोपीचंदन (सौराष्ट्री)

### १ भाषावार नांवें

सं. सौराष्ट्री, हिं. गोपीचंदन, सोरठकी मट्टी, बं. सौराष्ट्र देशीय सुगंधी मृत्तिका विशेष. म, गोपीचंदन, गु, गोपीचंदन, लॅ. सिलिकेट ऑफ अॅल्युमिना.

### २ गोपीचंदनाची नावें

**सौराष्ट्री तुवरी कांक्षी मृत्तालकसुराष्ट्रजे ।**
**आढकी चापिसा ख्याता मृत्स्नाच सुरमृत्तिका ॥** भा. प्र. १८५

सौराष्ट्री, तुवरी कांक्षी, मृत्तालका, सुराष्ट्रजा, आटकी, मृत्स्ना व सुरमृत्तिका हीं याचीं संस्कृत नांवें आहेत.

### ३ गोपीचंदनाचें गुण

**गोपिका चंदनं शीतं दाहव्रण विषापहम् ।**
**विसर्प शमकं लेपात्पतद्‌गर्भ स्थिरी करम् ॥** शा. नि.

गोपीचंदन, शीतल, दाह नाशक, व्रण विनाशक, विषहारक, विसर्प निवारक आहे. याचा लेप दिला असतांना गर्भपात होत असल्यास स्थिर होतो.

**गोपीचंदनकं दाह क्षतरक्त विकारनुत् ।**
**पित्तं कफं च प्रदरं नाशये दितिकीर्तितम् ॥** शा. नि.

गोपीचंदन दाह, क्षत, रक्तविकार, पित्त, कफ आणि प्रदररोगनाशक आहे.

## दुग्धपाषाण [ शिरगोळा ]

१ दुग्धपाषाणाची भाषावार नांवें

सं. दुग्धपाषाण, हिं. शिरगोला, बं. शिरगोला, म. शिरगोळा. गु. दुधियो पाणो. क. रंगवालीय हरेल्ल. शा. नि.

२ दुग्धपाषाणाची नांवें

दुग्धपाषाणिका क्षीरी माधवी मेदसन्निभा। शा. नि. ७७४

दुग्धपाषाणिका, क्षिरी, माधवी. मेद सन्नीभा, ( दुग्धपाषाण, दुग्धपाषाणक, दुग्धाश्मा, गोमेदसन्नीभ, वज्राभ दीप्तिक, दुग्धी, क्षीरक्षव, सौंध.)

३ दुग्धपाषाणाचें गुण

दुग्धोपलस्तु मधुरस्त्वीदुष्णो ज्वरापहः।
पित्तप्रशमनः कामं त्वग्दाहाध्माननाशनः।
हृदामयहरो रुच्यः पित्तशूलविनाशनः।
कासश्वासहरश्चैव समाख्यातो भिषग्वरैः॥ र. त. १३५

दुग्धपाषाण हें मधुर, किंचित उष्ण, ज्वरनाशक, पित्तशामक, त्वचेच्या, ठिकाणीं होणारा दाहा व आध्मान यांचा नाशक, हृदयरोगनाशक, रूचिदायक, पित्तशूळ नाशक व श्वासकास यांचा नाशक आहे.

दुग्ध पाषाणको रुच्यईषदुष्णो ज्वरापहः।
पित्त हृद्रोग शूलघ्नः कासाध्मान विनाशनः॥ शा. नि. ७७४

दुग्धपाषाण रुचिकारक, किंचित उष्ण, ज्वरनाशक त्याचप्रमाणें पित्त, हृदरोग, शूळ, खोकला नाशक असून आध्मान नाहीसे करणारा आहे.

## काळीमाती

१ भाषावार नांवें

सं–पंक, कर्दममृत, हिं–कींच, गारा, मिट्टी, कालीमिट्टी, बं–कादा, माटी, कालमाटी, म– चिखल, माती, गारा, गु–गारो कालीमाटी, तै—नोवुलु, इं. मड् ब्लेक्लॅक (Mud blacle clay) लै.–हैड्रस सिलिकेट ऑफ ॲल्युमिनियम (Hydrusis Sificate Aluminum)

२ कृष्णमृत्तिका नामानि

मृन्मृदा मृत्तिका मृत्स्ना क्षेत्रजा कृष्ण मृत्तिका।

मृत्, मृदा, मृत्तिका, मृत्स्ना, क्षेत्रजा, कृष्णमृत्तिका हीं काळ्या मातीचीं नांवें आहेत.

१ काळ्या मातीचें गुण

कृष्णमृत्स्ना रक्तदोष प्रदरक्षत दाहहा ।
मूत्रकृच्छं, कफं पित्तं नाशये दितिकीर्तिता ॥ शा. नि

काळी माती रक्तविकार, प्रदर, क्षत, दाह मुत्रकृच्छ्र, कफ आणि पित्तनाशक आहे.

कृष्णमृत्क्षत दाहास्त्र प्रदर श्लेष्म पित्त नुत् ।
प्रलेपाद्विनिहंत्येषा शोथं भल्लात संभवम् ।- शा. नि.

काळीमाती, क्षत, दाह, रक्तविकार, प्रदर, कफ, पित्तनाशक आहे. या मातीचा लेप केला असता बिब्यापासून आलेली सूज नाहीशी होते.

मृत्क्षतप्रदरदाहरक्तजित् ।
पाण्डुकुष्ठजविसर्पकण्डुजित् । र. का. धे. ३०३

काळी माती ही क्षत, प्रदर, दाहा व रक्तविकार यांचा नाश करणारी आहे. तसेंच ती पांडुरोग, कुष्ट, विसर्प, खरूज या सर्वांचा नाश करणारी आहे.

## पंक-कर्दम

१ पंकाची नांवें

पंकस्तु जलकल्कश्च चुलुकः कर्दमो मलः ।
चिकिलः पलितो द्रापः पललश्च निषद्वरः ॥ शा नि

पंक, जलकल्क, चुलुक, कर्दम, मल, चिकिल, पलित, द्राप, पलल, निषद्वर, (जम्बाल, साद, दम) ही पंकाची नांवें आहेत.

२ पंकाचे गुण

कर्दमः शीतलो रुक्षो विषघ्नों वेदना पहः ।
शोफ दाह प्रशमनो व्रणशोधन रोपणः । शा. नि.

कर्दम शीतल, रुक्ष, विषनाशक, वेदना नाशक, सूज नाहीशी करणारा, दाहशामक असून व्रणशोधक आणि रोपक आहे.

कर्दमः शीतलः स्निग्धो विष पित्तास्त्र भग्नजित् ।
शोफ दाह क्षत हरो हितः शोधन रोपणे ॥ शा. नि.

कर्दम थंड, स्निग्ध, विषनाशक, रक्तपित्त, भग्न, सूज, दाह आणि जखम यांचा नाश करणारा असून व्रणशोधक आणि रोपक आहे.

------

# युनानी औषधें

## अध्याय ६० वा

(१) गिले अरमणी
(२) जंगार
(३) गिले मख्तूम
(४) सुर्महसफेद
(५) सिकता प्रधानयोग
(६) कैशेयांश्मा
(७) नागपाषाण (जहरमोहरा)
(८) हुजुल यहूद व त्याची पिष्ठी रत्नें
(९) पापडखार
(१०) संगेयशद
(११) अफीक
(१२) कहरुबा

Indira Gandhi National Centre for the Arts

### १ गिले अरमानी

नांव–(फा. हिं.) गिले अरमनी; (अ.) तीने अरमनी.

वर्णन–ही एकप्रकारची माती आहे. ती इराण व आर्मिनीयामधून येते. तिचा रंग फिक्कट लाल, किंचित सुगंधीत, स्वादांत फिक्की व जिभेवर ठेवली असतां ती जिभेला चिकटते. युनानी हकिम तिचा औषधिकर्मांत उपयोग करतात.

गुणकर्म—पहिले दर्जाचे शीत, थोडे रुक्ष, संग्राही, रक्तस्तंभक, हृदयाला शक्ति देणारे, व्रणशोधक, रोपक, दस्त बंद करणारे असें आहे. फुफ्फुस आमाशय व अंत्र या स्थानांतील व्रणाला नाहीसे करणारे, शरिराचे आंतील कोणत्याहि स्थानांतून रक्त येत असेल तर तें थांबविणारे इत्यादि विकारांवर त्याचा उपयोग करण्यांत येतो मात्रा १ ते ३ मासे.

### २ जंगार

नांवें— ( सं. ) नीलकल्क, ( हिं. ) जंजार, जंजाल; ( अ. ) जंजार; ( फा. ) जंगार.

"ताम्रपात्रस्थमम्लं वै सैंधवेन समन्वितम् । क्षीरेण सहितं वाऽपि विहितं त्रिदिनावधि ।। जातं तुत्थसमंनीलं कल्कं तत् प्रोच्यते दुधैः" र. प्र. सु. अ. १

गुणकर्म–जंजार हे युनानी मतानुसार गरम व खुश्क, अग्नेय, व्रणकारक, व्रण-लेखन व अवसादक ( वाढलेले मांस छाटणारे छेदक ) आहे. दुष्ट व्रणाचें शोधन रोपणाकरितां जंगार हें मलमांत मिसळून जखमेवर लावतात. डोळयाचे विकारांतहि दुसरें औषधांत मिळवून त्याचें अंजन करण्यांत येते. याचा पोटांत घेण्याकरिता उपयोग करण्यांत येत नाही.

विशेष —जंजार हें ताम्रापासून तयार करण्यांत येते. युनानी वैद्यकांत जंजार याचे दोन प्रकार मानतात.

(१) कृत्रिम–ज्याचें वर्णन वर केलें आहे. (२) खनिज–याला 'जंगारमादनी' अथवा 'दहेन फिरंग' असें म्हणतात. हा रसशास्त्रांतील 'सस्यक' असावा असे कांही लोक मानतात.

## ३ गिले मख्तूम

नाम– गिले मख्तूम (फा.) तीने मख्तूम (अ.)

वर्णन–ही एक हलके गुलाबी रंगाची चिकणी माती होय. याच्या वडया केलेल्या युनानी औषधें विकणाऱ्या दुकानदाराकडे मिळतात. हे लोह आक्सीजन व कॅल्शिअमचा यौगिक होय.

वर्णन–जंगार हें बाजारांत किराणा दुकानदाराकडे मिळते. तांब्याच्या पात्रांत दही किंवा सिरका कांही काळ ठेवल्याने सुकल्यावर हिरव्या रंगाचा तो होतो. त्याला गार असे म्हणतात.

गुणकर्म–हें शीत, रूक्ष, हृदयाला शक्ति देणारें, रक्तस्तंभक, संग्राही, शोथनाशक व विषनाशक आहे. उरक्षत, आमाशय व आतडी यांतील व्रण नाहीसे करणारे व पित्त व रक्तज अतिसारांत हे फार गुणकारी आहे. सद्योव्रणावर लावल्याने रक्तस्राव लवकर बंद होतो. व व्रण लवकर भरून येतो. विषारी प्राणी चावल्यास याचा दंशस्थानीं लेप करतात.

विशेष–गिले अरमनी व गिले मख्तूम हे गेरूचेच भेद होय.

## ४ सुर्मह सफेद

नाम-(फा.) सुर्मह सफेद (हिं.) सफेद सुरमा. (अं.) कॅल्साईट (Calcire)

वर्णन–हे द्रव्य श्वेतवर्ण, पत्रेयुक्त स्फटिकप्रमाणें दिसणारे पांढरा सुरमा या नांवानें बाजारांत मिळते. हे चुना व कोकिलाम्लचे यौगिक (कॅल्सियम कार्बोनेट ) होय. कोरफडीचे रसांत घोटून त्याचे गजपुटांत भस्म करतात. व गोदंतीभस्माप्रमाणेंच त्याचा उपयोग करतात.

## ५ सिकताप्रधान योग

आहृत्य सिकतां श्वेतां सुसूक्ष्मां प्रसृतोन्मिताम् । ॥२॥
तुल्यां तैलघृतक्षौद्रवसामज्जाभि संयुताम् ॥
अगारधूमत्रिफला लेहेन च विमिश्रिताम् । ॥३॥
सप्तभिः प्रसृतै सार्धं खजेन मथितां लिहेत् ।
रक्तष्ठीवी क्षतोरस्कः सिद्धयोगं समाचरेत्

(गदनिग्रह–कासाधिकार)

पांढऱ्या वाळूचें अतिसूक्ष्म चूर्ण तिलतैल, मध, गोघृत, मज्जा, गृहधूम व त्रिफळयाची रसक्रिया या सर्वांना एकत्र खूप घोटून प्याले असतां थुंकीतून रक्त पडणें व उरक्षत हें विकार दुरुस्त होतात.

## ६ कौशेयाश्मा

नांव–कौशेयाश्मा, ( दक्षिण भारत ) कलनारू; ( फा. ) संगेरेशम, ( अं. ) अॅस्बेस्टोस ( Asbestos)

वर्णन–हा एक नरम दगड होय. तो रेशमाचे तंतू दाबून ( प्रेस करून ) तयार केलेला लाल पिवळी झांक असलेला पांढरें रंगाचा असतो. हा उष्णतावाहक नाही. याकरितां अग्निपासून संरक्षणाकरितां याचा उपयोग करण्यांत येतो. हा एक वाळुच्या जातीचा व मॅग्नेशियाचा यौगिक होय (सिलिकेट ऑफ मॅग्नेशियम) असेहि म्हणतात.

उपयोग–याचें भस्म दंतपूय, प्रमेह व प्रदर या रोगांवर उत्तम गुण देणारे आहे कांही भागांत याचा दंतमंजनाकरितां उपयोग करितात.

## ७ नाग पाषाण (जहर मोहरा)

नांग–(सं.) नागपाषाण, नागाश्मा (फा.) जहरमोहरा, (अ.) फादजहर मादनी (अं.) सर्पेंटाईन (Sepentine) ओफाईट (Ophile)

वर्णन–हा एक दगड आहे. तो चीन, तिबेट, खोतान, लद्दाख, गढवाल नेपाल आदि पर्वत राजींत मिळतो. तो चिकना, वजनांत हलका, पिवळट, हिरवट :झांक असलेल्या पांढऱ्या रंगाचा असलेला असा उत्तम समजण्यांत येतो. हा सिकता व मॅग्नेशियाचा यागिक आहे.

गुण-कर्म–युनानी वैद्यकानुसार हे जास्त प्रमाणांत उष्ण, रूक्ष, सौमनस्यजनन, हृदय, मस्तिष्क व यकृत यांना बल देणारे, ओजोवर्धक व विषनाशक आहे. गुलाबाचे अर्कांत याची पिष्टी करून उपयोगांत आणतात.

महामारीचे रोगांत ( कालरा ) जहरमोहरा, दर्याई खोबरें व पपीता गुलाब-अर्कांत घासून देतात. हृदयस्पंदन, हृदयदौर्बल्य व वांती होणे यांवर याचा उत्तम उपयोग होतो. मात्रा २ ते ८ गुंजा. अनुपान गुलाब अर्क.

### ८ हजुल् यहुद (हजरतबेर)

नाम–(सं.) अश्मभिद् बदराश्म; (हिं.) बेरफत्थर, पत्थरबेर, हजरतबेर; (गु.) हजरतबेर; (अ.) हज्रूलयहुद, हज्रूजैतून; (का.) संगेजहुदान, संगेयहुद.

वर्णन–हा एक बेरया बलुत (सीता सुपारी–बासाचे फल) याच्या आकाराचा दीर्घवर्तुळाकार, दोन्हीबाजूस नोकदार बाहेरून भुऱ्या रंगाचा, झुरियोवाला, आंतून हिरवी झांक असलेला पांढऱ्या रंगाचा १–१॥ इंच लंबा गोटा (पत्थर) होय. याला कोणताहि स्वाद नसतो. हें पाण्यांत लवकर घासल्या जातें. हें एक चुना व रेती याचें योगिक आहे. हें अरबस्थानांतून भारतात आणतात. युनानी हकीम याचा औषधीचें कामीं उपयोग करितात.

### ९ हज्रल् यहुदकी पिष्टी

हज्रूल यहुदला गरम पाण्यांत धुवून कपडयाने पुसून त्याची वस्त्रगाळ पिष्टी करावी. तिला गुलाबअर्कांत किंवा चंदनी अर्कांत तीन दिवस मर्दन करावें व सावलींत वाळवून कोरडें झाल्यावर शिशीमध्यें भरून ठेवावें. मात्रा ४ ते ८ गुंजा. कांही लोक याला केळीच्या खांबाच्या रसांत अगर मुळीच्या रसांत सात दिवस भावना देऊन त्याची पिष्टी करून ठेवितात.

गुणधर्म–हज्रुल यहुद हें मुत्रल, पित्तशामक, वांतिला बंद करणारे, अश्मरी-शूळांचा नाश करणारे, मूत्राश्मरीनाशक, तसेच अश्मरी व शर्करा यांना मूत्रमार्गाने काढणारे आहे. मूत्रावरोधांत याला पाण्यांत उगाळून ओटीपोटावर लेप करितात.

### १० संगे यशद

नाम–हिं. संग यशद, हौलदिली, (अ.) यशब, हजरूल्यशब, (का.) यशम, संगेयशब, (अं.) जेड Jade.

हा एक अतिशय कठीण असा दगड (पत्थर) आहे. त्याला यारकंद व लद्दाक येथून काश्मीरद्वारा भारतांत आणतात. जैतुनी रंगाचा, साफ, मजबूत (सक्त) असा उत्तम समजल्या जातो. याचे खलबत्ते तयार करतात. रत्नाची पिष्टी करण्यास हे खल उत्तम असतात.

गुणकर्म–युनानी मत–संगयशब शीत, रूक्ष, आमाशयाला शक्ति देणारा आहे. हृदयदौबल्यं, हृद्स्पंदन, आमाशयशूळ, आमाशय दौर्बल्य, प्रवाहिका, लघ्वीची जळजळ व अश्मरी या रोगांत फार गुणकारी आहे. हा शरीराच्या आंतील व्रणाला नाहीसे करितो व रक्त जाणें बंद करतो. विशेषेकरून हृदयाला शक्ति देण्याकरितां याची पिष्टी फार उपयोगी आहे. मात्रा २ ते ४ गुंजा व पिष्टी २ ते ८ गुंजा.

कुर्स संग यशब–प्रवाळ पिष्टी, पिस्त्याचा बाहेरचा शिलका, रुमीमस्तकी, अब-रेशम, कातरलेला लहान इलायचीचे दाणे व संगयशब हे सर्व प्रत्येकी ३–३ भाग व वंशलोचन चूर्ण पांच भाग या सर्वांना बारीक पिष्टी करून विही किंवा सेव यांचे रसांत ५–६ तास घोटून १॥ माशाच्या गोळ्या कराव्या. १–२ गोळ्या दिवसांतून ३–४ वेळ बडीशेपेच्या अर्कांतून द्याव्या म्हणजे पित्तप्रधान अतिसार खात्रीनें थांबतो.

## ११ अकीक

नाम–(अ. फा. हि.) अकीक, (अं.) ॲगेट Agate.

वर्णन–हा एक रंगीत, कडक व मौल्यवान दगड (उपरत्न) आहे. हा पुष्कळ रंगाचा मिळतो. त्यांतले त्यांत रक्तवर्णाचा अकीक उत्तम असतो. याची घटना–त्यांत ७० ते ९० प्रमाणांत रेती, तसेच कमी जास्त प्रमाणांत ॲल्युमिना, ऑक्साईड ऑफ् आयर्न किंवा ऑक्साईड ऑफ मॅन्गेनिज असते. संगेसुलेमानी, ओपल व लहसुनीया (वैडुर्य) हे सर्व अकीकच्या जातीचें दगड आहेत. अकीकची पिष्ठी किंवा भस्म करून ते उपयोगांत आणतात.

**अकीक गुण**

**शीतो रुक्षश्चित्त दोषेषु गीतो रक्तस्तंभी दार्ढ्यकारी द्विजानाम् ।**
**हेम्ना साकं साधितोऽतीव वृष्यः श्लक्ष्णः शस्यते कोऽप्यकीकः ॥१६॥**
**सि. भै. म. मा. लो.**

Indira Gandhi National Centre for the Arts

अकीत शीतवीर्य, रुक्ष, रक्तस्तंभक, दांताला दृढ करणारे व मानसिक रोगांत फारच उपयोगी आहे. सोन्याचे भस्म अथवा वर्ख $\frac{1}{16}$ भाग मिळून तयार केलेली अकीकची पिष्टी अति वृष्य आहे.

युनानी मत–अकीक हें थोडे शीत, रूक्ष, हृद्य, रक्तस्तंभक, अश्मरीनाशक व नेत्ररोगाला फार फायदेशीर आहे. चार गुंजा अकीक पिष्टी शेवच्या सर्बतात मिळवून घेतलें असतां हृद्स्पंदन हा विकार कमी होतो. व त्यामुळे हृदयाला शक्ति उत्पन्न होते. रक्तस्राव व दुःचिकित्स्य रजःस्रावांत एकटे अकीकभस्म किंवा रक्तस्तंभक औषधीबरोबर दिलें असतां त्यामुळे उत्तम गुण येतो. याचेच अंजन केलें असतां डोळ्याची शक्ति वाढते. अकीक पिष्टी दांतावर घासली असतां हिरड्यांतून रक्त येणें बंद होते. व हिरड्या मजबूत होतात. याचे भस्म उत्तमांग (डोळे, नाक, कान, मेंदू वगैरे) यांना फार फायदेशीर आहे. तसेच ते बलदायक व वाजीकरणयुक्त आहे. मात्रा २ ते ४ गुंजा.

## १२ कहरुबा

नाम– सं. तृणकांतमणि, तृणकांत; फा. कहरूबा. गु. केरबो; म. केरवा, कडरोबा; अं. अम्बर, ले. सक्सिनम्.

वर्णन–कहरुबा अश्मीभूत राळ होय. कहरुबा हा फारशी शब्द आहे. त्याचा अर्थ कह म्हणजे सुखें गवत, रुबा म्हणजे खेचनेवाला (तृणकांत). कहरुबाला गरम कपड्यावर घासले असतां त्यांने विद्युत्शक्ति उत्पन्न होते. याचें काठिण्य २–२॥ व विशिष्ट गुरुत्व १.१ आहे. याला गरम कपड्यावर घासलें असतां. त्याचा लिंबासारखा वास येतो. त्याचा रंग पिवळसर असतो.

गुणकर्म–युनानी मत– कहरुबा अनुष्णशीत, थोडे रुक्ष, मनाला प्रसन्न करणारा, हृदय, अंत्र व आमाशय यांना शक्ति देणारे, संग्राही व रक्तस्तंभक आहे. हृदयदौर्बल्य, हृदयाची धडधडी, रक्तष्टीवन, रक्तातिसार, रक्तार्श, रक्तप्रदर व उरक्षत या रोगांत हें एकटे किंवा दुसरें उपयुक्त औषधीबरोबर देतात. आमाशय व आंतडीला शक्ति येण्याकरितां हें रुमामस्तीशी बरोबर देतात. सद्योव्रणावर शिंपडल्याने रक्तस्राव बंद होतो व व्रण भरून येतो. मात्रा १–२ मासे गुलाब किंवा चंदनीतेल याचे अर्कांतून घोटून त्याची पिष्टी तयार करतात. याचें भस्म कोणीहि करीत नाही.

———

Indira Gandhi National
Centre for the Arts

# क्षार विज्ञानीय

## अध्याय ६१

### १ क्षार काढावयाचा प्रकार

क्षारवृक्षस्य काष्ठानि शुष्कान्यग्नौ प्रदीपयेत् ।
नीत्वा तद्भस्ममृत्पात्रे क्षिप्त्वा नीरे चतुर्गुणे ॥
विमर्द्य धारयेद्रात्रौ प्रातःस्वच्छ जलं नयेत् ।
तन्नीरं क्वाथयेद्वन्हौ यावत्सर्वं विशुष्यति ।
ततः पात्रात्समुध्दृत्य क्ष रो ग्राह्यः सितप्रभः ।
चूर्णायः प्रतिसार्यः स्यात्तेजः स्यात्क्वाथवस्थितः ॥
इति क्षारद्वयं धीमान् युक्ताकार्येषु योजयेत् ॥ र. चं.

ज्या वृक्षाच्या अगर वनस्पतीच्या लाकडाचा क्षार काढावयाचा असेल तीं लाकडें वाळवून पेटवावी. नंतर त्यांची राख एका मातीच्या भांड्यांत घालून त्यांत त्या राखेच्या चौपट पाणी घालावें आणि त्यांत ती राख कुसकरून तें पाणी रात्रभर तसेंच ठेवावें. मग सकाळीं त्या भांड्यांतील वर आलेलें स्वच्छ पाणी हळुंच दुसऱ्या भांड्यांत काढून घ्यावें आणि अग्नीवर ठेवून कढवावें. सर्व पाणी आटल्यावर भांड्याच्या तळाशीं असलेला पांढरा क्षार काढून घ्यावा. त्यापैकी जो चुन्याप्रमाणे कोरडा क्षार होतो तो प्रतिसारणाच्या (वर चोळण्याच्या किंवा घासण्याच्या) कामीं उपयोगी असतो. आणि जो काढ्याप्रमाणें पातळ असा काढून घेतात तो मृदु असून गुणावह असतो. हे दोन्ही क्षार योग्य वाटतील त्याप्रमाणें कार्यांत योजावें.

### २ क्षाराचें अभावी काय घ्यावें ?

क्षाराभावे तु गृण्हीयाद्रक्षा तत्काष्ठसंभवा ।

क्षार नसेल तर त्याचे अभावी त्या झाडाच्या लाकडाची राख घ्यावी. तीहि साधारणपणें क्षारासारखे गुण करिते. क्षारापेक्षा हिचे गुण कमी असतात.

### क्षार वृक्ष

कदली पलाश तिलनी चुल कनक सुरदालि वास्तुकैरंडाः ।
वर्षाभूवृक्ष मोक्षक सहिताः क्षारो यथा लाभम् ॥ र. ह. त. पा. ८१

केळीचें झाड, पळस, तीळ, वेतसवृक्ष, धोत्रा, देवदाली, एरंड, पुनर्नवा, आडुळसा, मोरवा यापैकीं मिळेल त्या सर्वांचा क्षार जारणेच्या कामीं आहे. वरील वृक्ष हे क्षारवृक्ष होत.

४ मृदुक्षारांत कोणती घटक द्रव्यें असतात?

यांत प्राय: कांही दुसऱ्या पदार्थांबरोबर सोडियम आणि कार्बोनेट लवण असते. यांत कांही आम्ल पदार्थ टाकलें असतां कॉर्बनडाय ऑक्साईडचे बुडबुडे यांतून फार जोराने निघतात.

५ तीक्ष्ण क्षार कसा तयार करतात ?

लांकडें जाळून तयार झालेली राख व पाणी यांचें मिश्रण तयार करून पाणी पूर्ण न आटवितां अर्धे पाणी आटवून त्या द्रवामध्यें चुना आणि शंखनाभी इ. पदार्थांचें भस्म मूळ राखेच्या $\frac{1}{4}$ प्रमाणांत टाकून नंतर तो द्राव आटवून सुकवावा म्हणजे तीक्ष्ण क्षार तयार होतो.

६ तीक्ष्ण क्षारांत कोणती घटक द्रव्यें असतात

तीक्ष्ण क्षारांत बहुतेक थोड्या प्रमाणांत सोडियम आणि पोटॅशियम तत्वाचें हैड्रो ऑक्साईडस् असतात. तें फारच दाहजनक असतात. आणि म्हणूनच त्यांना तीक्ष्ण क्षार असे म्हणतात.

हिंदी रसरत्न समुच्चय ( डॉ. कुळकर्णी )

७ क्षाराचे गुण

**क्षारास्तीक्ष्णा महोष्णाश्च दाहकर्मकरा: परम् ।**
**गुल्मार्शो ग्रहणीप्लीहमूत्रकृच्छ्राश्मरीहरा: ।**
**कृमिघ्ना: पाचनाश्चैव दारणाश्च विसर्पिण: ।**
**शोधना रोपणाश्चैव मूत्रलाश्च प्रकीर्तिता: ।।** र. त. १६३

क्षार हा तीक्ष्ण, फार उष्ण, दाहाकारक कर्म करणारा, गुल्म, अर्श, ग्रहणी, प्लीहा, मूत्रकृच्छ् व अश्मरी या सर्वांचा नाश करणारा आहे. शिवाय क्षार हा कृमिघ्न, पाचक, दारुण असा विसर्प यांचाहि तो क्षार नाश करितो. तसेच तो व्रणाचें शोधन करणारा, रोपण करणारा असून तो मूत्रल आहे.

**क्षारास्तु गुल्मगुदजग्रहणोगदघ्ना: ।**
**पुंस्त्वाश्मशुलकृमिशर्करहारिणश्च ।।**
**स्यु: पाचना: ससरणा: कचचक्षुरोजो ।**
**मेदो विषामकफकुष्ठहर:: प्रदिष्टा: ।।** र. का. धे. ३०९

क्षार हा गुल्म, मुळव्याध, संग्रहणी हें विकार नाहीसे करणारा, तसेंच पुरुषत्व हरण करणारा, मुतखडा, शूळ, कृमि, लघ्वींतून जाणारी साखर, या सर्वांचा नाश करणारा आहे. तसेच तो पाचक, स्नायुच्या गतीची वाढ करणारा, तसेच तो केस, डोळे यांचे ओज, मेदरोग, विष, आम, कफ आणि कुष्टरोग या सर्वांचा नाश करणारा आहे.

८ क्षाराची सर्व साधारण मात्रा

द्विगुञ्जतः समारभ्य रक्तिकाष्टकसंमितान् ।
क्षारांस्तु विनियुञ्जीत साधारणतया भिषक् ।। र. त. १६३

क्षाराचे पोटांत घेण्याचे प्रमाण–दोन गुंजेपासून आठ गुंजेपर्यंत क्षाराची मात्रा जाणावी.

९ क्षाराचें आठ गुण

नैवाति तीक्ष्णो न मृदुः शुक्लः श्लक्ष्णोऽथ पिच्छिलः ।
अभिष्यन्दी शिवः शीघ्रः क्षारोह्यष्टगुणः स्मृतः ।। र. का. मे. ३१०

क्षार हा अति तीक्ष्ण नाही. अति मृदुहि नाही. तसेच तो पांढरा, श्लक्ष्ण (चोपडा), पिच्छिल, अभिष्यंदी, रम्य व लवकर गुण देणारा आहे.

## यवक्षार

१ भाषावार नांवें

सं.–यवक्षार. हिं.–जवाखार. वं.–यवक्षार. सोरा म.–जवखार. गु.–जवखार. क.–यवक्षार. तै.–यवखारं. इं.—कार्बोनेट ऑफ पोटाश ( Carbonate of Potash ) लॅ.–पाटयाश्यं कार्बिनास, (Potassium Carbonass) अ.—नुतरून.

२ यवक्षाराची नांवें

यवक्षारो यवापत्यं यवजो यवशूकजः ।
यव्यो यवाग्रज्जश्चैव यवाह्वो यवनालजः ।।
यवशूको यावशूकः शूकजो यावशूकजः ।
याव्यस्तथैव पाक्यश्च समाख्यातो भिषग्वरैः ।। र. त. १४७

यवक्षार, यवापत्य, यवज, यवशुकज, यव्य: यवाग्रज, यवाह्व, यवनालज; यवशुक, यावशूक, शूकज, यावशुकज, याव्यः, पाक्य: हीं यवक्षाराचीं नांवें आहेत.

३ यवक्षारांतील रासायनिक द्रव्यें

यवक्षारामध्ये पोटॅशियम कार्बोनेटचें प्रमाण जास्त असते. पळस, मोखा, अपामार्ग इत्यादि वृक्षांच्या अथवा त्या वृक्षांच्या मुळाच्या राखेंत पोटॅशियम काबोनेटचें प्रमाण पुष्कळ असते. परंतु यांत थोडया जास्त प्रमाणांत दुसरेहि पदार्थ असतात. हे निरनिराळे पदार्थ क्षारामध्ये असल्याकारणाणे प्रत्येक क्षाराचें गुणधर्म कांही विशिष्ट प्रकारचें होतात.

४ यवक्षाराची ओळख

आजकाल काशी येथील बाजारांत यवक्षार या नांवाने आंबट आणि पांढऱ्या रंगाचा पदार्थ मिळतो तो यवक्षार नाही.

यवक्षाराची चव राखेप्रमाणे परंतु कांही मिठाप्रमाणे असते. सज्जीखार आणि यवक्षार यांच्या स्वादांत विशेष अंतर नसते. यवक्षारांत आम्लत्व केव्हांहि राहूं शकत नाही.

( हिंदी डॉ. कुळकर्णी )

## ५ यवक्षार निर्माण प्रकार

यवशूकभवं भस्म समादाय भिषग्वरः ।
सलिलेऽष्टगुणे क्षिप्त्वा विमले भाजने ततः ।।
सप्तवारं प्रयत्नेन स्रावयेत्पृथुवाससा ।
स्रावितं सलिलञ्चाथ चुल्यां तीव्राग्निना पचेत् ।।
निःशेषं सलिलं ज्ञात्वा पाकपात्रतलस्थितम् ।
यवक्षारं प्रयत्नेन गृण्हीयात्पाण्डुरप्रभम् ।। र. त. १४७

यवाचे शूक आणून त्याचें जाळून भस्म करावें. तें भस्म (राख) एका भांड्यांत घालून त्यांत त्या राखीच्या आठपट पाणी टाकावें. नंतर तें ढवळून घ्यावें, व जाड फडक्यांतून सात वेळ गाळून घ्यावें. नंतर तें गाळलेलें पाणी एका भांड्यांत घालून चुलीवर ठेवून खाली तीव्र अग्नि लावावा. सर्व पाणी आटून गेल्यावर भांड्याच्या तळाशी जवखार पांढऱ्या रंगाचा राहील तो काढून ठेवावा.

Indira Gandhi National
Centre for the Arts

## ६ यवक्षाराचे गुण

यवक्षारो लघुः स्निग्धो दीपनः पाचनः परम् ।
गुल्मप्लीहामयहरः कफहा वातनाशनः ।।
शूलानाहोदराध्मान मूत्रकृच्छ्रप्रणाशनः ।
कष्ठामयहरो हृद्यश्चाम्लपित्तहरः सरः ।।
औपसर्गिक मेहोत्थ फलशोथ निवारणः ।
स्वेदप्रवर्तकश्चैव भिषग्भिर्मूत्रलो मतः ।। र. त. १४८

यवक्षार हा लघु, स्निग्ध, दीपन, पाचन, गुल्म व प्लीहा यांचा नाश करणारा आहे. तसेच तो कफनाशक, वातनाशक, शूल पोटाचा फुगारा, उदर, मूत्रकृच्छ यांचा नाश करणारा, कुष्ठरोगनाशक, हृदयाला हितकर, आम्लपित्तनाशक असून तो सर आहे. औपसर्गीक कारणामुळे उत्पन्न झालेल्या मेहरोगामुळे उत्पन्न झालेली सूज नाहीशी करणारा, घाम आणणारा व मूत्रल असा आहे.

यवक्षारो लघुः स्निग्धा ससूक्ष्मो वन्हिदीपनः ।
निहंतिशूलवातामश्लेश्म श्वास गलाययान् ।।
पाण्ड्वर्शो ग्रहणी गुल्मा नाह प्लीह हृदामयान् ।। शा. नि. २२७

यवक्षार हलका, स्निग्ध, सूक्ष्म, अग्निप्रदीपक असून शूल, वात, आम, कफ, श्वास, गलरोग, पांडुरोग, मुळव्याध, संग्रहणी, गुल्म, पोट फुगणें, प्लीहा आणि हृद्रोग नाशक आहे.

यवक्षारो हिमः श्रेष्ठः शर्कराश्मरिकृच्छ्रजित् ।
निहंतिशूलवाताम पुंस्त्व गुल्मादि जन्तुजित् ॥ शा. निः

यवक्षार हलका, श्रेष्ठ, शर्करा, अश्मरी, शूल, वात, आम, पुरुषत्व, गुल्मादि रोग आणि कृमीनाशक आहे.

**वातशूल**

मरीचनागरोपेतो यवजस्तूष्णवारिणा ।
द्वित्रिर्वार प्रयोगेण वातशूलं हरेद्ध्रुवम् ॥ र. त. १४८

जवखार हा मिरे आणि नागरमोथा यांचें चूर्ण मिसळून गरम पाण्याबरोबर तीन वेळ घेतल्याने वातशूळांचा नाश होतो.

**मूत्रकृच्छ्र**

एलासितोपलोपेतः शीलित्तो यवशूकजः ।
मूत्रकृच्छ्रं निहन्त्याशु दाहशोयादिसंयुतम् ॥
गोक्षुरक्वाथसंयुक्तो यवक्षारस्तु शीलितः ।
शकृद्विघातजं शीघ्रं मूत्रकृच्छ्रं विनाशयेत् र. त. १४८

यवक्षार हा विलायची व खडीसाखर यांचे बरोबर सेवन केला असतां दाहा, शोथ यांनी युक्त अशा मूत्रकृच्छाचा नाश होतो.

यवक्षार हा गोखरूच्या काढयांतून सेवन केला असतां मळाला अवष्टंभ करणारा असा मूत्रकृच्छ नाहीसा होतो.

**अश्मरी**

तक्रेण तु यथाकामं यवक्षारस्तु शीलितः ।
अश्मरीं नाशयत्याशु मूत्रकृच्छ्रं च दारुणम् ॥ र. त. १४८

यवक्षार हा ताकाबरोबर सेवन केला असतां अश्मरी व दारुण असा मुत्रकुच्छ्र याचा नाश होतो.

**वातोत्थउदर**

अजमोदात्रिकटुककणोपेतो यवोद्भवः ।
क्षारस्तु भक्षणादाशु वातोत्थोदररोगनुत् ॥ र. त. १४८

यवक्षार हा अजमोदा, त्रिकुटव जिरे यांचें चूर्णाबरोबर सेवन केलें असतां वातोदराचा नाश होतो.

मूत्रल

यवक्षारस्तु निंबूकरसेन परिशीलितः ।
मूत्रलः स्वेदजनकः स्मृतश्च ज्वरनाशनः ॥ र. त. १४९

यवक्षार हा निंबाच्या रसांतून सेवन केला असतां तो मूत्रल घाम आणणारा व ज्वरनाशक असे कार्य करणारा आहे.

७ निम्बूकाम्लीय यवज निर्माण प्रकार

काचपात्रे यवक्षारं चतुर्विंशति भागिकम् ।
द्रावयेच्छीतसलिले रसज्ञः समभागिके ॥
निम्बूकाम्लं सुविमलं त्वथ विंशति भागिकम् ।
द्रावयेदन्यपात्रस्थं जले तु समभागिके ॥
पात्रे काचादिलिप्ते तु मेलयेदनयोर्द्रवम् ।
चुल्यां निधायाथ पचेत्तोयांशं परिशोषयेत् ॥
घनसारप्रभं चूर्णं रसविज्ञः समाहरेत् ।
विबुधैः कीर्तितोऽयं तु निम्बूकाम्लीयशूकजः ॥ र. त. १५०

यवक्षार चोवीस भाग घेऊन एका काचपात्रांत टाकावा व त्यांत तितकेंच पाणी टाकून तें द्रवीभूत करावें. दुसरें एका भांड्यांत निंबुकाम्ल वीस भाग घेऊन त्यांत तितकेंच पाणी घालावें. व दोन्ही पात्रांतील द्रव दुसऱ्या एका कांचाच्या पात्रांत एकत्र करावें. नंतर तें पात्र चुलीवर ठेवून खाली जाळ लावावा व तें सर्व पाणी जळूं द्यावें. म्हणजे पात्राच्या खाली कापराप्रमाणें पांढरें स्वच्छ चूर्ण राहील तें काढून घ्यावें. हें निंबुकाम्ल होय.

८ निम्बूकाम्लीययवज गुणाः

निम्बूकाम्लीययवजो मूत्रलः श्लेष्मभेदनः ।
ज्वरघ्नः स्वेदजनको जलोदरहरः परम् ॥
वृक्कशोथप्रशमनो विशेषाद् वृक्कशूलनुत् ॥
मूत्ररोधहरः कामं तथा श्लैष्मिककासनुत् ॥ र. त. १५०

निंबुकाम्लीय यवज हें मूत्रल, कफनाशक, ज्वरनाशक, घाम आणणारें, जलोदर नाशक, मूत्रपिंडाची सूज नाहीशी करणारें, विशेषेकरून वृक्कशूळांचा नाश करणारे, मूत्ररोधाला दूर करणारें व कफज कासाला नाहीसे करणारें आहे.

९ निम्बूकाम्लीययवज मात्रा

आरभ्य पञ्चगुञ्जातो दशगुञ्जोन्मितं परम् ।
निम्बूकाम्लीययवजं प्राणाचार्यः प्रयोजयेत् ॥ र. त. १५०

निंबुकाम्लीय-यवज हें पांच गुंजेपासून दहा गुंजेपर्यंत उपयोगांत आणावें.

## सर्जिक्षार

### १ भाषावार नांवें

स.–स्वर्जिक्षार, हिं–सज्जी, वं–साजीखार, साजीमाटी, म.–सज्जीखार, गु.–साजीखार, क.–खाजीखारू, इं.–कार्बोनेट ऑफ सोडा ( Carbonate of soda ) लॅ.–आर्थोक्नेमम्‌इंडिकम् ( Arthrocnemem Indicum ) केरोक्झीलॉन् फिटिडंम् ( Caroxylon fytidum ) फा.–संजार कलीया, अ.–कलीवशव्वुल असफर.

### २ स्वर्जिकाक्षार नामानि

कपोत स्वर्जिका स्वर्जि: शूलघ्नी सुखवर्च्चक: ।

कपोत, स्वर्जिका, स्वर्जो, शूलघ्नी, सुखवर्चक.

दुसरीं नांवें–सौवर्चल, रुचक, सज्जीकाक्षार, सर्जिकाक्षार, सुनचिक, स्त्रुघ्नी, योगवाही, स्वर्जका, सुरवर्चक, स्त्रुघ्नीका, सुवर्ची, सुवर्चा, स्वर्जिकाक्षार.

### ३ सज्जीखारांतील रासायनिक यौगिक

सज्जीखारामध्यें जो रासायनिक यौगिक असतो त्याला सोडियम कार्बोनेट ( $Na_2 Co_3$ ) असें म्हणतात. आणि यांत मीठ त्याचप्रमाणें सोडियम सल्फाईड इत्याहि कांही दुसरे पदार्थहि कमीजास्त प्रमाणांत असतात.

### ४ सज्जीखाराला बांगडखार कां म्हणतात

बांगड्या तयार करते वेळी बांगड्याची कांच लवकर वितळण्याकरितां तो खार उपयोगी आणल्या जात असल्यामुळे ह्या सज्जीखाराला बांगडखार असेंहि म्हणतात.

### ५ सर्जिक्षार निर्माण प्रकार

उष्टप्रियाक्षुपं दग्ध्वा यत्नात् क्षारं समाहरेत् ।
तोयेऽष्टगुणिते क्षिप्त्वा भाजने विमले तत: ॥
सप्तकृत्व: प्रयत्नेन स्त्रावयेत्पृथुवाससा ।
स्त्रावितं सलिलञ्चाथ पचेद् गाढं भिषग्वर: ॥
नि:शेषे सलिले तत्र स्थालिकातलसंस्थितम् ।
हिमकुन्देन्दुसंकाशं सर्जिक्षारं समाहरेत् ॥ र. त. १५१

दुरालभा ( धमासा ) चें मुळासुद्धा झाड आणून, त्याला जाळून त्याची राख करावी व त्या राखेच्या आठपट त्यांत पाणी घालावें. नंतर तें मिश्रण एका जाड फडक्यानें सात वेळ गाळून घ्यावें. नंतर तें गाळून घेतलेले पाणी एका भांड्यांत चुलीवर ठेवून खाली जाळ लावावा. पाणी सर्व जळून जाईपर्यंत पचन करावें. म्हणजे पात्राच्या तळाशीं चंद्राप्रमाणें शुभ्र असा सर्जिकाक्षार असतो तो काढून घ्यावा.

६ सर्जिक्षाराचें गुण

सर्जिक्षारः स्मृतस्तीक्ष्णः कटुरुष्णश्च पाचनः ।
समीरणहरः कामं कासश्वासनिवारणः ।।
अग्निदीप्तिकरश्चैव गुल्माध्मान विनाशनः ।
व्रणोदरामयहरः कृमिघ्नश्च प्रकीर्तितः ।। र. त. १५१

सर्जिकाक्षार हा तीक्ष्ण, तिखट, उष्ण, पाचक, वातनाशक, कास व श्वासनाशक, अग्नि प्रदीप्त करणारा, गुल्म, आध्मान, व्रण, उदररोग व कृमी यांचा नाशक आहे.

७ सर्जिक्षार मात्रा

आरभ्य रक्तित्रितयाद् रविरक्तिकसंमितम् ।
सर्जिक्षारं प्रयुञ्जीत बलकालाद्यपेक्षया ।। र. त. १५१

सर्जिकाक्षाराची मात्रा ही रोग्याचें बल व ऋतुमान पाहुन तीन गुंजेपासून बारा गुंजेपर्यंत जाणावी.

८ सर्जिक्षाराचा दीपन व पाचन योग

कणाजरणचूर्णेन सर्जिका परिशीलिता ।
रक्तित्रयमितात्यर्थं दीपनी पाचनी मता ।। र. त. १५१

सर्जिकाक्षार हा पिंपळी, जिरे याचें बरोबर तीन गुंजेइतका घेतल्याने दीपन पाचन करणारा आहे.

९ कास, श्वासहर योग

सर्जिका मधुना लीढा वासासत्वसमन्विता ।
वातिकं श्लैष्मिकञ्चापि कासं श्वासंच नाशयेत् ।। र. त. १५१

सर्जिकाक्षार, अडुळशाच्या सत्वाबरोबर मधांतून घेतलें असतां वातीक व कफजन्य अशा कास, श्वासाचा नाश होतो.

१० आम्लपित्तनाशक योग

सर्जिक्षारश्चतुर्गुञ्जः शीलित। शीतवारिणा ।
अम्लपित्तं निहन्त्याशु त्वम्लोद्गारांश्च निर्भरम् । र. त. १५१

सर्जिकाक्षार हा चार गुंजा थंड पाण्याबरोबर घेतला असतां आम्लपित्त व आंबट ढेकर यांचा नाश होतो.

११ कृमीनाशक योग

यवानिकात्र्यूषणचूर्णयुक्ता ।
सुर्वाचिका वै त्रिदिनोपयुक्ता ।
आध्मानयुक्तान् गुदमार्गजातान्
कृमीन्निहन्यात्कृमिजांश्च रोगान् ।। र. त. १५१

ओवा त्रिकटु यांचें चूर्णाबरोबर सर्जिकाक्षार तीन दिवस घेतला असतां गुदस्थानांतील आध्मानयुक्त कृमि व कृमीपासून झालेले रोग या सर्वांचा नाश होतो.

१२ गुल्मनाशक योग

सर्जिक्षारो गुडोपेतः शीलितस्तूष्ण वारिणा ।
नाशयेदचिरादेव गुल्मपीडां नवोत्थिताम् ॥

सर्जिक्षार हा गुळांत मिसळून गरम पाण्याबरोबर घेतला असतां नवीनच झालेल्या गुल्मरोगाचा तात्काळ नाश होतो.

१३ कर्णस्त्रावनाशक योग

बीजपूरद्रवोपेता स्वर्जिका स्वल्पमात्रया ।
कर्णक्षिप्ता हंति कर्णस्त्रावं दाहं रुजादिकम् ॥ र. त. १५२

सर्जिकाक्षार हा लिंबाच्या रसांतून थोड्या प्रमाणांत कानांत घातला असतां कर्णस्त्राव, त्यांतील सूज (लाली) व पीडा ही नाहीशी होते.

१४ निम्बूकाम्लीयसर्जिकाया निर्माण प्रकार

विध्वब्धिभागप्रमितां सर्जिकान्तु समाहरेत् ।
द्विगुणे शीतसलिले द्रावयेद्भिषजां वरः ॥
खनेत्रभागप्रमितं निम्बूकाम्लं समाहरेत् ।
तुल्ये तोये चान्यपात्रे तथैव द्रावयेद्भिषक् ।
पात्रे काचप्रलिप्ते तु मेलयेदुभयोर्द्रवम् ।
मृद्वाग्निना चुल्लिकायां पचेत्तोयं च शोषयेत् ॥
निःशेषं सलिलं ज्ञात्वा शुभ्रं चूर्णं समाहरेत् ।
भिषग्वरैः समाख्याता निम्बूकाम्लीयसर्जिका ॥ र. त. १५२

सर्जिकाक्षार हा ४१ भाग घेऊन एका पात्रांत टाकावा. त्यांत त्याच्या दुप्पट पाणी घालून हलवावें. म्हणजे द्रवीभूत होईल. दुसरें एका भांड्यांत वीस भाग निंबुकाम्ब घालून त्यांत तितकेंच पाणी घालावें. आणि ह्या दोन्ही पात्रांतील मिश्रण तिसऱ्या एका कांचेच्या भांड्यांत एकत्र टाकावें. आणि तें भांडें चुलीवर ठेवून खाली मंद अग्नि लावावा. सर्व पाणी आटून गेल्यावर पात्राच्या बुडाशीं शुभ्र चूर्ण राहील. तें काढून घ्यावें. त्याला निंबुकाम्लीय सर्जिक्षार असे म्हणतात.

१५ निम्बूकाम्लीय सर्जिका गुणाः ।

क्षीरच्छर्दिप्रशमनी वन्हिदमांद्यापहारिणी ।
आध्मान शूलविष्टंभहारिणी कांतिकारिणी ॥
ग्राहिणी शिशिरा चैव विशेषाद् दुग्धपाचनी ।
पिपासनाशिनी चैयं निंबूकाम्लीय सर्जिका ॥ र. त. १५२

लहान मुलांच्या रोगांत–मुलांना दूध ओकून पडत असेल तर निंबुकाम्ल दिल्यानें तें थांबतें. तसेंच तें अग्निमांद्यांचा नाश करणारे आहे. शिवाय तें पोटफुगी, शूळ, विष्टंभ यांचा नाश करणारें आहे. कांतीवर्धक, ग्राही, थंड, विशेषेकरून दुधाला पचन करणारें व फार तहान लागत असल्यास त्याचें निवारण करणारे हे निंबुकाम्लीय सर्जिकाक्षाराचें गुण आहेत.

१६ बालकोचित मात्रा

गुञ्जैकतः समारम्य गुंजाद्वितयसंमिताम् ।
प्राणाचार्यः प्रयुञ्जीत निम्बूकाम्लीयसर्जिकाम् ॥ र. त. १५२

निंबुकाम्लीय सर्जिकाक्षार हा एक गुंजेपासून दोन गुंजेपर्यंत लहान मुलांना देण्याचें प्रमाण जाणावें.

१७ पूर्ण मात्रा

आरभ्य पञ्चगुञ्जातो दशगुञ्जोन्मितां परम् ।
रसविद्विनियुञ्जीत निंबूकाम्लीयसर्जिकाम् ॥ र. त. १५२

निंबुकाम्लीय सर्जिक्षार हा पांच गुंजेपासून दहा गुंजेपर्यंत मोठ्या मनुष्याला द्यावा.

Indira Gandhi National Centre for the Arts

## टाकणखार

१ भाषावार नांवें

(सं.) टंकणक्षार (हि.) सुहागा (बं.) सोहागा (म.) स्वागीखार, टांकणखार. (गु.) टंकण पाढीयो, टंकण कुलियो (क.) टंकणखार, (तै.) विलिय टंकणु (इ.) बोराक्स, बायबोरेट ऑफ सोडा. Borax Byborate of Soda (लै.) सोडास्बाईबोरास् Sodas Biboras (फा.) तीगार. (अ.) बुरग.

२ टाकणखाराची नांवें

टंकणरंकनश्चैव टङ्कटंकश्च टङ्कणः ।
द्रावकष्टङ्कणक्षारष्टंकक्षारश्च कथ्यते ॥
रङ्कक्षारस्तथा रङ्गो रङ्गदो लोहशोधनः ।
लोहश्लेषणश्चापि कीर्तितः स्वर्णशोधनः ॥
सौभाग्यञ्च सितक्षारः श्वेतक्षारश्च टंगकः ।
क्षारराजश्च कथितो रसायनविशारदैः ॥ र. त. १५३

टांकणखारांचीं नांवें–टंकण, टंकन, टंकः टंगः टंकणः, द्रावकः टंकणक्षारः टंकक्षारः रंगक्षारः रंगदः लोहशोधनः लोहश्लेषकः स्वर्णशोधनः सौभाग्यः सितक्षारः श्वेतक्षाराः टंगकः, क्षारराजः,

३ टाकणखार रूनिज, प्राप्ती व स्वरूप

हिमालय पर्वताच्या रांगेमध्यें टाकणखार हा खनीज रुपामध्यें अनेक ठिकाणीं मिळतो. याला सुहाग असेंहि म्हणतात. हा लहान लहान नियमित आकाराच्या तुकड्याच्या रुपामध्यें प्राप्त होतो. शुद्ध टंकणाचे तुकडे कांहीसें पार दर्शक असतात. उन्हामध्यें पडून राहिल्या कारणानें यांतील पाण्याचा अंश कांहींसा सुकून जातो. आणि तेव्हां त्याचें पारदर्शकत्व नाहींसे होऊन हा अपारदर्शक आणि पांढऱ्या रंगाच्या चूर्ण रूपांत प्राप्त होतो. तें अपारदर्शक गरम पाण्यांत ढवळून, गाळून आणि आटवून घेतल्यावर त्या मिश्रणाला तसेंच पडूं दिलें तर शुद्ध टंकणाचे पारदर्शक तुकडे तयार होऊं शकतात. याचें रासायनिक नांव सोडियम् बोरेट. याचे रासायनिक सूत्र $No^2$ Br, $O_7$ 10 $H^2O$ असें आहे. आजकाल टंकण दुसऱ्या खनिजा पासून रासायनिक विधीनेंही तयार केंल्या जाते.

४ टाकणखाराचें प्रकार

टंकणस्त्रिविधः प्रोक्तः स्फटिकाभो गुडप्रभः ।
तृतीयः पाण्डुरः प्रोक्तः श्रणुतस्य गुणागुणम् ॥
उत्तमो नीलकंठश्च स्फटिकाभश्च मध्यमः ।
गुडाभश्चाधमः प्रोक्तो रसशास्त्र विशारदैः ॥ र. च. ६९

टांकणखार एक स्फटिकासारखा दिसणारा, दुसरा गुळाप्रमाणे दिसणारा आणि तिसरा पांढरा असा तीन प्रकारचा आहे. त्याचे गुणदोष असे–पांढरा टांकणखार उत्तम, स्फटिकाप्रमाणे दिसणारा मध्यम आणि गुळासारखा दिसणारा कनिष्ठ समजावा.

५ टाकणखाराचें प्रकारापैंकी श्रेष्ठ कोणता

अपरोनील कंठाख्यष्टंकणः पूर्वं टंकणात् । आ. प्र. ९७
श्रेष्टो नीलच्छबिः किंचित् आ. प्र. ९७

दुसरा टांकणखार निलकंठ या नांवाने प्रचलित आहे. हा पहिल्या प्रकारच्या टांकणखाराच्या गुणापेक्षा अधिक श्रेष्ट आहे.

६ अशुद्ध टाकणखाराचें दोष

अशुद्धष्टंकणो वान्तिभ्रान्तिकारी प्रयोजितः । यो. र. २२६ र. चं. ७०

अशुद्ध टांकणखार वांति व भ्रांति हे विकार उत्पन्न करितो.

७ टाकणखाराची शुद्धि

वन्हावुत्फुल्लयोगेन टंकणस्तु विशुध्यति । र. चं. ७०

टांकणखार अग्नीवर ठेवून फुलवून घ्यावा, म्हणजे शुद्ध होतो.

सुचूर्णितं टंकणं तु खलु पञ्चपलोन्मितम् ।
समुज्ज्वलोदरे क्षुद्रकटाहे विन्यसेत्ततः ॥
चुल्लिकायां निधायाथ पचेद् दर्व्याप्रचालयन् ।
सुपुष्पितं नष्टनीरं शुद्धिमायाति टंकणम् ॥ र. त. १५३

टांकणखाराचें चूर्ण करून पांच पळे घ्यावे व एका लहान कढईत तें टाकावें. ती कढई चुलीवर ठेवून खाली जाळ लावावा व पळीने तें चूर्ण ढवळीत जावे. तें चूर्ण चांगलें फुलून आलें व पाण्याचा अंश नाहीसा झाला म्हणजे टांकणखाराची शुद्धि झाली असें समजावें.

८ टाकणखाराचें निर्मलीकरण

टंकणं चूर्णितं तोये तत्वसंख्यगुणे भिषक् ।
सन्द्राव्य वस्त्रपूतञ्च कृत्वां चुल्ल्यां निधापयेत् ॥
तीव्राग्निना पचेत्कामं नीरं च परिशोषयेत् ।
स्वल्पनीरांशशेषेंच टंकणं निर्मलं हरेत् ॥ र. त, १५३

टांकणखाराचें चूर्ण करून त्याचे चोवीसपट पाणी त्यांत घालावें. चांगलें मिसळल्यावर कपडयांतून गाळून घ्यावें. नंतर तें चुलीवर ठेवून खाली तीव्र अग्नि लावावा व सर्व पाणी आटवून घ्यावें. थोडें पाणी राहिलें म्हणजे तें भांडें खाली उतरून घ्यावें; म्हणजे टांकणखार निर्मळ झाला असें समजावे.

९ टाकणखाराचें गुण

टंकणो द्रावणो भेदी विषहारी ज्वरापहः ।
गुल्माम शूलशमनो वःतश्लेष्महरः परः ॥
तथैव वन्हिकृत्स्वर्णरुप्यथोः शोधनः सरः ॥ र. चं. ७०

टांकणखार लोहादि धातूंचें पाणी करणारा, मलभेदक, विषनाशक, ज्वरनाशक, गुल्म व आमशूळ यांचा नाशक, वातकफनाशक, अग्निदीपक, सारक व सोनें, रूपें ह्यांची शुद्धि करणारा आहे.

टंकणः कटुरुक्षणश्च रूक्षस्तीक्ष्णश्च सारकः ।
कफविश्लेषणो हृद्यो वातामयनिषूदनः ॥
कासश्वासहरः कामं स्थावरादिविषापहः ।
अग्निदीप्तिकरश्चापि भृशमाध्माननाशनः ॥
स्त्रींपुष्पजननोबल्यो विविध व्रणनाशनः ॥
पित्तकृच्च समाख्यातो मूढगर्भ प्रवर्तकः ॥

टांकणखार हा तिखट, उष्ण व रुक्ष सारक. कफाचें नि:सारण करणारा, हृद्य, वातविकारनाशक, कासश्वासहारक, स्थावर आदि विषाचा नाश करणारा, अग्नीवर्धक, पोटाला अति फुगारा असला तरी तो नाहीसा करणारा, स्त्रियांचा विटाळ उत्पन्न करणारा, बलकर, सर्व प्रकारच्या व्रणाला भरून आणणारा, पित्तकारक व मूढगर्भ-प्रवर्तक आहे.

१० टाकणखाराचा अनुपान परत्वें रोगावर उपयोग

टंकणं वन्हिसंभष्टं मधुना सह लेपयेत् ।
मुखपाकं निहन्त्याशु दाहशीथादि संयुतम् ॥ र. त. १५४

टांकणखाराचें चूर्ण व्रणावर टाकले तर फार प्रमाणांत होणारा रक्तस्राव तात्काळ थांबतो.

११ मुख पाकावर योग

सुचूर्णितं टंकणं तु द्रावयेद्विमले जले ।
योनौ बस्तिप्रयोगेण पिडकादि रुजं हरेत् ॥ र. त. १५४

टांकणखार हा अग्नीवर भाजून चूर्ण करून मधांतून तोंडांतील छाल्यास लावलें तर दाह, शोथ यांनी युक्त असें तोंडांतील छाले नाहीसे होतात.

१२ योनि पीडेवर योग

टांकणखाराचें चूर्ण करून तें पाण्यांत टाकून त्याचा स्त्रियांना योनी भागांत उत्तर बस्ती दिल्यास त्या स्थानांतील सर्व पीडा नाहीशी होते.

१३ श्वेत प्रदरावर योग

उक्तमानकृतेनैव टंकणाम्लद्रवेण तु ।
प्रत्यहं विधिना दद्यात् बस्तिमुत्तरपूर्विकाम् ॥
इत्थं बस्तिप्रयोगेण दिनसप्तकमात्रकम् ।
श्वेतप्रदरजा बाधा चिरजापि विनश्यति ॥ र. त १५७

टंकणाम्ल द्रवाचा दररोज सात दिवसपर्यंत उत्तर बस्ती दिल्याने फार दिवसांची स्वेतप्रदराची पीडा नाहीशी होते.

१४ कर्णस्त्राव नाशक योग

सुभगाम्लद्रवोऽयं तु योजित: कर्णधावने ।
सान्द्रं व्रणं तु चिरजं कर्णस्त्रावं च नाशयेत् ॥ र. त. १५६

टंकणाम्ल द्रवाचा कर्ण धावनाकरितां उपयोग केल्यास जुनाट व्रण व पुष्कळ जुनाट असा कर्णस्त्राव यांचा नाश होतो.

## १५ टंकणाम्ल निर्माण प्रकार

चूर्णितं टंकचूर्णंतु तदर्धेऽत्युष्णवारिणी ।
द्रावयित्वा प्रयत्नेन काचपात्रे निधापयेत् ॥
वन्हौ संताप्य च ततो लवणद्रावकं क्षिपेत् ।
द्रावप्रक्षेपणादूर्ध्वं पात्रं भूमौ तु विन्यसेत् ॥
शीतीभूते तु सलिलं शनैः खल्वपसारयेत् ।
पृथक् कुर्वीत टंकाम्लं त्वधःपतितमुत्तमम् ॥
टंकणांम्लं पुनस्तूष्णे त्रिगुणे सलिले भिषक् ।
द्रावयित्वा पुनस्तद्वद् सलिलं त्वपसारयेत् ॥
समाहरेत् टंकणाम्लं मलस्थमतिनिर्मलम् ।
संशोध्य च ततो वैद्यः प्रयोगेषु प्रयोजयेत् ॥ र. त. १५५-५६

टांकणखाराचें चूर्ण करून त्याच्या अर्धे अती उष्ण पाणी घेऊन त्यांत तें चूर्ण टाकावें. चांगलें द्रवीभुत झाल्यावर तें एका कांच पात्रांत टाकावें. व तें काचपात्र अग्निवर ठेवून गरम करावें व लगेच लवणद्रावक थेंब थेंब सर्व कण खाली बसेपर्यंत टाकावें. नंतर तें पात्र खाली काढून थंड झाल्यावर त्यांतील पाणी काढून टाकावें. व खाली राहिलेलें उत्तम टंकणाम्ल वेगळें काढावें. तें टंकणाम्ल पुन्हा तिप्पट गरम पाण्यांत टाकून अग्निवर ठेवून द्रावण करावें. नंतर खाली काढून थंड झाल्यावर त्यांतील पाणी काढून घ्यावें व तळाशीं राहिलें तें निर्मळ टंकणाम्ल घेऊन तें सुकवावें. नंतर त्याचा उपयोग करावा.

## १६ टंकणाम्लाचें गुण व प्रमाण

टंकणाम्लस्तु भूतघ्नो नेत्राभिष्यन्दनाशनः ।
अग्निदग्धव्रणहरो मूत्रलः क्षतरोपणः ॥
औपसर्गिकमेहोत्थ व्रणबाधनिबर्हणः ।
श्वेतासृग्दरहृच्चैव श्रुतिस्त्रावहरो मतः ॥
आरभ्यरक्तिद्वितयया द्रक्तिष्टक संमितम् ॥ र. त. १५६

टंकणाम्ल हें जीवाणुनाशक, डोळ्याची सूज लाली याचें नाशक, अग्निनें भाजलेल्या व्रणाला भरून काढणारें, मूत्रल, जखम भरून काढणारें, मेहोत्थ, व्रणनाशक श्वेत प्रदर व कर्णस्त्राव यांना दूर करणारे आहे. त्याचे देण्याचें प्रमाण दोन गंजेपासून आठ गुंजेपर्यंत जाणावें.

## सोरा

१ भाषावार नांवें

(सं.) सूर्यक्षार (हि.) सोरा, सूर्याखार बाजी (म.) सोरा, (गु.) सुरोखार. (तै.) चिट्लुभस्मसु. (इं.) नाइटर, साल्ट पिटर Nitre Saltpetre (लै.) पोटेश्यं नैट्रास Potassium Nitrate (फा.) सोरा (अ.) अबकेर.

२ नांवें

सूर्यक्षारोर्क क्षारश्च ताक्ष्यं स्तीक्ष्ण रसस्तथा ।
सुवर्चिका सर्व सहो ह्यौरिणश्च शिलाजतुः ॥ शा. नि.

अर्थ—सूर्यक्षार अर्कक्षार, ताक्ष्यं तीक्ष्णरस, सुवर्चिका सर्वसह, औरिण, शिलाजतु

३ सोरक निर्मलीकरण

पलोन्मितं सोरकं तु शीतले सलिले भिषक् ।
चतुष्पलमिते क्षिप्त्वा वस्त्रपूतं पतेत्ततः ॥
स्वल्पशेषं जलं ज्ञात्वा पात्रमुत्तारयेत्ततः ।
विमलं चूर्णसंकाशं सोरकं तु समाहरेत् ॥
स्वल्पशेषेऽपि सलिले यदि वन्हिः प्रदीयते ।
जले निःशेषतां याते सोरकं दह्यते स्वयम् ॥
तस्माद्रसायनाचार्यः सावधानतया सदा ।
सोरकं निर्मलीकुर्यान्नस्याद् द्रव्यक्षतिर्यथा ॥ र. त. १६०

सोरा एक पळ घेऊन त्यांत चार पळें थंड पाणी घालावें. नंतर तें मिश्रण अग्निवर ठेवून थोडें पाणी शिल्लक राहिल्यावर पात्र खाली उतरून घ्यावें व स्वच्छ सोऱ्याचें चूर्ण काढून ठेवावें. थोडें पाणी ठेवण्याचें कारण सर्व पाणी आटूं दिलें तर सोरा जळेल व म्हणून त्या सावधानी करितां म्हणून थोडें पाणी असतांनाच खाली काढावें असें सांगितलें आहे.

४ सोरक शोधन

सोरकं चूर्णितं खल्वे त्वेसातोयेन भावयेत् ।
त्रिवारं भावनादेव शुद्धिमायात्यनुत्तमाम् ॥ र. त. १६०

सोऱ्याचें खलांत चूर्ण करून विलायचीच्या काढ्याची तीन वेळ भावना द्यावी म्हणजे सोरा शुद्ध होतो.

५ शुद्ध सोरक गुण

सोरकः कटुकस्तीक्ष्णो विदग्धाजीर्णनाशनः ।
अश्मरीमूत्रकृच्छ्राग्निमांद्यपाण्डु प्रमेहनुत् ॥ र. त. १६०

सोरा हा तिखट, तीक्ष्ण, विदग्धा जीर्णाचा नाशक, तसेंच अश्मरी, मूत्रकृच्छ्र, अग्निमांद्य, पांडुरोग, प्रमेह यांचा नाश करणारा आहे.

६ सोरक मात्रा

द्विगुञ्जतः समारभ्य दशगुञ्जोन्मितं परम् ।
सोरकं विनियुञ्जीत बलकालाद्यपेक्षया र. त. १६०

दोन गुंजेपासून दहा गुंजेपर्यंत रोग्याचें बळ व ऋतुमान पाहून सोऱ्याची मात्रा उपयोगांत आणावी.

७ मुत्रावरोध नाशक योग

ससितं सोरकं वारा गुञ्जापञ्चकसंमितम् ।
ज्वरदाहतृषार्तैस्तु रोगिभिः परिशीलितम् ॥
जनयेत्स्वेदमत्यर्थं मूत्ररोधं च नाशयेत् ।
दाहतृषादिकं चापि हत्वा कामं ज्वरं जयेत् ॥ र. त. १८१

खडीसाखर घातलेलें सोऱ्याचें पाणी पांच गुंजा रोग्याला दिले असतां दाह, तृषा, यांचा नाश होतो. घाम अतीशय येऊन मूत्रावरोधांचा नाश होतो. तसेच दाह, तृषा आदि रोगांचा नाश होऊन कामज्वराचा नाश होतो.

## अपामार्ग क्षार

१ नांवें

अपामार्गक्षार उक्तो मयूरक्षारकस्तथा ।
खरमञ्जरिकाक्षारः किणिक्षारश्च कीर्तितः ॥ र. त. १६३

आपामार्ग क्षारांचीं नांवें--मयुरक्षारक, खरमंजरीकाक्षार, किणिक्षार ही आपामार्ग क्षारांचीं नांवें होय.

२ गुण

खरमञ्जदिकाक्षारस्तीक्ष्णः श्वासनिबर्हणः ।
गुल्मशूलादिशेषघ्नः कामं बाधिर्यनाशनः ॥ र. त. १६३

आपामार्गक्षार हा तीक्ष्ण, श्वासनाशक, गुल्म शूळ आदि रोगांचा नाश करणारा व बाधिर्य नाशक आहे.

३ अपामार्ग क्षाराचा अनुपान परत्वें रोगावर उपयोग

मयूरक्षारकः कामं मधुना परिशीलितः ।
विनाशयेच्चिरोद्भूतं श्वासं परम दारुणम् ॥ र. त. १६३

आपामार्गक्षार हा मधांतून घेतला असतां तो पुष्कळ दिवसांचा जुनाट व फार त्रासदायक असा श्वास नाहीसा करतो.

४ शुल आध्मानावर योग

सल्यूषण: किणिक्षारो यवानीचूर्ण संयुत: ।
निहन्ति शूलं त्वचिरादाध्मानंचातिदारुणम् ॥ र. त. १६३

आपामार्गक्षार हा त्रिकटु व अजमोदा यांचें चूर्ण गाळून घेतलें असता अतिदारुण असा शूळ व आध्मान यांचा नाश होतो.

५ अश्मरी, मूत्रकृच्छ्रावर योग

अपामार्ग क्षारचूर्णं यवाग्रजसमन्वितम् ।
शीलितं नाशयेदाशु मूत्रकृच्छ्रं तथाश्मरीम् ॥ र. त. १६३

आपामार्ग क्षाराचें चूर्ण व यवक्षाराचें चूर्ण दोन्ही एकत्र मिसळून घेतलें असतां अश्मरी व मुत्रकृच्छ् यांचा नाश होतो.

६ गुल्म प्लीहावर योग

खरमञ्जरिकाक्षार: सव्योषश्च ससैंधव: ।
शीलितो नाशयेद्गुल्मं प्लीहानञ्चाति दारुणम् ॥ र. त. १६४

आपामार्गक्षार हा त्रिकटु व सैंधव यांचें चूर्ण मिसळून घेतलें असतां गुल्म व प्लिहा यांचा नाश होतो.

Indira Gandhi National Centre for the Arts

## अर्क

१ अर्कक्षाराची नांवें

अर्कक्षारो रवीक्षारो भास्करक्षारकस्तथा ।
खर्जूघ्न क्षारकश्चाथ मित्र क्षारश्च कीर्तित: । र. त. १६४

अर्कक्षार:, रवीक्षार:, भास्कर, क्षारक: खर्जूघ्न, क्षारक:, मित्रक्षार: हीं अर्कक्षारांचीं नांवें आहेत.

२ पांढऱ्या रुईची भाषावार नांवें

(हिं.) लाल आक, सफेद आक, मंदार. (वं.) आकंद श्वेत आकंद. (म.) रुई, पांढरी रुई. (क.) पक्के, मंदारपक्के. (तै.) नील जिल्लेडे घोली तेला जिल्लेडे, जल्लेट्ट चेट्टु. (गु.) आकडो, भोलोआकडो. (इं.) जाइगोंटिक् स्वोलोवर्ट ( Gigantic Swallow wort. ). (लै.) केलोट्रोपिस जाइगेंठिया ( Galotropis Jigantea ) कोलोद्रोपिस प्रोसिरा, ( Gprocera). (फा. ) खुर्क दूध. (अ.)

३ द्विविधार्क गुणा:

अर्कद्वयं सारवात कुष्टकण्डू विष व्रणान् ।
निहंति प्लीह गुल्मार्श: श्लेष्मोदर यकृत्कृमीन् ॥
अलर्क कुसुमं वृष्यं लघु दीपन पाचनम् ।

**अरोचक प्रसेकार्शः कास श्वास निवारणम् ।**

दोन्ही प्रकारची रुई, रेचक, वात, कोढ, कंडू, वीष, व्रणप्लीहा, गुल्म, मुळव्याध, कफ, उदररोग, यकृत, आणि कृमिनाशक आहे. पांढऱ्या रुईचें फुल, बलवर्धक, हलकें अग्नीप्रदिप्त करणारें, पाचक, अरुची, तोंडांतून लाळ गळण्याचा विकार, मुळव्याध आणि श्वासनाशक आहे.

४ अर्कक्षारगुणा

**क्षीरमर्कस्य तिक्तोष्णं स्निग्धं स लवणं लघु ।**
**कुष्ठ गुल्मोदर हरंश्रेष्ठ मेतद्विरेचनम् ॥**　　　　शा. नि.

रुईचें दूध कडु, उष्ण, स्निग्ध, खारट, हलकें असून तें कोड, गुल्म, त्याचप्रमाणें उदररोगनाशक आहे. हें उत्तम रेचक आहे.

५ अर्कमूलस्यत्वग्गुणा

**अर्कमूलत्वचा स्वेदकरी श्वास निबर्हणी ।**
**उष्णाच वामिका चैव ह्युपदंश विनाशिनी**　　　　शा. नि.

रुईच्या मुळाची साल स्वेद उत्पन्न करणारी, श्वासनाशक, उष्ण आणि उपदंश नाशक आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

६ अर्कक्षाराचा गुल्मप्लीहावर योग

**ससैन्धवं त्वर्कपत्रं त्वन्तधूंमं दहेद्भिषकम् ।**
**क्षारः स मस्तुना पीतोगुल्मप्लीहोदराञ्जयेत्**　　　　र. त. १६४

सैंधव व रुईचीं पानें दोन्ही एकत्र परळांत घालून बंद करून भुलीवर ठेवून खाली विस्तव लावून त्याची राख करावी. ती राख (क्षार) दह्याच्या निवळींतून द्यावी म्हणजे गुल्म प्लीहा व उदररोग यांचा नाश होतो.

७ अर्कक्षाराचा श्वासावर योग

**सत्र्यूषणो रविक्षारो मधूना परिशीलितः ।**
**विनाशयेद्विशेषेण कासं श्वासं च दारुणम् ॥**　　　　र. त. १६४

रुईचा क्षार हा त्रिकटुच्या चूर्णाबरोबर मधांतून घेतला असतां दारूण असा कास श्वास यांचा नाश होतो.

## तिलक्षार

१ नांवें

**तिलक्षारः समाख्यातस्तिलभतिरतथैव च ।**
**होमधान्यविभूतिश्च पवित्रक्षारकस्तथा ॥**　　　　र. त. १६४

तिलक्षाराचीं नांवें—तिलक्षार, तिल–भूति, होमधान्य विभूति, पवित्रक्षारक.

## २ तिलक्षार–गुण

तिलक्षारः स्मृतस्तीक्ष्णो मूत्ररोधनिबर्हणः ।
अश्मरी नाशनश्चैव प्लीहघ्नो व्रणदारणः ॥ र. त. १६४

तिलक्षार हा तीक्ष्ण, मूत्ररोधाचा नाश करणारा, मुतखडा, अश्मरी, प्लिहा व दारूण असा व्रण या सर्वांचा नाशक आहे.

## ३ तिलक्षाराचा अनुपानपरत्वें रोगावर उपयोग

सव्यूषणस्तिलक्षारः सैन्धवेन समन्वितः ।
शीलितो हयचिरादेव जाठराग्नि प्रदीपनः र. त. १६४

तिलाक्षार हा त्रिकटुचें चूर्ण व सैंधव मिसळून घेतला असता तात्काळ अग्नि प्रदिप्त होतो.

## ४ मूत्ररोध नाशक योग

अंकोलक्षारसंयुक्त स्तिलक्षारस्तु शीलितः ।
मधुनान्ते तोयपानान्मूत्ररोधं विनाशयेत् ॥ र. त. १६४

तिलाक्षार हा अंकोलाचा क्षार मिसळून मधातुन घ्यावा व वरून पाणी प्यावें म्हणजे मूत्रावरोधाचा नाश होतो.

## ५ वृक्कशूलनाशक योग

तिलक्षारः सयवजः शीलितो निंबुकांबुना ।
वृक्कशूलं निहन्त्याशु भास्करस्तिमिरं यथा ॥ र. त. १६५

तिलक्षार हा यवक्षार मिसळुन निंबुच्या रसांतून घेतला असतां वृक्कशूळाचा खात्रीनें नाश होतो.

## ६ अश्मरी नाशक योग

तिलक्षारः सयवजः कदलीक्षारमिश्रितः ।
शीलितो मधुना काममश्मरीमाशु नाशयेत् ॥
तिलभूतिर्माषमिता रुचकेन समन्विता ।
तक्रेण मधुना वापि शीलिता त्वश्मरीं जयेत् ॥

तिलक्षार हा यवक्षार व कदलीक्षार मिसळून मधाबरोबर घेतला असतां अश्मरीचा नाश होतो व तोच जर काळे मिठाबरोबर ताकांतून किंवा मधांतून घेतला तरी अश्मरीचा नाश होतो.

७ मूत्रशर्करा नाशक योग

होमधान्यविभूतिस्तु धात्रीक्षारसमन्विता ।
गोक्षुरक्वाथसंयुक्ता नाशयेन्मूत्रशर्कराम् ॥ र. त. १६५

तिलक्षार हा आवळीच्या सालीची राख करून त्याबरोबर गोखरूच्या काढ्यांतून घेतला असतां मूत्रशर्करेचा नाश होतो.

८ व्रणशोथ नाशक योग

पवित्रक्षारचूर्णं तु यवजेन प्रलेपितम् ।
व्रणशोथे करोत्याशु दारणं परमोत्तमम् ॥ र. त. १६५

तिलक्षार हा यवक्षाराबरोबर मिसळून त्याचा व्रणावर लेप केला असतां ताबडतोब व्रणाचें दारण करतो.

## स्नुहीक्षार

१ भाषावार नांवें

(हिं.) थहर, सेहूंड. (बं.) मनसागाछ, सेजवृक्ष. (म.) निवडुंग, काटे निवडुंग, फणीचें निवडुंग, विकांडी, वइनिवडुंग. (गु.) थोरदांडलीयो, कटाली, कंटोलोथोर, हाथलो, तरधारी, नानोपरदेशी. (क.) तिवडिगु, काली, मंडुकाली. (अ.) जुकुम, फर्म्युन. (लॅ.) युफोर्विया, टुरुकालाई, पेन्टागोता. (तै.) चैमुंडु, (दे.) सावर. (इ, मिल्क्सहेज्ज, प्रिक्लीपियर Milks hedge, Prickly pear (लै.) युफोर्विया द्रायगोना, Euphorbia Trigona युफोर्विया निरिफोलिया Euphorbia Nirifolia (फा.) लादनाम (तु.) कोडकलि, (ता.) कली. (मला.) तिरुकल्ली.

२ स्नुहिनामानि

स्नुहि समंत दुग्धाच मागदर्बहु दुग्धिका ।
महावृक्षः सुधावज्रा शीहुण्डो दंडवृक्षकः ॥ शा. नि.

स्नुही समंत दुग्धा, नागद्रु, बहु दुग्धिका, महावृक्ष, सुधा, वज्रा, शिहुंडा, दंडवृक्षक.

**दुसरीं नांवें**--सीहुंड, स्नुक, स्नुषा, स्नुहा, स्नुही वज्र, वज्रदु, वज्रद्रुम, वज्रकंटक गुड, गुडा, गुली, गुला, बहुशाल, कृष्णसार, निस्रींश पत्रिका, नेत्रारि, शाखा, कंट, सिंहतुंड, वज्री कांडशाख, कुलिशद्रुम, कांडरोहक.

३ सेहुंडदुग्धगुणा

उष्णवीर्यं स्नुहिक्षीरं स्निग्धंच कटुकं लघु ।
गुल्मिनां कुष्ठिनां चापि तथैवोदर रोगिणाम् ॥
हितमेतद्विरेकार्थे येचान्येदीर्घरोगिणः ॥ शा. नि.

निवडुंगाचें दुध, उष्णवीर्य, स्निग्ध, तिखट, हलके असून तें गुल्म, कुष्ठ उदर-रोगनाशक आहे. पुष्कळ दिवसांच्या रोग्याकरिताहि याचा जुलाब हितकर आहे.

४ सेहुंडपत्र गुणा

सेहुडस्य दलं तीक्ष्णं दीपनं रोचनं भवेत् ।
आध्मानाष्टिलिका गुल्म शूलशौथो दराणिच ॥

निवडुंगाचीं पानें तीक्ष्ण, अग्नि प्रदिप्त करणारे आहे. अत्यंत रुचीउत्पादक असून, आध्मान अष्टिलिका. गुल्म, शूल, सूज आणि उदररोगनाशक आहे.

५ स्नुही क्षाराचा अनुपानपरत्वें रोगावर उपयोग

स्नुहीक्षार: शंखयूतिर्सजिकायवजान्वित: ।
विषूचिकां निहन्त्याशु त्वजीर्णञ्चाति दारुणम् ॥ र. त. १६५
चिरोत्थितानां गुल्मानां पञ्चतां पञ्चतां नयेत् ।
ग्रहणीं नाशयेदाशु तथा शूलंच दारुणम् ॥ र. त. १६५

स्नुहीक्षार हा शंखभस्म, यवक्षार व सर्जिक्षार यांच्याबरोबर मिसळून घेतला असतां विषुचिका व दारूण अजीर्ण यांचा नाश होतो. तसेच फार जुन्या अशा पांची प्रकारच्या गुल्मांचाहि नाश होतो. तसेच ग्रहणी व दारूण असा शूळ यांचा नाश होतो.

६ उदरनाशक योग

स्नुहीक्षारस्त्रिलवणक्षारत्रिकसमन्वित: ।
निहंति शोफं प्लीहानमुदराणि च नाशयेत् ॥ र त १६५

स्नुहीक्षार हा त्रिलवण (मीठ, सैंधव, व बिडलोण) व क्षारत्रिक (जवखार सज्जिखार व टाकणखार) या सर्वांचे चूर्णाबरोबर घेतला असतां शोफ, प्लिहा व उदररोग या सर्वांचा नाश करतो.

७ श्वासनाशक योग

सत्र्यूषण: स्नुहीक्षारो मधुना परिशीलित: ।
नाशयेदचिरादेव श्वासं परमदारुणम् ॥

स्नुहीक्षार हा त्रिकटुचें चूर्णाबरोबर मधांतून घेतले असतां दारूण असा श्वास-रोग तात्काळ नाहीसा होतो.

८ यकृत प्लीहानाशक योग

स्नुहीक्षारो वरोपेत: सैंधवाग्निसमन्वित: ।
निहन्ति वन्हिमाद्यं तु यकृत्प्लीहोदराणि च ॥ र त १६६

स्नुहीक्षार हा त्रिफळा, सैंधव, व चित्रक या सर्वांचें चूर्णाबरोबर घेतला असतां अग्नीमांद्य यकृतवृद्धि व प्लीहावृद्धि व उदररोग या सर्वांचा नाश होतो.

## पलाशक्षार

१ नांवें

पलाशक्षारकश्चैव किंशुकक्षारकस्तथा ।
पर्णक्षारश्च कथितस्त्रिपर्णक्षारकस्तथा ॥ र त १६६

पलाशक्षारांचीं नांवें–पलाशक्षारक, किंशुकक्षारक, पर्णक्षार, त्रिपर्णक्षारक.

२ गुण

पर्णक्षारोऽग्निजननो गुल्मप्लीहादिनाशनः ।
यकृद्वृद्धिप्रशमनो मूत्रकृच्छ्राश्मरीहरः ॥ र. त. १६६

पलाशक्षार हा अग्निवर्धक, गुल्म प्लीहादिकांचा नाश करणारा यकृत वृद्धिचें प्रशमन करणारा, मूत्रकृच्छ्र, अश्मरी यांचें निवारण करणारा अशा गुणांनी युक्त आहे.

३ पलाशक्षाराचा अनुपानपरत्वें रोगावर उपयोग

पर्णक्षारस्तु मधुना कणाचूर्ण समन्वितः ।
वन्हिद्दीप्तिकरः कामं गुल्मप्लीहोदरापहः ॥ र. त. १६६

पलाशक्षार हा मधांतून पिंपळीचें चूर्ण घालून घेतला असता, अग्नि प्रदिप्त करणारा, गुल्म, प्लीहा व उदर यांचा नाश करणारा आहे.

४ रक्तगुल्मनाशक योग

पलाशक्षारसलिलैर्गव्यमाज्यं विपाचितम् ।
शीलितं नाशयत्याशु रक्तगुल्मं सुदारुणम् ॥ र. त. १६६

पलाशक्षाराच्या पाण्यांत गाईचें तूप पचन करावे व तें सेवन केलें असता दारूण अशा रक्त गुल्माचा नाश होतो.

## चिंच

१ भाषावार नांवें

(सं.) तिन्तिडी, (हिं.) इमली, (बं.) तेंतुल, (म.) चिंच, (गु.) आंबली. (क.) हुणिसे, हुणिसेहण्णु, हुणिसिनयले. (तै.) चिंताचेट्टु, चिण्ड. (औत्क.) कंआं, (ता.) पुळि. (बम्.) टिन्टज. (इ.) टमेरिंडट्री (Tamarind tree). (लै.) टेमेरिंडस् इंडिकस् (Tamarinddus Indicus). (अ.) तमर हिंदी.

शा. नि.

२ चिंचेच्या क्षाराचीं नांवें

चिंचाक्षारोम्लिकाक्षार श्चिंचिका क्षारक स्तथा ।
आम्लिका क्षारकश्चैव चिंचाभूतिश्च कथ्यते ॥
चिंचिका भसितं चैव चिंचाभस्म तथैवच ।
अम्लिका भसितं चापि तिंतिडी भसितं तथा शा. नि.

चिंचेच्या क्षाराचीं नांवें–चिंचाक्षार, अम्लिकाक्षार, चिंचिकाक्षारक, आम्लिका-क्षारक, चिंचाभूति, चिंचिकाभसित, चिंचाभस्म, आम्लिकाभसितं, तिंतिडीभसितं ही चिंचेच्या क्षाराचीं नांवें आहेत.

१ चिंचेचे गुण– नं. १

आम्लिकाम्ला गुरुर्वात हरीपित्तकफास्त्रकृत् ।
पक्वातु दीपनी रुक्षा सरोष्णा कफवातनुत् ।। . शा. नि.

कच्ची चिंच, भारी, वातनाशक, पित्तकारक, कफकारक आणि रक्त दुषित करणारी आहे. पक्व झालेली चिंच दीपन, रुक्ष कांहोशी सारक, उष्ण आणि कफवात नाशक आहे.

पक्वचिंचारसश्चाम्लो मधुरो रुचिकृन्मतः ।
व्रणनाशकरश्चैव लेपनाच्छोथ पंक्तिहृत् ।। शा नि.

पक्वचींचेचा रस, आबंट, मधुर, रुचीकारक, व्रणनाशक असून लेप केला असतां सूज आणि पंक्तिशूळ नाहीसा होतो.

चिंचासारं दाहकफकारकं चाति अम्लकम् ।
वातनाशकरं प्रोक्तं समान शर्करा युतम् ।।
दाहं पित कफं चैव नाशये दितिकोर्तितम् ।। शा. नि.

चिंचेचा सार दाह आणि कफकारक अत्यंत आंबट आणि वातनाशक आहे. त्यांत समान प्रमाणांत साखर मिळविल्यास तो क्षार दाह, पित्त आणि कफ यांचा नाश करतो.

४ चिंचेच्या क्षाराचे गुण

चिंचाक्षारश्चाग्निमांद्यं शुलनाशकरोमतः । शा. नि.

चिंचेचा क्षार मंदाग्नि आणि शूळ यांचा समूळ नाश करणारा आहे.

५ चिंचेच्या क्षाराचा अनुपान परत्वें रोगांवर उपयोग

विषूचिकानाशक योग

स्नुहार्कक्षारसहितो मृतशंखसमन्वितः ।
चिंचाक्षारोऽशनादाशु नाशयेत्तु विषूचिकाम् ।। स. त. १६७

चिंचाक्षारांत निवडुंगक्षार, अर्कक्षार, शंखभस्म हे सर्व एकत्र करून तो सेवन केला असतां विषुचिकेचा तात्काळ नाश होतो.

४ गुल्मनाशक योग

शूलमुन्मूलयेत्कामं वन्हिमांद्यविनाशनः ।
अजीर्णं क्षपयत्येव गुल्मबाधां विशेषतः ।। र. त. १६७

चिंचाक्षार हा वरील द्रव्यें मिळवून घेतला असतां शूळ, अग्निमांद्य, अजीर्ण व गुल्म या सर्वांचा समूळ नाश होतो.

५ ग्रहणीनाशक योग

पटुपञ्चकसंयुक्तो जरणव्यूषणान्वितः ।
शीलितस्त्वम्लिकाक्षारो हरेद् ग्रहणिकारुजम् ।।

चिंचिकाक्षार हा पंचलवण, जिरें व त्रिकटु यांचें चूर्णाबरोबर सेवन केला असतां दारुण अशा ग्रहणी रोगांचा तो नाश करितो.

६ पंक्तिशूलनाशक योग.

अरोचकं निहन्त्याशु तथा शूलं सुदारुणम् ।
आध्मानं पंक्तिशूलंच विष्टब्धाजीर्णकं तथा ।। र. त. १६७

चिंचाक्षार हा वरील सर्व द्रव्यें मिळवून सेवन केला असता तो दारुण असा शूळ, आध्मान, परिणामशूळ व विष्टब्धाजीर्ण या सर्व रोगांचा नाश करितो.

## पापडखार

**नांव**–( सं. ) पर्पटक्षार, ( हिं. म. गु. ) पापडखार, ( अ. ) बोरक, ( फा. ) बुरे अरमनी.

वर्णन–हा पदार्थ क्षारीय जमिनींत मिळतो, हा कृत्रिम रीतीनेंहि तयार केल्या जातो. याचा पापड करण्याकडे उपयोग केल्या जातो. म्हणूनच त्याला पापडखार असें म्हणतात. जो पापडखार पांढरा, हलका जाळीदार, लवकर तुटणारा असेल तो उत्तम समजावा.

गुणधर्म–हा वातानुलोमक, मूत्रल, सारक, आम्लतानाशक, क्षारकर्माचे उपयोगी असा आहे. याला गरम करून ताकांतून घेतले असतां कावीळ रोगाचा नाश होतो. जिरे व सुंठ यांचें चूर्णाबरोबर पापडखार पाण्याबरोबर घेतला असतां पोटशूळ व फुगारा नाहीसा होतो. पापडखार व समभाग चुना दोन्ही एकत्र मिसळून पाण्यांत मिसळून मसेवर लावले असतां मस निघून जाते. पिकलेल्या व्रणशोथावर लावले असतां तो व्रण ( सूज ) फुटतो.

----

# लवण विज्ञानीय

## अध्याय ६२ वा

## सैंधव लवण

१ भाषावार नांवें

(सं.) सैंधव, (हिं.) सेंधानोन, (वं.) सैंधव लवण, (म.) सेंधेलोण, (गु.) सिंधालुण, ( क. ) सैंवव, ( तै. ) सिंधुरुप, ( लै. ) सोडिया इक्लोरिडं, ( Sodii Chloridum (इं.) क्लोराइड् ऑफ सोडियम ( Chloride of Sodium ) (अ.) मिल्हे हिंदी.

३ सैंधव नामानि

**सिन्धुद्भवं मणि मन्थं नादेयं लवणोत्तमम्** **शा. नि.**

सिंधुद्भ, मणिमंथ, नादेय, लवणोत्तम.

दुसरीं नांवें–शितशीव, सितसिव, सिंधूज, सिंधूपल, वशीर, सिंतुदेशज, मणिबंध, सिन्धु मंथज, सिंधुलवण, सिंधुभव, सिंधुसंभव, नादेय, शिवसिद्ध, शिवात्मज, पथ्यशुद्ध शितशिव.

Indira Gandhi National
Centre for the Arts

२ सैंधवाचें उत्पत्तिस्थान

**पंचांबुवर्तिनः सिंधोः पूर्वभागे विशेषवः ।**
**शिलोच्चय खनौ सिंधूपलं समुपलभ्यते ॥** **शा. नि.**

सिंधूच्या पूर्व भागीं पांच नद्या जेथे मिळतात तेथे खाणींत सैंधव सांपडतो.

## नारिकेल लवण

### नारिकेलाख्यलवणकृति

**सुविपक्वं ससलिलं नारिकेलं समाहरेत् ।**
**अपनीय जटां वृद्धिपत्रेण स्फोटयेद् दृशम् ॥**
**जातरंध्रान्नरिकेलात्तोरं सर्वं परित्यजेत् ।**
**सूचूर्णितं सैंधवं तु दशतोलकसंमितम् ॥**
**निक्षिप्यरंध्रमार्गेण ततो रंध्रं निरोधयेत् ।**
**वसनेन समाच्छाद्य परितो लेपयेन्मृदा ॥**
**रौद्रयंत्रे विशोष्याथ पुटयेत्तु महापुटे ।**
**तद्गोलकं स्वांगशीतं प्रयत्नेन समाहरेत् ।**
**सैंधवं कज्जलीवर्णं कपालांशोज्झितं हरेत् ।**
**लवणो नारिकेलाख्यः समाख्यातो भिषग्वरैः ॥** **र. त. १६८**

पक्व झालेलें व पाणी नसलेलें एक नारळ घ्यावें. त्याचेवरील जटा (वरील तुषा) सुरीने काढून टाकावी. नारळाचें जें छिद्र असते, त्या छिद्रांतून नारळांतील पाणी काढून टाकावें. नंतर दहा तोळे सैंधवाचें चुर्ण करून तें त्या छिद्रावाटें नारळांत भरावें व तें छिद्र बंद करावें. नंतर तें नारळ सभोवार कपड्याने गुंडून वरून मातीचा लेप करावा व उन्हांत सुकवून त्याला महापुटांत अग्नि द्यावा. नंतर तें नारळ स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावे. त्या नारळाची नारवाटी ( कठीण आवरण ) वेगळे काढून टाकावें व कज्जलीप्रमाणे काळचा रंगाचें सैंधवाचें चूर्ण वेगळे काढून चूर्ण करून ठेवावें. त्याला नारिकेलाख्य लवण असें म्हणतात.

२ नारिकेलाख्य लवण गुणा:

लवणो नारिकेलाख्यः पाचनः पित्तनाशनः ।
अम्लपित्तहरः कामं पित्तशोषज शूलनुत् ॥
वातजं पित्तजं वापि श्लेष्मजं सन्निपाततम् ।
शूलं च परिणामोत्थं नाशयेदविकल्पतः ॥ र. त. १६८

नारीकेलाख्य लवण हें पाचक, पित्तनाशक, आम्लपित्तहर, पित्त हें पित्ताशयांत अगर पित्तनलीकेंत सुकल्यामुळे होणारा शूळ, तसेंच वातपासून, पित्तापासून, कफापासून किंवा सन्निपातापासून झालेला शूळ व परिणामशूळ यांचा नाश करणारे आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

## अर्कलवण

१ अर्कलवण कृति

सूचूर्णितं सैंधवं तु समार्कदलसंयुतम् ।
अन्तर्धूमं पचेद्धीमान् स्वांगशीतमथोद्धरेत् ॥
जायते खल्वसंपिष्टं लवणं मलिनप्रभम् ।
आयुर्वेदाचार्यवर्यैर्नामार्कलवणं मतम् ॥ र. त. १६८–६९

सैंधवाचें चूर्ण करून त्यांत रुईचीं पानें मिसळून परळांत मातकापड करून अंतर्धुम अग्नीनें पचन करावे. स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावें. त्याचें चूर्ण करून ठेवावे. तें मळकट रंगाचें होते. त्याला अर्क लवण असें म्हणतात.

२ गुण

यकृप्लीहोदरहरं रुचिरं मलभेदनम् ।
विशेषतः समाख्यातं तत्रेऽर्कलवणं बुधैः ॥ र. त. १६९

अर्कलवणाचे गुण–यकृतवृद्धि, प्लिहावृद्धि यांचा नाश करणारे, रुचकर, शौचाला साफ करणारे असे अर्कलवणाचें गुण आहेत.

## बिडलवण

### १ नांवें

बिडं कृत्रिमकं चैव सुपाक्यं द्राविडं तथा ।
आसुरं च विटं चाथ धूर्तं च कृतकं मतम् ।

बिड, कृत्रिमक, सुपाक्य, द्राविड, आसुर, विट, धूर्त व कृतक ही बिडलोणाचीं नांवें होत.

### २ गुण

बिड रुच्यं च तीक्ष्णोष्णं सूक्ष्मं लघु च दीपनम् ।
सक्षारं हृद्यमूर्ध्वाधः कफवातानुलोमनम् ॥
अजीर्णानाहविष्टंभहरं शूलविबधजित्
हृद्गौरवप्रशमनं वातघ्नं च प्रकीर्तितम् ॥

बिडलोण हे रुचकर, तीक्ष्ण, ऊष्ण, सूक्ष्म, लघु, अग्नीदीपक, क्षारयुक्त, हृद्य, वर व खाली वाताचे अनुलोमन करणारें, अजीर्ण, आनाह, विष्टभ, शूळ यांचें निवारण करणारे तसेंच मलमूत्र साफ करणारे, हृदयाचा जडपणा व वातरोग यांचा नाशक आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

### ३ बिडलवणाची कृति

वस्वक्षिसेरकमितं लवणं रोमकाभिधम् ।
पञ्चाशच्चोलकमितं चूर्णमामलकोद्भवम् ॥
समादाय भिषग्वर्यस्ततः सम्मेलयेद्भृशम् ।
ततः खल्वस्य चूर्णस्य चतुर्थांशं विधानवित् ।
मृल्लिप्तायां क्षुद्रकण्ठयां हडिकायां तु विन्यसेत् ।
चुल्लिकायां निधायाथ विधानज्ञो भिषग्वरः ॥
प्रज्वाल्य तीव्रज्वलनं पचेद्धोराद्वयं भिषक् ।
हण्डिकाया मध्यभागो यावदायाति रक्तताम् ॥
क्षिपेत्ततः क्रमेणेह शेषं चूर्णं भिषग्वरः -
प्रखरेणानलेनाथ यामद्वितयमात्रकम् ॥
विपाचयेदविरतं रसतंत्रविधानवित् ।
स्वतः शीतेच लवणं बिडाख्यं तु समाहरेत् ॥
चतुर्विंशतिसंख्याकसेरकप्रमितं शुभम् ।
ततः सर्वेषु योगेषु योजयेद्भिषजां वरः ॥ र. त. १७०

रोमकलवण २८ शेर आवळ्याचें चूर्ण ५० तोळे, दोन्ही एकत्र खलांत घोटून तें चवथाई मिश्रण एका लहान, खालून मातकापड केलेल्या मडक्यांत टाकून तें चुलीवर ठेवून खाली तीव्र अग्नि लावावा. तें मडकें आंतून लाल झाले म्हणूजे बाकीचें चूर्ण थोडे थोडे टाकीत जावे. याप्रमाणे दोन तास तीव्र अग्नि लावावा. व सर्व चूर्ण टाकून त्याचें पचन झाल्यावर तें स्वांगशीत होऊं द्यावें. त्याला बिडलवण असें म्हणतात. त्या सर्व चूर्णांतून पचन झाल्यावर २४ शेर चूर्ण शिल्लक राहते. त्याचा सर्व योगांत उपयोग करावा.

## सौवर्चल लवण

### १ सौवर्चल लवण--नांवें

सौवर्चलं च रुचकं रुच्यकं हृद्यगंधकम् ।
अक्षं च कृष्णलवणं वै काललवणं स्मृतम् ॥　　र. त. १७१

सौवर्चलवणाचीं नांवें–सौवर्च, रूचक, रुच्यक, हृद्यगंधक, अक्ष, कृष्णलवण, काललवण, हीं सौवर्चलांचीं नांवें होत.

### २ गुण

सौवर्चलं मतं हृद्यं पाचनं दीपनं परम् ।
रोचनं भेदनं चापि विशदं वातनाशनम् ॥
सस्नेहं लघु गुल्मघ्नं तूर्ध्ववातानुलोमनम् ।
विबंधानाहशूलघ्नं जन्त्वरोचकनाशकम् ॥　　र. त. १७१

सौवर्चल हें हृद्य, पाचक, रुचकर, स्वच्छ, वातनाशक, सारक, स्निग्ध, लघु, गुल्मनाशक, शरीराचें ऊर्ध्वभागांत वाताचें अनुलोमन करणारे, मलमूत्राचें निःसरण करणारें, आनाह, शूळ, जंतु व अरुचि या सर्व रोगांचा नाश करणारे आहे.

### ३ सौंवर्चललवण निर्माणप्रकार

विशुद्धं स्वर्जिकाक्षारं चतुष्पलमितं हरेत् ।
द्रावयेदथ यत्नेन तोयेऽष्टपल संमिते ॥
यातीह द्रावतां यावान् तावन्तं सैंधवं ततः ।
सर्जिकाया द्रवे यत्नान्निक्षिपेद्भिषजां वरः ॥
ततः सुविमले पात्रे न्यस्य चुल्ल्यां निधापयेत् ।
पचेत्तीव्राग्निना कामं तोयं च परिशोषयेत् ॥
निःशेषं सलिलं ज्ञात्वा किंचित्कालं पुनः पचेत् ।
पाकशेषे च लवण रुचकाख्यं समाहरेत् ॥　　र. त. १७१

शुद्ध स्वर्जिकाक्षार चार पळें घेऊन तें आठ पळ पाण्यांत टाकून त्याचें द्रावण करावें. तें द्रवीभूत होईपर्यंत त्यांत थोडे थोडे सैंधव घालीत जावें. नंतर मिश्रण एका स्वच्छ भांड्यांत टाकून चुलीवर ठेवावें. व खाली तीव्र अग्नि लावावा. सर्व पाणी जळून जाईपर्यंत पचन करावें. सर्व पाणी आटल्यावर पुन्हा थोडा वेळ तीव्राग्नीने पचन करावें. पचन झाल्यावर जे राहील तें रुचकाख्य म्हणजे सौवर्चल लवण होय. तें काढून घ्यावें.

१ रोमक उत्पत्तिस्थान निर्वचनम्

यस्माज्जज्ञे विशेषेण रोमानद्यन्तिके पुरा ।
तस्माद्भिषज्वरैरेतद्रोमकं परिकीर्तितम् ॥
शाकंभर हृदोद्भूत जलाद्यस्मात्प्रजायते ।
तस्मादेतद्भिषग्वर्येर्मतं शाकंभरीयकम् ॥

रोमा नदीजवळ त्याची उत्पत्ति होते म्हणून त्याला रोमक असें म्हणतात. शाकांभरहृद (म्हणजे अजमीरच्या जवळपास सांबरे सरोवराच्या पाण्यापासून त्याची उत्पत्ति होते म्हणून त्याला शाकांभरीय असें म्हणतात.)

२ रोमक लवणाचीं नांवें

रोमकं रोमलवणं रौमंच रौमकं मतम् ।
शाकंभरी यंच गडं सांभरं संभरोद्भवम् ॥

रोमकलवणाचीं नांवें–रोमक, रोमलवण, रौमं, रौमकं, शाकंभरी, गडं, सांभरं संभरोद्भवम् हीं रोमकलवणांची नांवें होत.

३ गुण

सांभरं लवणं ख्यातं भेदनं दीपनं परम् ।
अत्युष्णं लघु तीक्ष्णं च कटुपाकि च पित्तलम् ॥
मलदोषहरं सूक्ष्मयर्शोघ्न वातनाशनम् ।
कफप्रणाशनं चैव विशदं कोष्ठशोधनम् र. त. १७२

सांभर लवण हें प्रसिद्ध आहे. तें सारक, अति अग्निदीपक, अति उष्ण, लघु, तीक्ष्ण, पाककाळी तिखट, पित्तकारक, मलदोषहारक, सूक्ष्म, अर्शनाशक, वातनाशक, कफनाशक, विशद व कोठ्याचें शोधन करणारें आहे.

## लवणद्रावक

१ नांवें

लवणद्रावकः ख्यातो लवणाम्लसमाव्हयः ।
पटुद्रावश्च कथितः पटुकद्रावकस्तथा ॥

लवणद्रावक, लवणाम्ल, पटुद्राव, पटुकद्रावक हीं लवण द्रावकाची नांवें आहेत.

२ लवणद्रावनिर्माणप्रकार

सुचूर्णितं सैंधवं तु भाजने भर्जयेद्भिषक् ।
जलीयांशे विनिष्क्रांते चुल्लितस्त्ववतारयेत् ।
षट्भागसंमितं चाथ भृष्टचूर्णितसैंधवम् ।
काचकुप्यां निधायाथ विधानज्ञो भिषग्वरः ॥
द्रद्रभागमितं चात्र गंधकद्रावकं शुभम् ।
शनैः शनैस्तु निक्षिप्य चुल्लिकायां निधापयेत् -
ततोऽस्यां काचनलिकामुखमेकं निवेशयेत् ।
अपरंच मुखं तस्यास्तोयपूर्णोरार्द्धके ॥
नोरपूरित पात्रस्थे काचकुंयेऽपरे न्यसेत् ।
अतिमन्दानलेनाथ पचेत्खलु विधानवित् ॥ र.त.पा. १७२
तिर्यङगनिपातितं चाथ बाष्परूपेण संचितम् ।
तोयाभं लवणद्रावं रसवैद्यः समाहरेत् ॥
सेवेत पंचबिदुभ्वो कलाविंदुमितं परम् ॥
लवणद्रावकस्तीक्ष्णो जाठराग्निप्रदीपनः
मूत्रदोषहरोबल्यो यकृतदोष निकृंततः ॥

सैंधवाचें चूर्ण करून तें एका भांडयांत घालून चुलीवर ठेवून खाली जाळ लावून भाजावे. त्यांतील पाण्याचा अंश जळून गेल्यावर तें भांडें चुलीवरून खाली उतरून घ्यावे. त्यापैकी भाजलेलें मीठ सहा भाग, एका काचकुपींत भरावें व ती काचकुपी चुलीवर ठेवून त्यांत अकरा भाग गंधक द्रावक थोडे थोडें टाकावें. नंतर एक कांचेची नळी घेऊन त्या नळीचें एक तोंड त्या चुलीवरील बाटलीचे तोंडांत घालावें व दुसरें टोक पाण्याने अर्धे भरलेल्या दुसऱ्या काचपात्राचें मुखांत घालावे. व तें अर्धे पाण्याने भरलेलें भांडें तिसऱ्या एका पाण्याने पूर्ण भरलेल्या काचपात्रांत ठेवावें. नंतर चुलीवर ठेवलेल्या काचकुपीला मंद मंद जाळ लावावा. तें पचन करावें म्हणजे त्याची वाफ होऊन त्या वाफेचे तीर्यक पातन होऊन ती वाफ अर्धे पाणी भरलेल्या काचपात्रांत जाईल. त्या ठिकाणीं त्या वाफेचें पाणी होईल त्याला लवणद्रावण असें म्हणतात.

सेवनमात्रा—पांच थेंबापासून १६ थेंबापर्यंत लवणद्रावक तीक्ष्ण जठराग्नीला प्रदीप्त करणारा मूत्ररोगनाशक, बलकारक व यकृतदोष नाहीसे करणारा आहे.

३ सजललवणद्रावकनिर्माणप्रकार

अनलनयनवर्त्म-प्राप्तसंख्याप्रमाणं
सलिलममलमादौ काचपात्रे निदध्यात् ॥
तदनु खलुविहायोयामिनी रत्नतुल्यं
विमललवणकाम्लं निक्षिपेद्वैद्यवर्यः ॥
अयमेव समाख्यातस्त्वायुर्वेद विशारदैः ।
सजलो लवणद्रावो विविधातंक नाशनः ॥ र. त. १७२

गाळून घेतलेलें पाणी २३ भाग घेऊन तें एका काचपात्रांत टाकावें. व त्यांत स्वच्छ लवणाम्ल १० तो. टाकावें. त्या मिश्रणाला सजल लवणद्राव असें म्हणतात. ते नाना प्रकारच्या रोगांचा नाश करिते.

४ सजललवणद्रावक गुण

लवणद्रावकस्तीक्ष्णो जाठराग्निप्रदीपनः ।
मूत्रदोषहरोबल्यो यकृद्दोषनिकृन्तनः र. त. १७२

लवण द्रावक हा तीक्ष्ण, जठराग्नीला प्रदिप्त करणारा, मूत्रदोष नाशक, बलकर व यकृताचें दोष नाहीसे करणारे आहे.

## लवणक्षार

Indira Gandhi National
Centre for the Arts

१ नांवे

अथस्त्यासैंधणे साधु सिंधूत्थं लवणोत्तमम् ।
मणिमंथं च विमलं शिलात्मकशिवे तथा र. का. धे. ३०८

लवणक्षाराचीं नांवें-सिंधुत्थं, लवणोत्तमं, मणिमंथं, विमलं शिलात्मक,

२ लवणक्षाराचें शोधन

लवणानि तथा क्षारान् शोभाञ्जनरसे क्षिपेत् ।
अम्लवर्गयुतेनादौ दिनं धर्मे निभावयेत् ॥
ततो वैशोलिकायंत्रे दिवसं पाचयेत्सुधी र. का. धे. ३१२

शेवग्याच्या सालीच्या रसांत पहिल्याने आम्लमर्ग द्रव्याचा रस घालून नंतर लवण वर्गांतील पदार्थ व क्षारीय द्रव्यें त्यांत मिसळावे. नंतर तें मिश्रण एक दिवस उन्हांत ठेवावें. नंतर तें एका मडक्यांत घालून पचन करावें.

३ लवणक्षाराचें गुण

जम्बीरबीजपूरकचांगेरीवेतसाम्लसंयोगात् ।
क्षारा भवंति सुतरां गर्भद्रुतिजारेणशस्ताः ॥

जंबीर निंबुचा रस, महाळुंगाचा रस, आंबडचुक्याचा रस. आम्लवेतसाचा रस हे सर्व एकत्र करून त्याचा क्षार तयार होतो. तो गर्भवतीचें उपयोगी आहे.

१ समुद्रलवणाचीं नांवें

**सामुद्रं लवणं ख्यातं समुद्रजलसंभवम् ।**
**समुद्रजं सागरजं मतं सामुद्र कंचतत् ॥** र.त. १६९

समुद्रलवणाचीं नांवें– सामुद्रं, लवणं, समुद्रजं, सागरजं, सामुद्रकं ही समुद्र- पत्ति समुद्राच्या पाण्यापासून होते.

२ गुण

**समुद्रलवणं हृद्यं रुच्यं स्निग्धं च दीपनम् ।**
**सक्षारं भेदि वातघ्नं नात्युष्णं नीतिशीतलम् ॥** र. त. १६९

समुद्रलवणाचे गुण–समुद्रलवण हे हृद्य, रुचकर स्निग्ध, अग्निदीपक, क्षारयुक्त, सारक, वातनाशक, फार उष्ण नाही व फार थंड नाही.

३ समुद्रलवणाचा परिचय

**समुद्रजलसंशोषाल्लवणं जायते तु यत् ।**
**सामुद्रं लवणं तत्तु समाख्यातं भिषग्वरैः ॥** र. त. १६९

समुद्राचें पाणी आटविले असता जे मीठ तयार होते, त्याला समुद्रलवण असें म्हणतात.

Indira Gandhi National Centre for the Arts

# तैलपातन विज्ञानीय

## अध्याय ६३ वा

### १ सर्वसाधारण तेल काढण्याचा विधि

पृथ्वीवर अनेक पदार्थ असे आहेत की ज्यांत तेलाचा थोडा बहुत अंश हा आहेच. कांही झाडांच्या पंचागामध्यें अथवा त्यांच्या फळांतील गिरामध्यें तेलाचा कांही अंश असतो. केव्हां केव्हां तेलाचें प्रमाण इतकें कमी असते की, त्याला वेगळे काढणे फार जड असते. कांही फारच थोडचा पदार्थांचें तेल अनुभवाने फार उपयुक्त झाले आहे.

ज्या पदार्थांत तेलाचें प्रमाण पुष्कळ असते, त्याला थंड अथवा गरम पाण्यांत भिजवून बारीक वाटून आणि पिळून तेल काढल्या जाते.

जसे तेली लोक तीळ, भुईमुग, एरंडबीज, रुई आणि सरसू इत्यादि पदार्थांपासून तेल काढतात.

ज्या पदार्थामध्यें तेलाचें प्रमाण मध्यम असते. आणि तेलही थोडचा प्रमाणांत निघते, व ते पदार्थंहि फार महाग असतात. अशा वेळीं त्या पदार्थाला बारीक कुटून अथवा दळून त्यापेक्षा चौपट पाण्यांत किंवा काढचांत अथवा दुसऱ्या कोणत्याहि द्रवांत त्याला टाकून मंदाग्नीवर ठेवून थोडा जाळ लावावा. असे केल्याने त्या पदार्थांमधील तेलाचा अंश द्रवापेक्षा हलका असल्या कारणाने द्रवावर तरंगू लागतो. तो काढून घेतात.

ज्या पदार्थांमधील तेलाचें प्रमाण अत्यंत कमी असेल तोही बारीक कुटून अथवा दळून त्याचा कल्क करून त्या कल्काच्या चारपट किंवा आठपट कोणत्या तरी उपयुक्त काढचांत तो कल्क टाकून त्यांत तिळाचें किंवा दुसरें कोणतेहि उपयुक्त तेल मिसळून काढचाचा पूर्ण अंश जाळून उक्त पदार्थाचे तेल काढावें.

हल्ली उक्त पदार्थांना बारीक करून रेक्टी फाईट स्पिरिट इत्यादिकांच्या बरोबर मंद अग्नीवर उकळून नंतर स्पिरिट गाळून घेऊन भट्टीच्या साहाय्याने त्याचें तिर्यक पातन केलें असतां भट्टीमधील पदार्थांत उक्त पदार्थांमधील तेलाचा अंश येतो.

वर सांगितलेल्या विधीचे विस्तृत वर्णन ह्या छोटचाशा ग्रंथांत करतां येत नाही. पाश्चात्य विज्ञानामध्ये या विषयावर अनेक मोठमोठे ग्रंथ लिहिलेलें आहेत. आयुर्वेदीय रसशास्त्रामध्यें फारच थोडचा प्रकारचीं तेलें उपयोगांत आणतात. त्यांना प्राप्त करण्याच्या संक्षिप्त विधीचें वर्णन पुढे दिलेलें आहे.

आयुर्वेदीय ग्रंथांमध्ये तैलपातन करण्याच्या तीन विधीं सांगितल्या आहेत. एक प्रकार सूर्याच्या उष्णतेच्या साहाय्याने तैलपातन केल्या जाते. दुसरा प्रकार उक्त पदार्थांच्या चूर्णाला कोणत्याहि द्रवांत मंदाग्नीवर उकळून तेल प्राप्त केले जातें. तिसऱ्या प्रकारांत कंदुक यंत्राप्रमाणे एखादे यंत्र अथवा तेलाच्या घाणीप्रमाणे एखादें मंत्र अशा यंत्राच्या सहाय्याने तेल काढल्या जाते. या विधीचें संक्षिप्त वर्णन पुढे केले आहे.

हिंदी डॉ. कुळकर्णीकृत (रसरत्न समुच्चय)

## २ तेल काढण्याचा विधी प्रकार १

मूलान्युत्तर वारुण्या जर्जरीकृत्य कांजिके ।
क्षिपेंदकोल्लबीजानां पेशिकां झर्झरीकृताम् ।
तत्तैलं धृतवत्स्यानं ग्राह्यं तत्तु यथाविधि ॥ र. र. स. पा. १२३–२४

थोर इंद्रवारुणीचीं मुळें आणून. ती कांजींत वाटून, त्यांत अंकोलाच्या बीजाची वस्त्रगाळ केलेली पूड घालून पुन्हां खलावें व फडक्यांत बांधून उन्हांत ठेवावें, म्हणजे कांही वेळाने तुपाप्रमाणें त्यांचें तेल खाली गळते. तें भांड्यांत धरून यथाविधि काढून घ्यावें.

प्र. २ अंकोलबीजसंभूतं चूर्णं समर्द्य कांजिकैः ।
एकरात्रोषितं तत्तु पिण्डीकृत्य ततः परम् ॥
स्वेदयेत्कन्दुके यंत्रे घटिकाद्वितयं ततः ।
तां च पिंडी दृढे वस्त्रे बद्ध्वा निष्पीड्य काष्ठतः ।
अधःपात्रस्थितं तैलं समाहृत्यं नियोजयेत् ।
एवं कंदुकयंत्रेण सर्वतैलान्युपाहरेत् ॥ र. र. स. पा. १२४

अंकोलाच्या बीजाचें चूर्ण कांजींत खलून, एक रात्र तसेंच ठेवून, नंतर त्याचा गोळा करून तो कंदुक यंत्रांत दोन घटका पचन करावा. नंतर तो गोळा एका बळकट कापडांत बांधून लाकडानें सडकून दानावा. व खालील भांड्यांत पडणारें तेल काढून घ्यावें. ह्याप्रमाणें ह्या कंदुक-यंत्राच्या साह्यानें सर्व तेलें काढून घ्यावीं.

## ३ कुचला जेपाळ यांचें तेल प्रकार १

प. ३ अपामार्गकषायेण तैलं स्याद्विषमुष्टिजम् ।
मूलक्वाथैः कुमार्याश्च तैलं जैपालजं हरेत् ॥ र. र. स. पा. १२५

आघाड्याच्या काढ्याच्या भावनेनें कुचल्याचें तेल निघतें व कुमारीच्या मुळाच्या काढ्याच्या भावनेनें जेपाळाचें तेल काढावें.

क्वाथै रक्तापमार्गस्थ बाकुची तैलमाहरेत् ।
कृष्णायाः काकतुंड्याश्च बीजचूर्णानि कारयेत् ।
कांतपाषाण चूर्णं च एकीकृत्य निरोधयेत् ।
धान्यराशिगतं पश्चादुधृत्य तैलमाहरेत् र. र. स. पा. १२५

तांबड्या आघाड्याच्या कषायानें बावच्याचें तेल काढावें. काळ्या कावळीच्या बीयांचें चूर्ण करून तें व कांतपाषाणाचें चूर्ण करून तें दोन्हीं मिसळून एकत्र करून तें वस्त्रगाळ करावें आणि नंतर धान्यराशींत तीन दिवस पुरून ठेवून काढावें. व त्याचे तेल निघतें तें काढून घ्यावें.

## ४ धोत्र्याच्या बियांचें तेल

धत्तूरबीजचूर्णानि वस्त्रपूतानि कारयेत् ।
समूलोत्तार वारुण्याः कषायेण बिलोडयेत् ॥
आलिप्य कांस्यपात्रं तु धारयेदातपे खरे ।
सुतप्तं वस्त्रपूतं च पातयेत्तैलमाहरेत् ॥
शिग्रुपुष्करबीजानां बीजस्य माकुचस्य च ।
ग्राह्यं धत्तूरजं तैलं क्वाथात्धर्मे समुद्धृतम् ॥
तथा सर्वत्र तैलानि संग्राह्याण्यौषधांतरेः । र. र. पा. ९४

धोतऱ्याचें बियांचें चूर्ण वस्त्रगाळ करून मुळासह कडुइंद्रावणाच्या काढ्यांत खलून काशाच्या भांड्यास लिपावें व तें भांडें प्रखर उन्हांत ठेवावें. तें चांगलें तापल्यावर वस्त्रांतून पिळून तेल काढून घ्यावें. ह्याच धोतऱ्याच्या बियांच्या तेल काढण्याच्या कृतीने शेवग्याचें बी. पोखरमुळाचें बी व भांगेचें बी ह्याचें तेल वेगवेगळे काढून घ्यावें ज्याप्रमाणें काढा करून अगर उन्हाच्या साह्यानें तेल काढावयाचें त्याचप्रमाणें सर्व तेलें निरनिराळ्या औषधींची काढून घ्यावीं.

## ५ अंकोलादिकांचें तेल काढण्याची रीत

अंकोटस्यापि तैलं स्यात्काकतुंड्या समूलया ।
बाकुचीदेवदाल्याश्च कर्कोटीमूलतो भवेत् ॥
अपामार्गकषायेण तैलं स्याद्विषतुंडजम् ।
मूलक्वाथैः कुमार्यास्तु तैलं जैपालजं भवेत् ॥
क्वाथेन रक्तमार्गस्य बाकुची तैलमाहरेत् ।
क्वाथेनचेंद्र वारुण्यास्तैलमारग्वधं भवेत् ॥
काकतुंड्यापामार्गोत्थ क्वाथातैलं समाहरेत् ॥ र. त. पा. ९४ ९५

अंकोलाच्या बियांचें तेल काकतुंडीच्या मुळांच्या साह्याने काढावें. बावची व देवडांगरी यांच्या बियांचें तेल कार्टोलीच्या मुळ्यांच्या साह्याने काढावें.

कुचल्याच्या बियांचें तेल आघाड्याच्या मुळांच्या काढ्यांच्या साह्याने काढावें.

कोरफडीच्या मुळचांच्या साह्याने बावचीच्या बियांचें तेल काढावे.
कटुइंद्रावर्णाच्या मुळांच्या साह्याने बाहव्याच्या मुळांचे तेल काढावें.
काकतुंडीच्या बियांचें तेल आघाडयाच्या काढयाच्या योगाने काढावें.

**अपक्वभानुपत्राणां रसमादाय भावयेत् ।**
**समस्तबीजचूर्णं च ह्युक्तानुक्तं पृथक् पृथक् ।।**
**आतपे मुच्यते तैलं साध्यासाध्ये न संशयः ।।** र. चं.

रुईचीं हिरवीं पानें आणून त्यांचा रस काढून त्या रसाच्या कोणत्याहि औषधींच्या बीजाच्या चूर्णाला भावना देऊन ते उन्हांत ठेवावें म्हणजे त्यांचें तेल निघते.

## ६ मालकांकोणीचें तेल काढण्याचा विधि

मालकांकणीचें बी गंधा बिजोरा, लवंग, जायफळ जायपत्री, हे समानप्रमाणांत घेऊन बारीक कुटून बुडाला छिद्रें असलेल्या अशा एका मजबूत मातीच्या भांडयांत ठेवून द्यावे. आणि त्या भांडयाला दुसऱ्या भांडयाच्या तोंडावर ठेवून पहिल्या भांडयाचें बूड आणि दुसऱ्या भांडयाचें तोंड यांचा मातकापडाने मजबूत संधिलेप करावा. नंतर वरच्या भांडयाचें तोंड शरावानें झांकून त्याला मातकापड करावें. त्य नंतर जमिनींत एक खड्डा खोदून खालच्या भांडयाला त्या खड्डयांत ठेवावें. व वरच्या भांडयाच्या चारहि बाजूला गोवऱ्या लावून त्यांना पेटवुन द्यावे. असे केल्याने भांडयाच्या तळाशीं असलेल्या छिद्राच्या मार्गानें वरच्या भांडयांतील संपूर्ण तेलाचा अंश खालच्या भांडयांत उतरून त्या भांडयाच्या तळाशीं द्रवरूपांत एकत्र होतो. हे तेल मालकांकोणीचे तेल या नांवानें विकल्या जाते. वास्तविक फक्त मालकांगणीपासूनहि तेल काढता येतें. तेल काढण्याचा हा फक्त एकच प्रकार झाला.

----

# भूनाग सत्त्वपातन विज्ञानीय

## अध्याय ६५

### १ भूनागसत्व (दानवी ज्वरसत्व) प्रकार १

धौतभूनाग संभूतं मर्दयेद्भृंगजद्रवैः ।
निंबुद्रवैश्च निर्गुण्ड्याः स्वरसैस्त्रिदिनं पृथक् ।
तद्द्रावणगणोपेतं संमर्द्य वटकीकृतम् ।
निरुध्य दृढमूषायां द्विदंडं प्रधमेद्दृढम् ॥
स्वतः शीतं समाहृत्य पट्टके विनिवेश्यतत् ।
खकान्राजिकातुल्यात्रेणूनतिभरान्वितान् ॥
द्वादशांशार्कं सयुक्तान्धमित्वा खकान्हरेत् ॥
प्रक्षाल्य खकानाशु समादाय प्रयत्नतः ।
वज्रादिद्रावणं तेन प्रकुर्वीत यथेप्सितम् ॥
खरसत्त्वमिदं प्रोक्तं रसायनमनुत्तमम् ।
द्वित्रिमू ा    कस्थां सत्त्वं भवति निश्चयः ॥ र.    र. स. पा. १२२

धुतलेल्या भूनागाचें वाळवून चूर्ण करून तें माक्याच्या रसांत तीन दिवस खलावें. नंतर लिंबाच्या रसांत व निर्गुडीच्या रसांत वेगवेगळे तीन दिवस खलावें. नंतर द्रावणवर्गातील औषधांशीं खलून त्याची वडी करावी व मुशींत घालून मुखमुद्रा करून दोन घटका तीव्राग्नीने पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर काढून पाटयावर ठेवावें. व त्यांतील मोहरीसारखें वजनदार असें कण घेऊन तें आणि द्वादशांश ताम्र एकत्र करून मुशींत घालून फुंकावें, म्हणजे सतेज कणांसहीत असें सत्व तयार होतें. तें लागलेंच धुवून घ्यावें आणि मग त्यांच्या संयोगाने हिरा आदि करून द्रव्याचें द्रावण करावें. ह्याला खरसत्व म्हणतात. हें उत्तम रसायन आहे. दोन, तीन अथवा एक मुशींत म्हणजे एकदां अगर तीनदा मुशींत घालून फुंकल्याने निश्चयानें सत्व निघतें.

भुजंगमानुपादाय चतुप्रस्थसमन्वितान् ।
सुवर्णरुप्यताम्रायस्कान्तसंसूति भूमिजान् ॥
प्रक्षाल्य रजनी तोयैः शीतलैश्च जलैरपि ।
उपेषितं मयूरं वा शूरं वा चरणायुधम् ।

क्रमेण चारयित्वाऽथ तद्विष्ठां समुपाहरेत् ॥
क्षाराम्लैः सह संपेष्य विशोष्य च खरातपे ।
ततः खर्परके क्षिप्त्वा भर्जयित्वा मषीं चरेत् ॥
मषीं द्रावणवर्गेण संयुक्तां संप्रमर्दिताम् ।
निरुध्य कोष्ठिकामध्ये प्रधमेद्धटिकाद्वयम् ॥
शीतलीभूतमूषाया खोटमाहृत्य पेषयेत ।
प्रक्षाल्य खकानाशु समादाय प्रयत्नतः ।
सुवर्णमानवद्ध्मा वा नवं कृत्वा नियोजयेत् ॥ र. र. स. पा. १२२–२३

सोनें, रूपें, तांबें, लोखंड व कांत (लोहचुंबक) यांच्या खाणींत उत्पन्न झालेलें भूनाग (दानवी) चार प्रस्थ (२५६ तोळे) आणून हळदीच्या काढयानें व थंड पाण्यानें धुवून उपोषित ठेविलेल्या मोरास अगर उपोषित अशा तरुण कोंबडयास चारून त्याची विष्ठा घ्यावी व ती क्षार (टांकणखारादि) आम्ल (लिंबाच्या वगैरे) रसांतून घोटून उन्हांत वाळवावी. नंतर खापरांत घालून जाळून राख करावी. आणि ती राख द्रावणवर्गातील औषधांशीं खलून मुशींत घालून तोंड बंद करून दोन घटका अग्नींत ठेवून फुंकावें व थंड झाल्यावर काढून खलावें. व लागलीच धुवुन त्यांतील कण काढून आणून फुंकून स्वच्छ करून घ्यावेंत.

Indira Gandhi National Centre for the Arts

२ भूनागसत्वपातन प्रकार

ताम्रभूभव भूनागान्निशापिष्टान् समेन तान् ।
गुडगुग्गुलु लाक्षोर्णा मत्स्य पिण्याक टंकणैः ॥
दृढमेतैश्च संयोज्य मर्दयित्वा धमेद् सुखम् ।
मुंचति ताम्रवत सत्वं ते पक्षा अपि बर्हिणाम् ॥ आ. प्र. पा. ३७८

तांब्याच्या खाणींपासून निघालेलें भूनाग यांचें समभाग हळदीचें चूर्ण घेऊन त्यांत गुळ, गुग्गुळ, लाख, मासोळी, पेंड (ढेप) व सुहागा मिळवून सर्वांचा एकच खल एकत्र खल करावा नंतर तें एका परळांत ठेवून भट्टींत घालून भात्यानें फुंकावें म्हणजे भूनागाचें तांब्याच्या रंगाचें सत्व निघतें. याच प्रकारानें मोराच्या पंखाचेंहि सत्व निघतें.

३ भूनागाची उत्पत्ति व प्रकार

भूनागो वज्रमारः स्थान्ताना विज्ञानकारकः ।
रसस्य जारणे प्रोक्तं तत् सत्वं तु रसायनम् ॥
वर्षासु वृष्टि संक्लिन्न भूगर्भे संभवंति हि ।
जंतवः कृमिरूपा ये ते भूनागा इति स्मृताः ॥
चतुर्विधास्तु भूनागाः स्वर्णादि खनि संभवाः ।
स्वर्णभूमि भवाः पीता रूप्यभूमिभवाः सिताः ॥

ताम्रभूमिभवास्ताम्राः कृष्णा लोहमयी भवाः ।
रसेंद्रप्राणरूपास्ते भूनागाः सिद्ध संमताः ॥
स्वर्णादिभूमिसंभूता दुर्लभास्ते प्रकीर्तिताः ।
ताम्रभूमिभवा प्रायः सुलभा गुणवत्तराः ॥ आ. प्र. पा. ३७८

भूनाग हिऱ्याला मारणारा, अनेक विज्ञानकारक, त्याचे सत्व पारद जारणे-करिता उपयोगी, तसेच रसायन आहे. वर्षाऋतुतींल वृष्टीमुळे जमिनीवर, शेतांत, चिखलांत कृमीचें आकाराचे जे जंतु उत्पन्न होतात त्याला भूनाग असे म्हणतात. स्वर्णादिकांच्या वेगवेगळया खाणींतून त्यांची उत्पत्ति होत असल्यामुळे भूनाग चार प्रकारचे मानतात. सोन्याच्या खाणींत उत्पन्न होणारे रंगाने पिवळे असतात. चांदीचे खाणींतील पांढरे, तांब्याच्या खाणींतील लाल व लोहाचे खाणींतील भूनाग रंगाने काळे असतात. सिद्ध मताने भूनाग हे पाऱ्याला प्राणरूप आहे. सुवर्ण आदि भूमितील भूनाग दुष्प्राप्य व गुणाने अधिक असे मानतात.

## ४ भूनागसत्वमारण

भूनागसत्वं पलसंमितं तु
रसेश्वरं द्वयक्षमितं च शुद्धम् ।
पलोन्मितं शुद्धसुगंधचूर्णं
दत्वा पुटेद् वन्यकरीष वन्हौ ॥
भूनागसत्त्वं पुटितं त्रिधैवं
त्वनुत्तमां याति मृतिं निकामम् । र. त. पा. २०८

Indira Gandhi National

भूनागसत्व एक पळ, पारा दोन तोळे शुद्ध, शुद्ध गंधक एक पळ सर्वांची एकत्र घोटून कज्जली तयार करावी. नंतर त्याला रानगोवऱ्याचे पुट द्यावें. अशीं तीन पुटें द्यावीत म्हणजे भूनागाचे उत्तम भस्म होते.

## ५ भूनाग सत्वाचे गुण

शीतं भूनागसत्वं तु सर्वकुष्ठव्रणव्रणुत् ।
तद्युक्त जलपानेन स्थावरं चापि जंगमम् ॥
विषं नश्यति, तत् पात्रगतः सूतोऽग्नितो दृढम् ।
एवं मयूरपक्षोत्थ सत्वस्यापि गुणा मताः ॥ आ. प्र. पा. ३७९

भूनागाचें सत्व हें शीतल, संपूर्ण कुष्ठाचा नाश करणारे व या सत्वाबरोबर पाणी पिण्यानें स्थावर व जंगम असें दोन्ही प्रकारचे विष नष्ट होतें. ह्या सत्वाच्या भांड्यांत पाऱ्याला ठेवून तें अग्नीवर ठेविलें तर तो पारा बद्ध होतो. हे वरील सर्व गुण मोराच्या पंखांतहि आहेत.

### ६ भूनागसत्वाचें प्रयोजन

वज्राणां द्रावणार्थाय सत्वं भूनागजं ब्रुवे ।
तदेव परमं तेजः सूतराजेंद्र वज्रयोः ॥ र. र. स. पा. १२१

हिऱ्याच्या द्रावणाकरितां भूनागाचे ( गांडोळाचे ) सत्व कसें काढावें तें सांगतो कारण पारद व व्रज यांचें तें परमतेज आहे.

### ७ भूनागसत्वाच्या भस्माचे गुण

भूनागसत्वं सुमृतं तुवरं कुष्ठनाशनम् ।
विषघ्नंच विशेषेण ताम्रवद्गुणकारकम् ॥ र. त. पा. २०९

भूनागसत्वाचें भस्म हें तुरट, कुष्ठनाशक, विषनाशक असून ताम्राप्रमाणे गुणकारक आहे.

### ८ भूनाग सत्वाचा रोगावर उपयोग

भूनागसत्वं मतिमान् ताम्रवत् विनियोजयेत् ।
ताम्रवत् चानुपानानि सहपानानि चादिशेत् ॥ र. त. पा. २०९

भूनागसत्वाचा ताम्रभस्माप्रमाणें उपयोग करावा. ताम्रभस्माप्रमाणेच त्याचेंहि अनुपान व सहपान जाणावे.

### ९ मोराच्या पंखाचें सत्वपातन

भूनाग सत्वमार्गेण सत्वं मायूरपक्षजम् ।
निपातयेत् मारयेच्च रसतंत्र विचक्षणः ॥
भूनागसत्ववत् चास्य गुणान् खलु समादिशेत् ।
आमयेषु च यत्नेन ताम्रवद्विनियोजयेत् ॥ र. त. पा. २०१

मोराच्या पिसाचें सत्व भूनागाच्या सत्वाप्रमाणें काढावें व त्याचप्रमाणे त्याचें भस्महि करावें. त्याचें गुणहि भूनागसत्वाप्रमाणें असून ताम्रभस्माप्रमाणेच रोगामध्यें त्याचा उपयोग करावा.

---

अध्याय ६६

# चरक, सुश्रुत व वाग्भट ह्या ग्रंथांतील पारा व धातु संबंधींचे उतारे

Indira Gandhi National Centre for the Arts

# चरक, सुश्रुत व वाग्भट ह्या ग्रंथांतील पारा व धातु संबंधीचे उतारे

## अध्याय ६५

चरक, सुश्रुत, अष्टांगहृदय, या प्राचीन ऋषिप्रणीत ग्रंथांत पारा, गंधक, धातू, महारसादि रत्नें, इ. द्रव्यांचा उपयोग ज्या ज्या ग्रंथांत सांगितला आहे त्या ग्रंथाचें नांव, प्रकरण, अध्याय व रोग या संबंधीची माहिती या परिशिष्टांत सांगितली आहे.

| अ. नं. | पदार्थाचें नांव | ग्रंथाचें नांव | कोणत्या भागांत | रोग | उपयोग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खाणें | बाह्य उपयोग |
| १ | पारा | चरक | चि. अ. ७ श्लोक ६९–७० | कुष्ट | खाणें | लावणे किंवा अंजन. |
| | | सुश्रुत | चि. अ. २५ श्लो. ३९ | वांग | | अभ्यंग घृतकल्क |
| | | वाग्भट | उ. अ. १३ श्लो. ३१ | नेत्ररोग | | अंजन. |
| | | ,, | उ. स्था. अ. ३२ श्लो. ३१–३२ | वांग मुखविकार,क्षुद्ररोग | | लावणे |
| | | ,, | उ. स्था. अ. ३९ श्लो. १६२ | रसायन | खाणे | |
| २ | गंधक | चरक | चि.स्था.अ. १७ श्लो. १२२ | श्वास हिक्का | खाणें | |
| | | ,, | चि. अ. ७ श्लो. ६८ ते ७२ | कुष्ट | खाणे | |
| | | वाग्भट | चि. अ. १९ श्लो. ७२ | ,, | | लावणे |
| | | ,, | चि. अ. १९ श्लो. ६७ | ,, | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ श्लो. ३१–३२ | तिमिर | | लावणे, अंजन |
| ३ | अभ्रक | ,, | चि. अ. ८ | अर्श | | अभ्यंग |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | माक्षिक | चरक | चि. अ. ७ श्लो. ६८, ६९ | कुष्ट | खाणे | |
| | | ,, | ,, १६ ,, ७१–७६, ८० | पांडुरोग | खाणे | |
| | | ,, | ,, २६ ,, २४३ | नेत्ररोग | | लावणे |
| | | ,, | ,, २९ ,, १५७ | वातरक्त | खाणे | |
| | | सुश्रुत | ,, ९ ,, ६ | कुष्ट | | लेप |
| | | ,, | ,, ९ ,, २५ | पांढरे कोड | | लेप |
| | | ,, | चिकित्सास्थान अ. २८ श्लो. २१ | रसायन | खाणे | |
| | | ,, | उ. स्था. अ. १२ श्लो. १६ | नेत्ररोग | | लावणे |
| | | ,, | ,, १७ ,, ४३ | दृष्टिगत रोग | | अंजन |
| | | ,, | ,, ४४ ,, २३ | पांडुरोग | खाणे | |
| | | ,, | ,, ४४ ,, ३१ | कुंभकामला | खाणे | |
| | | वाग्भट | चि. अ. १६ श्लो. २० | पांडुरोग | खाणे | |
| | | ,, | ,, १८ ,, ३० | विसर्प | खाणे | |
| | | ,, | उ. स्था. अ. १ ,, ७/९ | बालोपचार | खाणे | |
| | | ,, | ,, १ ,, २३ | बालोपचार | खाणे | |
| | | ,, | ,, १३ ,, १६ | तिमिर | | अंजन |
| | | ,, | ,, १३ ,, २९ | तिमिर | | अंजन |
| | | ,, | ,, १३ ,, ४४ | कांच रातांधळे | | अंजन |
| | | ,, | ,, ३५ ,, ५३ | गरविष | खाणे | |
| | | ,, | ,, ३९ ,, १६२ | रसायन | खाणे | |
| ५ | शिलाजित | चरक | चि. अ. १ पाद ३ श्लो. १७ | | | |
| | | ,, | ,, ५ श्लो. ९३ | गुल्म | खाणे | |
| | | ,, | ,, १३ ,, १४८ | उदर | खाणे | |
| | | ,, | ,, १६ ,, ७९ | पांडुरोग | | अभ्यंग |
| | | ,, | ,, २९ ,, १५८ | वातरक्त | खाणे | |
| | | सुश्रुत | ,, ५ ,, ३५ | महावात व्याधी | खाणे | |

Indira Gandhi National Centre for the Arts

| अ. नं. | पदार्थाचे नांव | ग्रंथाचे नांव | कोणत्या भागांत | रोग | उपयोग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खाणे | बाह्य उपयोग |
| ५ | शिलाजित | सुश्रुत | चि. अ. ७ श्लो. ११ | अश्मरी | खाणें | |
| | | ,, | ,, ९ ,, ६ | कुष्ट | • | अयस्कृती |
| | | ,, | ,, १३ ,, ४ | मधुमेह | खाणें | |
| | | ,, | ,, १६ ,, ३१ | विद्रवी | खाणें | |
| | | ,, | ,, १९ ,, ४५ | उपदंश | | लेप |
| | | ,, | उ. स्था. अ. १२ श्लो. १३ | रक्ताभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | उ. तंत्र अ. ४४ श्लो. ३१ | कुंभकामला | खाणें | |
| | | वाग्भट | चि. अ. १४ श्लो. ५१ | गुल्म | पिणें | |
| | | ,, | ,, १६ ,, २० | पांडुरोग | पिणें | |
| | | ,, | ,, १९ ,, ४८ | कुष्ट | खाणें | |
| | | ,, | ,, २१ ,, ४९ | वातव्याधी | खाणें | |
| | | ,, | ,, २२ ,, ६५ | वातरक्त | खाणें | |
| | | ,, | उ. स्था. अ. ३९ श्लो. ७९ | रसायन | खाणें | |
| | | ,, | उ. स्था. अ. ३९ श्लो. १६२ | रसायन | खाणें | |
| ६ | मोरचुत | चरक | चि. अ. २६ श्लोक २४३ | नेत्ररोग | | अंजन |
| | | सुश्रुत | सु. अ ३८ श्लोक ३८ | मूत्रशर्करा, गुल्म | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १ श्लोक ९७ | व्रण | | लावणें |
| | | ,, | ,, २ ,, ८२ | ,, | | लावणें |
| | | ,, | ,, ९ ,, १० | कुष्ट | | लेप |
| | | ,, | ,, ९ ,, २७ | श्वेत कुष्ट | | लेप |
| | | ,, | ,, १९ ,, ४०।४१ | उपदंश | | लेप |

Indira Gandhi National Centre for the Arts

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सुश्रुत | चि. अ. १९ श्लो. ४५ | उपदंश | | लेप |
| | | वाग्भट | उ. अ. ३४ ,, ४ | उपदंश | | लेप |
| ७ | गेरु | चरक | चि. अ. ४ ,, ७१-७३ | रक्तपित्त | खाणें | |
| | | सुश्रुत | चि. अ. १९ ,, ४०-४१ | उपदंश | | लेप |
| | | ,, | उ. स्था. अ. १२ श्लो. १६ | रक्तभिष्यंद | | लावणें |
| | | ,, | उ. स्था. अ. १७ ,, ६-७ | दृष्टिगत रोग | | लावणें |
| | | :, | उ. स्था. अ. ४४ ,, २१ | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | उ. स्था. अ. ५० ,. १९ | हिक्का | खाणें | |
| | | वाग्भट | उ. स्था. अ. ३२ ,, ३१ | क्षुद्ररोग | | लावणें |
| | | ,, | उ. स्था. अ. ३४ ,, ४ | उपदंक्ष व्रण | | लावणें |
| | | ,, | उ. स्था. अ. ३४ ,, ४६ | गुह्यरोग | | लावणें |
| ८ | हिराकस | चरक | चि. अ. ७ ,, १११-११४ | कुष्ट | | लावणें |
| | | ,, | चि. अ. ३० ,, ७६ | योनिव्यापद | | लावणें |
| | | सुश्रुत | चि. अ. ३७ ,, २८ | शोफ | | बाह्यप्रयोग |
| | | ,, | चि. अ. १ ,, ५८ | व्रण | | लावणें |
| | | ,, | चि. अ. १ ,, ९६ | व्रण | | लेप |
| | | ,, | चि. अ. ६ ,, १२ | अर्श | | लेप |
| | | ,, | चि. अ. ८ ,, ३९-४० | भगंदर | खाणें | शोधन |
| | | ,, | चि. अ. ९ ,, १० | कुष्ट | | लेप |
| | | ,. | चि. अ. ९ ,, ५५ | कुष्ट | | लावणें |
| | | ,, | चि. अ. १९ ,, ४५ | उपदंश | | लावणें |
| | | ,, | उतरतंत्र अ, ११ श्लो. १५ | नेत्ररोग | | अंजन |
| | | वाग्भट | चि, अ. १८ श्लो. २६ | विसर्प | | लेप |
| | | ,, | चि. अ. १९ ., ६७ | कुष्ट | | लेप |
| | | ,, | चि, अ. १९ ,, ७१ | कुष्ट | | लेप |

Indira Gandhi National Centre for the Arts

| अ. नं. | पदार्थाचें नांव | ग्रंथाचें नांव | कोणत्या भागांत | रोग | उपयोग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खाणें | बाह्य उपयोग |
| ८ | हिराकस | वाग्भट | चि. अ. १९ श्लो. ७३ | कुष्ट | | लेप |
| | | ,, | उ. स्था. अ. ९ ,, २३ | वर्त्मरोग | | चोळणें |
| | | ,, | उ. स्था. अ. ११ ,, ५ | नेत्ररोग | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. ३२ ,, १२ | क्षुद्ररोग | | लावणें |
| | | ,, | उ. स्था अ. ३४ ,, ५ | उपदंश | | लावणे |
| | | ,, | उ. स्था. अ. ३४ ,, ५१ | योनीरोग | | लावणें |
| ९ | तुरटी | चरक | चि. अ. ७ ,, १११ | कुष्ट | | लावणे |
| | | ,, | चि. अ. ३० ,, ९६ | योनिव्यापद | | लावणें |
| | | सुश्रुत | सु अ. ३७ ,, १४ | व्रण | | शोधन |
| | | ,, | चि. अ. १ ,, ५८ | व्रण | | लेप |
| | | ,, | चि. अ. १९ ,, ४०-४१ | उपदंश | | लावणें |
| | | वाग्भट | उ स्था. अ. ३४ श्लो. ५ | उपदंश | | लेप |
| १० | हरताळ | चरक | चि. अ: १८ श्लो. ७२ | कास | धूम्रपान | |
| | | ,, | चि. अ· २६ ,, १८४ | कंठरोग | खाणें | |
| | | ,, | चि. अ. ७ ,, १११ | कुष्ट | | लावणे |
| | | सुश्रुत | चि, अ. १ ,, ५९-६० | व्रण | | लेप |
| | | ,, | चि.अ. १ ,, ९६ | व्रण | | लेप |
| | | ,, | चि. अ. १ ,, १०४ | केस गळणें | | लावणें |
| | | ,, | चि. अ. ६ ,, १२ | अर्श | | लावणें |
| | | ,, | चि.अ.९ ,, १० | कुष्ठ | | लावणें |
| | | ,, | चि.अ.९ ,, २७ | श्वेत कुष्ट | | लावणें |
| | | ,, | चि.अ.९ ,, ५५ | कुष्ट | | लावणें |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | हरताळ | सुश्रुत | चि. अ. १९ श्लो. ४०।४१ | उपदंश | | लावणें |
| | | ,, | चि. अ. १९ ,, ४६ | उपदंश | | लावणे |
| | | ,, | चि. अ. २० ,, ६ | क्षुद्ररोग | | लावणें |
| | | ,, | चि. अ. २० ,, २८ | क्षुद्ररोग | | लावणें |
| | | ,, | चि. अ. २५ ,, ३८ | पलित | | लावणें |
| | | वाग्भट | चि. अ. ३ ,, ६७ | कास | धूम | |
| | | ,, | चि. अ. ८ ,, ६७ | अर्श | | अभ्यंग |
| | | ,, | चि. अ. १९ ,, ८१ | कुष्ट | | लावणें |
| | | ,, | चि. अ. २० ,, १३ | श्वित्रकृमि | | लेप |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ श्लोक ३१ | तिमिर | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. ३२ श्लोक ३१ | क्षुद्ररोग | | लावणे |
| | | ,, | उ. स्था. अ. ३७ श्लोक ३५ | वृश्चिक विष | | लावणे |
| | | ,, | उ. स्था. अ. ३४ | योनिरोग | | नस्य, अंजन |
| ११ | मनशीळ | चरक | चि. अ. २६ श्लो. ९७ | हृद्रोग | खाणे | |
| | | ,, | चि. अ. २६ ,, २४५ | नेत्ररोग | | अंजन |
| | | ,, | चि. अ. २६ ,, २४३ | नेत्ररोग | | अंजन |
| | | ,, | चि. अ. १८ ,, ६९ ७१,७२,१४४,१४५ | | खाणे | |
| | | सुश्रुत | चि. अ. १ ,, ५८ | व्रण | | लेप |
| | | ,, | चि. अ. ९ ,, १० | कुष्ट | | लेप |
| | | ,, | चि. अ. ९ ,, ५५ | श्वेतकुष्ट | | लेप |
| | | ,, | चि. अ. १९ ,, १८ | वृद्धि उपदंश | | लेप |
| | | ,, | चि. अ. १९ ,, ४० | उपदंश | | लावणें |
| | | ,, | चि. अ. १९ ,, ४६ | उपदंश | | लावणें |
| | | ,, | चि. अ. १९ ,, ४७ | उपदंश | | लावणें |
| | | ,, | चि. अ. २० श्लो, ६ | क्षुद्ररोग | | लावणें |
| | | ,, | चि. अ. २५ ,, ३८ | पलित, खलत मुख विकार | | लावणें |

| अ. नं. | पदार्थाचे नांव | ग्रंथाचे नांव | कोणत्या भागात | रोग | उपयोग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खाणें | बाह्य प्रयोग |
| | | सुश्रुत | उ. स्था. अ. ११ श्लो ७।८ | अभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १२ ,, १६ | रक्ताभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १७ ,, ९।७ | दृष्टितरोग | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १७ ,, ४३ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १७ ,, ९८ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १८ ,, १०० | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. ४९ | हिक्का | धूम | |
| | | वाग्भट | चि. अ. ३ श्लो. ६७ | कास | धूम | |
| | | ,, | चि. अ. ३ ,, १४८ | ,, | धूम | |
| | | ,, | चि. अ. ६ ,, २० | ओकारी | खाणें | |
| | | ,, | चि. अ. ८ ,, | मुळव्याध | | अभ्यंग |
| | | ,, | उ. स्था. अ. ३२ श्लो १ | क्षुद्ररोग | | लेप |
| | | ,, | चि. स्था. अ. १९ श्लो. ६७ | दद्रु | | लेप |
| | | ,, | चि. स्था. अ. १९ श्लो. ७१ | कुष्ट | | लावणें |
| | | ,, | चि स्था अ. १९ श्लो. ७३ | ,, | | लावणें |
| | | ,, | उ. स्था अ. ९ श्लो. २३ | वर्त्मरोग | | लावणें |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ श्लो. २९ | तिमिर | | लावणें |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ श्लो. ७० | काच शतांधळे तिमिर | | लावणें |
| | | ,, | उ. स्था. अ. ३४ श्लो. ४ | उपदंश व्रण | | लावणें |
| | | ,, | उ. स्था. अ. ३७ श्लो. ४४ | वृश्चिक विष | | नस्या, अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. ३७ श्लो. ७३ | ,, | | लेप |
| १२ | अंजन | चरक | चि. अ. १७ श्लो. १२२ | हिक्का, श्वास | खाणे | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | अंजन | चरक | चि. अ. १७ श्लो. १२५ | तिमिर, काच | | लावणें |
| | | ,, | ,, २६ ,, १९४ | नेत्ररोग | | वर्ती |
| | | ,, | ,, २६ ,, २४४ | ,, | | अंजन |
| | | ,, | सु. अ. ५ ,, १२,१६ | | | अंजन |
| | | ,, | चि. अ. २६ ,, २४३, २४४ | | | अंजन |
| | | सुश्रुत | ,, ९ ,, २५ | श्वेतकुष्ट | | लावणें |
| | | ,, | ,, १९ ,, ४५ | उपदंश | | लावणें |
| | | ,, | ,, १९ ,, ४०, ४१ | ,, | | लावणें |
| | | ,, | उ.स्था.अ.४४ श्लो. २१ | पांडुरोग | खाणें | |
| | | वाग्भट | ,, १३ ,, २६ | तिमिर | | अंजन |
| | | ,, | ,, १३ ,, २९ | तिमिर | | अंजन |
| | | ,, | ,, १३ , ६६ | तिमिर | | अंजन |
| | | ,, | ,, ३५ ,, २४ | विषदोष | पान | नस्य अंजन |
| १३ | कंकुष्ट | सुश्रुत | सु. अ. २८ ,, १३ | | | |
| १४ | सोमल | ,, | क.स्था.अ.२ ,, ५ | | | |
| | | चरक | चि. अ. १७ ,, १३८–३९ | | | |
| १५ | हिंगुळ | वाग्भट | उ.स्था.अ. ३७ | वृश्चिक विष | | लावणें |
| १६ | सोने | चरक | चि. अ. १ | रसायन | खाणें | प्र.पाद श्लो.५८ |
| | | ,, | ,, २१ ,, २१ | ,, | खाणें | तृ. पाद श्लो. १६१७ |
| | | ,, | ,, ७ ,, ६८-६९, ७०-७२ | कुष्ट | खाणें | चतुर्थपाद |
| | | ,, | चि.स्था.२३ ,, २३६, २३७ | विष | खाणें | |
| | | सुश्रुत | चि. अ.२८ ,, १५, १६ | रसायन | खाणें | |
| | | ,, | ,, २८ ,, २१ | ,, | खाणें | |
| | | ,, | उ.स्था.अ.१० ,, ८, १५ | अभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | ,, १८ ,, ६१ | दृष्टीगतरोग | | अंजन |
| | | ,, | ,, ४८ ,, १८ | तृष्णा | खाणें | |

Indira Gandhi National Centre for the Arts

| अ. नं. | पदार्थांचें नांव | ग्रंथाचें नांव | कोणत्या भागांत | रोग | उपयोग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खाणें | बाह्य उपयोग |
| १६ | सोने | वाग्भट | उ.स्था. अ. १ श्लो. ७ | बालोपचार | खाणें | |
| | | ,, | उ. स्था. अ. १ ,, ४६,४७ | ,, | खाणें | |
| | | ,, | उ स्था. अ. १३ ,, १६, २० | तिमिर | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ ,, ४५ | तिमिर | | अंजन |
| | | ,, | उ. स्था अ. ३५ | विषदोष | खाणें | |
| | | ,, | उ. स्था अ. ३९ ,, ४२, ४३ | रसायन | खाणें | |
| १७ | चांदी | चरक | चि. अ. १ ,, १९, २० | रसायन | खाणें | तृतीयपाद श्लो. १६ |
| | | ,, | चि. अ. १ ,, | रसायन | खाणें | प्रथमपाद ,, ५८ |
| | | ,, | चि. अ. १६ ,, ८० | पांडुरोग | खाणें | तृतीयपाद ,, १६ |
| | | ,, | चि. अ. १७ ,, १२३ | हिक्का श्वास | खाणें | चतुर्थपाद ,, २१ |
| | | सुश्रुत | उ स्था. अ. १०,, १५ | अभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १८,, ६१ | दृष्टीगत रोग | | अंजन |
| | | वाग्भट | चि. अ. १६ ,, | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | चि. अ· १३ ,, २० | तिमिर | | अंजन |
| | | ,, | उ. अ. ३९ ,, ४३ | रसायन | खाणें | |
| १८ | लोह | चरक | चि. अ. १६ " ८०-८२ | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | चि, अ. १६ ,, ९५- ९६ | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | चि.अ. १७ ,, १२३ | हिक्का श्वास | खाणें | |
| | | ,, | चि. अ. २६ ,, २३९ २४३ | नेत्ररोग | | वर्ति |
| | | सुश्रुत | चि. अ. ६ ,, २१ | महाकुष्ट मधुमेह | खाणें | |
| | | ,, | चि.अ. ९ ,, २५ | श्वेतकुट | | लेप |
| | | ,, | चि.अ. ९ ,, ३० | कुष्ट | खाणें | |

Indira Gandhi National Centre for the Arts

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | लोह | सुश्रुत | चि. अ १० श्लो. ११ | महाकुष्ट | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १२ श्लो. ११ | दुर्नाम शोफ, पांडु | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १९ श्लो. ४७ | उपदंश | | लावणें |
| | | ,, | चि. अ. २५ श्लो. ३३ | पलित, खलत | | लावणें |
| | | ,, | उ. स्था. अ. १२ श्लो. १३ | रक्ताभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १२ श्लो २४ | नेत्ररोग | | अंजन |
| | | ,, | ,, अ. १८ श्लो. १०१ | ,, | | अंजन |
| | | ,, | ,, अ ४४ श्लो. १७ | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | ,, अ. ४४ श्लो. २३ | ,, | खाणें | |
| | | वाग्भट | चि. अ. १२ श्लो. ३१ | प्रमेह | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १२ श्लो. ४२ | ,, | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १६ श्लो. ९ | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | चि. अ १६ श्लो ३६ | ,, | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १८ श्लो. ३१ | विसर्प | | लावणें |
| | | ,, | उ स्था. अ. ११ श्लो. ५ | संधिसितासित | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ श्लो. १६ | तिमिर | | खाणें |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ श्लो. २० | तिमिर | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ श्लो २३ | तिमिर | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १६ ४० | सर्वाक्षिरोग | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १६ ३६ | ,, | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. २४ ४२ | शिरोरोग | | लावणें |
| १९ | ताम्र | चरक | चि. अ. १ श्लो. २१ | रसायन | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १७ श्लो. १२२ १२३ | हिक्का, श्वास | ख णें | |
| | | ,, | चि. अ. २४ श्लो. २३६ २३७ | विष | खाणें | |
| | | ,, | चि. अ. २६ | | | वर्ती |
| | | ,, | सु. अ. ५ श्लो. ७० | | | जिव्हानिर्लेखन |

| अ. नं. | पदार्थाचे नांव | ग्रंथाचे नांव | कोणत्या भागांत | रोग | उपयोग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खाणे | बाह्य उपयोग |
| १९ | ताम्र | सुश्रुत | चि. अ. १९ श्लो. ४७ | उपदंश | | लावणे |
| | | ,, | उ. स्था. अ. ११ श्लो. ६।६ | अभिष्यंद | ,, | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १२ ,, १३ | रक्ताभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १५ ,, २६ | छेद्यरोग | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १७ ,, ६।७ | दृष्टिगत रोग, शलाका | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १८ ,, २४ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १८ ,, ६१ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १८ ,, १००।१०१ | ,, | | अंजन |
| | | वाग्भट | उ. स्था. अ. ९ ,, ३२ | वर्त्मरोग | | लावणे |
| | | ,, | उ. स्था. अ. ११ श्लो. ५ | संधिसितासित | | वात |
| | | ,, | उ. स्था. अ. ११ ,, ३९ | ,, | | वात |
| | | ,, | उ, स्था. अ. १३ ,, २० | तिमिर | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ ,, ३१ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ ,, ४५ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ, स्था. अ. १४ ,, ३१ | लिंगनाश | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ.१६ श्लो. ३४ | सर्वाक्षिरोग | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ, १६ श्लो. ४२ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. ३२ | क्षुद्ररोग | | लावणें |
| | | ,, | उ.स्था.अ. ३९ श्लो ४२ | रसायन | खाणें | |
| २० | लोह शुद्धि | चरक | चि. अ. १ श्लो. ३ | रसायन | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १ श्लो. ७ | रसायन | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १ ,, १६ | रसायन | खाणें | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | लोह शुद्धि | चरक | चि. अ. १ श्लो. २१।२२ | रसायन | खाणें | |
| | | ,, | ,, ७ ,, ६८।६९।७०।७२ | कुष्ट | खाणें | |
| | | , | ,, १६ ,, ६८।६९।७०।७४ | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | ,, १६ ,, ७६ | ,, | खाणें | |
| २१ | लोह | वाग्भट | उ. स्था, अ. ३४ श्लो. ५४ | योनिदोष | खाणें | |
| | | ,, | ,, अ. ३९ श्लो. ४३ | रसायन | खाणें | |
| | | ,, | ,, ३९ श्लो. १०७ | ,, | खाणें | |
| | | ,, | ,, अ. ३९ श्लो. १६२ | ,, | खाणें | |
| २२ | मंडुर | चरक | चि. अ. १६ श्लो. ६८।६९।७०।८४ | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १६ श्लो. ९२ | पांडुरोग | खाणें | |
| | | सुश्रुत | उ. स्था. अ. ४४ श्लो. २३ | ,, | खाणें | |
| | | ,, | ,, अ. ४४ श्लो. ३१ ३२ | कामला | खाणें | |
| | | ,, | ,, अ. ४४ श्लो. ३४ | पांडु, कामला | खाणें | |
| | | वाग्भट | चि. स्था. अ. १६ श्लो. १५ | पांडुरोग | खाणें | |
| | | ,, | चि. स्था. १९ श्लो. ४६ | कुष्ट | खाणें | |
| | | ,, | उ. स्था. अ. ९ श्लो. ३२ | वर्त्मरोग | | लावणें |
| २३ | पितळ | चरक | सु. अ. ५ श्लो. ७० | मात्रा शितीय | | जीभ.घासण्यांची वज्री |
| २४ | कथिल | ,, | चि. अ. ७ श्लो. ८५ | कुष्ट रोग | | लावणें |
| | | सुश्रुत | उ. स्था. अ. १२ श्लो. १४ | रक्ताभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | सु. अ. ३८ श्लो. ६२ | | | |
| | | वाग्भट | उ. स्था. अ. १३ श्लो. ३१ | तिमिर | | लेप |
| | | चरक | चि. अ. ७ श्लो. ८५ | कुष्ठ | | |
| २५ | शिसे | सुश्रुत | सु. अ. ३८ श्लो ६२ | | | अंजन |
| | | वाग्भट | उ. स्था. अ. १३ श्लो. ३१ | तिमिर | | |
| २६ | शंख | चरक | चि. अ. १ श्लो २१।२२ | रसायन | खाणें | |
| | | ,, | चि. अ. ४ श्लो. ९६ | रक्तपित्त | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १७ श्लो. १२२।१२३ | हिक्का, श्वास | खाणें | |

| अ. नं. | पदार्थाचे नांव | ग्रंथाचे नांव | कोणत्या भागांत | रोग | उपयोग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खाणे | बाह्य उपयोग |
| २६ | शंख | चरक | चि. अ. २६ श्लो. २३९ | नेत्ररोग | | वर्ती |
| | | ,, | चि. अ. २६ श्लो. २४९ | ,, | | ,, |
| | | सुश्रुत | चि. अ. १ श्लो. १०४ | केस गळणे | | लेप |
| | | ,, | उ. अ. १० श्लो. ८ | अभिष्यंद | | लावणे |
| | | ,, | उ. अ. १० ,, १५ | ,, | | लेप |
| | | ,, | उ. स्था. अ. १० श्लो. ८ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १२ ,, १६ | रक्ताभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | उ स्था. अ. १२ ,, २२ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १७ ,, ४३ | दृष्टिगतरोग | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १८ ,, २४ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १८ श्लो. ९२ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. ४४ ,, २१ | पांडुरोग | खाणें | |
| | | वाग्भट | उ, स्था. अ. ९ ,, ३३ | नेत्ररोग | | वात |
| | | ,, | उ. स्था. अ ११ ,, १२ | संधिसितासित | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ ११ ,, ४७ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ, स्था. अ ११ ,, ३४ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ.१३ श्लो. २२ | तिमिर | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ, १३ श्लो. ४१ | ,, | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ श्लो. २३ | ,, | | वात |
| | | ,, | उ.स्था.अ. १६ श्लो २३ | सर्वाक्षिरोग | | अंजन |
| | | ,, | चि. स्था. अ. २० श्लो. १६ | श्वित्रकृमी | | लेप |
| २८ | समुद्रफेस | सुश्रुत | उ. स्था. अ. १० श्लो. ८ | | | |

Indira Gandhi National Centre for the Arts

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २६ | हिरा | चरक | चि. अ. ७ श्लो. ७० | | | |
| | | ,, | चि. अ. २३ ,, २४८ | | | |
| २७ | मोती | ,, | चि. अ. १ ,, २१-२२ | रसायन | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १७ ,, १२२-१२३ | ,, | खाणें | |
| | | सुश्रुत | उ. स्था. अ. १० श्लो. १५ | अभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १५ ,, २६ | छेद्यरोग | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १७ ,, ९७ | दृष्टिगत रोग | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १८ ,, ९० | ,, | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. ४४ ,, २१ | पांडुरोग | खाणें | |
| | | वाग्भट | उ. स्था. अ. ११ ,, ३४ | संधिसितासित | | अंजन |
| | | ,, | उ. स्था. अ. १३ ,, २२ | तिमिर | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १४ | लिंगनाश | | ,, |
| २८ | वाळ | चरक | चि. अ. १ श्लो. २१-२२ | रसायन | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १७ ,, १२२-१२३ | हिक्का श्वास | खाणें | |
| | | ,, | चि. अ. २६ ,, ५४ | अश्मरी मूत्रकृच्छ्र | खाणें | |
| | | ,, | चि. अ. २६ ,, २३९ | नेत्ररोग | | अंजन |
| | | सुश्रुत | उ. स्था. अ. १२ श्लो. २२ | रक्ताभिष्यंद | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १० ,, १५ | अभिष्यंद | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १५ ,, २६ | छेद्यरोग | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १७ ,, ९८ | दृष्टिगतरोग | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. १८ ,, २४ | ,, | | ,, |
| | | ,, | उ. स्था. अ. ४४ ,, २१ | पांडुरोग | खाणें | |
| | | वाग्भट | चि. अ. ६ | छर्दी | खाणें | |
| | | ,, | चि. अ. ११ श्लो. १३ | मुत्राधात | खाणें | |
| | | ,, | उ. स्था. अ. १४ श्लो. ३२ | लिंगनाश | | अंजन |
| २९ | डुवैर्य | चरक | चि. अ. १ श्लो. २१-२२ | रसायन | खाणें | |

| अ. नं. | पदार्थाचे नांव | ग्रंथाचे नांव | कोणत्या भागांत | रोग | उपयोग | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खाणे | बाह्य उपयोग |
| २९ | वैंडुर्य | चरक | चि. अ. १७ श्लो. १२२।१२३ | हिक्का श्वास | खाणें | |
| | | चरक | ,, २६ ,, २३९ | नेत्ररोग | | अंजन |
| | | सुश्रुत | उ. स्था. अ. १० श्लो. १५ | अभिष्यंद | | ,, |
| | | ,, | ,, अ. १५ श्लो. २६ | छेद्यरोग | | ,, |
| | | ,, | ,, १७ श्लो. ९७ | दृष्टिगतरोग | | ,, |
| | | ,, | ,, अ. १८ श्लो. ६१ | ,, | | ,, |
| | | ,, | ,, अ. १८ श्लो. ४०, ९२ | ,, | | ,, |
| | | वाग्भट | ,, अ. १३ श्लो. २१ | तिमिर | | ,, |
| | | ,, | ,, अ. १४ श्लो. | लिंगनाश | | ,, |
| ३० | स्फटिक | चरक | चि. अ. १ श्लो. २१।२२ | रसायन | खाणें | |
| | | ,, | चि. अ. १७ श्लो. १२२।१२३ | हिक्काश्वास | खाणें | |
| | | सुश्रुत | उ. स्था. अ. १० श्लो. १५ | अभिष्यंद | | अंजन |
| | | ,, | ,, अ. १२ श्लो. २२ | रक्ताभिष्यंद | | ,, |
| | | ,, | उ. अ. १८ श्लो. ९० | दृष्टिगतरोग | | ,, |
| ३१ | गोमेद | चरक | सु. अ. २३ श्लो १५ | | | |
| ३२ | मरकत | ,, | चि. अ. २३ श्लो २५२ | | | |
| ३३ | कर्कोटक मणी | ,, | चि. अ. २३ श्लो. २५२ | | | |

a Gandhi National Centre for the Arts

पंचकर्मयुक्त अनुभवी

# चि कि त्सा वि भा ग

# पंचकर्मयुक्त अनुभविक चिकित्साविभाग

## अध्याय १

### १ प्रस्तावना

**चिकित्सा लिहिण्याचा उद्देश**

'रसधातुप्रकाश' या ग्रंथांत रसशास्त्राचा संपूर्ण विभाग लिहून झाल्यानंतर चिकित्सेवर एक स्वतंत्र ग्रंथ यापुढील दोन वर्षांत लिहावा असा विचार होता व आहेहि. परंतु बऱ्याच विद्यार्थ्यांचा असा आग्रह आहे कीं रसशास्त्र हा विषय त्या वर्षांत शिकविणें झाल्यानंतर या ग्रंथाचा आम्हाला फारसा उपयोग होणार नाही. शिक्षण-कालांतहि तिसरें किंवा ४ थें वर्षाचें अभ्यासांत ग्रंथ निदान चिकित्सा यांना उपयोगी अशा नोटस् म्हणून तरी या ग्रंथाचा उपयोग व्हावा व त्याशिवाय आम्हाला आमच्या धंद्यांतहि यांचा थोडा फार उपयोग व्हावा या दृष्टीने याच ग्रंथांत कांही निवडक रोगावरील चिकित्सा प्रकरणें लिहिल्यास आम्हा सर्वांना त्या पुस्तकाचा हरघडी उपयोग होईल.

Indira Gandhi National Centre for the Arts

ह्या त्यांच्या आग्रहावरून त्यांना त्यांच्या पुढील वर्षांत उपयोगी पडेल असा चिकित्सेचा थोडा भाग लिहिण्याचें ठरविलें. त्यामुळे रसधातुप्रकाश हा ग्रंथ आयुर्वेद कॉलेजांतील विद्यार्थ्यांना रसशास्त्र या विषयाकरिता जितका उपयोगी होऊ शकेल तितका जरी नसला तरी चिकित्सेवरील उपयुक्त व पुरक नोटस् म्हणून तरी त्यांना याची मदत व्हावी व विद्यालयीन अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावरहि धंद्यांत हरवढी त्याचा थोडा तरी उपयोग व्हावा या दृष्टीने याच ग्रंथांत 'पंचकर्मयुक्त अनुभविक चिकित्सा विभाग' हें प्रकरण समाविष्ट केलें आहे.

**औषधी संबंधी माझा अनुभव**

या चिकित्साविभागांत विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयामार्फत माझे देखरेखीखाली सुरु असलेले पुरुषवार्ड, स्त्रीवॉर्ड, बालवार्ड मिळून चाळीस बेडस् असलेले इन्डोअर वॉर्ड, त्या शिवाय एका वेळेस सहासात सूतिका राहू शकतील असा सात बेडस्चा प्रसूतिविभाग. अशा सर्व वॉर्डमधील रोग्यांना औषधी योजना करतांना जे अनुभव मला आले ते सर्व औषधीयोग व त्याशिवाय इतरहि उपयुक्त असे निवडक औषधी-पाठ या ग्रंथांत समाविष्ट करून घेतले आहेत.

## २ आयुर्वेदियऔ धी संबंधी माझे अनुभव

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रॅक्टिकल करितां २५० रोगी दररोज येतात. आऊट डोअर दवाखाना तसेच चाळीस बेडस् असलेला इन्डोअर वॉर्ड, त्यांत पुरुष वार्ड, स्त्री वार्ड, व बालक विभाग असून त्याशिवाय सात बेडसचे सूतिकागृह हें वेगळें आहे. या सर्व ठिकाणीं फक्त आयुर्वेदिकच औषधें वापरण्यांत येतात. अॅलोपॅथीचें एकहि औषध आजपर्यंत कधीच वापरण्यांत आलें नाही किंवा एकहि इंजेक्शन देण्यांत आलेले नाही.

सूतिकागृहांत बाळंतपणाचे अगोदर एक गुंज हेमगर्भ आल्याचा रस व मध यांतून देण्यांत येतो, आणि बाळंतपण झाल्यावर नंतर पुन्हा हेमगर्भ देण्यांत येतो. बाळंतपणाकरितां आलेली बाई दहा दिवस सूतिकागृहांत असते. बाळंतपण झाल्यानंतर हेमगर्भ दिल्यानंतर त्याच दिवसापासून देवदार्व्यादि काढा १ तोळा, तितकेच गरमपाणी घालून त्यांत १ गुंज प्रतापलंकेश्वर टाकून सकाळ संध्याकाळ देण्यांत येतो. कोणाहि सूतिकेला इंजेक्शन किंवा अॅलोपॅथिक औषध कधीहि देण्यांत आलेलें नाही. दहा दिवसानंतर घरीं जातांना सूतिकाभरण दीड मासा दररोज १ गुंज दशमूळाच्या काढ्यांतून घेण्यास सांगण्यांत येते.

येथे एक ऑपरेशन थिएटर आहे. त्यांत ड्रेसिंगचीं कामें, मायनर ऑपरेशन्स व कांही मेजर ऑपरेशन्स केली जातात. महाविद्यालयांतील विद्यार्थी येथेच प्रॅक्टिकल करितां येत असतात. या ठिकाणीं ऑपरेशनच्यावेळीं फक्त क्लोरोफॉर्म हें एकच बाहेरचें औषध वापरण्यांत येतें. त्यानंतर सुश्रुतांतील शोधन, रोपण, तेलें व इतर आयुर्वेदिक उपचार करण्यांत येतात. याहि भागांत अॅलोपॅथीचीं औषधें किंवा इंजेक्शन्स कधीहि वापरण्यांत येत नाही व सर्वच रोगी दुरुस्त होऊन जातात.

## ३ कष्टसाध्य रोगाच्या दुरुस्तीचें प्रमाण

धर्मार्थ वॉर्डमधील सर्व रोग्यांचें एक रजिस्टर असून त्यांत रोगी आला केव्हा व गेला केव्हा त्या तारखा दिल्या आहेत. एकूण किती दिवस होता? त्याचा मुख्य रोग व त्यावरील औषध व त्यानें आलेला गुण, पूर्ण का अपूर्ण ही सर्व माहिती लिहून ठेवलेली आहे; त्यामुळे कोणत्यारोगांचे कितीरोगी आले? त्या रोगावर कोणतीं औषधे दिलीं? किती रोग्यापैकी किती रोग्यावर लागू पडली? त्या औषधीने अंदाजे किती दिवसांत गुण आला? खाण्यांत कोणकोणते पदार्थ किंवा पेये दिली. तसेच पाणी थंड, कीं गरम करून थंड केलेलें त्याची माहिती दिली आहे. हें रजिस्टर धर्मार्थ आयुर्वेदिक वॉर्डमध्यें सर्वांच्या पाहण्याकरितां ठेविलें आहे.

यांपैकी कांही क्लिष्ट रोगांची माहिती खाली दिली आहे. कोणत्या रोगाचे रोगी किती आले व किती दुरुस्त झाले व किती दुरुस्त झाले नाही याची माहिती खाली दिली आहे.

या दोन वर्षांचे अवधींत निरनिराळ्या रोगांचे रोगी माझे धर्मार्थ आयुर्वेदिक वार्डमध्यें आले. त्यापंकी अत्यंत महत्वाचे व चिकित्सा करण्याला कठीण अशा पैकी कांही रोगांचीं नांवें व त्यांपैकी किती दुरुस्त झाले याची अंदाजे माहिती मी खाली देत आहे. ते सर्व रोगी जुनाट होते. कांहींना तीन वर्षां पासून, कांहींना दोन वर्षांपासून तर कांही एक वर्षांपासून, आजारी असलेले असे होते.

**१ जलोदर**--५० ते ६० रोगी आले. त्यापैकी २-४ सोडून सर्व रोगी दुरुस्त झाले.

**२ शूळ**--या रोगाचे ४० ते ५० रोगी आले. त्यापैकी २-३ सोडून सर्व रोगी दुरुस्त झाले.

**श्वास**--या रोगाचे ३०-३५ रोगी आले. त्यापैकी सर्वच दुरुस्त झाले. क्वचित् एकादाच दुरुस्त झाला नसेल.

**४ संतत (टायफाईड) ज्वर**--या रोगाचे फक्त ८-१० रोगी आले. एक सोडून सर्वच दुरुस्त झाले. (अवधी १६ ते २२ दिवस)

**५ मुळव्याध (कोंबयुक्त)**—८ ते १० रोगी आले. त्यापैकी वार्डमध्यें ३-४ च होते. वार्डमध्यें बाहेरुन येऊन औषधी घेऊन जात होते असे ५-६ होते. त्यापैकी ४-५ दुरुस्त झाले व बाकीचे थोडा आराम वाटू लागल्यावर निघून गेले.

**६ गृध्रसी (सायटिका)**—५-६ रोगी आले. ते सर्व दुरुस्त झाले.

**७ यकृत (लिव्हर)**--या रोगाचे ३०-४० रोगी आले. पैकी २-३ सोडून सर्व रोगी दुरुस्त झाले.

**८ हातपाय दोन्ही लुले पडलेले**--असे ९-१० रोगी आले. त्यांचे हातपाय दुसऱ्यानें उचलून ठेवावें लागत. हातांना व पायांना बिलकुल चेतना नव्हती. थोडेही सरकता येत नव्हते. त्या पैकी ३-४ रोग्यांचे हातपाय असे दोन्ही लुले होते. सर्वांगाला वेदना होत्या. सर्वच रोगी दुरुस्त झालें.

**९ संग्रहणी**—या रोगांचे ३०-४० रोगी आले. त्यापैकी थोडा गुण वाटल्या बरोबर अर्धे रोगी मध्येंच सोडून गेले, राहिलेल्या पैकी १-२ सोडून बाकी सर्वच दुरुस्त झाले. या निरनिराळ्या लक्षणांच्या एकाच रोगांत पुष्कळ वेळा औषधीयोगांत फेरबदल करावा लागला. दुसऱ्या कोणत्याहि रोगांत औषधी करितां संग्रहणी इतका फेरबदल करावा लागला नाही.

या शिवाय उदर, शोथ, कास, पांडुरोग, गुल्म, अतिसार, उन्माद, अपस्मार, इत्यादि रोग असलेले रोगी वार्ड मध्यें आले व तेही दुरुस्त होऊन गेले.

रोग्यांची जी संख्या वर दिली आहे त्यांत दोषपरत्वें कती किति होते हें लिहिलें नाही.

## ४ धर्मार्थ वार्ड

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना रोगपरीक्षेचें संपूर्ण ज्ञान करून देण्याकरितां एक सुशिक्षित व आयुर्वेदिक वार्डमध्यें बरेच दिवस अनुभव घेतलेल्या अशा वैद्याची हल्ली नेमणुक केली आहे. व तसेच पॅथॉलॉजीचे (प्रॅक्टीकलचे) विशेष अनुभविक ज्ञान मिळविलेले एम्. बी. बी. एस्. डॉक्टराचीहि नियुक्ति मायक्रासकोपिक परीक्षेकरितां करण्यांत आली आहे.

धर्मार्थ आयुर्वेदिक वार्डमधील रोग्यांची परीक्षा करून रोगनिश्चिति करण्याकरिता खालील प्रमाणें व्यवस्था केली आहे.

१ **तज्ञ वैद्य**--सरकारमान्य विद्यालयांतून डिग्री कोर्स पुरा करून डिग्री मिळविलेला व कांही दिवस धर्मार्थ वार्डमध्यें अनुभव घेतलेला असा.

२ **डॉक्टर**--एम्. बी. बी. एस्. असून पॅथॉलजीचें विशेष अनुभविक ज्ञान असलेला. (फक्त मायक्रासकोपिक परीक्षेकरिता)

**मायक्रास्कोपस**--हल्ली दोन आहेत. तिसरा लवकरच बोलावण्यांत येईल.

(४) वाफारा देण्याचें यंत्र व त्याकरितां एक स्वतंत्र खोली.

(५) पंचकर्म चिकित्सें करितां एक स्वतंत्र खोली तयार करण्याचें बांधकाम चालू आहे.

(६) रोग्यांची छाती, पोट व इतर दुःखी अवयवाला शेकण्याकरितां इन्फ्रारेड लाईट.

(७) धुरी देण्याचें यंत्र.

(८) रोग्यांना गरज लागेल तेव्हां काढा करण्याकरिता, तसेच गरज लागल्यास पाणी ताबडतोब गरम करण्याकरितां शेगडीची व्यवस्था आहे.

(९) लघ्वी परीक्षेकरितां–युरिनॉमिटर, सेक्रोमिटर इ. मूत्रपरीक्षेचीं साधनें.

(१०) रक्तपरीक्षेकरिता--सेंट्रिफ्युगल मशीन, हेमोग्लोबिनामिटर, हेमोसायटोमिटर, स्फिग्मामानोमेटर्स, मायक्रासकोप व लहान उपकरणें.

## ५ रोगविशेष परीक्षा

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयातर्फे माझें देखरेखीखाली चालविण्यांत येत असलेल्या धर्मार्थ आयुर्वेदिक वार्डमधील रोग्यांची रोगनिश्चिती करण्याकरितां, अष्टविध परीक्षा करण्यासंबंधीचें विस्तृत वर्णन मागे केलेच आहे. त्याशिवाय अष्टविध परीक्षेनेहि निश्चित रोगपरीक्षा होणें कठीण जाते. अशा कांही रोग्यांची परीक्षा खालील साधनांनी करून घेण्यांत येते.

**मायक्रासस्कोपिक परीक्षा**

१ मूत्रपरीक्षा

२ रक्तपरीक्षा

३ थुंकीची परीक्षा

४ X ray परीक्षा

यापैकी रक्त. परीक्षा व थुंकीची परिक्षा ही आमच्या धमर्थि वार्डमध्येंच मुद्दाम ठेवण्यांत आलेले एक वैद्य एक डॉक्टर असे दोघें मिळून करतात. त्या परीक्षे-करितां दोन मायक्रासकोपस् असून त्याशिवाय इतरहि सर्व साधनें आहेत.

परंतु Xray मशीन आमचे येथे हल्ली नाही. ते पुढचे वर्षी बोलावण्यांत येईल Xray नी तपासावयाचा रोगी Xray असणाऱ्या डॉक्टरकडे पाठवून तपासून घेण्यांत येतो.

६ वैद्यांना न्याय वैद्यक व संक्रामक रोगाचें ज्ञान आवश्यक

लोकांच्या सर्व वैद्यकीय गरजा भागविण्याकरितां वैद्यांना खालील विषयांचे ज्ञान असणें अत्यंत जरूर आहे.

(१) स्वास्थ्यरक्षणाचें संपूर्ण ज्ञान असणें.

(२) आधुनिक रोगांसहित सर्व रोगांचें संपूर्ण ज्ञान व त्यावर पंचकर्मासहित अचूक औषधी योजना.

(३) निश्चित रोगपरीक्षा--रोगपरीक्षेंच्या सर्व प्रकारच्या साधनांचा उपयोग करता येणें.

(४) साथीचें रोगांत—प्रतिबंधक व रोगनाशक असे संपूर्ण उपाय व्यक्ति, घर किंवा सबंध गांव यावर साथीच्या दिवसांत करावें लागणारें इलाज.

१. प्रतिबंधक उपाय, २. सबंध घर धुणें, नदी, नाले, विहिरी या सर्वांची सफाई व शुद्धि. कॉलरा, प्लेग, देवीची किंवा इतर कोणतीहि साथ.

(५) पाणी शुद्ध करणें--क्लोरिन किंवा दुसरी कोणतीं तरी पाणी शुद्ध करणारीं द्रव्यें घालून.

(२) न्यायदानांत सरकारला मदत--मृताची परीक्षा वैद्यांना करता यावी. मृत्यु कशामुळे आला. किती वेळापुर्वी मृत्यु आला. याकरितां पोष्टमार्टम करतांना पाहण्याची सरकारकडून परवानगी मिळविणें.

३) विष पोटांत गेल्यास तें ताबडतोब बाहेर काढता येणें. तें विष कोणते, याची परीक्षा.

(४) कुत्र्याच्या विषाची परीक्षा.

७ रोग्यांना द्यावयाचें पेयादिक अन्नपाणी

रोगावर फायदेशीर होईल असे मुग, तांदुळ वगैरे धान्य पाण्याचें निरनिराळें प्रमाण घालून शिजवून देणें. त्यापैकी कांही प्रकार खाली देण्यांत येत आहे.

(१) रोगनाशक अशा अन्नपाण्यासंबधी विचार प्रास्ताविक.

(२) (१) वाटचमंड (२) मंड (३) लाजमंड (४) शुद्धमंडाची कृति, (५) अष्टगुणमंड (६) विलेपी (७) पेया–युष (८) यवागु (९) भात करण्याची कृति (१०) फांट कल्पना (११) ताकांत शिजवलेला भात (१२) कण्हेरी यवागु (१३) पेज (१४) तापवून थंड केलेलें पाणी (१५) दूध कोणी पिऊं नये? (१६) उन पाण्यासंबंधी सूचना (१७) उन पाण्याचा निषेध (१८) थंडपाण्याचा निषेध (१९) पाणी कोणी थोडे प्यावें.

## ८ दोषांच्या ६ अवस्था चिकित्साकाल

(१) दोषांच्या संचयप्रकोपादि सहा अवस्थेपैकीं पहिल्या किंवा दुसऱ्या अवस्थेंतच चिकित्सा करून पुढील रोगनिर्मिति टाळणें.

(२) दोषवृद्धिच्या संचयादि सहा अवस्थांचीं नांवें (३) संचय अवस्थेत होणारी दोषांचीं लक्षणें (४) दोषांच्या प्रकोप अवस्थेंत हाणारीं दोषांची लक्षणें (६) दोषांच्या स्थानसंचयामुळे त्या त्या स्थानांत होणारे रोग–त्यांचीं नांवें (७) तिन्ही दोष शमन करण्याचा विधी (८) कफ प्रकोपावर उपचार (९) वातपित्तकफ यावर उपचार (१०) आमयुक्त व्याधीचें लक्षण (११) आमयुक्त व्याधीचा प्रतिकार १ ते २ (१२) कंठात प्राण असेपर्यंत चिकित्सा.

## ९ चिकित्सा प्रकरणांतील विषय

ह्या चिकित्सा विभागांत अंदाजे पंधरा रोगांची संपूर्ण चिकित्सा सांगण्यांत आलेली आहे. व त्यानंतर अंदाजे ५० रोगावरील निवडक थोडे अनुभविक अशी औषधींचीं नांवें व त्यांचे पाठही देण्यांत आले आहेत.

प्रत्येक रोगावर चिकित्सा सांगताना पहिल्यानें त्या रोगाचीं संप्राप्ती व्याख्या, लक्षणें, स्थान, दुष्टी, दोष दुष्टी, व नंतर त्या रोगावर करावी लागणारी स्नेहन स्वेदना सहित पंचकर्म चिकित्सा व रोगनाशक औषधें, चूर्ण, गुटीका, काढे, रसायने भस्म, लेप, धूर या सर्वांचे पाठ या शिवाय हॉस्पीटलमधील रोग्यांना औषधी देवून जी जास्त गुणकारी ठरली अशी रोगावरील संपूर्ण औषधी योजना. त्या रोगावर खाण्याकरितां द्यावयाचे पदार्थ दुध, साबुदाणा, मोसंबीया पदार्थांशिवाय पेज,पेया विलेपी वगैरे तयार करण्याची कृति तसेंच पिण्याकरितां द्यावयाचें पाणी कांहीं रोगांत (जलोदर) पाणी पिणें अजिबात बंद कांही रोगांत फारच कमी तर कांहीं रोगांत थंड तर कांही रोगांत गरम खाण्याकरिता द्यावयाचे पदार्थ कोणतें व वर्ज्य कोणते इत्यादि संपूर्ण माहिती या चिकित्सा विभागांत प्रत्येक रोगाच्या वर्णनांत दिली आहे.

**ग्रंथाची उपयुक्तता–**

हा ग्रंथ विद्यालयीन आयुर्वेद विद्यार्थी तसेंच सर्व वैद्य व डॅाक्टर्स यांना तर उपयुक्त होईलच परंतु त्यांचेशिवाय वैद्य व डॉक्टर नसलेल्या अशा इतर सर्व लोकांना

आपापल्या कुटुंबांतील लहान मुलांपासून तो वयस्क अशा वृद्ध माणसापर्यंत त्यांच्या त्यांच्या काळांत त्या त्या रोगांवर औषधी योजना करतांना या ग्रंथांचा नेहमीच उत्तम उपयोग झाल्याशिवाय राहणार नाही.

हा ग्रंथ सर्वांना सर्वसाधारण रोगाकरितां औषधी योजना करण्याकरितां तर उपयोगी आहेच पण त्याशिवाय क्लिष्ट व कांही आधुनिक रोगावरहि वैद्यलोक या पुस्तकाच्या सहाय्यानें यशस्वी औषधीयोजना करूं शकतील असा भरवसा आहे.

वरील प्रकरणें लिहून झाल्यानंतर मदत करणाऱ्या प्राध्यापकांचे आभार मानणे जरूर आहे.

## ११ प्राध्यापकाचे आभार

पंचकर्मयुक्त अनुभविक चिकित्सा विभागाचीं संबंध प्रकरणें लिहून झाल्यानंतर ती विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकाकडे परिक्षणार्थ पाठवित गेलो. यांचीं नांवें–(१) वैद्य दा. ज्ञा. कराडे, आयुर्वेदाचार्य (विद्यापीठ). (२) वैद्य गो. दा. पाठक. आयुर्वेदाचार्य (हिंदु युनिव्हर्सिटी). (३) द. ह. कसबेकर, आयुर्वेदाचार्य (विद्यापीठ). (४) पु. र. तारे आयुर्वेदाचार्य (विद्यापीठ). (५) वैद्य त्र्यं. ग. जोशी आयुर्विद्या विशारद (पुणें). (६) दि. शं. सहस्त्रबुद्धे आयुर्वेदाचार्य (विद्यापीठ). हे सर्व बहुतेक विषयांत तज्ञ असून विद्यालयांत प्राध्यापकाचें काम आज १०–१० वर्षांपासून करीत आहेत. त्यांपैकी पु. र. तारे हे विद्यालयाच्या प्राध्यापकाचें काम आज २० वर्षांपासून करीत आहेत. त्या सर्वांनी वरील पुस्तकाचीं सर्व प्रकरणें आस्थापूर्वक वाचून पाहिलीं. त्या प्रत्येक प्राध्यापकानें त्या त्या प्रकरणांत आवश्यक व उपयुक्त अशा सूचना लिहून कळविल्या त्या मी त्या त्या प्रकरणांत समाविष्ठ करून घेतल्या. वेळांत वेळ काढून सर्व प्राध्यापकांनी सर्व प्रकरणें काळजीपूर्वक वाचून ज्या योग्य अशा सूचना केल्या त्याबद्दल त्या सर्वांना मी धन्यवाद देतो.

----

# दोष विज्ञानीय

## अध्याय २ रा

### १ त्रिदोषांमुळे शरीराची उत्पत्ति–

त्रिदोष म्हणजे वात, पित्त, कफ हेच शरीराचे धारण करितात. म्हणून त्यांना धातु म्हणण्याचाहि प्रघात आहे. तेच शरीराचें सूत्रचालक आहेत. तसेंच शरीर निर्माणाचे वेळेपासून तेच शरीरांतील सर्व अवयवांचे उत्पादक आहेत. व ठरीव प्रमाणापेक्षा कमी जास्त झाल्यास त्यानेच शरीराचा नाशहि होतो. ते तीनही पदार्थ स्थूल व सूक्ष्म अशा दोन्ही स्वरूपांनी शरीरांत आहेत.

आयुर्वेदाच्या सिद्धांताप्रमाणे पंचमहाभूतें व चैतन्य (जीवात्मा) एकत्र झाली असतां शरीराची उत्पत्ति होते. पंचमहाभूतांपैकी आकाश व वायू यांच्या एकत्रित गुणाला वायू ही संज्ञा दिली आहे. तसेच तेजाला पित्त व पाणी आणि पृथ्वी यांचे एकत्रीत गुणाला कफ हें नांव दिलें आहे. आणि हेंच वायु पित्त व कफ शरीराचें धारण करितात तसेंच तें शरीरांत विकृतिहि उत्पन्न करितात.

### २ दोष हें नांव कसें पडलें–

'स्वातंत्रेण दूषण स्वभावत्वा दोषाः' या आयुर्वेदोक्तिनुसार या वात, पित्त, कफ या त्रिधातूला दोष हें नांव शास्त्रकारांनी दिलें आहे. रसरक्तादि सात पदार्थांना धातु ही संज्ञा असल्यामुळे या तीन पदार्थांची चटकन कल्पना यावी याकरिता व रसरक्तादि धातुपासून ते भिन्न आहेत हें सहज समजावें म्हणून वात, पित्त व कफ या तीन पदार्थांचा दोष नांवानेच सदैव उल्लेख केलेला आहे.

वात, पित्त व कफ यांना स्वातंत्रेण दूषण स्वभात्वात् दोष म्हटलें असलें तरी त्यांना दूषित करणारा कोणताच पदार्थ नाही, असा त्याचा अर्थ नाही. त्यांना दूषित करणारे निरनिराळे खास पदार्थ व हवामान यांनी तें दूषित होतात पण ते सर्व शरीराचें बाहेरील आहेत. शरीरांतील रक्तादि कोणत्याहि पदार्थाने तें दूषित होत नसून तेच शरीरांतील धातु व मल यांना दूषित करितात. शरीरांत कोणताहि निजविकार उत्पन्न होण्याचें अगोदर पहिल्याने वात, पित्त व कफापैकी एक दोन किंवा तीनहि दोष दूषित होतात. आणि नंतर इतर धातु दुषित होऊन निज विकार उत्पन्न होतात. शरीरांतील दोष हा पहिला पदार्थ सुरूवातीस दूषित होतो.

## रोगापूर्वी दोषविकृति–

वात, पित्त, कफ हे दोष जेव्हा अविकृत स्थितींत असतात तेव्हां शरीर निरोगी राहून शरीराचीं सर्व कामें सुरळीत चालतात. तेचविकृत झाले म्हणजे शरीराला ते विकार उत्पन्न करितात. त्यामुळे शरीरांत जो फेरबदल होतो तो प्रथम वात, पित्त, कफ यांतच होतो. ज्या दोषाच्या गुणाचे पदार्थ जास्त खाण्यांत येतील तेच गुण असलेल्या दोषाची वाढ होईल. थोडचा प्रमाणांत झालेल्या वाढीमुळे प्रत्यक्ष रोग असा उत्पन्न होत नाही.

## दोषवृद्धिमुळे होणारीं लक्षणें–

परंतु जो दोष संचित झाला असेल त्या दोषांच्या गुणाचे पदार्थांचा तिटकारा येतो व त्याच्या विरुद्ध गुणांच्या पदार्थावर इच्छा उत्पन्न होते. उदाहरणार्थ शरीरांत कफदोष जर वाढला असेल तर उष्ण, कडु व तुरट असे पदार्थ खाण्याची इच्छा उत्पन्न होते. तो दोष जास्त प्रमाणांत वाढल्यास मात्र रोग उत्पन्न होतात.

कोणत्या दोषापासून रोग होणार आहे हे खालील लक्षणावरून समजून येईल. दुखणे, अंग गळणें, जखडणें, रोमांच उभें राहणे, कंप होणें, रुक्षता वाटणें अंग ताठणें, गोळा होणें, फुरफुरणें, तुरट चव असणें, काळे किंवा अरुणवर्ण डोळे, त्वचा, नखे यांचें ठिकाणीं दिसून येणें हीं लक्षणें कमी जास्त दिसू लागली म्हणजे हा विकार वातप्रधान दोषापासून आहे असे समजावे. दाह, लाली. उष्णता, अंग गळणें, पिकणें, घाम येणें, मलीनता, कुजणें, हिरवा, पिवळा रंग, नखें, डोळे, त्वचा यांचे ठिकाणीं दिसणें, बेशुद्धि व उन्मत्तपणा येणें हीं लक्षणें पित्ताधिक्य दोषापासून होणाऱ्या रोगाची समजावी.

स्निग्धपणा, खाज, थंडी, जडपणा, चिकटणें, आळस, सूज, अपचन, जास्त झोप, सुस्तपणा, नख, डोळें, त्वचा यांचे ठिकाणीं पांढरेपणा येणें, जिभेची चव गोड व खारट वाटणें हीं लक्षणें कफाधिक्य दोषापासून होणाऱ्या रोगाचीं जाणावीं.

## ४ दोष विकृतीमुळें अंतर, मध्य व बाह्य मार्गांत होणारे रोग–

दोषांच्या विकृतीमुळे शरीरांतील कोणतें स्थान विकृत झालें आहे हें त्या रोगांत होणाऱ्या लक्षणावरून समजून येते. सूज, गळवे, खरूज, आवाळू, मोड हीं लक्षणें झालीं म्हणजे रक्त, मांस, मेद वगैरे धातु व त्वचा या स्थानांत विकृति झालीं असे समजावे. या स्थानाला बाह्य मार्ग असें म्हणतात. ओकारी, अतिसार खोकला, उदर, ताप, सूज, मोड, गुल्म, गळवे इत्यादि विकार झाल्यास विकृति तोंडापासून गुदद्वारापर्यंत जो मोठा मार्ग आहे त्या स्थानांत झाली असें समजावें. त्या स्थानास अंतरमार्ग असें म्हण-

तात. डोकें, हृदय, मूत्रपिंड ते बस्तिचा भाग हीं मर्मे. हाडें, सांधें, स्नायु, शिरा, कंडरा इत्यादि भाग आणि फुफ्फुसें इत्यादि भाग विकृत झाले म्हणजे क्षय, अर्धांगवायू, श्वास, मेह, हृदरोग, धनुर्वात, संन्यास इत्यादि रोग होतात. त्या रोगाला मध्यम मार्ग असें म्हणतात.

वरील तीन मार्गापैकी बाह्य मार्गांत होणारे रोग हें लवकर बरे होणारे, अंतर मार्गांत होणारे विकार बरे होण्याला त्या पेक्षां थोडे कठीण आहेत व मध्य मार्गांत होणारे रोग हे दुरुस्त होण्याला जास्तच कठीण असतात.

----

Indira Gandhi National
Centre for the Arts

# पंचकर्म चिकित्सा विज्ञानीय

## अध्याय ३ रा

### १ चिकित्सेचें प्रकार

चिकित्सेचें मुख्य दोन प्रकार आहेत. बृहण व लंघन. लंघनाचे पुन्हा दोन प्रकार १ शोधन (पंचकर्म) २ शमन. पंचकर्म चिकित्सा म्हणजे वाढलेल्या दोषांना शरीराचें बाहेर काढून टाकण्याकरिता करावी लागणारी जी चिकित्सा तिलाच शोधन चिकित्सा म्हणतात. शोधन चिकित्सेचे पांच प्रकार आहेत. वमन, विरेचन, बस्ति, नस्य व रक्तस्त्राव याशिवाय घाम काढणें व लघ्वी जास्त करणें ह्याहि क्रिया शोधन चिकित्सेतच येतात. कारण ह्या दोन क्रियेमुळे सर्व शरीरांतील दोष बाहेर काढलें जातात. ज्या चिकित्सेमुळे कमीजास्त झालेले शरीरांतील दोष समप्रमाणांत आणल्या जातात त्याला शमन चिकित्सा म्हणतात. शमन चिकित्सेचें सात प्रकार आहेत—दीपन, पाचन, उपवास, पाणी न पिणें, व्यायाम, उन्हांत बसणें व मोकळे हवेंत फिरणें. याप्रकारे शोधन व शमन मिळून बारा प्रकारची चिकित्सा म्हणण्यास हरकत नाही.

दोष फार वाढलेले असून रोगी जर फार अशक्त नसेल तर अशा स्थितींत शोधन चिकित्साच करावी. अशा वेळी शमन चिकित्सेचा फारसा उपयोग होणार नाही. शमन चिकित्सा ही रोगी फारच अशक्त असेल व दोष फार वाढलेले नसतील तर अशा वेळीं फायदेशीर आहे. शोधन चिकित्सेनें दोष बाहेर काढून टाकलें जात असल्यामुळे रोग लवकर दुरुस्त होतात. यावेळीं हे लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं औषधोपचार सुरू करण्याचें अगोदर रोग्याची शक्ति पाहून शोधन किंवा शमन यापैकी कोणता उपचार पहिल्याने करावा हें ठरविलें पाहिजे. रोगाचीं लक्षणें पाहून रोगी शोधनाला योग्य वाटत असला पण रोगी जर बराच अशक्त असेल तर शोधन न देतां शमन उपचारच करावे. संशयीत ठिकाणीं प्रथम थोडें शोधन देऊन पाहावें त्याने फारशी अशक्तता वाटली नाही तर शोधन उपचार मधून मधून करीत जावें.

### २ चिकित्सा व्याख्या

चतुर्णां भिषगादीनां शस्त्रानां धातुवैकृते ।
प्रवृत्तिर्धातु साम्यार्था चिकित्सेत्यभिधीयते ।। च. सूत्र

चारहि भिषक द्रव्यें, उपस्थीत व रोगी. हे प्रशस्त असतांना व धातूची विकृति झाली असतांना धातू साम्य करण्यासाठीं जें कार्य करावयाचे त्याला चिकित्सा असें म्हणतात.

## रोगविकार व्याख्या

विकारो धातुवैषम्यं साम्यं प्रकृतिरुच्यते ।
सुख संज्ञकमारोग्यं विकारो दुःखमेवच ।। च. सूत्र.

विकार म्हणजे धातु वैषम्य व धातूंचे साम्य म्हणजेच प्रकृति किंवा आरोग्य व त्यालाच सुख म्हणतात. विकार म्हणजे दुःख.

## उत्तम औषध कोणते?

तदेव युक्तं भैषज्यं यदा रोग्याय कल्पते ।
स चैव भिषजां श्रेष्ठो रोगेभ्यो यः प्रमोचयेत् ।। च. सू. १-१३५
प्रयोगः शमयेत व्याधिं योऽन्यमन्य मुदीरयेत् ।
नासौ विशुद्धः शुद्धस्तु शमयेद्यो न कोपयेत् ।।
याहि उदीर्ण शमयति नान्यं व्याधिं करोति च ।
सा क्रिया न तु वा व्याधि हरत्यन्यमुदीरयेत् ।।
याभिः क्रियाभिर्जायंते शरीरे धातवः समाः ।
सा चिकित्सा विकाराणाम् कर्म तत् भिषजां स्मृतम् ।।

तेंच उपयुक्त औषध समजावें की ज्याने आरोग्य प्राप्त होतें. तोच वैद्यांत श्रेष्ठ समजावा की जो रोगांपासून सुटका करतो.

तोच प्रयोग श्रेष्ठ समजावा की जो दुसऱ्या व्याधींना उत्पन्न करीत नाही. ती रोगांवरील चिकित्सा शुद्ध नव्हे की जी रोगांचा प्रकोप करते. तीच चिकित्सा की जी प्रकोप करित नाही.

जें द्रव्य उदीर्ण झालेल्या रोगांना शमन करतें पण दुसऱ्या व्याधि निर्माण करीत नाही. तिलाच क्रिया किंवा चिकित्सा म्हणावें परंतु जी दुसरी व्याधि निर्माण करते ती चिकित्सां नव्हे.

ज्या क्रियेमुळें शरीरांत धातूंचें साम्य होते. तीच विकारांची चिकित्सा समजावी. व तेंच वैद्याचे कर्म जाणावें.

## ३ रसायन औषधांचें श्रेष्ठत्व

यतोहि अल्पमात्रोय योगित्वात् अरुचेर प्रसंगतः ।
क्षिप्रमारोग्य दायित्वा दौषधीभ्योऽधिको रसः ।।
न दोषाणां न रोगाणां न पुंसांश्च परिक्षणम् ।
न देशस्य न कालस्य कार्यं रस चिकित्सिते ।।
असाध्येष्वपि दातव्यो रसोऽतः श्रेष्ठ उच्यते ।
उत्तमो रसवैद्यस्तु मध्यमो मुलिकादिभिः ।। र. र. स.

अधमः शस्त्रदाहाभ्याम्–

एतावतैवास्या रसचिकित्साया प्रशस्तमध्यवसीयते

( १ ) काष्टौषधींपेक्षा रसौषधीचें पोटांत घेण्याचें प्रमाण फारच अल्प असते. (२) रसायन औषधीला कोणतीहि वाईट चव नसते. (३) तें तात्काळ गुण देणारे आहे. (४) रसायन औषधें घेण्याला कंटाळवाणें नसते. (५) रसायन औषधें हीं तीनहि दोषांत, सर्व प्रकारच्या रोगांत, पुरुष, मुलें, स्त्रिया या सर्वांना निरनिराळे हवामान असलेल्या देशांत व केव्हाहि देतां येते. (६) असाध्य रोगांत देखील ह्याचा उपयोग होतो म्हणून रसायन औषधें काष्ठौषधीपेक्षा श्रेष्ठ समजलीं जातात.

४ चिकित्सेचे मुख्य दोन प्रकार

उपक्रम्यस्य हि द्वित्वाद्विधैवोपक्रमोमतः ।
एकः संतर्पणस्तत्र द्वितीय श्वापतर्पणः ॥
बृंहणो लंघनश्चेति तत्पर्याया वुदाहृतौ ।
बृंहणं यत् बृहत्वाय लंघनं लाघवाय यत् ॥
देहस्य　　वा. भ. सु.

रोग दोन प्रकारचे असल्यामुळे चिकित्साहि दोन प्रकारची आहे. एक संतर्पण-रूप व दुसरी अपतर्पणरूप, यांस अनुक्रमें बृंहण व लंघन अशीं दुसरीं नांवें आहेत. जे शरीरास पुष्टि देते ते बृहण व जे शरीरास हलकेपणा कृशता आणते तें लंघन.

५ लंघनाचे दोन प्रकार

शोधनं शमनं चेति द्विधा तत्राऽपि लंघनम् ।

लंघनांत पुनः शोधन व शमन असे दोन प्रकार आहेत.

यदीरयेत् बहिर्दोषान् पंचधा शोधनंच तत् ॥
निरूहो वमनं काय शिरोरेकोऽस्त्रविस्तुतिः ॥

जे औषध अंतस्थ दोषांना बाहेर काढते ते शोधन. तें पांच प्रकारचे आहे. निरुह बस्ती, वमन, विरेचन, शिरोविरेचन अथवा नस्य आणि रक्तस्राव.

६ शमनाची व्याख्या

न शोधयति यद्दोषान् समान्नोदीरयत्यपि ।
समीकरोति विषमान् शमनं तच्च सप्तधा ॥
पाचनं दीपनं क्षुतृड् व्यायामातपमारुताः ॥　　वा. भ. सु.

जे औषध दोषांना बाहेरहि काढत नाही व समदोषास वाढवीतही नाही. पण कमीजास्त झालेल्या दोषास सम करिते त्यास शमन म्हणतात. ते सात प्रकारचे आहेत पाचन, दीपन, लंघन पाणी न पिणे, व्यायाम, ऊन घेणे व वारा घेणे.

## ७ स्नेहन स्वेदनाची जरूरी

वमन विरेचनादि शोधन घेण्यापूर्वी शरीर स्निग्ध करावें लागतें, शरीराचे अवयवांना अंतर्मार्गांत, व बहिर्मार्गांत तसेच मध्यममार्गांत चिकटून बसलेले दोष व मल हे बाहेर काढण्याकरितांतें स्थान व दोष यांत पहिल्यानें मृदुपणा आणावा लागतो. त्यांत मृदुपणा आला म्हणजे त्या ठिकाणीं चिकटून बसलेले दोष व मल हे मृदु होऊन तेथून निघण्याच्या योग्य स्थितींत येतात. याकरिता पहिल्यानें स्नेहन देणें जरूर असते. स्नेहन देणें म्हणजे तेल, तूप इत्यादि स्निग्ध पदार्थ ४–५ दिवस पाजून शरीर स्निग्ध करणें होय. याप्रमाणें शरीर स्निग्ध झाल्यावर त्यानंतरची दुसरी क्रिया म्हणजे स्वेदन करणें होय. सर्व शरीराला शेकणें किंवा वाफारा देणें याला स्वेदन क्रिया म्हणतात. स्नेहनानें शरीर स्रोतसांत चिकटून बसलेलें दोष अगोदरच नरम झालेलें असतात. तें या स्वेदनानें पातळ होऊन रक्तांत मिसळतात आणि रक्तप्रवाहामार्फत तें कोठ्यांत येतात. आणि नंतर वमन, विरेचन, नस्य, बस्ती या शोधन विधीने तें शरीराचे बाहेर काढले जातात. या विधीने शरीरांतील कोणत्याहि धातूंत दोष चिकटून बसले असलें तरी त्या धातूंना बिलकूल धक्का न लागूं देतां ते दोष बाहेर काढले जातात.

## ८ स्नेहनस्वेदनाचें महत्त्व

> **स्नेहक्लिनाः काष्टगा धातुगा वा**
> **स्रोतोलीना ये च शाखास्थि संस्थाः ॥**
> **दोषाः स्वेदैस्ते द्रवीकृत्य कोष्ठं**
> **नीता सम्यक् शुद्धिभि र्निर्ह्रियंते ।**

कोठा, धातु, स्रोतोमार्ग, हात, पाय व अस्थि यांत मुरून बसलेले दोष स्नेहनानें ओलसर होतात. त्या सर्वांस स्वेद, पातळ करून कोठ्यांत आणतो आणि तेथून वमन विरेचनाच्याद्वारें तें साफ बाहेर काढले जातात.

> **मलोहि देहादुत्क्लेश्य ह्रियते वाससो यथा**
> **स्नेहस्वेदेस्तथोक्लेश्य ह्रियते शोधनैर्मलः ॥** वा. सू.

ज्या कपड्यांना स्नेह आहे तो ( साबण, खार वगैरे पदार्थ घालून पाण्यांत घालून उकळतात ) त्यांच्या योगानें वस्त्रांचा मळ सुटतो. त्याचप्रमाणें स्नेहन व स्वेदन यांचें योगानें शरिरांतील मळ मोकळा होऊन वमन–विरेचनादिकांच्याद्वारें तो बाहेर काढल्या जातो.

> **स्नेहस्वेदावनभ्यस्य कुर्यात् संशोधनं तु यः ॥**
> **दारु शुष्कमिवानामे शरीरं तस्य दीर्यते ॥** बा. भ. सु.

सुकलेलें लाकूड वाकविल्यानें जसे तात्काळ मोडतें, त्याचप्रमाणें स्नेहन, स्वेदन न करितां शोधन दिलें असतां शरीराचा नाश होतो.

## ९ शोधन विधीचें महत्त्व

**बुद्धि प्रसादं बलमिंद्रियाणां धातुस्थिरत्वं ज्वलनस्य दीप्तिम् ।**
**चिराच्च पाकं वयसः करोति संशोधनं सम्यगुपास्य मानम् ।।**

योग्य रीतीनें संशोधन केलें असतां त्यापासून निर्मळ बुद्धि, बळकट इंद्रियें, स्थिर धातु प्रदिप्त अग्नि व दीर्घ आयुष्य ही प्राप्त होतात.

**अजातानामनुत्पत्तौ जातानां विनिवृत्तये ।।**
**रोगाणां पंचकर्मेव सुखार्थीनं समाचरेत् ।।**

न झालेले रोग होऊ नये व झालेले रोग नाहीसे व्हावेत म्हणून, तसेंच सुखाची इच्छा करणाऱ्याने पंचकर्म हा उपचार करावा.

## १० शोधन (पंचकर्म) केव्हा करावे ?

**बलिनो बहुदोषस्य पंचकर्माणि कारयेत् ।**
**यक्ष्मिणः क्षीणदेहस्य तत् कृतं स्याद्विषोपम् ।।**

शरीरांत पुष्कळ दोष वाढलें असतील आणि तो रोगी जर सशक्त असेल तर त्याला वमन, विरेचन, निरुह बस्ति, अनुवासनबस्ति स्वेद या पंचकर्मांपैकी एक, दोन किंवा सर्वांचाच प्रयोग करणें हितकारक होईल. परंतु बल, मांस क्षीण असलेल्या रोग्याला पंचकर्मांचा विधि करणें विषाप्रमाणें घातक आहे.

**पाचनैर्दीपनैः स्नेहैस्तान् स्वेदैश्च परिष्कृतान् ।**
**शोधयेत् शोधनैः काले यथासन्नं यथाबलाम् ।** बा. भ. सु

पहिल्यानें पाचन, दीपन, स्नेहन व स्वेदन हे संस्कार करून नंतर योग्यकालीं शक्तिमान पाहून जवळच्या मार्गानें त्याचें शोधन करावें.

## ११ स्थानपरत्वें शोधन

**हंत्याशु युक्तं वक्त्रेण द्रव्यमामाशयान्मलान् ।**
**घ्राणेनचोर्ध्वजत्रूत्थान् पक्वाधानाग्दुनच ।।** वा. भ. सु. १६

आमाशयांतील मलांना तोंडावाटें दिलेलें औषध लवकर जिंकू शकतें. उर्ध्वजत्रु-रोगांत दोषांना नाकावाटें दिलेलें औषध लवकर जिंकते. आणि आंतडींतील दोषांना गुदद्वारावाटें दिलेले औषध लवकर जिंकते.

## १२ स्थानानुसार व दोषानुसार शोधन चिकित्सा

डोक्यांतील दोष नस्य देऊन, आमाशयांतील दोष वांतीद्वारें, पक्वाशयांतील रेचक औषधांनी, मलाशयांतील दोष बस्तीनें तसेच कफदोषावर वमन हें मुख्य शोधन आहे. पित्त दोषावर जुलाब देणें हें मुख्य औषध आहे. वातदोषावर बस्ती देणें हित-कारक आहे. घाम काढणें, मुत्ररेचन व रक्तस्राव हे उपचार सर्व शरीरांत पसरलेल्या

दोषांचें शोधन करणारें आहेत. स्थान दुष्टीचा विचार करून त्या त्या स्थानांतील दोष वर दिल्याप्रमाणे जवळच्या मार्गांनीच बाहेर काढणेंच सोईचें असते.

१३ पंचकर्मव्याख्या

वमनं रेचनं नस्यं निरूहमनुवासनम् ।
एतानिपंचकर्माणि ॥

वमन, विरेचन. नस्य, निरुहबस्ति व अनुवासन बस्ती या पांच विधींना पंचकर्म असें म्हणतात.

प्राक् पाचनं स्नेहविधिस्ततश्च
स्वेदस्ततः स्यात् वमनं विरेकः ।
निरूहणा न्वासन बस्तिकर्म
नस्यं क्रमश्चेति भिषग् वराणःम् ॥ वा. सू. अ. १६ (टिका)

दोषांचें पाचन करण्याकरितां स्नेहन व स्वेदन हे दोन विधि पहिल्यानें करून नंतर वमन, विरेचन, निरुहबस्ती, अनुवासनबस्ती व नस्यविधी असे हें पांच विधि करावें.

पंचकर्मोक्ति प्रस्तावे वमनविरेकान्स्वासन ।
निरुहानुक्त्वा नस्य विधिमाह ॥ वा. भ. अ. २० टिका श्लो. १

वमन, विरेचन, निरुह, अनुवासन व नस्य हे पांच विधि म्हणजे पंचकर्म होय.

१४पंचकर्माचीं नांवें

वमनं रेचनं नश्यं कर्णपूरणमेवच ।
रक्तस्रुतिः समासेन कथ्यते नाति विस्तरम् ॥ यो. र.

वमन, रेचन, नस्य, कर्णपूरण व रक्तस्रुति हीं पंचकर्में होत असे कांही वैद्य मानतात.

१५ वमनाचीं औषधें (योग)

कृष्णाराठफलंसिधुं कफे कोष्ण जलैः पिवेत् । यो. र.

पिंपळी, गेळफळ, सैंधव यांचें चूर्ण करून ऊन पाण्याशीं कफविकारांत वमन होण्याकरिता द्यावें.

सश्लेष्मवातपीडायां सक्षीरं मदनं पिबेत् ।
अजीर्णेकोष्णपानीयं सिधुंपीत्वा वमेत् सुधीः ॥ यो. र.

कफयुक्त वातपित्तविकारांत गेळफळाचें चूर्ण दुधाशीं द्यावे. अजीर्णाच्या विकारांत वमन होण्याकरितां ऊन पाण्यांत सैंधव घालून पिण्यास द्यावें.

वांतिकारक औषधें

मदन मधुकलंबा निंबबिंबीविशाला ।
त्रपुस कुटजमूर्वा देवदाली कृमिघ्नम् ।
विदुल दहनचित्राः कोशवत्यौ करंजः
कणलवण बचेला सर्वपाइछर्दनानि ॥ वा. सु.

गेळफळ, जेष्ठमध, कडुभोपळा, कडुनिंब, कडुतोंडळे, इंद्रायण, कडुकाकडी, कुडा, मोरवेल, देवडांगरी, वावडिंग, जलवेतस, चित्रक, दांती, कडुदोडके, कडुघोसाळे करंज, पिंपळी, सैंधव, वेखंड, वेलची व सरसो हीं वांतिकारक औषधें आहेत.

१६ वमन कोणास देऊ नये

न वामनीयस्तिमिरी न गुल्मी नोदरी कृशः ।
नानिवृद्धो गर्भिणीं च न स्थूलो न क्षतातुरः ॥
सुकुमारं कृशंबालं वृद्धं भीरुं न वामयेत् ॥ यो. र.

तिमिर, गुल्म, उदर किंवा कृशत्व ह्यांनी पीडित, अतिवृद्ध, गर्भिणी, उरःक्षत व व्रण ह्यानें पीडित, सुकुमार, अशक्त व बाल, वृद्ध व भित्रा ह्यांना वमन देऊ नये.

Indira Gandhi National Centre for the Arts

१७ रेचक औषधें

निकुंभकुंभत्रिफलागवाक्षी स्तुक् शंखिनी नीलि नितिल्वकानि ।
शम्याक कंपिल्लक, हेमदुग्धा दुग्धं च मूत्रं च विरेचनानि ॥ वा. भ. सु.

दंती, निशोत्तर, त्रिफळा, घोडइंद्रायण, तिधारीनिवडुंग, साखवेल, निळी, लोध्र, बाहवा, रेवाचिनी, गिवळा धोत्रा दूध व मूत्र ही रेचक औषधें आहेत.

१८ रेचक औषधींचें योग

एरंडतैलं त्रिफला क्वाथेन द्विगुणेन च ।
युक्तंपीत्वा पयोभिर्वा न चिरेण विरिच्यते ॥ यो. र. २८६

एरंडतैलाच्या दुप्पट त्रिफळचाचा काढा घेऊन त्यांत तें एरंडेल घालून प्यावे किंवा एरंडेल तेलाच्या दुप्पट दूध घेऊन त्यांतून एरंडेल तेल घ्यावें. म्हणजे होतात.

त्रिवृत्ता कौटजं बीजं पिप्पली विश्वभेषजम् ।
समृद्वीकारसं क्षौद्रं वर्षाकाले विरेचनम् ॥ यो. र. २८६

निशोत्तर, इंद्रजव, सुंठ, पिंपळी ह्यांचें समभाग चूर्ण करून तें वर्षाऋतुमध्यें जुलाब होण्याकरितां मनुकांच्या काढचाशी मध घालून द्यावें.

त्रिवृता शर्करातुल्या ग्रीष्मकाले विरेचनम् । यो. र.

निशोत्तराचें चूर्ण करून तितकीच साखर घालून ग्रिष्मऋतूंत रेचण्यास घ्यावें.

पादमक्षर्णहस्तै पथ्या त्रिवृतं च नागरं लवणम् ।
निष्कथित पीतसारं नरपति योग्यं विरेचनं भवति ॥ यो. र.

हिरडेदळ पावभर, निशोत्तर एक भाग, सुंठ दोन भाग, दोन भाग सैंधव, दोन भाग यांचें चूर्ण थोर असाण्याच्या काढयांतून द्यावें. हा टाळफाचा योग राजालाहि देण्यास हरकत नाही.

## १९ रेचनापासून फायदे

इंद्रियाणां बलं बुद्धेः प्रसादो वन्हिदीप्तिता ।
धातुस्थैर्यं वयःस्थैर्यं भवेत् रेचन सेवनात् ॥

रेचक घेऊन उत्तम प्रकारे रेंच झाल्यानंतर इंद्रियाची शक्ति वाढते. बुद्धि प्रसन्न होते. जठराग्नि प्रदीप्त होतो. शरीरांतील सर्व धातूंना स्थिरत्व येते आणि वृद्धत्व लवकर येत नाही.

## २० रेचक केव्हां घ्यावें ?

स्निग्धस्विन्नाय वांताय दद्यात् सम्यग् विरेचनम् ।
अवांतस्य त्वधः स्रस्तो ग्रहणीं छादयेत् कफः ॥
मंदाग्नि गौरवं कुर्यात् जनयेत् वा प्रवाहिकम् ।
अथवा पाचनेनैव बलासं चापि पाचयेत् ॥
स्निग्धस्य स्नेहनैः कार्यं स्वेदैःस्विन्नस्यरेचनम् ।
शरदृतौ वसंतेच देहशुद्धौ विरेचयेत् ॥
अन्यदात्ययिके कार्ये स्वेदनं शीलयेत् बुधः ॥
पित्ते विरेचनं युंज्यादामोद्भूते गदे तथा ॥ यो. र. २८५

ज्याला उत्तमप्रकारे स्नेहन, स्वेदन, वमन दिलें आहे अशा मनुष्याला त्याच्या प्रकृतीला योग्य असें विरेचन द्यावें. ज्याने वमन घेतलें नाही. म्हणजे ज्याला वांत्या झाल्या नाहीत त्याला रेचक दिले असतां त्याचा कफ दोष खाली सरून ग्रहणीला आच्छादून टाकून अग्निमांद्य, अंगाला जडत्व, किंवा प्रवाहिका हें विकार उत्पन्न करितो. ह्यासाठीं प्रथम पाचनीय द्रव्यानें कफाचें पाचन करावें आणि नंतर रेचन द्यावें. तसेच स्नेहन, स्वेदन ह्या उपचारांनीं ज्याचें शरीर स्निग्ध व स्विन्न झालें आहे अशाला रेचक द्यावें. शरदऋतु व वसंत ऋतु ह्या दोन ऋतुमध्यें देहशुद्धिकरितां रेचन द्यावें. अन्य ऋतुमध्यें रेचन देणें जरूरच असेल तर प्रथम स्वेदन द्यावें. पित्तविकार, आमजन्य रोग, उदर, व पोट फुगणें ह्या विकारांत कोठ्याची शुद्धि होण्याकरितां रेचक द्यावें.

२२ शोधन क्रियेचें श्रेष्ठत्व

दोषाः कदाचित् कुप्यंति जिता लंघन पाचनैः ॥
ये तु संशोधनैः शुद्धा न तेषां पुनतद्भवः । यो. र. २८६

लंघन व पाचन ह्या उपचारांनीं जिकलेले दोष कदाचित् पुनःप्रकुपित होतात. परंतु संशोधक उपचारांनी दोष काढून टाकल्यामुळे ज्याचा देह व कोठा शुद्ध झाला आहे, त्याचें दोष पुन्हा वाढत नाहींत.

२३ विरेचन कोणास वर्ज्य

बालवृद्धावतिस्निग्धः क्षतक्षीणो भयान्वितः ।
श्रातस्तृषार्तः स्थूलश्च गर्भिणी च नवज्वरी ॥
नवप्रसुतः नारीच मंदाग्निश्च मदात्ययी ।
शल्यार्दितश्च रूक्षश्च न विरेच्या विजानता ॥ यो. र. २८६

बाल, वृद्ध. ज्याचा कोठा अति स्निग्ध झाला आहे, तो उरक्षत किंवा व्रण विकारानें क्षीण झालेला, भ्यालेला, दमलेला, तहानेला, स्थूल, गर्भिणी. नवज्वर ज्याला आहे तो, नुकतीच बाळंत झालेली स्त्री, ज्याचा अग्नि मंद आहे तो, मदात्यय रोगानें पिडीत, शरिरांत कांही शल्य गेल्यामुळे त्यानें पीडित, व रूक्ष कोठा असलेला मनुष्य ह्यांना विचक्षण वैद्यानें रेचन देऊं नये.

२४ वमनविरेचन औषधीकार्यांत फरक

अपक्वं वमनं दोषान् पच्यमानं विरेचनम् ।
निर्हरेद्वमनस्याहुतः पाकं न प्रतिपालयेत् ।। वा. सू. अ १८

वमनौषध अपक्व अवस्थेंतच दोषास काढून टाकिते आणि विरेचन औषध पक्व होत असतांना दोषास काढते. म्हणून वमनाच्या पचनाचीं वाट पाहूं नये.

२५ रेचक स्निग्ध असावें

सर्वान् स्नेहविरेकैश्च रूक्षैस्तु स्नेहभावितान् ॥

सर्व रोग्यास स्निग्ध रेचक द्यावें, पण चांगल्या रीतीनें स्नेहन झालेल्यास रुक्ष रेचक द्यावे.

२६ बस्तिचें महत्त्व

विट् श्लेष्म पित्तादि मलाचयानां ।
विक्षेप संहारकरः स यस्मात् ।
तस्याऽति वृद्धस्य शमाय नान्य ॥

द्रस्वेर्विना भेषजमस्ति किंचित् ॥
तस्माच्चि कित्सार्धं इति प्रदिष्टः ।
कृत्स्नाचिकित्साऽपिच बस्तिरेकैः । वा. सु. अ. १९

मल, कफ, पित्त वगैरे मलाचे जें संचय त्यास दूर फेकणें किंवा जागच्या जागीं राहणें हें सर्व वायुवरच अवलंबून असतें. तो अतिशय वाढला असतां त्याचें शमन बस्तीवाचून दुसरें औषध नाही. म्हणूनच बस्तीस कोणी कोणी अर्धी चिकित्सा मानतात. कांही तर सगळी चिकित्सा बस्तीत येते असे मानतात.

## २६ निरुह्बस्तिकरिता उपयोगी औषधें

मदनकुटजकुष्ठदेवदाली । मधुकवचादशमुलदारूरास्ना: ।
यवमिसिकृतवेधनंकुलत्थो । मधुलवणं त्रिवृता निरुहणानि ।

गेळफळ, कुडयाची साल, कोष्ठ, देवडांगरी, जेष्ठमध,, वेखंड, दशमूळे, देवदार, रास्ना, जव, बडीशेप, कडुदोडकें, कुळीथ, मध, सैंधव, निशोत्तर हीं औषधें निरुह-बस्तीच्या उपयोगी आहेत.

## २७ वातविकारावर बस्तीची औषधें

वातघ्दौषधनिः क्वाथ त्रिवृतासैंधवंयुतः ।
बस्तिरेकोऽनिले स्निग्धः स्वाद्वम्लोष्ण रसान्वितः ॥ वा. भ. सु. १९

वातविकारावर बस्ती देणें तो वातन शक औषधींचा ऊन काढा, निशोत्तर, सैंधव स्नेह, मधुर, अम्ल, मांसरस यांनी युक्त करून एकत्र द्यावा.

## २८ बस्तीचे प्रकार

वातोल्बणेषु दोषेसु वाते वा बस्तिरिष्यते ।
उपक्रमाणां सर्वेषां सोऽग्रणीस्त्रिविधश्चसः ॥
निरूहोऽन्वासनो बस्तिरुत्तरः वा. सु. १९

केवळ वातविकारांत किंवा वाताधिक दोषांत बस्ति देणें हितकारक आहे. तो सर्व प्रकारच्या चिकित्सेंत श्रेष्ठ असून त्याचे निरुह, अनुवासन व उत्तरबस्ती असे तीन प्रकार आहेत.

## २९ निरूहबस्ती कोणत्या रोगांत द्यावा?

गुल्माऽनाहखुडप्लीह शुद्धाऽतीसारशूलिनः ।
जीर्णज्वर प्रतिश्याय शुक्राऽनिलमलग्रहान् ॥
वर्ध्माश्मरी रजोनाशान् दारूणांश्चाऽनिलामयान् ॥ वा. सू. १९ ५६

निरुह बस्ती हा गुल्म, पोटफुगी, वातरक्त, पानथरी. निराम, अतिसार, शूळ, जीर्णज्वर, पडसें, वीर्य, वात व मळ यांचा अवरोध, अंतर्गळ, मुतखडा, विटाळ बंद होणें व दारुण वातरोग यावर द्यावा.

३० निरूहबस्ती योग्य तीच अनुवासनहि योग्य

आस्थाप्या एव चान्वास्थ्या विशेषादति वन्हयः ।
रूक्षाः केवलवातार्ताः वा. सु. १९

ज्यास निरुहबस्ती द्यावयाचा तेच अनुवासनासहि योग्य जाणावेत. ज्यांचा अग्नि फार तीक्ष्ण आहे. रूक्ष व केवळ वातरोगी अशास तर अनुवासनबस्तीं विशेषेकरून द्यावा.

१३ निरुह बस्ति

माधुतैलिक बस्ति

१) मधुतैले समे कर्षः सैंधवाद्विपिचुर्मिसिः ।
एरंडमूल क्वाथेन निरुहोमाधुतैलिकः ।
रसायनं प्रमेहार्शः कृमिगुल्मांत्र वृद्धिनुत् २८ वा. क. अ ४

मध व तेल समभाग, सैंधव एक तोळा, बडीशेप दोन तोळे व एरंडमूळाचा काढा यांचा बस्ती द्यावा. ह्यास माधुतैलिक म्हणतात. प्रमेह, अर्श, कृमि, गुल्म, व अंत्रवृद्धि यांचा नाशक असून हें रसायन आहे.

यापन बस्ति

२) यापनोधनकल्केन मधुतैल रसाज्यवान् ।
प्रायुजंघोरुवृषण बस्तिमेहनशूलजित् २९

मध, तेल, सूर्वा, तूप व नागरमोथ्याचा कल्क यांचा बस्ती गुद, पोटऱ्या, मांड्या वृषण, शिस्न व बस्ती यांतील शूळ दूर करितो व यापन म्हणजें प्राणधारण करणारा आहे.

यापन बस्ति

३) द्रसृतांशैधृतक्षौद्र वसा तैलैः प्रकल्पयेत् ।
यापनं सैंधवार्धाक्ष हपुषार्धपलान्वितम् ॥ ३०

तूप, मध, वसा व तेल हीं आठ आठ तोळे, सैंधव अर्धा तोळा व शेरणी दोन तोळे घेऊन त्यांचा बस्ति यापनार्थ द्यावा.

युक्तरथ बस्ति

४) एरंडमूलनिःक्वाथो मधुतेलं स सैंधवः ।
एषयुक्तरथोबस्तिः सवचा पिप्पली फलः ३१

एरंडमूळाचा काढा, तेल, मध, सैंधव, वेखंड, पिंपळी आणि गेळफळ यांचा कल्क यांच्या बस्तीस युक्तरथ बस्ति म्हणतात.

द्विपंचमूलत्रिफलाफलबिल्वानि पाचयेत् ॥ ३४
गोमूत्रेण च पिष्टैश्च पाठावत्सक तोयदैः ।
सफलैः क्षौद्र तैलाभ्यां क्षारेण लवणेनच ॥ ३५
युक्तो बस्तिः कफ व्याधि पांडुरोग विषूचिषु ।
शुक्रानिल विबंधेषु बस्त्याटोपेच पुजितः ॥ ३६

दशमूळें, त्रिफळा, गेळफल व बेलफळ यांचा गोमूत्रांत केलेला काढा, वासनवेल, कुडा नागरमोथे व गेळफळ यांचा कल्क, मध, तेल, जवखार व सैंधव यांचा बस्ति, कफरोग, पांडुरोग, विशूचिका, शुक्र व वायू यांचा अवरोध व बस्तींत गुडगुड शब्द या विकारावर प्रशस्त आहे.

## ३२ स्नेहबस्ति (अनुवासन)

शताव्हाचिरि दिबिल्वाम्लै स्तैलं सिद्धं समीरणे ॥ ५८

बडीशोप, करंज. कांजी वगैरे आम्ल पदार्थ यांनी सिद्ध केलेलें तेल वायूवर बस्ती देण्यास योग्य आहेत.

२) सैंधवेनाग्निवर्णेन तप्तंवाऽनिलजिद्धुतम् ।

सैंधव तापवून लाल करून तेलांत टाकावें, त्यानें तापलेल्या तेलाचा बस्ति द्यावा. तो वातघ्न आहे.

जीवंती मदनं मेदां श्रावणीं मधुकं बलांम् वा. क. ५९
शताभर्षभकौ कृष्णां काकनासां शतावरीम् ।
सगुप्तां क्षीर काकोलीं कर्कटांख्यां शठीं वचाम् ,, ६०
पिष्ट्वा तैलधृतं क्षीरे साधयेत्त च्चतुर्गुणे ।
बृहणं वातपित्तघ्वं बल शुक्राग्निवर्धनम् ॥ ,, ६१
रजः शुक्रामयहरं पुत्रीयमनुवासनम् ।

हरिणदोडी, गेळफळ, मेदा, मुंडी, जेष्टीमध, चिकणा, बडीशोप, ऋषभक, पिंपळी, पांढरी कावळी, शतावरी, कवचबीज, क्षीरकाकोली, काकडसिंगी, कचोरा व वेखंड यांचा कल्क, तेल, तूप व त्या तेलाच्या व तूपाच्या चौपट दूध एकत्र सिद्ध करावें. याचा बस्ति पौष्टिक, वातपित्तनाशक, शक्ति, शुक्र व अग्नि यांचा वर्धक, स्त्रियांचे आर्तवाचा व पुरुषांचें शुकाचे विकार दूर करणारा व पुत्र देणारा आहे.

साधितं पंचमूलेन तैलं बिल्वादिनाऽथवा ॥ ६६
कफघ्नं कल्पयेतैलं द्रव्यैर्वा कफघातिभिः ।
फलेरष्टगुणे चाम्ले सिद्धमन्वासने कफे ॥ ६७

बिल्वादि पंचमुळांनी किंवा इतर कफनाशक पदार्थांनी सिद्ध केलेलें तेल कफनाशक आहे. गेळफळे व आठपट आम्ल पदार्थ घालून तयार केलेलें तेल वुकावर अनुवासन देण्यास उत्तम आहे.

३३ नस्याचें महत्त्व

ऊर्ध्वं जत्रु विकारेषु विशेषान्नस्यमिष्यते ।
नासाहि शिरसोद्वारं तेन तद्व्याप्यहंतितान् ॥ वा. सु. अ. २०

ऊर्ध्वंजत्रुविकारांत म्हणजें शिरोरोगांत विशेषेकरून नस्याचा उपयोग इष्ट आहे. कारण नाक हें मस्तकाचें द्वार आहे. आणि म्हणून ह्याद्वारे दिलेलें औषध मस्तकांत शिरून व पसरून त्यांतील रोगाचा नाश करिते.

३४ शिरोविरेचनाकरितां औषधें

बेल्लापामार्ग व्योष दार्वीसुराला ।
बीजंशैरीषं वार्हतं शैग्रवं च ॥
सारोमाधूक: सैंधवं ताक्ष्यशैलं ।
त्र्युटचौपृथ्वीका शोधयंत्युत्तमांगम् ॥ दा. भ. सु

वावडींग, आघाड्याचें बी, त्रिकटु, दारुहळद, राळ, सिरसबीज, रिंगणी, डोरली, शेवग्याच्या शेंगेंतील बी, मोहाच्या झाडाचा नार, सैंधव, रसांजन, लहान, मोठी वेलचीं, बाफळी हीं औषधें शिरोविरेचनांत वापरलीं जातात.

Indira Gandhi National
Centre for the Arts

३५ धूम्रपान खोकल्यावर

शरावसंपुटच्छिद्रे नाडी न्यस्य दशांगुलाम् ।
अप्टांगुलां वा वक्त्रेण कासवान् धूममापिबेत् ॥

खोकल्यावर धूम्रपान करणें असल्यास दोन परळ एकत्र सांधून वरच्यास भोक पाडावें. त्या भोकांतून आठ अंगुले लांबीची नळी ठेवून तोंडानें धूर ओढावा.

३६ कोणाला धूम्रपान प्रशस्त

कास: श्वास: पीनसो विस्वरत्वंपूतिगंध: पांडुता केशदोष: ।
कर्णाऽस्याक्षिस्राव कंडूतिजाड्यं तंद्रा हिध्माधूमपं न स्पृशंति ॥ वा. सु.

धूम्रपान करणाऱ्या मनुष्यास खोकला, दमा, पीनस, स्वरभेद, तोंड व नाक यांची दुर्गंधी. चेहऱ्याचा फिकटपणा, केसाचे विकार, कान तोंड डोळे यांचा स्राव कंडु व ठणका जाड्य तंद्रा उचकी हे विकार होत नाहीत.

३७ धूम्रपानांत धूर तोंडानें सोडावा

मुखेनैव वमेतधूमं नासया दृग विधानकृत् ।

धूर सोडतांना नेहमी तोंडानेच सोडावा. नाकाने सोडल्यास डोळ्यास इजा होते. ( तीनदां धूर घेऊन तीनदा सोडणें यास एक धूम्रपान म्हणतात ).

नोट–स्निग्ध धूम्रपान दिवसांतून एकदाच, मध्यम दोनदा व तीक्ष्ण तीन किंवा चार वेळ.

३८ असनादि गण: (क्रमी कुष्ठव्रणनाशक योग)

असनतिनिश भूर्ज श्वेतवातप्रकीर्या ।
खदिरकदरभंडी शिशपामेषश्रृंग्य: ।
त्रिहिमतलपलाशा जोंगक: शाकशालौ ।।
क्रमुकधवं कुलिंगच्छागकर्णाश्वकर्णा:
असनादिर्विजयते श्वित्रकुष्ठकफ क्रिमीन् ।
पांडुरोगं प्रमेहंच मेदोदोष निबर्हण: ।। वा. सु. १५

असाणा, तिवस, भूर्जवृक्ष, अर्जुनसादडा, घाणेराकरंज, खैर, पांढरा खैर, शिरिष, शिसव, मेडशिंगी, पांढरें चंदन, दारुहळद, ताड, वळस अगर साग राळवृक्ष, सुपारी, धावडा, इंद्रजव, अजकर्ण, व अश्वचर्ण हा असयादि गण पांढरें कुष्ठ, कफ, कृमि, पांडु, प्रमेह व मेदोरोग यास नष्ट करितो.

३९ अर्कादि गण (कृमी कुष्ठव्रणनाशक)

अर्कालर्कौ नागदंती विशल्या ।
भार्गो रास्ना वृश्चिकाली प्रकीर्या
श्वेता युग्मं तापसानां च वृक्ष:
अयमर्कादिको वर्ग: कफमेदो विषापह: ।।
कृमिकुष्ठ प्रशमनो विशेषात् व्रणशोधन: वा. सु. १५

रुई, मदार, नागाळो, कळलावी, भारंगमूळ, रास्ना, लघुमेडशिंगी, घाणेरा, करंज, आघाडा, मोठी मालकागोणी, करंज, किन्हई पांढरोव किन्हई हिंगणबेट हा अर्कादिगण कफ, मेद, विष, कृमि व कुष्ठ यांचा नाश करणारा असून विशेषत: व्रण शोधक आहे.

———

# अन्नजल विज्ञानीय

## अध्याय ४

### १ रोग्यांना द्यावयाचें अन्न व पाणी

हॉस्पिटलमधील वेगवेगळ्या वार्डमधील रोग्यांची परीक्षा व औषधीयोजना ही जितकी महत्वाची आहे तितकीच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक रोगावर खाण्याकरितां कोणते कोणते पदार्थ द्यावे याचा विचार करणें ही होय. हल्ली रोग्याला खाण्याकरितां द्यावयाचें पदार्थ म्हणजे दूध, मोसंबी, डाळिंब व चहा हे पदार्थ होत. अलीकडील परिस्थितीनुसार वरील पदार्थ घेण्याचें कांहींना परवडत नाही. तितका दररोज खर्च करणें हें कांहींच्या शक्तीपलीकडे जाते. पदार्थ पोषक तेवढेच परंतु कमी खर्चांत रोग्याचें पथ्य (खाणें) होऊं शकेल. दूध, मोसंबी बरोबरच आणखी कांही खाद्य, पेय त्यांत सामील करून घेणें जरूर वाटतें.

रोग व दोष यासंबंधीचा विचार करून आपल्या नेहमीच्या खाण्यांत येत असलेल्या अन्नधान्यांतून कोणतें धान्य त्या रोग्याला देतां येण्यासारखे आहे, याचा विचार करून त्या रोग्याला पचूं शकेल अशा कोणत्या रीतीने धान्य शिजवून दिलें असतां हितावह होईल याचा विचार करतां असें दिसून येईल की पूर्वीच्या काळीं ज्याचा अग्नि फार मंद झाला आहे अशा रोग्याला मूग, तांदुळ, कणीक, उडीद हेच पदार्थ देत; पण आतां निरनिराळ्या रोगांकरितां निरनिराळ्या प्रकारांनी शिजवून म्हणजे शिजवितांना केव्हां १४ पट पाणी तर केव्हां ८ पट तर केव्हां ६ पट पाणी घालून शिजविणें व शिजवितांना रोगनाशक किंवा चव न बिघडू देतां जास्त स्वादिष्ट होण्याकरितां पाचक–दीपक व रोगनाशक अशीं द्रव्यें घालून तें खाद्य–पेय शिजवून तयार करून तें पेय देणें. कांही रोगांत धान्याचा एकही कण न येऊं देतां निव्वळ पाणी तर कांही रोगांत धान्याच्या कणासहीत तें शिजविलेलें पेय दिल्यानें तें काम फारच थोड्या खर्चांत होईल. याप्रमाणें दूध, साबुदाणा, मोसंबी, पेया, पेंज, मंड, विलेपी, फांट वगैरे हें पातळ खाद्यद्रव्यें आलटून पालटून देत गेल्यास रोग्याला कंटाळवाणेंहि वाटणार नाही व पाचक दीपक व रोगनाशक औषधी घालून तयार केल्यामुळे अग्नि प्रदिप्त होऊन रोगशमन होण्यालाहि कांहीसा फायदा होईल. त्या वस्तु सहज होण्यासारख्या असून खर्चाच्या दृष्टीनेहि त्या झेपण्यासारख्याच आहेत.

रोगी माणसांना औषध व अन्न देण्याच्या बाबतींत जितकी काळजी आपण घेतो तितकीच काळजी रोग्यांना पाजावयाच्या पाण्याच्या बाबतींतहि घेणें जरूर आहे. कांही रोगांत उदाहरणार्थ जलोदरांत पाणी पिणें वर्ज्य सांगितले आहे. तर सूज, मळमळ, मधुमेह, व्रण, इ. रोगांत पाणी फारच थोडें प्यावें असें सांगितलें आहे. कांही रोगांत पाणी प्यावयाचे तें थंड पाणी न पितां उकळी येईपर्यंत तापवून नंतर थंड करून तें पिण्यास द्यावे. उदाहरणार्थ पार्श्वशूळ, नवज्वर, उचकी, गलग्रह, पडसें इ. रोगांत निषेध सांगितला आहे.

रोग्यांना उपयुक्त होतील अशा खाद्यपेयांचीं नांवें व कृति खाली दिली आहे.

२ वाटचमंड

सुकंडितैस्तथा भृष्टैर्वाटचमंडो यवैर्भवेत् ।
कफपित्तहरः कंठचो रक्तपित्तप्रसादनः ॥ २१२ ॥ शा. खं. २-३८

जव चांगले कुटून कोंडा काढून त्यांत १४ पट पाणी घालून शिजवून तें पाणी गाळून घ्यावें. याला वाटचमंड म्हणतात. हा मंड प्यालें असतां कफपित्ताचा प्रकोप दूर होऊन कंठास हितकारक होतो व रक्तपित्ताचा प्रकोप दूर होतो.

Indira Gandhi National Centre for the Arts

३ मंड

मंडश्चतुर्दशगुणे सिद्धतोयेत्वसिक्थकः ।
मंडोग्राही लघुःशीतो दीपनो धातुसाम्यकृत् ॥
स्रोतोमार्दवकृत् पित्तज्वरश्लेष्मत्रयापहः । यो. र.

चौदापट पाणी घालून केलेल्या तांदळाच्या पेजेंतील शितें काढून टाकलीं म्हणजे तिला मंड म्हणतात. हा मंड ग्राहक, हलका, थंड, अग्निदीपक, शरीरांतील धातूंना समान स्थितींत ठेवणारा, स्रोतसांना मृदुत्व आणणारा आणि पित्त, ज्वर, कफ, आणि वेरी यांचा नाशक आहे.

४ लाजमंड

लाजमंडस्तु शालिभिः ।
लाजमंडोलघुर्ग्राहि हृद्यः पाचनदीपनः ।
अतिसार ग्रहण्यर्शो रोचकोरुक् त्रिदोषनुत् यो. र. ७४

भाताच्या लाह्या घालून जो मंड करितात त्याला लाजमंड म्हणतात. लाजमंड हलका, ग्राहक, हृदयाला हितकर, पाचक, अग्निदीपक असा आहे आणि तो अतिसार, संग्रहणी व मूळव्याध या रोगांत रुचि देणारा, शूळनाशक व त्रिदोषनाशक असा आहे.

लाजैर्वा तंडुलैर्भृष्टैर्लाजमंडः प्रकीर्तितः ।
श्लेष्मपित्तहरोग्राही पिपासा ज्वरजित् मतः ॥ शा. खं. २–३९

साळीच्या लाह्या अगर भाजलेले तांदुळ घेऊन त्यांत चौदापट पाणी घालून कढवून गाळून घ्यावें. याला लाजमंड म्हणतात. हा प्याले असतां कफपित्ताचा प्रकोप संग्रहणी व अतिसार याचें स्तंभन होते. ज्या ज्वरांत तहान लागते, तो ज्वर नाहीसा होतो.

## ५ शुद्धमंडाची कृति

नीरे चतुर्दशगुणे सिद्धो मंडस्त्वसिक्थकः ।
शुंठी सैंधवसंयुक्तः पाचनो दीपनः परः ॥ २०९ ॥ शा. खं. २-३८

तांदुळाचें १४ पट पाणी घालून शिजवून शितें येऊं न देतां पेज काढावी. त्य पेजेला शुद्ध मंड म्हणतात. त्यांत सुंठ, सैंधव मिळवून प्याले असतांना अन्नाचें पचन व अग्नीचें दीपन होते.

## ६ अष्टगुणमंडाची कृति व गुण

धान्यत्रिकटु सिंधूत्थ मुग्दतंडुलयोजितः ।
भृष्टश्च हिंगुतैलाभ्यां स मंडोऽष्टगुणः स्मृतः ॥२१०॥
दीपनः प्राणदो बस्तिशोधनो रक्तवर्धनः ।
ज्वरजित्सर्वदोषघ्नो मंडोऽष्टगुण उच्यते ॥ २११ ॥ शा. सं खं. २–३८

धणें, सुंठ, मिरे, पिंपळी, सैंधव, मूग, तांदुळ, हिंग व तेल या नऊ औषधांमध्यें प्रथम तेलांत हिंग मिळवून त्यांत मूग ४ तोळे व तांदुळ ८ तोळे घेऊन दोन्ही भाजावें. मग दुसरीं राहिलेली औषधें थोडी थोडी खारट व तिखट न होता त्या मुगांत व तांदुळांत मिळवून त्यांत चौदापट पाणी घालून शिजवून तें पाणी गाळून घ्यावे. तेणेंकरून अग्नीचें प्रदीपन, प्राणास तेज, बस्तीचें शोधन व रक्ताची वृद्धि हीं होतात. ज्वर व वातादीक तीन दोष हें दूर होतात. हा मंड अष्टगुणेंकरून युक्त आहे. म्हणून याला अष्टगुणमंड असें म्हणतात.

## ७ विलेपी

विलेपी च घनासिक्था सिद्धा नीरे चतुर्गुणे ।
बृंहणी तर्पणी हृद्या मधुरापित्तनाशिनी ॥ शां. स. खंड २–३७

तांदुळाचें चौपट पाणी घालून कढवून शिसें कुसकरून घट्ट पेज करावी. तिला विलेपी असें म्हणतात. ती धातुची वृद्धि करणारी, शरीर पुष्ट करणारी, हृदयास हितकर, मधुर व पिताचा नाश करणारी अशी जाणावी.

८ पेया

द्रवाधिका स्वल्पसिक्था चतुर्दशगुणे जले ।
सिद्धा पेया बुधैर्ज्ञेया यूषा: किंचिद् घन: स्मृत: ॥ २०६ ॥
पेया लघुतरा ज्ञेया ग्राहिणी धातुपुष्टिदा ।
यूषो बल्यस्तत: कंठयो लघुपाक: कफापह: ॥२०७॥ शा. खं. २–३७

तांदळाचें चौदापट पाणी घालून पातळ पेजेसारखे व थोडे चिकट होईपर्यंत कढवावे. त्याला पेया म्हणतात. पेयेपेक्षां जें किंचित घट्ट असते त्याला यूष म्हणतात. पेया फार घट्ट असून मलादिकांचें स्तंभन करणारी व धातु पुष्ट करणारी आहे. यूष बल देणारा, कंठास हितकारक व कफाला दूर करणारा असा जाणावा.

९ अन्नस्वरूप यवागू

अथान्नप्रक्रियात्रैव प्रोच्यते नातिविस्तरा ।
यवागू: षड्गुणजले सिद्धा स्यात् कृसरा घना ॥ २०३ ॥
तंडुलैर्माषमुद्‍गैश्च तिलैर्वा साधिता हिता ।
यवागूर्ग्राहिणी बल्या तर्पणी वातनाशिनी शा. खं. २–३७

अन्न प्रक्रिया (अन्नस्वरूप यवागू विलेपी व पेया यांची क्रिया) येथें संक्षेपेकरून सांगतो. तांदूळ, मूग, उडीद अथवा तीळ यांतून ज्या द्रव्यांचीं यवागू करावयाची तें द्रव्य घेऊन त्याच्या सहा पट पाणी घालून घट्ट होईतोपर्यंत कढवावें. त्याला अन्न-यवागू असे म्हणतात. त्या यवागूचीं नांवें दोन. कृसरा व घना व तीं यवागू मलादिकांचें स्तंभन करणारी व बल देणारी, शरिरास पुष्ट करणारी व वायूचा नाश करणारी अशी जाणावी.

१० भात करावयाची कृति

जले चतुर्दशगुणे तंडुलानां चतु:पलम् ।
विपचेत्स्रावयेन्मडं स भक्तो मधुरो लघु: ॥२०८॥ शा. खं. २–३८

१६ तोळे तांदूळ घेऊन त्याच्या १४ पट पाणी घालून शिजवून पेज काढावी म्हणजे तो भात मधुर व हलका होतो.

११ फांट कल्पना

क्षुण्णे द्रव्यपले सम्यक् जलमुष्णं विनिक्षिपेत् ।
मृत्पात्रे कुडवोन्मानं ततस्तु स्त्रावयेत्पटात् ॥ २१४ ॥

स स्याच्चूर्णं द्रवः फांटस्तन्मानं द्विपलोन्मितम् ।
मधुश्वेतागुडादींश्च क्वाथवत्तत्र निक्षिपेत् ॥ २१५ ॥ शा. खं. २–३९

४ तोळे औषध आणून चांगले कुटून १६ तोळे पाणी मडक्यांत घालून चांगले ऊन झाल्यावर त्यांत तें औषध टाकून चांगले ढवळून नंतर तें पाणी वस्त्रानें गाळून घ्यावें. त्याला फांट किंवा चूर्णद्रव असें म्हणतात. या फांटाचें प्यावयाचें प्रमाण दोन पळ जाणावें. त्या फांटांत मध, साखर, गूळ आदी करून पदार्थ घालावयाचे असतां काढयांत घालावयास सांगितलेल्या मानानें घालावे.

## १२ ताकांत शिजवलेला भात

तक्रसिद्धं तु यद्भक्तं ग्रहण्यर्शः श्रमापहम् ।
वातघ्नं बलदं श्लेष्मपित्तरक्ताभिवर्धनम् ॥ यो र. ७३

ताकांत भात शिजवून खाल्ला असता संग्रहणी, मूळव्याध व श्रम यांचा नाश करितो. तो वातनाशक असून शक्तिवर्धक आहे. कफ, पित्त व रक्त यांना वाढविणारा आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

## १३ कण्हेरी यवागू

यवागूः षड्गुणैस्तोयैः संसिद्धा विरलद्रवा ।
यवागूर्ग्राहिणी तृष्णा ज्वरघ्नी बस्तिशोधनी यो. र. ७३

तांदुळाच्या सहापट पाणी घालून दाट अशी जी कण्हेरी करितात ती यवागू ग्राहक असून तहान व ज्वर यांची नाशक आहे आणि बस्तिशोधक अशी आहे.

## १४ पेज

पेया सिक्थान्विता तोये चतुर्दशगुणे कृता ।
पेया कुक्षिगदक्लांति ज्वरस्तम्नाति सारजित् ॥
रुच्याग्निकृल्लघुर्दोष मलस्वेदानुलोमनी ॥ यो. र. ७४

चौदापट पाणी घालून ज्यामध्यें थोडी थोडी शितें आहेत, अशा प्रकारची जी पेज तिला पेया म्हणतात. ती कुशीसंबंधीं रोग, थकवा, ज्वर, अंग तापणें अतिसार यांचा नाशक आहे. तसेच रुचिकारक, अग्निदीपक, हलकी, वातादि दोष व मल याचें अनुलोमन करणारी व घाम आणणारी आहे.

## १५ तापवून थंड केलेलें पाणी कोणत्या रोगांत द्यावें ?

गुल्मार्शो ग्रहणीक्षयेषु जठरे मंदानलाध्मानके ।
शोफे पांडुगलग्रहे व्रणगदेमेहेचनेत्रामये ॥

वातारुच्यतिसारके कफयुते कुष्ठे प्रतिश्यायके ।
उष्णं वारि सुशीतलं शृतहिमं स्वल्पं प्रदेयं जलम् ॥ यो. र. १५४

गुल्म, मूळव्याध, ग्रहणी, क्षय, उदर, अग्निमांद्य, पोट फुगणें, सूज, पांडुरोग, गळ्याचा अवरोध, व्रण, मेह, नेत्ररोग, वातरोग, अरुचि, कफयुक्त अतिसार, कुष्ठरोग, पडसें, ह्या विकारांत तापवून थंड केलेलें पाणी द्यावें.

## १६ दूध कोणी पिऊं नये?

नवज्वरेच मंदाग्नौ ह्यामदोषेषु कुष्टिनाम् ।
शूलिनां कफदोषेषु कासीनामतिसारिणाम् ॥
पयःपान न कुर्वीत् विशेषात् कृमिदोषदम् ॥

नवज्वर, अग्निमांद्य, आमदोष, कुष्ठ, शूळ, कफदोष, खोकला, अतिसार हे विकार ज्यांना आहेत त्यांनी व ज्याला जंताचा विकार आहे त्यांनी दूध सेवन करू नये.

## १७ ऊन पाण्यासंबंधी सूचना

दिवाशृतं तु यत्तोयं रात्रौ तत् गुरुतां व्रजेत् ।
रात्रौशृतं दिवा तद्वत् गुरुत्वमधिगच्छति ॥ यो. र. १५६

दिवसा तापविलेलें पाणी रात्रीं जड होते व रात्रीं तापविलेलें पाणी दुसरें दिवशीं जड होतें. ( दिवसाकरितां वेगळे व रात्रीकरिता वेगळे तापवावें. )

## १८ ऊन पाण्याचा निषेध

दिवा शृतं तु यततोयं रात्रौ तद्गुरुतां व्रजेत् ।
रात्रौभ्शृतं दिवा तद्वत् गुरुत्वमधिगच्छति ॥ यो. र. १५३

दिवसा तापविलेलें पाणी रात्रीं जड होते. व रात्रीं तापविलेलें पाणी दुसरें दिवशीं जड होते. ( ह्यासाठीं दिवसा व रात्रीं वेगवेगळें पाणी तापवून घ्यावें. )

## १९ थंड पाण्याचा निषेध

पार्श्वशूले प्रतिश्याये वातरोगे गलग्रहे ।
आध्माने स्तिमिते कोष्ठे सद्यःशुद्धे नवज्वरे ॥
हिक्कायां स्नेहपीते च शीतांबु परिवर्जयेत् ॥ यो. र. १५३

पार्श्वशूळ, पडसें, वातरोग, गळा मिळून येणें, पोट फुगणें, कोठा स्तब्ध होणें, नवज्वर, उचकी हे रोग ज्यांना आहेत त्यांनी व ज्यांनी वमन, विरेचन घेतलें आहे व व ज्यांनी स्नेहपान केलें आहे त्यांनी थंड पाणी पिऊं नये.

२० कोणत्या रोगांत पाणी थोडे प्यावें?

अरोचके, प्रतिश्याये प्रसेके श्वयथुक्षये ।
मंदाग्नावुदरे कोष्ठे ज्वरे नेत्रामये तथा ।
व्रणेच मधुमेहेच पानीयं मंदमाचरेत् । यो. र. १५३

अरोचक, पडसें, मळमळणें, सूज, क्षय, मंदाग्नि, उदर, कोष्ठविकार, ज्वर, नेत्ररोग, व्रण, मधुमेह या विकारांत पाणी थोडें प्यावें.

-----

Indira Gandhi National
Centre for the Arts

# दोषचिकित्सा विज्ञानीय

## अध्याय ५ वा

रोगांवरील चिकित्सा सांगण्याचे अगोदर, रोगनिर्मितीला प्रामुख्याने कारणीभूत असलेले किंबहुना त्याचे विकृतिशिवाय रोग होणेच संभवत नाही. असे जें दोष त्यांची पहिल्यानें वृद्धि होते. ती एकदम न होता टप्प्याटप्प्यानें किंवा ठरीव अवस्थेनुसार होते. दोषांची वाढ होत होत प्रत्यक्ष रोगनिर्मिती होईपर्यंत दोषांना खालील सहा अवस्थें तून जावें लागतें. संचय, प्रकोप, प्रसार, स्थासंश्रय, व्यक्ति व त्याचे भेद अशा त्य दोषांच्या सहा अवस्था आहेत. त्यापैकी दोषांच्या पांचव्या अवस्थेंत रोगांची निर्मिती होते. तेव्हा तो रोग कोणता व त्या रोगांत कोणता दोष प्रधान आहे याचा लक्षणावरून विचार करून पंचकर्मयुक्त चिकित्सा करावी.

दोषांची संचयादि क्रमवृद्धीने जी वाढ होते त्या संचयप्रकोपादिकामुळे होणारीं लक्षणेंहि सांगितलीं आहेत.

Indira Gandhi National
Centre for the Arts

शरीराचें सूक्ष्म परीक्षण करून संचयप्रकोपादिकाच्या कोणत्या अवस्थेपर्यंत दोष वाढले आहेत हें त्यांच्या लक्षणावरून समजून घेणें जरूर आहे. दोषांचा चय झाल्याचीं लक्षणें दिसून आलीं तर कोणत्या दोषांचा तो चय आहे हें लक्षणावरून समजून घेऊन त्यावर औषधीयोजना करून दोषांची झालेली वाढ नाहीशी करून पुढे होणाऱ्या रोगांची निर्मिती मुळांतच नष्ट करतां येते. दोषांचा चय न होऊं देण्याचाच प्रयत्न वारंवार होत गेल्यास दोषांचा प्रकोप व प्रसर होण्याचे सहज टळेल. अशा स्थितींत रोग होण्याची कदापिहि भीतिच राहणार नाही. पण त्याकरितां आयुर्वेदांत सांगितले, स्वास्थ्यरक्षणाचे नियम मात्र कसोशीनें पाळलें पाहिजेत.

चिकित्सेला उपयोगी पडावे म्हणून दोषांचा संचय, प्रकोप प्रसरादिकांचीं लक्षणें व त्यावरील चिकित्सा सांगण्यांत येईल.

### २ दोषवृद्धिच्या सहा अवस्था

संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयम् ।
व्यक्ति भेदं च यो वेत्ति दोषाणां स भवेद्भिषक् ॥
संचये अपहृता दोषा लभंते नोत्तरागतीः ॥
ते तूत्तरासु गतिषु भवंति बलवत्तराः । सु. सु. २१

दोषांचा संचय, प्रकोप, प्रसर, ( व्याप्ति ) व्याप्तिनंतर आश्रयस्थान, व्यक्ति (रोगाचें प्रत्यक्ष स्वरूप) आणि त्या दोषांचें भेद हे सहा प्रकार ज्याला चांगले समजतात तोच वैद्य म्हणावा. दोषांचा संचय होताच जर ते संशोधनादि पंचकर्में करून काढून टाकलें तर त्यांना पुढील ( प्रकोपादि ) अवस्था प्राप्त होत नाही. तसा जर त्यांना प्रतिकार मिळाला नाही तर तें उत्तरोत्तर पुढील अवस्थेमध्यें बलाढ्य होतात. ( ह्यासाठीं दोष फारच संचित झाला असेल तर संशोधनानें काढून टाकावा. मध्यम प्रमाणांत संचित असेल तर लंघनपाचनादि योग करावें आणि अल्पसंचय असेल तर संशमन प्रयोग करावें.)

३ वातादिकांचा संचय हा प्रथमकाल

**तत्र संचितानां खलु दोषाणां स्तब्धपूर्णकोष्ठता पीतावभासता मंदोष्मता चांगानां गौरवमालस्यं चयकारणविद्वेषश्चेति लिंगानि भवंति । तत्र प्रथम क्रियाकालः ।:**

सु. सु. २१

दोष आपापल्या स्थानांत प्रमाणापेक्षा जास्त साठलें असता पुढे सांगितल्याप्रमाणें लक्षणें होतात. त्यांत सामान्यतः वाताचा जास्त संचय झाला असतां कोठा ताठतो व फुगल्यासारखा वाटतो. पित्ताच्या संचयानें पिवळट दिसणें व अंग किंचित् ऊन होणें आणि कफाच्या संचयानें अंगाला जडपणा व आळस येणें हीं लक्षणें होऊन शिवाय दोषांच्या वृद्धीला जीं जीं कारणें लागतात त्याचा तिटकारा येणें हीं लक्षणें होतात. दोषांचा आपापल्या स्थानांत ठरलेल्या प्रमाणापेक्षा जास्त साठा झाल्यामुळे रोग होण्याची भीति आहे. याकरितां त्या त्या स्थानांतील ते ते वाढलेले दोष काढून टाकण्याकरितां चिकित्सा करणें जरूर आहे. हा चिकित्सेचा पहिला काळ होय. ( दोषसंचय काढून टाकल्यामुळे पुढे रोग होण्याची मुळीच भीति राहत नाही. ) रोग न होऊं देण्याकरितां चिकित्सा करण्यासाठीं वैद्याला ही पहिली संधि लाभली आहे.

वातादिकांचा प्रकोप हा चिकित्सेचा द्वितीय क्रियाकाल

**तेषां प्रकोपात् कोष्ठतोदसंचरणाम्लिकापिपासापरिदाहान्नद्वेष हृदयोत्क्लेदाश्च जायंते तत्र द्वितीयः क्रियाकाल :।** सु. सु. २१

दोषांच्या संचयावर योग्य चिकित्सा न केल्यामुळे ते दोष वाढून त्यांचा प्रकोप झाला तर कोठ्यांत टोचल्याप्रमाणें पिडा होणें, पोटांत वायुच्या संचारामुळे गुडगुडणें हे विकार वातप्रकोपामुळे होतात. आंबट ढेकर येणें, तहान अंगाचा दाह हीं लक्षणें पित्तप्रकोपामुळे होतात. आणि अन्नद्वेष, मळमळल्यासारखे वाटणें हीं लक्षणें कफप्रकोपामुळे होतात. रोग न होऊं देण्याकरितां दोषाचा प्रकोप काढून टाकण्यासाठी हा दुसरा क्रियाकाल ( ही दुसरी संधि ) होय.

## ५ दोषांचा प्रसार झाल्याचीं लक्षणें

एवं प्रकुपितानां प्रसरतांच वायोर्विमार्गगमनमाटोपौ, औषचोषपरिदाह धूमायनानि पित्तस्य, अरोचकाविपाकाङ्गसादच्छर्देश्चेति श्लेष्मणो लिङ्गानि भवन्ति, तत्र तृतीयः क्रियाकालः ।। सु. सु. २१

ह्याप्रमाणें कुपित होऊन प्रसार पावलेल्या दोषांपासून होणारे विकार म्हणजे वायुच्या प्रसारावस्थेमुळे तो आपला मार्ग सोडून भलतीकडे जाणे आणि त्यामुळे पोटांत दुखणें व गुडगुडणें हे विकार होतात. पित्तप्रसारामुळे एखाद्या ठिकाणीं दाह होतो, अगर सर्वांगाचा दाह होतो. आंगाला ओढ लागल्याप्रमाणें पिडा होते आणि नाका-तोंडांतून वगैरे वाफा अगर धूर निघाल्यासारखे वाटते. कफाच्या प्रसारामुळे अरुचि, अपचन, अंगग्लानि आणि वांति हे विकार होतात. ही दोषाच्या प्रसाराची अवस्था म्हणजे चिकित्सेचा तिसरा काळ होय.

## ६ स्थानसंश्रयामुळे वेगवेगळ्या स्थानांतील विकार

अत ऊर्ध्वं स्थानसंश्रयं वक्ष्यामः । एवं प्रकुपिताः तांस्तान् शरीरप्रदेशानागम्य तांस्तान् व्याधीन् जनयन्ति । ते यदोदरसंन्निवेशं कुर्वंति तदा गुल्मविद्रध्युदराग्निसङ्गानाहविसूचिकातिसारप्रभृतीन् जनयंति; बस्तिगताः प्रमेहाश्मरीमूत्राघात मूत्रदोष प्रभृतीन्; वृषणगता वृद्धीः; मेढ्गता निरुद्धप्रकशोपदंशशूकदोषप्रभृतीन्; गुदगता भगंदरार्शः प्रभृतीन्; ऊर्ध्वजत्रुगतास्तूर्ध्वजान्; त्वङ्मांसशोणितस्तथाः क्षुद्ररोगान् कुष्ठानि विसर्पांश्च; मेदोगता ग्रंथ्यपच्यर्बुद गलगंडालजी प्रभृतीन्; अस्थिगताविद्रध्य नुषयी प्रभृतीन्; पादगताः श्लीपदवातशौणितवातकंटकप्रभृतीन्; सर्वांगगता ज्वर सर्वांगरोगप्रभृतीन्; तेषामेवभमिनि विष्टानां पूर्वरूप प्राडुर्भावः तं प्रतिरोगं वक्षामः तत्र पूर्वरूपणगतेषु चतुर्थः क्रियाकाल ।।

अत ऊर्ध्वं व्याधेर्दर्शनं वक्षामः–शोफार्बुदग्रंथि विद्रधि विसर्प प्रभृतानां प्रव्यक्त लक्षणता ज्वरातिसार प्रभृतिनां च । तत्र पंचमः क्रियाकालः ।।

अत ऊर्ध्वमेतेषामवदीर्णानां व्रणभावमापन्नानां षष्टः क्रियाकालः, ज्वरातिसार प्रभृतीनां च दीर्घकालानुबंधः । तत्राप्रतिक्रियमाणेऽसाध्यतामुपयान्ति ।।

आतां प्रस्तुत झालेल्या दोषांचा स्थानाश्रय सांगतो. ह्याप्रमाणें कुपित झालेले दोष स्रोतोमार्गानें जातां जातां जेथें कुपित होतात त्या त्या शरीराच्या जागीं ते ते रोग उत्पन्न करितात. ते ज्यावेळीं उदरांत प्रवेश करितात त्यावेळीं गुल्म, विद्रधी, उदर, अग्निमांद्य, आनाह, विषूचिका, अतिसार वगैरे विकार उत्पन्न करितात. तें बस्तींत ( मुत्राशयांत ) शिरले असतां, प्रमेह, अश्मरी, मूत्राघात व लघ्वीचे विकार उत्पन्न करितात. वृषणांत शिरले असतां वृषणवृद्धि विकार उत्पन्न करितात. शिस्नांत शिरले असतां निरुद्ध,प्रकाश, उपदंश व शुक्रदोष वगैरे विकार उत्पन्न करितात.

गुदामध्यें गेले असतां भगंदर, मूळव्याध वगैरे विकार उत्पन्न करितात. मानेच्यावर गेले असतां ऊर्ध्वजंत्रुगत सर्व रोग उत्पन्न करितात. त्यांनी त्वचा मांस व रक्त यांचा आश्रय केला असतां, क्षुद्ररोग, कुष्ठ व विसर्प वगैरे रोग उत्पन्न करितात. मेदाचा आश्रय केला असतां ग्रंथी, अपची, अर्बुद, गालगुड व आलजी वगैरे विकार उत्पन्न करितात. अस्थिगत झाले असतां विद्रधि अनुशयी नांवाची पुळी हे रोग उत्पन्न करितात. पायाच्या ठिकाणीं गेले असतां, श्लीपद, वातरक्त, वातकंटक हे रोग उत्पन्न करितात. आणि सर्वांगव्यापी झालें असतां ज्वर व सर्व अंगाचे रोग उत्पन्न करितात. ह्याप्रमाणे हे प्रसर पावलेले दोष त्या त्या स्थानीं शिरून जे जे रोग उत्पन्न करितात म्हणून सांगितले त्यांचीं पूर्व रूपें त्या त्या रोगाच्या निदान प्रकरणांत सांगूं. आतां रोगाच्या पूर्वरूपापर्यंतचीं ही त्यांची स्थिति म्हणजे चिकित्सा करण्याचा चौथा काळ समजावा.

आतां यापुढे रोगाचें प्रत्यक्ष स्वरूप सांगतो. सूज, आवाळू गांठी, विद्रधी व विसर्प यांचें स्पष्ट चिन्ह दिसणें व त्याचप्रमाणें ज्वर. अतिसार ह्यांचेंहि स्पष्ट लक्षण दिसणे हेंच त्यांचें प्रत्यक्ष दर्शन समजावें. हें जें रोगांचें उघडें स्वरूप हा चिकित्सा करण्याचा पांचवा काळ समजावा.

यापुढे ती व्रणाची सूज, आवाळू, गांठी फुटल्या असतां त्यांना व्रणाचें रूप येते. हा त्यांची चिकित्सा करण्याचा सहावा काळ समजावा. आणि ज्वर, अतिसार वगैरे रोग दीर्घकालपर्यंत राहणारे असतात. त्यामुळे त्याच्या स्वरूपदर्शनाबरोबरच म्हणजे चिकित्सेच्या निदान पांचव्या काळांतच उपचार केले पाहिजेत. नाही तर बरेच दिवस लोटल्यावर त्यांना प्रतिक्रिया म्हणजे उपचार योग्य वेळां न मिळाल्या कारणाने तें असाध्य होतात.

## ७ पंचकर्म कोणत्या रोगांत उपयुक्त नाही

पंचकर्मांचें एवढें महत्त्व सांगितल्यावर प्रश्न असा उत्पन्न होतो कीं पंचकर्म उपयोगी पडत नाही असेहि कांही रोग आहेत काय ? असा एक प्रश्न अग्निवेशानें महर्षि अत्रेयांना विचारला होता. चरक ग्रंथांत त्यासंबंधोची जी माहिती आहे, ती पुढील प्रमाणे.

अग्निवेशो गुरुं काले संशयं परिपृष्ठवान् ॥

शिष्य अग्निवेशाला चरकसंहिता बहुतेक सांगून झाल्यानंतर आतांपर्यंत अग्निवेशानें हेंच ऐकलें होते कीं स्नेहन, स्वेदन, वमन, विरेचन, आस्थापन, अनुवासन व शिरोविरेचन द्वारा सर्व रोगांची यशस्वी चिकित्सा होऊं शकते. यावर अशी एक स्वाभाविक शंका अग्निवेशानें विचारली कीं 'पंचकर्म' मुळीच उपयोगी पडत नाही, असा कोणता तरी रोग आहे काय ? यावर महर्षि अत्रेय म्हणाले की ' अस्ति उरूस्तंभ इति ' शिष्य, उरूस्तंभ एक असा रोग आहे की ज्यांत स्पष्ट दिसून आलें की पंचकर्म चिकित्सा ही व्यर्थ आहे. यापुढे पुन्हा महर्षि अत्रेय सांगतात की—

तस्य न स्नेहनं कार्यं न बस्तिर्न विरेचनम् ।
न चैव वमनं
वृद्धये श्लेष्मणो नित्यं स्नेहनं बस्ति कर्म च ।
तत् स्थस्योद्धरेण नैव न समर्थ विरेचनम् ।

स्नेहन, बस्ति, विरेचन व वमन ही त्याची योग्य चिकित्सा नव्हे. कारण स्नेहन, विरेचन, वमन व बस्ति या कर्मांनी वाढलेला कफ तेथून काढणें हें पंचकर्मांपैकी कोणत्याहि उपायानें शक्य नाही.

न शक्याः सुखमुद्धर्तुंजलं निम्नादिव स्थलात् ।

ओल्या जमिनींतून पाणी वेगळे काढून टाकणें जसें कठीण आहे, तसेच उरु (मांडी) मध्ये व्याप्त असलेल्या आमयुक्त समेदकफकाचें निर्हरण करणेंहि कठीण आहे. कारण उरूस्तंभ विकारांत 'स्निग्धोष्णलघुशीतादि' यांचा उरूमध्यें एकत्र संग्रह होऊनच 'उरुस्तंभा'ची उत्पत्ति झाली असते.

स्नेहाच्चामं चितं कोष्ठे वातादीन् मेदसा सह ।
उद्धाऽऽशु गौरवादूरु यात्यधोगैः सिरादिभिः ।। च. चि.

स्नेहादि कारणांनी आम एकत्र होऊन वातादि दोषांच्या गतीला रोखून व मेदोधातुसहीत कोठ्यांत उत्पन्न होऊन त्याच्या जडपणामुळे ऊरु (मांडी) मध्यें अधोगामीं शिरामधून येऊन स्थित होतो. उत्कट बलयुक्त कुपित व अवरुद्ध दोष त्या आमाला जंघा, पाय व मांड्या यांत जखडून टाकतो. त्यामुळे तो मनुष्य निर्बल व गतिशून्य होतो.

महासरसि गंभीरे पूर्णेऽम्बु स्तिमितं यथा ।
तिष्ठति स्थिरमक्षोभ्यं तद्वत् उरूगतः कफम् ।। च. चि.

विशाल सरोवरांत पूर्णपणें भरलेलें पाणी जसे खोल व निश्चल अशा स्वरूपांत राहतें, त्याचप्रमाणें मांड्यामध्यें स्थित झालेला कफ स्थिर व क्षोभरहित (निश्चल) अशा अवस्थेंत राहतो. त्यामुळे पाय व मांड्या यांची हालचाल बंद होते.

वातशंकिभिरज्ञानात्तस्य स्यात् स्नेहनात् पुनः ।
पादयोः सदनं सुप्तिः कृच्छ्रात् उद्धरणं तथा । च. चि.

'उरूस्तंभ' हा त्याच्या कांही लक्षणावरून वातरोगच आहे. अशी चुकीची समजुत निर्माण होऊन त्याला स्नेहन देण्याचा मोह उत्पन्न होतो. आणि त्यामुळे पायांत स्पर्शज्ञान कळेनासे होते व इतका जडपणा येतो की पाय उचलणेच होऊ शकत नाही.

म्हणून अत्रेयांनी सांगितलें की—

'साधयेदन्यथा नवम्'

पंचकर्म सोडून दुसरा नवीनच उपक्रम करणें भाग आहे.

तर मग कोणता उपक्रम करावा?

तस्य संशमनं नित्यं क्षपणं शोषणं तथा ।
युक्त्यपेक्षी भिषक् कुर्याद् अधिकत्वात् कफामयोः ॥ चं. चि.

उरूस्तंभ रोगांत कफ व आम या दोहोंचें आधिक्य असल्यामुळे युक्तीने नेहमी चिकित्सा करणाऱ्या वैद्यानें त्या कफ व आम या दोहोंचें जागचें जागीं शमन करणें शांतिपूर्वक धीरेधीरे नष्ट करणें व त्याचें शोषण ( सुकविणें ) करणें ह्या क्रिया कराव्यात. जमिनींत पाणी वारंवार सांडून व मुरून दलदल झालेल्या जमिनींतून जसें तेथील पाणी बाहेर काढून घेणे अशक्य होतें. तसेंच मांडया व खालच्या भागांत व्याप्त झालेल्या कफ व आम ह्या दोषांना वमन, विरेचन, बस्ती आदि पंचकर्मद्वारा बाहेर काढणें अशक्य आहे. तरी त्याकरितां जागचे जागीं शमन करणें, क्षीण करणें व त्याचें शोषण करणें याच क्रियेनें त्याचे दोष घालविणें योग्य होईल.

----

Indira Gandhi National
Centre for the Arts

# संचयप्रकोपादि दोषोपक्रमणीय

## अध्याय ६

### १ दोषप्रकोपादिकांना तलावाचें उदाहरण

आतांपर्यंत दोषांच्या सहा अवस्था सांगण्यांत आल्या आहेत. खरें पाहिलें असतां दोषसाम्यामुळेच शरीर सुस्थितींत राहून कांही वयोमानापर्यंत शरीराची नियमित वाढ होत राहते व नंतर शरीराच्या आरोग्याचें रक्षण होत राहते. आहारादी हवा-मान व ऋतुमान इत्यादिकांनी दोषांची वाढ होऊन रोग उत्पन्न होतात. ही जी दोषवृद्धि होते ती एकदम न होतां वेगवेगळ्या अवस्थेनुसार होते. एकानंतर दुसरी व दुसरीनंतर तिसरी अशा सहा अवस्था होतात. आणि रोग होण्यापूर्वी दोषांच्या त्या सहा अवस्थेपर्यंत योग्य उपचार केलें नाही तर ते दोष अखेरची पायरी गांठून शरीरांत त्यांचा सैरावैरा संचार सुरू होऊन शरीराच्या निरनिराळ्या क्रियेंत बाधा उत्पन्न करितात. उदाहरण घेऊन स्पष्टीकरण करू म्हटल्यास असें उदाहरण देता येईल की, पायऱ्या असलेला (खालून जिवंत झरे असलेला) असा एक तलाव असून विशिष्ट पायरीपर्यंत त्या तलावाचें पाणी राहत गेल्यास गांवांतील सर्व लोकांस पिण्यास भरपूर पाणी मिळतें. तसेच सर्व लोकांचीं धुणीं, भांडीं, स्नान इत्यादि नित्यकर्मे अव्याहत होत राहतात. शिवाय हवेंत जास्त उष्णता न वाढू देतां सर्व समशीतोष्ण ठेवण्यास त्या तलावाची सारखी मदतच होत राहते. अशा रितीने आपल्या स्थानांत राहून गांवाचें सर्व कामकाज व्यवस्थींत पार पाडण्याकरितां योग्य वेळीं योग्य प्रमाणांत पाण्याचा सारखा पुरवठा करीत तो राहतो. परंतु पावसाळ्यांत जर त्या तलावांतील पाण्यांत वाढ होत गेली व एकएक पायरी पाणी वाढत गेलें तर तलाव रक्षक, गांवचे अधिकारी हे नेहमी दक्ष राहून अमुक पायरीच्यावर पाणी न जाऊं देण्याचीच दक्षता बाळगीत असतात. तलावाचें पाणी जर तलावाचें विशिष्ट पायरीचे वर गेलें तर ते अधिकारी अगोदर व्यवस्था करून ठेवलेला पाणी बाहेर जाण्याचा मार्ग मोकळा करून पाणी बाहेर सोडून देतात. पाण्याची सपाटी योग्य ठरीव पायरीपर्यंत आली म्हणजे पाणी बाहेर जाण्याचा मार्ग बंद करतात. जर निष्काळजीपणामुळे तलावांत वाढत गेलेल्या पाण्याकडे दुर्लक्ष झाल्यास पाणी शेवटच्या पायरीस टेकलें, अशा स्थितींतहि तलावाचें पाणी बाहेर जाण्याचा मार्ग जर मोकळा करून पाणी बाहेर जाऊं दिलें नाही तर तें वाढत गेलेलें पाणी तलावाचें बाहेर जाऊन गांवांत शिरेल. लोक सैरावैरा पळूं लाग-तील. दररोजचे व्यवहार सर्व लोकांचे बंद पडतील. अशा रितीने सर्व गांवांत

हाहा:कार उडेल. गांव उजाड पडेल. त्रिदोषाच्या बाबतींतहि तंतोतंत अशीच स्थिति आहे. नेहमीच निर्मिती होत असलेल्या दोषांचीं ठरीव स्थानें आहेत. त्या स्थानांत ते ते दोष विशिष्ट प्रमाणांत विशिष्ट पायरीपर्यंत राहतात. त्यामुळे शरीराचे सर्व व्यव-हार सुरळीत चालतात. तेथून त्या त्या स्थानांतील दोष (धातु) आपापलें अंशाचा जरूर त्या स्थानांत अवश्यक असेल त्या प्रमाणांत पुरवठा करून तेथील कार्य सुरळीत चालविण्याला मदत करितात. परंतु आहारविहार, हवामान, ऋतुमानानें हे दोष त्याच्या त्याच्या ठरीव प्रमाणापेक्षा जास्त वाढले. संचयाच्या पहिल्या पायरीचे वर दोषाचे प्रमाण वाढले आणि आपण त्यावर कांहीच इलाज केला नाही तर त्या त्या दोषाचें प्रमाण प्रकोप ह्या दुसऱ्या पायरीपर्यंत जाईल. त्यामुळे पोटांत टोचल्याप्रमाणे, मळमळ, अन्नद्वेष इत्यादि लक्षणें होतील. तिकडेहि आपण कानाडोळा केला तर प्रसर ह्या तिसऱ्या पायरीपर्यंत दोषाची वाढ होईल. त्यामुळे पोटांत पूर्वीपेक्षा जास्त दुखू लागेल. आंगांतून गरम वाफा निघूं लागतील. व अंगग्लानि व वांति हे विकार होतील. त्यामुळे कोणत्याहि कामाकडे लक्ष न जातां कोणता तरी रोग होणार आहे असे विचार मनांत वारंवार येत राहतील. त्यामुळे दररोजच्या कामाकडेहि लक्ष राहणार नाही. अशाहि स्थितींत आळसांत राहून कांहीच इलाज केला नाही तर पूर्वीचीं लक्षणें जास्त प्रमाणांत वाढून दोषाचें प्रमाण स्थानसंश्रयाच्या चवथ्या पायरीपर्यंत वाढलेलें दिसेल. अशाहि स्थितींत योग्य उपचार केलें नाही तर व्यक्ति म्हणजे रोगनिर्मिति या पांचव्या पायरीपर्यंत दोषाचें प्रमाण वाढेल. एकदा रोग उत्पन्न झाला म्हणजे सर्व कामें बाजूला राहून रोगदुरुस्तीकडे लक्ष देणें जरूर असते. रोग दुरुस्त करावयाचा असल्यास ज्या दोषामुळे रोग झाला असेल तो बाहेर काढणें अवश्य आहे. त्याकरितां शोधन व शमन अशा दोन रीति सांगितल्या आहेत. त्या पुढे दिल्या आहेत.

## २ चय व कुपित दोषांची चिकित्सा

**चय एव जयेद्दोषं कुपितं त्वविरोधयन् ।**
**सर्व कोपे बलीयांसं शेषदोषाविरोधतः　　　　वा. सु.**

कुपित झालेल्या दोषांना विरोध न होईल अशा रीतीनें सांचलेल्या दोषाला प्रथम जिंकावे. सर्वांचाच कोप झाला असेल तर त्यांत जो विशेष बलिष्ट असेल त्याची प्रथम चिकित्सा करावी. पण इतर दोषांशी त्या चिकित्सेचा विरोध होऊं देऊं नये.

## ३ खरी चिकित्सा कोणती?

**प्रयोगः शमयेत् व्याधिं योऽन्नमन्यमुदीरयेत् ।**
**नासौ विशुद्धः शुद्धस्तु शमयेद्यो न कोपयेत् ॥　　　　वा. सु.**

ज्या योगानें एक रोग बरा होतो व दुसरा रोग वाढत जातो. ती कांही खरी चिकित्सा नव्हे. एका रोगाचें किंवा दोषाचें शमन करतांना दुसरा रोग किंवा दोष यांचा कोप होणे योग्य नाही.

४ कोठ्यांतील दोष शाखांत कसे जातात

व्यायामात् उष्मणस्तैक्ष्णादहिताचरणादपि ।
कोष्ठाच्छाखास्थि मर्माणि द्रुतत्वान्मारुतस्यच दोषा यांति वा. सु.

कोठ्यांतील दोष व्यायामामुळे, उष्णतेच्या तीक्ष्णतेमुळे, अहितकारक आहार-विहारामुळे व वायुच्या तीव्र वेगामुळे शाखा अस्थि व मर्मे यांच्यांत प्रवेश करितात.

५ शाखांतील दोष कोठ्यांत कसे येतात

तथा तेभ्यः स्रोतोमुख विशोधनात ।
वृद्धयाभिष्यंदनात्पाकात् कोष्ठं वायोश्च निग्रहात् ॥ वा. सु.

त्याचप्रमाणें शाखादिकांतील दोष स्रोतसांच्या मुखांचें शोधन, दोषांची वृद्धि, पातळपणा, पचन व वायुचा जोर यामुळे कोठ्यांत आणता येतात.

६ अल्प दोष विकार करीत नाही

तत्रस्थाश्च विलंबेरन भूयो हेतुप्रतीक्षिणः ।
ते कालादि बलं लब्ध्वा कुप्यंत्यन्याश्रयेष्वपि ॥ वा. सु.

त्या त्या स्थानीं गेल्यावर ते लागलीच विकार उत्पन्न करितात, असें नाही; निमित्ताची वाट पाहून कालादिकाचें बल मिळालें म्हणजे तें जरी स्वतःचें जागीं नसलात तरी कोप पावतात.

७ अबल दोषांची चिकित्सा

तत्राऽन्यस्थान संस्थेषु तदीयामबलेषु तु ।
कुर्याच्चिकित्सां स्वामेव बलेनान्याभिभाविषु ॥ वा. सु.

अशा प्रकारच्या दोषांची चिकित्सा करणें ती ते बलवान नसतील तर त्यांच्या मूळ स्थानास अनुसरून करावी, पण ते जर अन्य स्थानी बलिष्ट झालें असतील तर मात्र त्या अन्य स्थानास अवलंबून त्याची चिकित्सा करावी.

८ आगंतुक दोषांची चिकित्सा

आगतुं शमयेद्दोषं स्थानिनं प्रतिकृत्य वा ।

अथवा स्थानिक दोषांची अगोदर चिकित्सा करून नंतर आगंतु दोषाचा नाश करावा.

९ आमाची व्याख्या

ऊष्मणोऽल्प बलत्वेन धातुमाद्यमपाचितम् ।
दुष्टमामाशयगतं रसमामं प्रचक्षते ॥ वा. सु.

अग्नीच्या मंदपणामुळे शरीरांतील पहिला धातु जो रस तो आमाशयांत परिपक्व होता तसाच राहून वातादि दोषांच्या संयोगानें बिघडला म्हणजे त्या रसाला आम अशी संज्ञा आहे.

१० सामदोष

आमेन तेन संपृक्ता दोषा दूष्याश्च दूषिताः ।
सामा इत्युपदिश्यंते ये च रोगास्तदुद्भवाः । वा. सु.

वातादि दोष, रसादि दृष्य व त्यामुळे उद्भवणारे रोग या आमाशयाने युक्त असले म्हणजे त्यांना साम असें म्हणतात.

११ सामदोष बाहेर काढण्यापासून धोका

सर्वदेह प्रविसृतान् सामान् दोषान्न निर्हरेत् ।
लीनान् धातुष्वनुत्क्लिष्टान् फलादामाद्रसानिव ॥
आश्रयस्य हि नाशाय ते स्युर्दुर्निर्हरत्वतः ॥ वा. सु.

सर्व देहांत पसरलेले धातूत लीन झालेलें व स्वस्थानापासून च्युत न झालेले जें साम दोष त्यांना एकदम बाहेर काढून टाकू नये ज्या प्रमाणें अपक्व आंब्यांतील रस काढू गेलें असतां तो न निघतां आंब्याचाहि नाश होतो. त्याचप्रमाणें सामदोषांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्याने त्यांचा नाश न होता शरीराचा मात्र नाश होतो.

१२ दुसरे स्थानांत गेलेले दोष कसे काढावें?

प्रायः तिर्यग्गतादोषाः क्लेशयंत्यातुरांश्चिरम् ।
कुर्यान्न तेषु त्वरया देहाग्नि बलवित्क्रियाम् ॥
शमयेत्तान् प्रयोगेण सुखं वा कोष्ठमानयेत् ।
ज्ञात्वा कोष्ठ प्रपन्नांश्च यथासन्नं विनिर्हरेत् ॥ वा. सु.

बहुतकरून स्थानांतर करून गेलेले दोष रोग्याला फार दिवसपर्यंत त्रास देतात. म्हणून देहबळ, अग्निबळ, घ्यानांत आणून त्याचा प्रतिकार घाईघाईने न करितां सावकाशपणे करावा. त्याचा त्या अन्य स्थानांतच प्रशम करावा. किंवा युक्तीनें त्रास न होतां ते कोठ्यांत आलेले बरोबर ताडून नंतर ज्या बाजूनें जवळ पडेल तिकडून त्या दोषास बाहेर काढून टाकावें.

१३ आमदोषांचीं लक्षणें

स्रोतोरोध बलभ्रंश गौरवानिल मूढताः ।
आलस्यापक्ति निष्ठीव मलसंगा रुचिक्लमाः ॥
लिंग मलानां सामानां निरामाणां विपर्ययः ।

स्रोतसांचा अवरोध, बलहानि, जडता, वायूचा अव्यवस्थित संचार, आंळस, अपचन, तोंडास पाणी सुटणें, मलबद्धता, अरुचि, ग्लानि हीं सामदोषांचीं चिन्हें होत. निराम दोषांचीं चिन्हें याच्या उलट असतात.

## १४ स्थानपरत्वें दोषांची चिकित्सा

**तत्र वायोः पित्तस्थान गतस्य पित्तवत् प्रतीकारः पित्तस्यचकफस्थानगतस्य कफवत् कफस्य वातस्थान गतस्य वातवत् एष कियाविभागः**

वायु हा प्रकुपित होऊन पित्ताच्या स्थानांत गेला तर त्याजवर पित्त-दोषानुरूप उपचार करावा. पित्त कफस्थानांत गेला असता कफदोषांनुरुप करावें. आणि कफ जर वातस्थानांत गेला तर वातदोषांप्रमाणें उपचार करावें हा चिकित्सेचा भेद सांगितला.

## १५ दोष निरहरण करण्याचा मार्ग

**पाचनेर्दीपनैः स्नेहैस्तान् स्वेदैश्च परिष्कृतान् ।**
**शोधयेत् शोधनैः काले यथासत्त्वं यथाबलम् ।** वा. सु. १३

शरीरांत दोष पसरले असतां त्यासाठीं त्यावर पाचन, दीपन, स्नेहन व स्वेदन हे संस्कार करून नंतर योग्यकाळीं, शक्तिमान पाहून जवळच्या मार्गानें त्याचें शोधन करावें.

Indira Gandhi National Centre for the Arts

## १६ कोणत्या स्थानांतील दोष कोणत्या मार्गानें काढावें?

**हंत्याशु युक्तं वक्त्रेण द्रव्यमामाशयान्मलान् ।**
**घ्राणेन चोर्ध्वं जत्रूत्थान् पक्वाधानात् गुदेनच ।** वा. सु. १३

आमाशयांतील मलांना, तोंडावाटें दिलेलें औषध लवकर जिंकू शकते. ऊर्ध्व-जत्रुरोगांत दोषांना नाकावाटें दिलेलें औषध लवकर जिंकते. आणि आंतडींतील दोषांना गुदद्वारावाटें दिलेलें औषध (बस्तिद्वारा) लवकर जिंकते.

## १७ वाताचा शमन विधी

**स्निग्धोष्ण स्थिर वृष्यबल्य लवणस्वाद्वम्ल तैलातप**
**स्नानाभ्यंजनबस्तिमांसमदिरासंवाहनोद्वर्तनम् ।**
**स्नेहस्वेद निरूह नस्य शयन स्थानोपनाहादिकं ।**
**पानाहार विहार भेषजमिदं वातं प्रशांतिं नयेत् ॥** यो. र. ३२

स्निग्ध, उष्ण, जड, वृष्य (धातुवर्धक) बलदायक, गोड, आंबट व खारट असें पदार्थ व तेल यांचें सेवन, ऊन घेणें, स्नान करणें, अंगाला तेल लावणें, बस्ती घेणें, मांस व मद्य यांचें सेवन, अंग रगडणें, अंगाला उटी लावणें, अंतर्बाह्य तेलाचा उपयोग करणें (स्नेहन) घाम काढणें, निरुहबस्ती देणें, नस्य (नाकांत औषध घालणें). झोप

घेणें, वातविकृतीचें ठिकाणीं पोटीस बांधणें अशा प्रकारच्या आहारविहारादिकांनी वातदोषांचें शमन करावें.

## १८ पित्ताचा शमन विधी

तिक्तस्वादुकषायशीतपवनच्छायानिशावीजन ।
ज्योत्स्नाभू गृहवारियंत्र जलज स्त्रीगात्रसंस्पर्शनम् ।
सर्पिःक्षीरविरेकसेकरुधिरस्रावोपदेहादिकं ।
पानाहारविहारभेषजमिदं पित्तं प्रशांति नयेत् ॥

कडु, गोड, तुरट असे पदार्थ खाणें, गार वारा घेणें, सावली, रात्रीची वेळ, एकांतवास, चांदणें यांचें सेवन, तळघरामध्यें बसणें, आसपास कारंजीं सोडणें, कमळाचीं फुलें धारण करणें, स्त्रियांचें आलिंगन, दूध, तुप यांचें सेवन, रेचक, अंगावर गुलाब-पाणी शिंपडणें, रक्त काढणें, थंडगार असे लेप करणें अशा प्रकारच्या आहारविहारा-दिकांनी पित्ताचें शमन करावें.

## १९ कफप्रकोवर उपचार

रूक्षक्षार कषायतिक्त कटुक व्यायाम निष्ठीवनं ।
स्त्रीसेवाध्वनियुद्ध जागरजलक्रीडापदाघातनम् ।
धूपस्ताप शिरोविरेक वमनं स्वेदोपनाहादिकं ।
पानाहारविहारभेषजमिदं श्लेष्माणमुग्रं जयेत् ॥ यो. र. ३२

रूक्ष, खारट, तुरट, कडु, तिखट असे पदार्थ खाणें, व्यायाम करणें, वमन करणें, (ओकारी करणें) मैथुन, मार्ग चालणें, युद्ध (कुस्ती), जाग्रण जलक्रीडा, पायांनी अंग तुडविणें, धूम्रपान, शेकणें, शिरोविरेचन, नाकांत औषध घालून मस्तकांतील कफ काढून टाकणें, ओकारी, घाम काढणें, अंगास सुखकर असे लेप करणें इत्यादि आहार-विहारांनी उग्र अशा कफदोषास जिंकावे.

## २० वात, पित्त कफ वृद्धि यावर उपचार

कफप्रकोपेवमनं सनस्यं विरेचनं पित्तभवे विकारे ।
वातामये बस्तिविशोधनं च संसर्गजे च प्रविमिश्रमेतत् ॥

कफदोषाचा प्रकोप झाला असतां त्याला नस्य, वमन द्यावे. पित्तविकारावर रेचक आणि वातविकारावर बस्ती द्यावे. दोन दोन दोषांच्या विकारावर त्या त्या दोन दोन दोषांचें उपचार करावें.

## २१ आमयुक्त व्याधीचें लक्षण—

आलस्य तंद्रा हृदया विशुद्धि दोषप्रवृत्या कुलमूत्र भावैः ।
गुरुदरस्वारुचिसुप्तताभिरामान्वितं व्याधिमुदारहंति ॥

आळस, ग्लानि, मनाला अस्वस्थता, वातादि दोषांची योग्य मार्गाकडे प्रवृत्ति नसल्यामुळे मलमूत्र साफ न होणें, पोटाला जडत्व, अरुचि व अंगाला बधीरपणा हीं लक्षणें आमयुक्त विकारामध्यें होतात.

## २२ आमयुक्त व्याधीचा प्रतिकार

१) **आमंजयेत् लंघन कोष्णपेया लघ्वन्नरूक्षौदनतिक्तयूषैः ।**
**निरूहणैः स्वेदन पाचनैश्च संशोधनै रूर्ध्व मधस्तथाच ।।** यो. र. ३४

लंघन, सुखोष्ण अशी पेज, हलकें व रुक्ष असें अन्न, कडुरसानें युक्त अशीं धान्याचीं कढणें, निरुहबस्ती, घाम काढणें, पाचन औषध देणें, वमन व रेचन असें दोन्ही प्रकारचें संशोधन. अशा उपायांनी आमव्याधि जिंकावा.

२) **तत्रामे वमनं कार्यं विदग्धे लंघनं हितम् ।**

आमाजीर्णामध्यें वमन व विदग्धाजीर्णामध्यें लंघन हितकर आहे.

----

Indira Gandhi National
Centre for the Arts

# रोगपरीक्षा विज्ञानीय

## अध्याय ७ वा

१ रोगपरिक्षेची आवश्यकता

दोषवृद्धीच्या अवस्थेपैकी स्थानसंश्रय या अवस्थेपर्यंत म्हणजे पुढे होणाऱ्या रोगाचीं पूर्वरूपें दिसूं लागेपर्यंत दोषांवर योग्य चिकित्सा केली नाही तर स्थानसंचया नंतर त्या स्थानांत एकादा रोग निर्माण होईल. आणि मग तो रोग कोणता हें त्रिविध व अष्टविध परीक्षा करून तसेच रोग्याला होत असलेल्या लक्षणावरून निश्चित करून घ्यावे लागेल. याकरितां रोगपरिक्षेचें ज्ञान सर्व वैद्यांना अवश्य पाहिजे. म्हणून रोगपरिक्षेची माहिती पुढे दिली आहे.

२ रोगपरिक्षा

रोग्यांना औषधी योजना करण्यापूर्वी

१) **दर्शन स्पर्शन प्रश्नैः ।**

**नाडीमूत्रमलंजिव्हाशब्दस्पर्श त्वगाकृतिः स्थानानि अष्टौ परिक्षयेत् ।**

याप्रमाणें रोग्याच्या सर्व शरीराचें आपादमस्तक परिक्षण करून कोठें काय विकृति दिसते हे पहावें. त्वचेवर काळेपांढरे. गजकर्णासारखे चट्टे, सूज, गाठी, बेढबपणा, त्वचेचा रंग या गोष्टी पाहून घ्याव्या. नंतर हातानें सर्व शरीराला स्पर्श करून अंग गरम लागते काय तें पहावें. तसेंच सर्व स्थानें पाहावीं. डोळे, जिव्हा, घसा, नाक, कान चेहरा, गळा, फुप्फुस, हृदय, आमाशय, पानथरी, यकृत, मूत्रपिंड, पोटांत गाठी, बस्ती, पोटाचा फुगारा, दाबले तर कोठें दुखतें काय ? तसेच डोकें, छाती, हृदय, पोट, आंतडी किंवा इतर कोठें तरी व केव्हां तरी एखादे वेळीं दुखते काय ? या सर्व गोष्टी प्रत्यक्ष पाहून व विचारून घ्याव्या. लघ्वीचा रंग, लघ्वी थोडी थोडी, राहून राहून किंवा होतांना आग होते काय ? किंवा गरम वाटते का ? हें विचारावे. शौचाचें बाबतींत–शौचास किती वेळ होते, पातळ, चोथापाणी, एखादे फार जास्त होऊन गळल्यासारखे वाटते काय ? याशिवाय ओठ, जीभ, घसा व आंतील गांठी हें पाहून घ्यावें. ओठ किंवा जिभेला छाले, आंतल्या गांठीला सूज, घसा दुखतो काय ? फोड झाले काय ? किंवा गिळतांना त्रास वाटतो काय ? तसेच डोळे, लघ्वी, मळ, त्वचा यांचा यांचा रंग कोणता असतो, डोळे गरम वाटतात काय ? हें सर्व विचारून शिवाय रोग्याला जास्त तकलीफ कशाची वाटते हें विचारून घ्यावे. रात्री झोप येत नसल्यास कां येत नाही हेंही विचारुन घ्यावें. हें सर्व परीक्षण व चौकशी केल्यावर

महत्वाची, त्रासदायक लक्षणें रुग्णपत्रिकेवर उजवे बाजूस मांडून डावे बाजूस मुख्य रोग व अनुषंगिक होणारा त्रास व मुख्य दोष हें लिहावें. उदाहरण म्हणून वार्डांत आलेल्या जलोदराच्या रोग्याची तो पूर्ण बरा होईपर्यंतची हकिकत पुढे दिलेली आहे. सर्व रुग्णपत्रिका वार्डमध्यें ठेविल्या आहेत.

**रोग्याचें नांव, पूर्ण पत्ता, वय व प्रवेश दिनांक २-११-५४**

**माहिती**—३ वर्षांपासून बिमार. प्रथम संग्रहणी झाली. ती दुरुस्त झाली. ५।६ महिन्यानंतर पुन्हां केव्हा केव्हा जुलाब होऊं लागलें. नंतर उदररोग-यकृतवृद्धि,

१) जलोदर
२) दोन्ही पाय व पोट यांवर सूज
३) बरगडींत वेदना
मुख्य दोष-वात + पित्त

१) जलोदर
३) यकृतवृद्धि
३) रोज जुलाब १०।१२ वेळ
४) मूत्रपिंडास सूज
५) लघ्वी थोडी थोडी
६) सूज-पाय व पोट यांवर.
७) कोरडा खोकला
८) एका बरगडींत फार वेदना
९) डोळे व लघ्वी गरम वाटते.
१०) त्वचा रुक्ष, काळसर, पांढुरकी.
११) नखें-पांढरट, काळसर.
१२) डोळ्याच्या कडा फिक्कट.
१३) रक्ताचा अभाव.
१४) पोटाचा घेर बेंबी बेंबीवर
दि. २।११।५४ ३०॥ ३१॥

| दिनांक | दस्त दररोज किती | लघ्वीचें प्रमाण | उदराचें माप | स्नेहन |
|---|---|---|---|---|
| २।११।५४ | ८ वेळ | थोडी थेंब थेंब | बेंबी–३०॥ बेंबीवर-३१॥ | सकाळीं–तूप २॥ तो. सैंधव १ मा. कपभर पाण्यांतून. दुपारीं व रात्रीं– जलोदरारी—२ गुं. आरोग्यवर्धिनी–२ गुं. लोकनाथरस–२ गुं. मूत्रकृच्छ्रांतक—२ गुं. |

३ अष्टविध परीक्षा

**योगाक्रांत शरीरस्थ स्थानान्यष्टौ परीक्षयेत् ।　　　　यो. र. ८**
**नाडीं मूत्रं मलं जिव्हां शब्दस्पर्शदृगाकृती ।।　　　　भै. र.**

रोगी मनुष्याची नाडी, मूत्र, मल, जिव्हा, शब्द, स्पर्श, दृष्टि व आकृति (रूप, चेहरा) हीं स्थान अवश्य तपासून पाहावी.

४ त्रिविध परीक्षा

**दर्शनस्पर्शनप्रश्नैः परीक्षेताथ रोगिणम् ।**
**रोगंनिदान प्राग्रूप लक्षणोपशयाप्तिभिः ।।　　　　यो. र. ८**

डोळयांनी रोग्याचें आपादमस्तक असें सर्व शरीराचें परिक्षण करावें. तसेंच हाताने शरीराला (रोगस्थान) स्पर्श करून व प्रश्न विचारून रोग्याची परीक्षा करावी. व तसेंच निदान, पूर्वरूप लक्षणें, उपशम आणि संप्राप्ति या साधनांनी रोगाची (म्हणजे कोणता रोग आहे याची) परीक्षा करावी.

५ चिकित्सेपूर्वी रोगपरीक्षा

**आदौ सर्वेषु रोगेषु नाडी जिव्हाक्षिमूत्रतः ।**
**परिक्षां कारयेत् वैद्यः पश्चात् रोगं चिकित्सयेत् ।।　　　　यो. र.**

वैद्यानें आधी नाडी, जीभ आणि लघ्वी ह्यांच्या द्वारें सर्व रोगाची परीक्षा करावी आणि नंतर त्याची चिकित्सा करावी.

६ कंठांत प्राण असेपर्यंत चिकित्सा करावी

**यावत् कंठगताः प्राणा यावन्नास्ति निरिंद्रियः ।**
**तावत् चिकित्सा कर्तव्या कालस्य कुटिला गतिः ।।　　　　भै. र.**

जोपर्यंत कंठांत प्राण आहे व जोपर्यंत त्याच्या इंद्रियाची शक्ति नष्ट झाली नाही तोपर्यंत चिकित्सा करीत राहावें.

७ अल्प रोगाची उपेक्षा नको

**जातमात्र चिकित्स्यस्तु नोपक्ष्योऽल्पतयागदः ।।**
**वन्हिशस्त्र विषैस्तुल्यः स्वल्पोऽपि विकरोत्यसौ ।।　　　　भै. र. ३०**

रोग उत्पन्न झाल्याबरोबर त्वरित चिकित्सा करण्याला सुरुवात करावी. रोग फारच अल्पावस्थेंत आहे, सध्या औषध देण्याची आवश्यकता नाही. अशा कल्पनेने रोगाची उपेक्षा करूं नये. उपेक्षा केली असतां अग्नि, शस्त्र व विष या प्रमाणे सौम्य रोगहि शरीरांत पसरून अनेक प्रकारचे रोग उत्पन्न करितो.

----

# पंचकर्मयुक्त रोगचिकित्सा

## अध्याय ८

### १ पंचकर्मा संबंधी सारासार विचार

मागे सांगितल्याप्रमाणें त्रिविध, अष्टविध व मायक्रासकोपिकादि परीक्षा करून रोग निश्चित ठरल्यानंतर त्यावर रोग्याचें प्रकृतिमान पाहून योग्य अशीं औषधीयोजना ठरवावी. परंतु प्रत्यक्ष औषधी सुरू करण्याचें अगोदर पहिल्याने पंचकर्मचिकित्सा करावी. रोग्याचें प्रकृतिमान पाहून पंचकर्मापैकी जें योग्य वाटतील तेवढेच विधि करून नंतर औषधी देणें सुरूं करावें. सोबत पंचकर्माचा प्रत्यक्ष विधि पुढील पानावर लिहिला आहे. व त्यानंतर कांही रोग्याची धर्मार्थ आयुर्वेदिक वार्डमध्यें आल्यापासून तो वार्डमधून जाईपर्यंतची सर्व हकिकत दिली आहे. रोगी पुष्कळ दिवसाचा बिमार असून फार अशक्त नसेल तर पंचकर्मांचा पुढे सांगितल्याप्रमाणे सर्व विधि करून नंतर औषधोपचार सुरूं करावा. रोगी थोडया दिवसाचा आजारी असेल तर सर्व पंचकर्म विधि संपूर्ण न करता कांही थोडें जरूरी विधि करावें. रोगी पुष्कळ दिवसापासून आजारी असेल परंतु तो फारच अशक्त झाला असेल तर पंचकर्मांपैकी एकादा दुसराच विधि करून औषध सुरूं करावें. अशा रोगावर शमन चिकित्साच करावी.

### २ पंचकर्म विधी

चाळीस बेडस्च्या धर्मार्थ वार्डमध्यें रोगपरीक्षा करून झाल्यावर औषधीयोजना सुरूं करतांना सद्य पंचकर्माचा जो विधि नेहमीच करण्यांत येतो तो खाली नमूद केला आहे. रोगी जर फार दिवसाचा आजरी असेल तर सर्व पंचकर्मे रोग्याची शक्ति पाहून करावींत. रोगी नवीनपैकीच असेल किंवा जुनाट असून फार अशक्त झालेला असेल तर पंचकर्मांपैकी एकादाच विधि करुन औषध सुरुं करावें.

औषधी सुरूं करण्याचे अगोदर रोगी फारच अशक्त झालेला नसेल तर पहिल्याने त्याला २॥ तोळे एरंडेल किंवा पांच तोळे दूध गरम करून त्यांत एक तोळा तूप मिसळून त्यांतच २ गुंजा इच्छाभेदी घालून पाजावें. कारण जुलाब नेहमी स्निग्ध अनुपानांत दिल्यास रोग्याला फारसा त्रास होत नाही. रोगी फारच क्षीण झाला असेल तर जुलाब देण्यांत येत नाही. फक्त सारक चूर्ण देण्यांत येते. अशक्ततेमुळे रोग्याला उठतां येत नसेल तर तेहि न देतांच औषध सुरूं करण्यांत येते. दुसरे दिवसापासून स्नेहन देण्यांत येते. अडीच तोळे तूप, एक मासा सैंधव हे सर्व एक कप गरम पाण्यांत घालून

पाजावें. याप्रमाणे हा विधि सतत ५ दिवस फक्त सकाळी चालू ठेवावा. दुपारीं व रात्रीं रोगावरील औषधी योग्य अनुपानांतून देण्यांत येते. सहाव्या दिवशी स्वेदनक्रिया करण्यांत येतें. सर्व आंग शेकून टाकावे. शेगडीवर फडकें गरम करून शेकावे किंवा गरम पाण्याच्या रबरी पिशवीनें सर्व अंग शेकतात. किंवा वाफारा देतात. निर्गुंडी किंवा माका यापैकी एक किंवा दोन्ही थोडे कुटून पाण्यांत उकळी येईपर्यंत शिजवून त्याचा वाफारा बंद अशा जागेंत देतात. वाफारा देण्याकरितां किंवा सर्व पंचकर्माकरिताच एक स्वतंत्र खोली लवकरच तयार करण्यांत येत आहे. स्नेहन व स्वेदन देण्याचें दिवशीं ४ वाजतां व रात्रीं त्या रोगावरील औषध देण्यांत येतें. नंतर सातवे दिवशीं वमन देण्यात येते. गेळफळ ३ मासे, चूर्ण सैंधव १ मासा व मध ३ मासे सर्व एकत्र करून ग्लासभर पाण्यांत घालून पिण्यास द्यावें. त्याने एकदोन उलट्या होतील. त्यानंतर कृमिनाशक योग देण्यांत येतो. पळसपापडी ४ गुं., कृमिकुठार २ गुं., गूळ १६ गुंज यांचें चूर्ण करून, गोळी करून गिळण्यास द्यावी. दुसरें दिवशीं सकाळीं पुन्हा जुलाब वर सांगितल्याप्रमाणें स्निग्ध अनुपानांतून द्यावा. ज्या रोगावर औषधोपचार करावयाचा असेल, त्यांत बस्ती देणें जरूर असेल तर दुसरें दिवशीं बस्ती द्यावा. नंतर त्या त्या रोगाला धरून योग्य अशी औषधी योजना सुरू करावी. वरील पंचकर्में चालू असतांनां रोगावरील औषध दोनवेळ सुरूच ठेवावे.

Indira Gandhi National Centre for the Arts

नंतर दिवसांतून सकाळीं, दुपारीं, ४ वाजतां व रात्रीं असें ४ वेळ औषध सुरू करावें. शिरोरोग किंवा उन्माद, अपस्मार यासारखे मेंदूतील विकार असले तर औषधाबरोबर नस्यहि देत जावें. किंवा वाताचा विकार असल्यास त्यावरील इतर औषधीबरोबर महानारायण तेल एक चमचा पांच तोळे गरम दुधांतून दिवसांतून एक वेळ पाजीत जावे व तेलांत कापूर व सैंधव घालून गरम करून वरून चोळण्यास सांगावे. वीस पंचवीस दिवस पंचकर्मासहित औषधी देऊन गुण वाटत नसेल तर वरीलप्रमाणें पुन्हा कर्मविधि पांच सहा दिवस करावा. त्याचवेळीं दिवसांतून दोन वेळ औषधहि चालू ठेवावे. पंचकर्मविधि पुरा झाल्यावर पुन्हा २०-२२ दिवस औषध द्यावे. खात्रीने गुण येईल.

धमार्थ वॉर्डमध्यें रोगी राहण्याला येतो. त्यापैकी बहुतेक रोगी दुसरीकडील खाजगी डॉक्टर्स व वैद्य यांची औषधें ४–५ महिने घेऊन गुण न आल्यास येतो, म्हणूनच अशा रोग्यांना पंचकर्म विधि अवश्य करूनच औषधी योजना करावी. परंतु रोगी जर रोग सुरू झाल्यावर ताबडतोबच वार्डमध्ये आला तर पंचकर्मापैकी कोणकोणते विधि करणें जरूर आहे, हे रोगपरिक्षा केल्यावर तेथील वैद्याने विचार करून ठरवावे व वरीलप्रमाणें योग्य तेवढे पंचकर्मविधि करून औषधी योजना सुरू करावी. किंवा पंचकर्मापैकी एकहि योग करण्याची गरज वाटत नसेल किंवा आमपाचनाचीहि गरज वाटत नसेल तर पहिल्यानें औषधी देण्यालाच सुरुवात करावी. रोगपरिक्षा करून

ठरविण्यांत आलेल्या मुख्य रोगाशिवाय एखादे त्रासदायक लक्षण किंवा त्रासदायक दुसरा विकार असल्यास मुख्य रोगावरील औषधीशिवाय ह्या त्रासदायक विकारावरहि वेगळे असें औषध १–२ वेळ द्यावे.

आमचा हा आयुर्वेदिक दवाखाना किंवा वॉर्ड यामधील रोग्यांकरितां बहुतेक रसौषधी व भस्में यांचाच जास्त प्रमाणांत उपयोग करण्यांत येतो व वातजन्य विकारांत बस्ती वरचेवर देण्यांत येतो.

## दोन रोग्यावर प्रत्यक्ष केलेली चिकित्सा

### अर्धांगवायू

**लक्षणें–**

१) ६ महिन्यापूर्वी मालकाचें घरांत एकवेळ कल्पना नसतांना बेशुद्ध पडला, २ तास.
२) अर्धांगवायू, डावा भाग डोळचापासून पायापर्यंत लुळा
३) डोकें दुखते, डावा भाग, व मुंग्या.
४) डाव्या डोळचाने कमी दिसते.
५) गिळतांना डाव्या बाजूस दुखते.
६) डावा हात लुळा पण वाकडा, बेकाम.
७) डावा पाय वाकडा, जमिनीवर ठेवतां येत नाही.
८) मूठ वळतां येत नाही.

**नांव**

रामचंद्र विष्णुरामजी पालेवार वय ४० धंदा नोकरी. मु. वडळी. पो. वरुड. ता. मोर्शी.

१) ४-६ महिन्यांपासून बिमार.
२) अर्धांगवायू, सर्व डावा भाग लुळा.
३) मुंग्या.

### औषधी योजना

**पंचकर्म**

ता. १२-१२-५५ १) जुलाव

अ) एकांगवीर ६ गुं.
वातविध्वंस ६ ,,
कुचलाचूर्ण ६ ,,
४ पु.

२) स्नेहन

१) नारायण तेल १ चमचा गरम दुधांतून रोज सकाळीं घेणें.
२) नारायण तेलांत सैंधव व कापूर घालून दररोज गरम करून चोळावे व शेकावे.
३) तूप २॥ तोळे. गरम दुधांतून रोज १ वेळ रात्री ४ दिवस.

४) ५ वे दिवशीं निर्गुंडी, माका, एरंडमूळ यांचा काढा नारायण तेल घालून याचा वाफारा व दुसरें दिवशीं याचाच बस्ती.

**लक्षणें कमी–**

ता. २२-१२-५६

१) डोकें व मान शिलका होणें कमी.
२) गिळतांना त्रास थोडा कमी.
३) हाताचें हालणें कमी, मूंग्या येणें कमी.
४) जडपणा व थंडपणा कमी.
पण खोकला येऊं लागला, कफ जास्त.

२२-१२-५६

| | | |
|---|---|---|
| ब) एकांगवीर | ६ गुं. | ४ पु. |
| वातविध्वंस | ६ ,, | |
| कुचलाचूर्ण | ६ ,, | |
| श्वासकुठार | ६ ,, | |
| आनंद भैरव | ८ ,, | |

ता. २६-१२-५६

१) खोकला कमी झाला. कफ कमी.

२६-१२-५६

| | | |
|---|---|---|
| क) एकांगवीर | ६ गुं. | ४ पु. |
| वा. वि. | ६ ,, | |
| कुचलाचूर्ण | ६ ,, | |

Centre for the Arts

ता. ११-१-५६

१) लंगडत लंगडत चालतां येते.
२) मूठ वळतां येते.
३) भरलेलें भांडें कष्टानें उचलतां येतें.

शेवटपर्यंत औषध तेंच चालू होतें.

दि. १७-२-५६ ला घरीं गेला.

## कमी झालेलीं लक्षणें

१) चालणें उत्तम प्रकारें.
२) मूठ वळतां येते.
३) गिळतांना त्रास मुळीच होत नाही.
४) पाण्याने भरलेलें भांडें उचलतां येते.
५) डोळ्याने साफ दिसते.
६) लुळेपणा नाहीसा झाला.

शेवटपर्यंत--

१) रोज नारायण तेल एक चमचा पोटांत घेणें व अंगाला चोळणें. त्यांत सैंधव कापूर घालून चोळणें.
२) ८ वें दिवशीं बस्ति.
हे सर्व प्रयोग चालू होते.

## धर्मार्थ आयुर्वेद वार्डमधील एका रोग्याची हकीगत

**इतिहास**

तीन वर्षांपूर्वी संग्रहणीने आजारी होता. औषधोपचारांनी बरा झाला. नंतर पांचसहा महिन्यानंतर पुन्हा ६-७ जुलाब होऊं लागले. उदरवृद्धि व यकृतवृद्धि होऊं लागली. मूत्रपिंडाला सूज.

**नांव**

मंदनलाल ओंकारलाल, रा. छत्रपुरी खिडकी, बालाजीमंदीर. वय ४०. जात मारवाडी. धंदा दुकानदार, अमरावती.

## रोगी वार्डमध्ये आल्यावर पाहून व विचारून कळलेली हकीगत (लक्षणें)

**तात्काळ उपचार करावयाचीं लक्षणें**

१) जलोदर
२) सूज पाय व तोंडावर
३) लघ्वी थेंब थेंब
४) बरगडींत दुखतें

मुख्य दोष– वात अधिक पित्त

**प्रवेश ता. १।११।५४**

पोटाचा घेर ता. १।११। ५४ ला
बेंबी–३०॥
बेंबीचेवर –३१॥

विशेष–पोटांतील पाणी आम्ही केव्हांच काढीत नसतो.

रोग जुनाट असून रोगी फार अशक्त नसेल तर खालील सर्व पंचकर्मे करावीत. अशक्त असेल तर १-२ कर्मे करावीत.

१. जलोदर
२. यकृतवृद्धि
३. जुलाब दररोज ८-१० वेळां
४. लघ्वी फारच थोडी, थेंब थेंब, आग होते.
५. मूत्रपिंडास सूज
६. दोन्ही पायावर सूज
७. तोंडावर, डोळ्याचे कडेला सूज
८. खोकला कोरडा
९. मळमळ
१०. त्वचा रुक्ष, काळसर, पांढुरकी
११. नखें, काळसर पांढुरकी.
१२. डोळ्याच्या कडा फिकट, गरम वाटणें.
१३. बरगडींत वेदना.
१४. रक्त न्यूनता.

| तारीख | दस्तवेग | लघ्वी | उदराचें माप बेंबी बेंबीवर |
|---|---|---|---|
| १।११।५४ | ८ वेळ | थेंब थेंब | ३०॥ ३१॥ |
| ३ ,, | ९ ,, | ,, | |
| ४ ,, | ७ ,, | ,, | |
| ५ ते १० | ७ ते ४ | थोडी जास्त | |
| १६ नो. | ४ वेळ | ,, | २८॥ २९ |
| १ डिसेंबर | २ ,, | मोकळी होऊं लागली | २७ २८ |
| १० ,, | १ ,, | ,, | २५॥ – २६ |

तारीख

१।११।५४ २ गुं. इच्छाभेदी दुधांतून नंतर पुढीलप्रमाणें खाणें व पाणी–पहिले १० दिवस फक्त दूध, पाणी बंद. नंतर गरम करून थंड केलेलें पाणी साबुदाणा.

२।११।५४ स्नेहन सकाळीं २॥ तोळे तूप
१ मासा सैंधव
१ कप गरम पाण्याबरोबर पिणें.

दुपारीं व रात्रीं–मूत्ररेचक चूर्ण १ मा (दिवसांतून एकच वेळ)

| | |
|---|---|
| जलोदरारी | २ गुं. |
| आरोग्यवर्धिनी | २ ,, |
| लोकनाथ | २ ,, |
| मूत्रकृच्छ्रांतक | २ ,, |
| | २ पुड्या |

महारास्नादि काढा ।।
पुर्ननवादी काढा ।। तितकेंच पाणी घालून
१–१ पुडी घालून दोन वेळ घेणें. याप्रमाणें १ वेळ स्नेहन व २ वेळा औषधी ४ दिवसपर्यंत घेणें.

Indira Gandhi National Centre for the Arts

६।११।५४ कृमिघ्न सकाळीं- पळसपापडी ८ गुं.
कृमिकुठार २ ,,
गुळ १६ ,,
यांची गोळी करून घ्यावी.

दुपारीं व रात्रीं-वरील औषधीच्या २ पुड्या वरील अनुपानांतून.

स्वेदन सकाळीं- सर्व अंग शेकणें.
रबरी बॅग किंवा वाफाऱ्यानें.

वमन दुपारीं ४ वा.-गेळफळ ३ मा.
सैंधव १ ,,
१ कप गरम पाण्यांतून घेणें.

Indira Gandhi National
Centre for the Arts

रेचन सकाळीं- इच्छाभेदी २ गुं. किंवा एरंडेल २॥ तो. गरम दुधांतून घेणें.

| | | |
|---|---|---|
| औषध | मूत्ररेचकचूर्ण | १ मा. |
| | जलोदरारी | ४ गुं. |
| | आरोग्यवर्धिनी | ४ ,, |
| | लोकनाथ | ४ ,, |
| | मूत्रकृच्छ्रांतक | ४ ,, |
| | | ४ पुड्या |

सकाळीं दुपारीं ४ वा. व रात्रीं असे ४ वेळ वरील अनुपानांतून घेणें.

१) पोटावर रुईपानें एरंडेल लावून, गरम बांधावें. एक घट्ट कपडा मजबूत गुंडाळावा. पानें नसली तरीहि कपडा पहिलें दिवसापासून गुंडाळीत जावा. पोट उघडें ठेवू नये.

२) एकदा पोट, बरगडचा कडक शेकाव्या.

३) आठ दिवसांत समाधानकारक गुण न दिसल्यास वरील चारहि औषधें किंवा जरूर वाटेल तितक्या औषधीचें प्रमाण दिडपट वाढवावे.

ता. १२-११-५४ ला सूज कमी नाही म्हणून औषध बदललें.

| | | |
|---|---|---|
| १) | मूत्रकृच्छ्रांतक | ६ गुं. |
| | जलोदरारी | ४ ,, |
| | आरोग्यवर्धिनी | ६ ,, |
| | | ४ पुडचा |

Indira Gandhi National Centre for the Arts

| | | |
|---|---|---|
| २) | मंडूर | ६ गुं. |
| | वज्रक्षार | ४ ,, |
| | हिंगाष्टक | २४ ,, |
| | | ३ पुड्या |

दिवसांतून ७ पुड्या अनुपान वरील.

१) वरील औषध २३ नोव्हेंबरपर्यंत सुरू होते.

२) थोडी सूज कमी झाली.

३) लध्वी पुष्कळ बरी होऊं लागली.

४) पोटाचा घेर २–२ इंचांनी कमी झाला.

५) दस्त होणें थांबले नाही.

६) म्हणून औषधींत बदल केला.

| | |
|---|---|
| पं. पर्पटी | ४ गुं. |
| ग्र. गजकेसरी | ३ ,, |
| मूत्रकृच्छ्रांतक | ६ ,, |
| आ. वर्धिनी | ६ ,, |

४ पुड्या वरील अनुपानांतून.

१) वरील औषध १० दिवस सुरूं होते.

२) दस्त होणें कमी झाले. फक्त १–२ वेळा होऊं लागले.

३) पोटाचा घेर १–१ इंचांनी कमी झाला.

४) सूज सर्व उतरली.



Indira Gandhi National
Centre for the Arts

५) अशक्तता फार आली.
६) औषधींत बदल केला.

[illegible]

१) पु. मन्डूर   माक्षिक   लोह
    ४ गुं.   २ गुं.   २ गुं. = २ पुड्या.

२) मूत्रकृच्छ्रांतक   ६ गुं.
    आ. वर्धिनी   ६ ,,
    शंखवटी   ६ ,,
    ४ पुड्या

हें औषध दिवसांतून ६ वेळ वरील अनुपानांतून घेणें.

१) पोटाचा घेर पुन्हां १–१॥ इंचानी कमी झाला.
२) लघ्वी साफ होऊं लागली.
३) सूज नाहीशी झाली.

ता. ११ डिसेंबरला पूर्ण दुरुस्त होऊन गेला.

विशेष

१) जलोदराचे रोगी २ वर्षांत ५०-६० आले.
२) पोटांतील पाणी मुळीच काढलें नाही.
३) २–३ रोगी सोडून सर्वच दुरुस्त झाले.

Indira Gandhi National Centre for the Arts

# कास चिकित्सा विभाग

## अध्याय ९ वा

आयुर्वेदिय रोगनिदान व चिकित्सा यांचे संशोधन करण्याचे उद्देशाने माझे देखरेखीखाली सुरू असलेल्या धर्मार्थ आयुर्वेदिय वार्डात येथील रोग्याला तपासून औषधी योजना करताना जे अनुभव आले ते मी आता लिहित आहेत.

एकच औषध किंवा औषधीयोग १०० रोग्यांना देऊन त्यापैकी किती रोगी दुरुस्त होतात या उद्देशानें मी चिकित्सा करण्याला सुरुवात केली. या दोन वर्षांत आतांपर्यंत कोणत्या रोगाचे किती रोगी आले, त्यापैकी किती रोगी पूर्ण दुरुस्त झाले हे मी मागें लिहिलेच आहे. अजून कोणत्याहि एका रोगाचे शंभर ही संख्या पुरी झाली नाहीं, तरी पण तीन चार रोगाकरितां प्रत्येकी साठ साठ किंवा सत्तर सत्तर रोग्यावर उपचार करण्याची संधी मिळली. आणि त्या सर्वांना ठरलेले विशिष्ट औषध व औषधी योगच देण्यांत आलेला आहे. आणि यापुढेंहि शंभर रोगी त्या एकाच रोगाचे होईपर्यंत ते एकच औषध देण्यांत येईल. याप्रमाणें सात आठ रोगावर प्रयोग पाहणें सुरू आहे. जलोदर व शूळ या रोगावर दिलेली औषधे हे खरोखर संशोधनच म्हणावे लागेल.

आयुर्वेद महाविद्यालयांतील प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना उपयोगी पडावे म्हणून कांहीं रोगावरील चिकित्सेचे अध्याय लिहिले आहे.

### १ कास रोगाचे स्थान कास वर्णन

फुफ्फुस, कंठ, ऊर व गळा हेच स्थान अवलंबक कफ, प्राणवायु व उदान वायू यांचेंहि आहे. कास रोगांत ऊर व गळा म्हणजे फुफ्फुस व कंठ ही स्थानें विकृत होतात व त्या स्थानांत अनुक्रमे प्राणवायु व उदानवायु यांचेच कार्य होत असल्यामुळें त्यांच्या कार्यांतहि विकृति उत्पन्न होते.

### २ प्राणवायुचे कार्य

निश्वासन्न प्रवेशकृत् –श्वास आंत घेणें– बाहेरून आक्सिजन आत घेणे व अन्न गिळणें. उदान वायुचे कार्य नासा नाभी गलांश्चरेत् श्वास बाहेर टाकणें, आवाज उत्पन्न करणे. हे सांगण्याचे कारण एवढेच की कास रोगात वर सांगितलेल्या प्राणवायुच्या व उदानवायुच्या सर्व कार्यांत बिघाड होतो.